म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १६०५८

निबंध - सुगंध

ले. ना. सी. फडके

REFBK-0015121

# निबंध-सुगंध

ना. सी. फडके

19 MAY 1976

# निबंध-सुगंध

ना. सी. फडके

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ४०५११ वि: निबंध
क्रमांक १८५८ नों: दि: २३/५/५८

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
७५१२७

(मू)ल्य : रु. ६.००

(कॉ)न्टिनेन्टल प्रकाशन : पुणें

प्रकाशक
स. कृ. पाध्ये
व्हीनस प्रकाशन
"तपश्चर्या"
३८१ क, शनिवार पेठ
पुणें २

आवृत्ति पहिली
जानेवारी १९६६

मूल्य सहा रुपये

चित्रकार
ना. गो. जोशी

मुद्रक
वि. नी. पटवर्धन
साधना प्रेस
४३०-३१ शनिवार पेठ
पुणें २

REFBK-0015121

# अनुक्रमणिका

प्रकरण पृष्ठें

## भाग पहिला

१. लघुनिबंध म्हणजे काय ? व ते कसे लिहावे ? १
२. मी आणि माझे निबंध १६
३. मी लघुनिबंध का लिहितो ? २२

## भाग दुसरा

४. शब्द ! शब्द ! शब्द ! २९
५. माझा विरंगुळा ३५
६. आजी ४१
७. वर्षा ऋतु ४७
८. कश्मिरातील वसंत ५८
९. सुंदर स्त्रीची माझी कल्पना ६३
१०. मित्र ! मित्र ! ७१
११. जन्माचा जोडीदार ७७
१२. नको ती दूर चित्रवाणी ! ८३
१३. एक रंगलेली बैठक ९०

प्रकरण पृष्ठें

## भाग तिसरा


१४. आरशांत दिसणारं माझं रूप ! ९९
१५. माझा राजकीय पुढारीपणा ११७
१६. माझ्या हातून घडलेला एक प्रमाद १३५
१७. प्राध्यापकाच्या पेशांतील सुख-दुःखें १४४
१८. ना खंत ! ना खेद ! १४९


## भाग चवथा


१९. पन्नास वर्षांपूर्वीची माझी शाळा ! १५७
२०. हे माझं पुणं ! १६१
२१. खाऱ्या पाण्याखालची गंगा ! १६७
२२. पेशानं हुजऱ्या, परंतु वृत्तीनं रसिकाग्रणी १७३
२३. नट-सम्राट गणपतराव जोशी १८१
२४. जुन्या निबंधकारातील रसिकाग्रणी १९७
२५. कादंबरीकारांचे मूर्धाभिषिक्त राजे २०४
२६. पंतप्रधान गेले...! २१२

भाग पहिला

# लघुनिबंधाचा मंत्र आणि तंत्र

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों. दि. ........

# १ : लघुनिबंध म्हणजे काय ? व ते कसे लिहावे ?

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. १५७२१

मित्रहो !

लघुनिबंधाच्या स्वरूपासंबंधीं आणि तंत्रासंबंधीं कांही चर्चा करावी या उद्देशानं आपण माझ्याकडे आलांत याचा मला आनंद होतो. लघुनिबंध या नावानं जो वाङ्मयप्रकार ओळखला जातो त्याविषयीं लेखक आणि वाचक दोघांनाहि विशेष आकर्षण आहे.

आणि आपली चर्चा उपयुक्त ठरेल अशी आशा करायला कांही हरकत नाही. आपल्या या चर्चेला बराच सहाय्यक होईल असा एक विचार प्रारंभीच सांगावासा वाटतो. तो हा कीं, " निबंध " या नांवानं ऐंशी वर्षांपूर्वी जो साहित्यप्रकार मराठींत ओळखला जात असे त्याचा कायापालट झालेला आहे. इतका कायापालट की कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर आपल्यांत पुन्हा आले आणि त्यांच्या हातीं नव्या तऱ्हेच्या निबंधांचा एखादा संग्रह दिला तर ते खचित चकित होतील आणि म्हणतील, " काय हे निबंध म्हणतां ? अहो, या साऱ्यांची गोळाबेरीज केलीत तरी माझ्या निबंधमालेचे पुरते दोन अंकदेखील भरावयाचे नाहीत." उलट ज्यानं गेल्या पंचवीस वर्षांतलंच मराठी निबंधसाहित्य वाचलं आहे अशा एखाद्या विद्यार्थ्यानं चिपळूणकरांच्या निबंधमालेचं वाचन प्रथमच सुरू केलं तर तोहि आश्चर्यानं म्हणेल, " मला जे निबंध माहीत आहेत व आवडतात तसे हे नाहीत. यांना तुम्ही पांडित्यपूर्ण लेख म्हणा. पण निबंध ? ...छे ! "

चिपळूणकरांच्या काळांतले आम्हा मराठी लोकांच्या अंगावरचे लांब लांब अंगरखे हळू हळू लुप्त होऊन त्यांची जागा सुटसुटीत लांब्या कोटांनी घेतली त्याचप्रमाणे मराठी निबंधाचा पूर्वीचा विस्तार नाहीसा झाला आणि तो छोटा झाला.

**प्रश्न :** म्हणूनच निबंध असं न म्हणतां लघुनिबंध असं आपण म्हणूं लागलों, नाही का ?

**उत्तर :** होय, बरोबर आहे. परंतु पूर्णतः बरोबर नाही. कारण केवळ निबंध आकारानं आणि लांबीनं कमी झाला येवढंच घडलेलं नाही. तर निबंधाची पद्धतीच बदलली. त्यामागचा हेतुच बदलला. म्हणजे असं म्हणावं लागेल की निबंधाच्या आकारांत आणि भाषेंत—त्याच्या शरीरांत आणि वेषभूषेंत—जो फरक झाला आहे तो परिणामांच्या स्वरूपाचा आहे. खरी क्रांति झाली आहे ती निबंधाच्या अंतरंगांतली आहे. चिपळूणकरांच्या किंवा टिळकांच्या एखाद्या निबंधाचे दहा तुकडे केल्यानं दहा लघुनिबंध निर्माण होणार नाहीत. कारण ते निबंध विस्ताराने मोठे होते हा भिन्नतेचा खरा मुद्दाच नव्हे. जुन्या आणि नव्या मराठी निबंधांत खरा महत्त्वाचा फरक पडला आहे तो अंतरंगाचा.

**प्रश्न :** अंतरंगांतली क्रांति म्हणजे नक्की काय समजावं आम्ही ?

**उत्तर :** सांगतों. जुन्या निबंधाचे प्रमुख गुण दोन होते. पांडित्य आणि प्रचार. कोणत्या तरी एका मताचं मंडण अगर खंडण करण्यासाठीं निबंधकार लेखणी उचलीत असे. त्यामुळे स्वतःच्या पांडित्याचं प्रदर्शन किती करूं आणि किती नको असं त्याला होत असे. निबंधाची भूमिकाच वादविवादाची असे. स्वमत-प्रतिपादन आणि परमतनिर्दालन या हेतूनं निबंधकार प्रेरित झालेला असे. या हेतूला पोषक अशीं जीं हत्यारं तो वापरीत असे त्यांत साहाजिकच पांडित्याला पहिलं स्थान त्याला द्यावं लागे. चिपळूणकर-आगरकरांपासून तों खाडिलकर-केळकरांच्या निबंधांपर्यंत समग्र मराठी निबंध लेखनाला हें विधान लागू पडेल. खाडिलकर-केळकर यांचा उल्लेख मी मुद्दामच करतों आहे. कारण जुन्या काळांतील वृत्तपत्रीय

अग्रलेख निबंधाच्या सदरांतच घालावे लागतील. शिवराम महादेव परांजपे यांच्या निबंधांत कल्पनाविलास मोठ्या प्रमाणांत होता. भावनोत्कटता आणि वक्रोक्ति, व्याजोक्ति इत्यादि अलंकार यांच्या साहाय्यानं गद्य काव्याच्या सरहद्दीशीं येऊन भिडणारे त्यांचे "काळां" तील कांही निबंध वगळले तर १८८० पासून तों १९२५ पर्यंत मराठी निबंधाला वृत्तपत्रीय अग्रलेखाचंच स्वरूप होतं. मतप्रचार हा त्याचा हेतु होता. पांडित्य हा त्याचा मुख्य गुण होता. या कारणानंच तो विस्तारानं मोठा असे आणि त्याच्या हेतूला साजेल अशा भाषेंतच तो लिहिला जाई. मराठी निबंधांत १९२५ नंतर जी क्रांति झाली तिच्यामुळं निबंधाचा हेतु बदलला आणि हेतु बदलल्यामुळं त्याचा गुण तो आकारानं आणि लांबीनं कमी झाला. मी जी क्रांति म्हणतों तिचं स्वरूप लक्षांत आलं की नाही आता ?

**प्रश्न** : बरंचसं आलं. परंतु जुन्या-नव्या निबंधांतल्या फरकाची आणखी फोड करून सांगाल तर बरं होईल.

**उत्तर** : अवश्य फोड करतों. ऐका, पूर्वीं निबंध वाचला जात असे तो मतासाठी आणि पांडित्यासाठी. निबंधाचा "विषय" वाचकाला महत्त्वाचा वाटे व म्हणून तो त्याकडे वळे. अमुक अमुक सामाजिक, धार्मिक, राजकीय प्रश्नाविषयीं चिपळूणकर, आगरकर, टिळक, परांजपे, खाडिलकर, केळकर काय म्हणतात तें माहीत करून घेण्याची वाचकांची इच्छा असे व म्हणूच त्यांचे निबंध वाचले जात. निबंधाची योग्यता त्याच्या विषयावरून ठरत असे. जितका विषय मोठा आणि महत्त्वाचा तितकी निबंधाची योग्यता मोठी ठरत असे. परंतु नव्या थाटाच्या निबंधांत विषयाचं महत्त्व पार लयाला गेलं. मतप्रचार आणि पांडित्यप्रदर्शन हे हेतूच सुटल्यामुळे निबंधांत विषयाची मातबरी आता राहिलेली नाही. पूर्वी निबंधाच्या विषयांत वाचकांना गोडी वाटत असे, आणि म्हणून ते निबंध वाचीत असत. आता निबंधकार या व्यक्तींत आपल्याला गोडी वाटते आणि म्हणून त्यानं लिहिलेले निबंध आपण वाचतों. कसबी निबंधकाराला अमुक एका विषयाची गरज लागते असं

नाहीच. आणि याचाच अर्थ असा की आधुनिक लघुनिबंधाला विषयाची मर्यादा राहिलेली नाही. ज्या विषयाबद्दल लिहायचं त्याचं लेखकाला ज्ञान असलं पाहिजे असं देखील बंधन उरलेलं नाहीं. कारण त्या विषयाबद्दल आपण किती घोर अज्ञानांत आहोंत याबद्दल तो अत्यंत आकर्षक आणि मार्मिक तऱ्हेनं बोलत राहिला तर ? तोहि एक लघुनिबंधच म्हणावा लागेल की ! यावरून आधुनिक थाटाच्या निबंधांत पांडित्याचा बडेजाव कसा बिलकूल उरलेला नाही तें पहा.

**प्रश्न** : म्हणजे आत्मनिवेदनासाठी लघुनिबंध लिहिला जातो असं म्हणायचं की काय ?

**उत्तर** : अगदी बरोबर बोललांत. एखाद्या जलाशयाच्या कांठावर बसून आपण एक लहानसा दगड टाकतों व मग जलपृष्ठावर उठणारे तरंग पाहत राहतों, तद्वत या आधुनिक निबंधप्रकारांत कोणत्याहि विषयाच्या निमित्तानं लेखकाच्या अंतरंगांत उठणाऱ्या विचारविकारतरंगांचं दर्शन घडावं आणि त्यापासून आल्हाद व्हावा येवढीच वाचकाची अपेक्षा असते.

**प्रश्न** : बोध आणि प्रचार अजिबात वर्ज्य असतो ?

**उत्तर** : काटाक्षानं वर्ज्य समजायला हवा असं नव्हे, परंतु तो अभिप्रेत असलाच तरीसुद्धा फक्त ध्वनिख्यानंच तो प्रगट व्हायचा असतो. लघु-निबंधाचं मुख्य कार्य हें कीं विषयापेक्षा विषयाच्या अनुषंगानं लेखकाच्या व्यक्तित्वाची, त्याच्या स्वभावाची, त्याच्या आवडी-निवडीची ओळख वाचकाला झाली पाहिजे. नाटक अगर कादंबरी लिहितांना लेखकानं अप्रगट राहिलं पाहिजे असा जो संकेत आहे तो जुन्या निबंधांत पाळला जात असे. "आम्ही म्हणतों की," "आमचं स्पष्ट मत आहे की," "आम्ही विचारतों की" अशा प्रकारचीं वाक्यं त्यांत आढळलीं तरी एकंदरींत जुना निबंध तृतीय पुरुषी असे. उलट नवा निबंध प्रथमपुरुषी झाला आहे. निबंधाची आधुनिक कल्पना अशी की तो लिहितांना लेखकानं पदोपदीं प्रगट झालं पाहिजे. स्वतःविषयीं कलात्मक रीतीनं दुसऱ्याला जें जें म्हणून सांगतां येण्यासारखं असेल तें लेखकानं निबंधांत लिहावं अशी

परवानगीं आहे. इतकंच नव्हे तर लेखकाचं हें आत्मनिवेदन सौन्दर्याचे नियम संभाळून जितकं निःसंकोच होईल तितका त्याच्या निबंधाचा सरसपणा वाढेल. म्हणजे असं म्हणूं या की, आधुनिक लघुनिबंध हा पुष्कळ अंशीं संभाषणाच्या स्वरूपाचा असून सुहृद्भाव हा त्याचा आत्मा आहे.

लघुनिबंधाचा प्रकार 'रत्नाकर' मासिकांत प्रथम रूढ करतांना 'गुजगोष्टी' असं नांव मी वापरलं होतं तें याच कारणानं.

**प्रश्न** : जुन्या आणि नव्या निबंधांतील फरक आमच्या चांगला लक्षांत आला. नव्या लघुनिबंधाचा हेतु आणि गुण व लक्षण यांचीहि कल्पना आम्हांला आली. परंतु समजूत पक्की होण्याच्या दृष्टीनं एखाद्या लघुनिबंधाचं प्रत्यक्ष उदाहरणच घेतलं तर बरं होईल.

**उत्तर** : एक लघुनिबंध वाचून दाखवूं काय ?

**प्रश्न** : होय, तीच गोष्ट मला सुचवायची होती.

**उत्तर** : ठीक आहे. वाचूंया आपण एक लघुनिबंध. ऐका...किती वर्षांमागं कोण जाणे, पण कुणाबरोबर तरी मी मोटारींत बसून गिरगांवांतून दादरकडे जात होतों. सात रस्त्यांचा विस्तीर्ण चौक ओलांडून आमची गाडी पुढच्या सरळ रस्त्यानं जाऊं लागली आणि मग अगदी अकस्मात डाव्या हाताला वाळत घातलेल्या कपड्यांच्या रांगाच रांगा मला दिसल्या. या ठिकाणीं नदीकांठ नव्हता. वृक्षलता नव्हत्या. हिरवे तृणांकुर नव्हते. ज्यांच्या गळ्यांतल्या घुंगुरघंटा वाजत आहेत अशा गाई—म्हशी नव्हत्या. उलट आजूबाजूला धुरकट चाळी होत्या. मोकळ्या मैदानांत दहा ठिकाणीं केरकचऱ्यांचे ढीग साठले होते. पण या रुक्ष कळकट कोंदणांतदेखील दोरीवर झुलणाऱ्या कपड्यांच्या त्या रांगा मला नयनमनोहर वाटल्या.

मग दादरला जातांना किंवा तिकडून परत येतांना रोज त्या दृश्याकडे पाहण्यासाठीं मी आधीपासून तयार राहूं लागलो. ती ठरलेली जागा आली की, शेंकडो शुभ्र कपड्यांचा खूप मोठा थवाच्या थवा मला दिसे. रस्त्यांत बांबू उभे करून त्यांवर जाड दोरखंड ताणून त्या दोरावर कसरत करण्याचा

खेळ मांडणाऱ्या डोंबाऱ्याची मला एकदम आठवण होई. त्या डोंबाऱ्याप्रमाणे ते सारे कपडे वाऱ्याच्या झोताबरोबरच नाच करीत असत. सूर्यप्रकाश मनसोक्त खाणारे, वारा पिणारे, स्वतःची आर्द्रता टाकून देणारे ते कपडे बेभान होऊन वेड्यासारखे नाचत आहेत असं मला वाटे. डोंबाऱ्याप्रमाणे ते उंच आवाजांत ललकारी मारीत नसत इतकंच.

आणि एके दिवशीं उन्हांत चकाकणाऱ्या त्या शेंकडो कापड्यांची फडफड पाहतां पाहतां माझ्या मनांत आलं, हे कपडे उंच आवाजांत ओरडत नसतील; पण त्यांच्या आपापसांत गुजगोष्टी चालल्याच असतील. चोंचीला चोंच घालणाऱ्या पक्ष्यांप्रमाणे एकमेकांला अंग घासणारे हे शर्ट, हे लेंगे, या चादरी, या साड्या एकमेकींशीं खचित कांही तरी बोलत असतील. त्यांचा तो फडफड आवाज ही त्यांची भाषाच असेल. ही भाषा जर मला अवगत होईल, तर त्यांचीं तीं आपापसांतील बोलणीं मला कळतीलहि.

किती भिन्न भिन्न ठिकाणचे हे कपडे एकत्र आले होते. कांही बंगल्यांतले, कांही वाडींतल्या घरांतले, कांही चाळींतल्या खोलींतले, किती वेगवेगळ्या स्त्री-पुरुषांच्या अंगावरचे हे कपडे असतील, श्रीमंत, गरीब, सज्जन, दुराचरणी, पापभीरु, व्यसनी, बुद्धिमान, मूर्ख, अशा किती शेकडो तऱ्हांच्या व्यक्तींच्या अंगावर हे कपडे खेळले असतील. किती व्यक्तींचीं किती तऱ्हांचीं खाजगी आयुष्यं यांनी पाहिलीं असतील. सुस्वरूप आणि कुरूप अशा किती माणसांचीं शरीरं कपड्यांनी झाकली असतील. कितीकांच्या लाजेवर यांनी पांघरुण घातलं असेल. कितीकांचा निर्लज्जपणा यांना पहावा लागला असेल. या ठिकाणीं एकत्र आल्यावर हे कपडे एकमेकांत बोलल्याशिवाय काय राहत असतील ? जें जें पाहिलं, ऐकलं तें काय हे एकमेकांना सांगत नसतील ? असं कसं होईल? दूरदूरचीं अनोळखी माणसं थर्ड क्लासच्या डब्यांत एकत्र आलीं कीं कांही तरी निमित्तानं एकमेकांची ओळख करून घेतात आणि बोलायला लागतात, त्याप्रमाणे धोब्याच्या दोरीवर एकत्र आलेले हे कपडे परस्परांना फार गमतीच्या गोष्टी सांगत असलेच पाहिजेत.

शेजारीं शेजारीं दोरीवर लटकणारे हे पाच–पंचवीस हातरुमाल एक-मेकाला कांहीच सांगत नसतील ? पांढरे, रंगीत, चौकटीचे, सुती, रेशमी,

जाडेभरडे, तलम, मऊ, असे हे तऱ्हेतऱ्हेचे मस्त रुमाल दोनच दिवसांपूर्वीं किती भिन्न टिकाणीं होते. किती निरनिराळ्या व्यक्तींच्या हातांत होते. किती वेगवेगळ्या रीतींनी त्यांचा उपयोग झाला होता. हा जाड साधासुधा रुमाल साध्या माणसाचा निढळाचा घाम पुसण्याच्या कामीं लागला असेल. घाम पुसतांना प्रत्येक वेळेस प्रामाणिकपणानं श्रम करून थकलेला तो साधा माणूस म्हणाला असेल, " या जगांत खऱ्याची किंमत नाहीं. " वारंवार ऐकलेला तो उद्‌गार आता हा रुमाल इतर रुमालांना सांगत असेल काय ? पण तितक्यांत हा तलम रेशमी तांबड्या रंगाचा रुमाल निराळ्याच गोष्टी सांगूं लागत असेल. लक्षाधीशाच्या आळशी, व्यसनी मुलाच्या हातांत हा खेळला असेल, व पंचपक्वानांच्या मेजवानीनंतर त्याच्या तोंडावरून हा फिरला असेल. याच्या कानीं फार निराळे उद्‌गार सदोदित आले असतील. एखाद्या रुमालानं चंगीभंगी माणसाच्या बुशकोटाच्या वरच्या खिशांतून डोकावून दुनिया नेहमी पाहिली असेल, दुसऱ्यानं नेहमीं मसालेदार पान चघळणाऱ्या उडाणटप्पू माणसाच्या तोंडावर ओघळणारा रंग पुसण्याखेरीज दुसरं कांही केलं नसेल. हा रुमाल जुगाऱ्याबरोबर शहरांतले सारे जुगारी अड्डे फिरून आला असेल. तो रुमाल सराफकट्ट्यावरच्या जवाहिऱ्याच्या खिशांत राहिल्यामुळे कित्येकदां भारी किमतीच्या पाणीदार मोत्यांची संगत त्याला लाभली असेल. एखादा रुमाल मर्द शिकाऱ्याच्या खिशांत असल्यामुळे त्याला हिंस्र श्वापदांच्या रोमांचकारी हकीकती सांगतां येत असतील. दुसऱ्या एखाद्याचा धनी गायक असल्यामुळे त्याला किती तरी चिजा सहज तोंडपाठ झाल्या असतील. हा रुमाल कुणी तरी कुणाला भेट म्हणून दिलेला असेल आणि त्याला एक चित्तवेधक प्रेमकथा ठाऊक असेल. या दुसऱ्या रुमालानं एखाद्या रूपगर्वितेच्या डोळ्यांतून ओघळणारं काजळ पुसलं असेल. या तिसऱ्यानं एखाद्या प्रेमभंग झालेल्या तरुणीचीं आसवं टिपलीं असतील. सारांश, दोरीवर एकत्र वाळणारे हे रुमाल एकमेकांना काय सांगत असतील याबद्दलच्या कल्पना कराव्या तेवढ्या थोड्या होतील.

हा विचार ज्यावेळीं माझ्या मनांत प्रथम आला त्यावेळीं उन्हांत वाळत घातलेल्या त्या कपड्यांची शोभा अधिकच वाढल्यासारखी मला वाटली खरी, पण दुसऱ्या दिवशीं त्याचा मला त्रास होऊं लागला. धुलाईला

देण्यासाठी मी माझे कपडे गोळा करूं लागलों तेव्हा माझ्या मनांत आलं, हे कपडे जिथे वाळत घातले जातील तिथे कुणाच्या कपड्यांची आणि यांची भेट होईल त्याचा काय नियम, आणि माझ्याबद्दलच्या कोणकोणत्या गोष्टी हे दुसऱ्या कपड्यांना सांगतील कुणास ठाऊक ? अंग झांकण्यासाठी आपण कपडे वापरतों, पण त्यामुळे त्या बेट्यांना आपलं अंतरंग माहीत होतं. शरीरापेक्षा आपलं अंतरंग आपण शक्यतो जगापासून अधिक झाकलेलं असतं. आपले अनेक अनुभव आपण गुप्त ठेवलेले असतात, आपल्या कित्तीक इच्छा दडवलेल्या असतात. पण आपले कपडे आपल्या एकांतांतील गोष्टींना साक्षी असतात. आपलं सारं खासगी चरित्र त्यांच्या परिचयाचं झालेलं असतं. त्या चरित्रांतल्या नको त्या गोष्टींची वाच्यता माझ्या कपड्यांनीं दोरीवर उन्हांत वाळतां वाळतां इतर लोकांच्या कपड्यांजवळ केली म्हणजे ? मला क्षणभर वाटलं कीं, कपडे धुलाईला देऊं नयेत. पण मग एक उलट विचार माझ्या मनांत आला. तो हा, कीं, ज्या कपड्यांजवळ माझे कपडे कानगोष्टी करतील अशी मला शंका वाटते ते कपडे कांही आपापल्या धन्याजवळ त्याची वाच्यता करूं शकणार नाहीत. कपडे आपापसांत कितीहि बोलत असले तरी त्यांची भाषा तुम्हा–आम्हांला कांही कळत नाही. आपले कपडे एकत्र वाळले आणि एकमेकांशीं कितीहि बोलले तरी त्यांच्या साहाय्यानं तुमचीं गुपितं मला कळणार नाहींत, माझीं तुम्हांला कळणार नाहींत. कपड्यांची भाषा माणसाला कळावी असा शोध जोपर्यंत कुणी कल्पक शास्त्रज्ञानं लावला नाही तोपर्यन्त कपडे घराबाहेर धुलाईला गेले तरी हरकत नाहीं. ते ज्या स्थळीं वाळत घातले जातील त्या स्थळाला शोभा देण्यापलीकडे त्यांच्याकडून दुसरं कांही कार्य होणार नाही.

मग मी माझे कपडे धुलाईसाठी पाठवून दिले.

ऐकलात लघुनिबंध ? आता कांही प्रश्न विचारायचे असले तर विचारा.

**प्रश्न** : अगदी पहिला प्रश्न विचारावासा वाटतो तो हा की आपल्याला ह्या निबंधाचा विषय कसा सुचला ?

**उत्तर** : निबंधाच्या प्रारंभीच मी तें सांगितलं आहे. नाही का ? धोब्यांनी उन्हांत वाळत घातलेले कपडे माझ्या दृष्टीस पडले, आणि एकदम

मला वाटलं कीं लघुनिबंधाला योग्य असा हा विषय मला सापडला. अर्थात असे उन्हांत वाळत घातलेले कपडे पूर्वीहि मी अनेक वेळा पाहिले असतील. त्या वेळेस लघुनिबंध लिहिण्याचं कां सुचूं नये आणि त्या एका विवक्षित प्रसंगींच कां सुचावं तें सांगतां येणार नाही. कल्पनेचे व्यापार अखेर विश्लेषणाच्या पलीकडेच आहेत हेंच खरं.

**प्रश्न :** परंतु लेखकानं लघुनिबंधासाठी विषय कसा निवडावा याबद्दल कांहीं सांगतां येईल का ?

**उत्तर :** येईल. लघुनिबंधलेखनांत लेखकाच्या व्यक्तित्त्वाला महत्त्व आहे. विषयाला नाही, असं म्हटल्यानंतरहि विषयाची चर्चा आपण करीत आहोत यांत वर वर पाहतां विसंगति वाटण्यासारखी आहे हें तुमच्या लक्षांत आलंय ना ? परंतु खरं पाहतां तशी विसंगति नाहीं. कारण लघुनिबंधांत खरं महत्त्व आहे आत्मनिवेदनाला. असं म्हटल्यानंतर देखील त्या आत्मनिवेदनाला कांही तरी निमित्त हवंच की. या निमित्तालाच म्हणायचं लघुनिबंधाचा विषय.

**प्रश्न :** आलं लक्षांत. म्हणूनच सांगा लघुनिबंधाच्या विषयाबद्दल कांही सामान्य नियम आहे काय ?

**उत्तर :** ज्या निमित्तानं लेखकाला आपल्या अंतरंगाची एखादी मनोरंजक बाजू दाखवितां येईल असा कोणताहि विषय लघुनिबंधाला चालतो. अर्थात् विषयाच्या वैचित्र्याच्या दृष्टीनं लघुनिबंधाला कसलीच मर्यादा नाही. सामान्य सूचना म्हणून येवढंच म्हणतां येईल की जो सामान्य दृष्टीला क्षुद्र वाटेल असा विषय निबंधकारानं निवडावा. कारण निबंधाच्या मथळ्यांत सूचित होणारा विषय जितका अधिक क्षुद्र, आणि मथळा वाचताच "हा लेखक या विषयाबद्दल काय लिहिणार बुवा" अशी वाचकाच्या मनांत उद्‌भवणारी शंका जितकी जोराची, तितका चमत्कृतीचा भाग अधिक असणार, आणि या क्षुद्र विषयांतहि लेखकानं कांही तरी महत्त्वाचा आशय उभा केला की वाचकाला होणारा आल्हाद अधिक असणार हें उघड आहे.

**प्रश्न** : उन्हांत वाळत घातलेले कपडे पाहून आपल्याला विषय सुचला म्हणतां, पण तो सुचल्यानंतर निबंधाच्या मांडणीची कांही काळजी घेतलीत का ?

**उत्तर** : घेतली तर, दोरीवर वाळणाऱ्या कपड्यांना वाचा असली तर काय होईल ही माझ्या निबंधांतली मध्यवर्ती कल्पना आहे. या कल्पनेचा परिपोष मी कसा केला आहे तें पहा ना. लघुनिबंध मुख्यतः आत्मनिवेदनपर असल्यामुळे, मित्राशीं केलेल्या मनमोकळ्या संभाषणाच्या स्वरूपाचा असल्यामुळे खरं पाहतां मांडणी किंवा रचना यांचं फारसं महत्त्व त्यांत नाहीं. पूर्व पक्ष—उत्तर पक्ष, मुद्दे—प्रतिमुद्दे, प्रमाण-प्रतिप्रमाण इत्यादि जुन्या निबंधाच्या रचनेचीं अंगं नव्या लघुनिबंधांत अयुक्तच ठरतात. अमुक एक सिद्धांत सिद्ध करण्याचा हेतुच संपल्यावर पद्धतशीर मांडणीची अथवा बंदिस्तपणाची आवश्यकता राहणार कशी ? मित्राशीं नर्म भाषण करतांना आपण काय त्याची अवधानपूर्ण रचना करतों ? बोलण्यावरून बोलणं सुचतं, अन् तें सुचेल त्या क्रमानं आपण बोलत जातों नाही का ? मधेच एखादी गोष्ट पाल्हाळानं सांगावी, मधेच एखादा दाखला सांगावा, आपल्या विधानाला आधार देतांना स्मरणानं दगा दिला तरी "अमक्या त्या ह्यानं म्हटलं आहे ना ?" असं म्हणण्यांत दूषण मानूं नये, क्वचित् विषयांतरहि करावं अशा थाटानं मित्रमंडळींत आपण बोलत असतों कीं नाही ? मग लघुनिबंध याच थाटानं लिहायचा म्हटल्यावर रचनेच्या अगर मांडणीच्या कौशल्याचा प्रश्न गौण ठरावा हें क्रमप्राप्तच होय. ताजेपणा, मुग्धपणा, सहजपणा हे लघुनिबंधाचे प्राणभूत गुण आहेत. रचनेचा खटाटोप केला तर लघुनिबंधाला शोभा येण्याऐवजी त्याची खरी टवटवी मात्र नष्ट होईल. कृत्रिम प्रसाधनांनी नटलेल्या व वस्त्रालंकारांची काळजीपूर्वक रचना करून पुढे येणाऱ्या नटीपेक्षा घर्मबिंदूंनी आणि भुरभुर उडणाऱ्या केसांनी जिचं मुखमंडल शोभिवंत दिसत आहे, आणि आपण कुणाच्या दृष्टीस पडत आहोंत याचं भानहि जिला नाही अशा शेतांतल्या माचीवर उन्हांत उभं राहून पाखरं हाकणाऱ्या किशोरीसारखं लघुनिबंधाचं स्वरूप असलं पाहिजे.

**प्रश्न :** म्हणजे लघुनिबंधांत मांडणी किंवा रचना असूं नये असं म्हणायचं की काय ?

**उत्तर :** छे छे, असा भलताच निष्कर्ष नका काढूं. लघुनिबंधांत रचनेची खटपट " असूं " नये असं म्हणण्याऐवजी त्यांत रचनेची खटपट " दिसूं " नये असं समजायला हवं. सहजस्फूर्त संभाषणाच्या थाटानं लघुनिबंध प्रगट झाला पाहिजे हें तर खरंच आणि बंदिस्तपणाऐवजी थोडासा विस्कळीतपणाच त्याची शोभा वाढवितो हेंहि खरंच. तथापि हा विस्कळीतपणादेखील हेतुपूर्वक प्रयत्नानं साधायचा असतो हें विसरूं नका.

**प्रश्न :** माफ करा, पण एखादा उखाणा घातल्यासारखं बोलतांहा आपण.

**उत्तर :** असं का ? थोडंसं निराळ्या शब्दांत सांगतो. समजलं तर पहा. आपली बसायची खोली सजविण्याचे दोन प्रकार आहेत. त्यांतला एक असा कीं एखादी गौर मांडावी त्याप्रमाणं खोलींतल्या साऱ्या वस्तु अगदीं रेखीव तऱ्हेनं टापटीप मांडायच्या आणि दुसरा असा की खोलींतल्या वस्तु मुद्दाम मांडलेल्या नसून सहजगत्या त्या त्या ठिकाणीं पडल्या आहेत असा पाहणाराला भास होईल अशा तऱ्हेनं त्या ठेवायच्या. लघुनिबंधाची सजावट या दुसऱ्या प्रकारची असायला हवी. लघुनिबंधांतील मांडणीचा किंवा रचनेचा अभाव म्हणजे खराखरा अभाव नव्हे. तर अभावाचा कलात्मक आभास होय.

**प्रश्न :** पांडित्य हा जुन्या निबंधाचा प्रमुख गुण होता, आणि लघुनिबंधांत पांडित्याला स्थान नाही असं आपण सांगितल्याचं आठवतं. आपण आपला जो लघुनिबंध वाचून दाखविलात त्यांत तर पांडित्याचा प्रत्यय आम्हांला येतो हें कसं काय ?

**उत्तर :** रचनेच्या बाबतींत जें विधान मी केलं तेंच पांडित्याच्या बाबतींत करण्यासारखं आहे. लघुनिबंधांतला पांडित्याचा अभाव म्हणजे खराखुरा अभाव नव्हे तर अभावाचा कलात्मक आभास होय. नव्या थाटाच्या लघुनिबंधात कोणतीहि गोष्ट सिद्ध करायची नसते म्हणून

लेखकाच्या पांडित्याला त्यांत अवकाश नाहीं हें खरं. लघुनिबंध आत्म-निवेदनपर असतो हेंहि खरं. तथापि लघुनिबंधकाराच्या ठिकाणीं पांडित्य आणि कवित्व हे दोन्ही गुण असायलाच हवेत. लघुनिबंध म्हणजे संभाषण होय. परंतु ती कांहीं अरसिक मूर्खाची बडबड नव्हे. तें संभाषण ऐकतांना एखाद्या विद्याजड पंडिताचं प्रवचन आपण ऐकत आहोंत असं वाटून वाचक कुठेहि बिचकतां कामा नये. परंतु त्याबरोबरच वाचकाला असंहि सतत वाटत राहिलं पाहिजे की जो पंडित आहे, कवि आहे, ज्याच्या अनुभवाचा विस्तार फार मोठा आहे, ज्यानं मानवी व्यवहाराचे नाना रंग ढंग पाहिले व ओळखले आहेत, ज्यानं सत्कृत्यं केलीं आहेत आणि चुकाहि केल्या आहेत. ज्यानं जगरहाटीकडे रसिक दृष्टीनं पाहिलं आहे अशा बहुश्रुत मर्मज्ञाचं मधुर आर्जवी भाषण आपण ऐकत आहोंत. तेव्हा लघुनिबंधांत पांडित्य नसावं याचा अर्थ तो लिहिणाऱ्याच्या ठिकाणीं पांडित्य नसावं असा करतां कामा नये. निबंध लिहिणारा कवि असलाच पाहिजे. पंडित असलाच पाहिजे. परंतु पांडित्यप्रदर्शनासाठी निबंध लिहिला असं वाटतां कामा नये. पांडित्य ‘ असू ’ नये असं नव्हे तर पांडित्य ‘ दिसू ’ नये हेंच खरं. निबंधाच्या मिषानं वाचकाशी बोलतांना पांडित्याच्या उंच पायरीवरून बोलण्याऐवजी अगदी सामान्य माणसांत मिसळून हितगुज केल्याप्रमाणे निबंधकारानें बोलले पाहिजे.

**प्रश्न** : मघाशीं जो लघुनिबंध आपण वाचून दाखविलात त्यांतली सगळ्यांत अधिक कौशल्याची जागा कोणती ?

**उत्तर** : आपणच सांगा कीं.

**प्रश्न** : आम्ही ओळखलीच आहे. परंतु ती आपण सांगाल तर बरं होईल.

**उत्तर** : असं म्हणतां ? बरं सांगतों. ज्या ठिकाणीं उन्हांत वाळणाऱ्या कपड्यांच्या वर्णनावरून मी स्वतःच्या विचारावर आलों आहें आणि धुलाईला कपडे देऊंच नये असं मला वाटूं लागल्याचं वर्णन केलं आहे ती जागा फार कौशल्याची म्हणावी लागेल. इंग्रजींतला शब्द वापरायचा

झाला तर असं म्हणतां येईल की माझ्या निबंधांतला हा टच सगळ्यांत अधिक कौशल्यपूर्ण ठरावा.

**प्रश्न** : असं कोणत्या कारणासाठी म्हणतां आपण ?

**उत्तर** : अशा कारणासाठी कीं लघुनिबंधांत सर्वसामान्य विचारांना आणि काव्यात्मतेला कितीहि अवकाश असला तरी अखेर आत्मनिवेदन हेच त्याचं मुख्य लक्षण. मी वाचून दाखविलेल्या माझ्या लघुनिबंधांत वर्णनाच्या आणि कल्पनेच्या ज्या भराऱ्या आहेत त्यांनी त्या लघुनिबंधाला कितीहि शोभा आली असली तरी त्या शोभेचा कळस झाला आहे "मग मी माझे कपडे धुलाईसाठी पाठवून दिले." या अखेरच्या वाक्यानं. बरोबर आहे कीं नाहीं ?

**प्रश्न** : होय, बरोबर आहे. अगदी बरोबर आहे.

* * *

## २ : मी आणि माझे निबंध

मराठी साहित्याच्या जिवंतपणाच्या आणि सतत प्रगतीच्या ज्या अनेक खुणा सांगतां येतील त्यांतली एक अशी कीं त्यातल्या कोणत्याहि विशिष्ट प्रकाराविषयी बोलतांना जुनं आणि नवं यांतील भेद चटकन नजरेंत भरतो, आणि त्या भेदाची चर्चा करावी लागते.

हरीभाऊ आपट्यांनीं निर्माण केलेली मराठी कादंबरी आणि चालू घटकेची मराठी कादंबरी यांची तुलना करूं लागलं कीं तोंडांतून उद्गार निघतो, "ती जुनी, आणि ही नवी !" आपट्यांच्या कादंबऱ्या आजहि आवडीनं वाचल्या जातात. यापुढेहि कित्येक वर्षं वाचल्या जातील. त्यांच्या चांगलेपणाविषयीं दुमत नाही. तथापि त्या कादंबऱ्यांचं वळण आता जुनं झालं, आणि मराठी कादंबरीचं नवं वळण फार वेगळं आहे असं म्हणायलाच हवं, मराठी लघुकथेच्या बाबतींत देखील जुनी कथा आणि नवी कथा यांतली तफावत चटकन् लक्षांत येते, ज्या नव्या वळणाची लघुकथा सध्या लिहिली जाते ती लिहिण्याचं पन्नास वर्षांपूर्वीच्या कथाकारांच्या स्वप्नांतहि आलं नसतं; आणि जुन्या वळणाच्या ज्या लघुकथा विसाव्या शतकाच्या पहिल्या पंचवीस वर्षांत मासिकांच्या संपादकांनी अगत्यानं छापल्या आणि वाचकांना आवडल्या त्या आता कुणी मासिकाचा संपादक स्वीकारील व त्यानं त्या छापल्या तर वाचक त्या आवडीनं वाचतील अशी आशा करतां येणार नाहीं. अण्णासाहेब किर्लो-स्करांच्या वेळचं जुनं संगीत नाटक ज्याप्रमाणे काळाच्या पडद्याआड कायमचं

अंतर्धान पावलं त्याप्रमाणे मराठी कादंबरीचं, कवितेचं, आणि लघुकथेचं जुनं वळणं आता इतिहासजमा झालेलं आहे. आणि मराठी निबंधांच्या बाबतींतहि असंच झालेलं आहे. जुन्या थाटाचा मराठी निबंध आता सहसा कुणी लिहीत नाही. त्या जुन्या निबंधाहून अगदींच निराळ्या धाटणीचा निबंधप्रकार आता मराठींत रूढ झालेला आहे. हा नवा प्रकारच लेखक हाताळतात. हाच वाचकांना आवडतो. निबंधाचा हा नवा प्रकार आजकालच्या वाचकांच्या इतक्या परिचयाचा झालेला आहे, की ज्या वाचकांचं वाचन चालू घटकेच्या साहित्यापुरतंच मर्यादित आहे त्यांना निराळ्या प्रकारचा निबंधप्रकार एके काळीं रूढ होता हें सांगून देखील खरं वाटायचं नाहीं.

गेल्या तीस वर्षांत जो नव्या तऱ्हेचा मराठी निबंध प्रचारांत आला त्याची पहिली खूण म्हणजे त्याचं लघुत्व. त्याची छोटी लांबी रुंदी. आणि याहून महत्त्वाची अशी त्याची दुसरी खूण म्हणजे त्याचं लालित्य.

गेल्या तीस वर्षांतल्या एकंदर मराठी साहित्याकडे नजर टाकली तर आपल्याला असं एक विधान करतां येईल कीं लालित्यानं पांडित्यावर झपाट्यानं आक्रमण केलेलं आहे. १८८० ते १९२५ या पंचेचाळीस वर्षांच्या कालखंडात विचार आणि भाषा या दोन्ही बाबतींत रुक्षता आणि जडत्व हे गुण समजले जात होते, व त्यांचं कौतुक होत होतं, परंतु हें कौतुक कमी कमी होत जाऊन आधुनिक मनाला आकर्षित करील अशा चापल्याचा, प्रवाहित्वाचा, आणि नीटनेटकेपणाचा साज साहित्याच्या सर्व प्रकारांवर चढत गेलेला गेल्या तीस वर्षांत आपल्याला स्पष्टपणे दिसून येतो. या कालखंडांत मराठी कादंबरीचा थाट तर कल्पनेपलिकडे पालटलाच. लालित्याचीं नवीं नवीं लेणीं या साहित्यप्रकारावर लेखकांनी घातलींच. पण शिवाय पूर्वी जो एक साहित्यप्रकार लालित्याशीं कांहीं संबंध नसल्या-प्रमाणे वावरत असे त्यालाहि चुचकारून आणून कलात्मक स्वरूप देण्याची कामगिरी नव्या शैलीच्या लेखकांनीं करून दाखविली. हा लेखनप्रकार म्हणजे " निबंध ! "

मराठींतल्या या नव्या तऱ्हेच्या ललित लघुनिबंधाची प्रथा सुरू करण्याचा मान मला देण्यांत येतो. योग्य तो विनय न सोडतां, हा मान स्वीकारण्यांत मला संकोच वाटत नाही. या नव्या तऱ्हेचे निबंध प्रथम मी लिहिले, मराठी वाचकांना ते एकदम आवडले. निबंधाचा हा प्रकार लोकप्रिय झाला, मराठींतले नामवंत लेखक या प्रकारचेच निबंध लिहूं लागले, आणि ललित लघुनिबंधाला एकंदर मराठी साहित्याच्या संसारात मानाचं स्थान मिळालं—या साऱ्या गोष्टी खऱ्या आहेत.

तथापि एक प्रामाणिक कबुली मला द्यायला हवी असं वाटतं. ती कबुली अशी की, तीस वर्षांपूर्वी नव्या तऱ्हेचे ललितनिबंध जेव्हा मी प्रथम लिहावयास लागलों तेव्हा या तऱ्हेचा लघुनिबंध म्हणजे अमूक अमूक प्रकारचा अशी रेखीव व्याख्या कांहीं माझ्या मनासमोर नव्हती. निबंधाच्या नव्या प्रकाराचं निश्चित स्वरूप कोणतं, त्याचं उद्दिष्ट कोणतं, त्याचे विशिष्ट गुणधर्म कोणते खास त्याचं असं तंत्र कोणतं-इत्यादि प्रश्नांचा विचार मी केलेला नव्हता. मी लिहूं लागलों, जे निबंध लिहिले ते वाचकांना फार आवडले, आणखी आणखी लिहीत गेलों, आणि अशा प्रकारं बरेच निबंध लिहिल्यानंतर मी विचार करूं लागलों कीं हा जो नवीन निबंधप्रकार मी लिहितों आणि वाचकांना फार आवडतो त्याचं वैशिष्ट्य कोणतं ? त्याची खरी गोडी कशांत आहे ? त्याची रचना कशी असते म्हणून लोकांना आवडते ? त्याची भाषा कशी असते म्हणून लोकांना ती चटका लावते ? त्यांत काय सांगितलेलं असतं म्हणून वाचक त्याकडे आकर्षित होतात ?

याचा अर्थ असा कीं मी जरी सुमारे पाऊणशें निबंध लिहिले असले तरी त्यांतले पहिले सुमारे दहा निबंध अजाणतेपणानं, आंधळेपणानं लिहिले. १९२५ सालीं 'रत्नाकर' नांवाचं मासिक मी चालवीत होतों. याच मासिकांत "जादुगार" व "दौलत" या माझ्या कादंबऱ्या क्रमशः प्रसिद्ध झाल्या. हरीभाऊंच्याहून अगदी वेगळ्या धर्तीची कादंबरी मराठी वाचकांना वाचायला मिळाली, आणि कादंबरीकार म्हणून माझं नांव झालं. याच मासिकांत क्रिकेटच्या चौरंगी सामन्यांचीं व हॉकीच्या सामन्यांचीं मी केलेलीं वर्णनं मराठी वाचकांना प्रथम वाचायला मिळालीं. 'रत्नाकर'

मासिकाच्या वाचकांना नित्य कांही तरी नवं चटकदार लालित्यपूर्ण असं वाचायला देण्याची माझी धडपड होती. या तळमळीमुळे मी नित्य नव्याच्या शोधांत होतों. या माझ्या शोधांतच मला नवा मराठी निबंध सापडला !

कित्येक इंग्रजी लेखकांचे चटकदार लघुनिबंध माझ्या वाचनांत आले होते. ते वाचून मला वाटूं लागलं : असं कांही तरी मराठी वाचकांना द्यायला हवं. आणि या इच्छेच्या पोटीं 'सुहास्य' या माझ्या पहिल्या आणि मराठींतल्याही पहिल्याच लघुनिबंधाचा 'रत्नाकर' मासिकांत जन्म झाला.

"असं कांहीतरी लिहावं." एवढाच संदिग्ध आणि ढोबळ विचार मी केला होता. वाचकांना जो चिंतनीय वाटेल असा कोणता तरी विचार सांगायचा, तो थोडक्यात सांगायचा, आणि अतिशय चटकदार भाषेंत सांगायचा यापलिकडे फारसा विचार मी केला नव्हता, 'सुहास्य' हा माझा पहिला निबंध म्हणजे कांहीशा अंधळेपणानं मी केलेला एक प्रयोग होता. सहज सुचलेली गाण्याची लकेर खुशाल मोठ्या आवाजांत गावी तशापैकी माझं तें करणं होतं. माझा तो पहिला प्रयोग लोकांना पसंत पडल्याचं दिसलं तेव्हा आणखी लिहीत गेलों. तथापि रत्नाकरांत प्रसिद्ध झालेल्या माझ्या लघुनिबंधाचा एक गट कल्पिला तर त्याविषयीं मला असं सांगितलं पाहिजे की ते निबंध लिहितांना माझ्या लिहिण्यांत स्फूर्ति होती पण डोळसपणा नव्हता. लोकांना चिंतनीय वाटेल असा कोणता तरी एक विचार सांगायचा, मासिकाच्या चार पांच पानांतच तो संपेल इतक्या आटोपशीरपणानं सांगायचा, आणि चटकदारपणानं सांगायचा एवढीच कल्पना माझ्या डोक्यांत होती. रत्नाकरांत प्रसिद्ध झालेले माझे लघुनिबंध त्या वेळेस लोकांना फार आवडले. आजहि आवडत असतील. परंतु मी कांहीं त्यांना आदर्श लघुनिबंध म्हणणार नाही. माझे जे निबंध मला आवडतात ते नंतरच्या काळांत लिहिले गेलेले. हे नंतरचे निबंध लिहितांना जो निबंधप्रकार मी रूढ करीत होतों त्याच्या विशिष्ट गुणधर्मांची स्पष्ट कल्पना मला आलेली होती. पूर्वीसारखा मी आता चाचरत नव्हतों, अडखळत नव्हतों, रस्ता शोधीत नव्हतों. मला वाट सांपडली होती. नव्या ललित लघुनिबंधाचं स्वरूप जुन्या निबंधाहून कोणत्या बाबतींत वेगळं आहे त्याचं निश्चित ज्ञान मला झालं होतं.

चिपळूणकरांच्या काळांतले आम्हा मराठी लोकांच्या अंगावरचे लांब लांब अंगरखे हळू हळू लुप्त होऊन त्यांची जागा सुटसुटीत लांड्या कोटांनी घेतली, त्याचप्रमाणे मराठी निबंधाचा पूर्वीचा विस्तार नाहीसा होऊन त्याला छोटेपणा आला, हा मोठा फरक तर कुणालाहि दिसण्यासारखा आहे. परंतु बाह्य स्वरूपांतल्या या फरकाहून निबंधांच्या अंतरंगांत आणि हेतूतच जी क्रांति झाली ती अधिक महत्त्वाची आहे.

पूर्वी निबंध वाचला जात असे तो त्यांतील पांडित्यासाठी. निबंधाचा ‘ विषय ’ वाचकाला महत्त्वाचा वाटे. म्हणून त्याकडे तो वळे. निबंधकार या ‘ व्यक्ती ’पेक्षा तो कोणत्या विषया’चं प्रतिपादन करतो याच्याकडे वाचकांचं लक्ष असे, व निबंध वाचतांनाही वाचकांचं सारं अवधान ‘ विषया ’कडे असे. निबंधाची योग्यता त्याच्या विषयावरून ठरत असे. परंतु ज्या नव्या थाटाचा निबंध मला रूढ करावयाचा होता त्यात विषयाला महत्त्व नव्हतं, निबंधकार या ‘ व्यक्ती ’ला महत्त्व होतं. एखाद्या जलाशयाच्या काठावर बसून आपण एक लहानसा दगड त्यांत टाकतो व मग जलपृष्ठावर उठणारे तरंग पाहतों, तद्वत निबंधाच्या आधुनिक प्रकारांत कोणत्या तरी विषयाच्या निमित्तानं लेखकाच्या अंतरंगात उठणाऱ्या विचार-विकार तरंगांचं दर्शन व्हावं व त्या दर्शनापासून आल्हाद व्हावा, एवढीच, वाचकांची अपेक्षा असते. जो नवा निबंध-प्रकार मी रूढ करीत होतों त्याचं मुख्य कार्य काय ? या प्रश्नाचं उत्तर मी असं ठरविलं की ‘ विषया ’पेक्षां विषयाच्या अनुषंगानं लेखकाच्या व्यक्तित्वाची, त्याच्या स्वभावाची, त्याच्या आवडीनिवडीची ओळख वाचकाला रमत गमत खेळकरपणानं करून देणं हा निबंधाचा मुख्य हेतु असायला हवा. स्वतः-विषयीं कलात्मक रीतीनं दुसऱ्याला जें जें म्हणून सांगतां येण्यासारखं असेल तें तें लेखकानं निबंधांत लिहावं अशी परवानगी आहे. इतकंच नव्हे तर लेखकाचं हें आत्मकथन सौंदर्याचे नियम न मोडतां जितकं निःसंकोच असेल तितका त्याच्या निबंधाचा सरसपणा वाढतो. म्हणजे अंतरंगांतल्या मित्रमंडळीशीं गप्पा मारतांना जो मनमोकळेपणा आपण स्वीकारतों तो स्वीकारून निबंधकारानं लिहिलं पाहिजे. अर्थात् नवा निबंध पुष्कळ अंशीं संभाषणाच्या स्वरूपाचा असायला हवा, आणि सुहृद्भाव असायला हवा,

आणि हा त्याचा आत्मा म्हणायला हवा. दहा बारा निबंध लिहून झाल्यावर ही गोष्ट मला स्पष्टपणे कळली हें खरं. परंतु गंमत अशी की या गोष्टीची अंधुक जाणीव रत्नाकरांतला अगदी पहिला निबंध लिहितांना देखील मला होती. कारण निबंधाचं सदर मी रत्नाकरांत सुरू केलं त्याला ' निबंध ' असं नांव मी दिलं नव्हतं, गुजगोष्टी असं नांव दिलं होतं ! पुढे कित्येक वर्षांनी मी असेच नव्या थाटाचं निबंध ' प्रतिभा ' नांवाच्या पाक्षिकांत लिहूं लागलों, तेव्हां त्यांना मी सामान्य मथळा दिला " धूम्रवलयें. "

सारांश, रत्नाकराच्या काळानंतर जे निबंध मी लिहिले त्यांत मित्रमंडळींच्या बैठकींत बसून मनमोकळेपणानं गप्पा मारण्याची भूमिका अधिक जाणतेपणानं मी स्वीकारलेली दिसेल, अशी भूमिका स्वीकारल्यामुळे माझी निबंधाची भाषाहि अधिक खेळकर आणि हलकी फुलकी झालेली आढळेल. विषयांची निवड आणि सजावट यांतहि फरक पडत गेलेला दिसेल.

आपण सामान्य माणसं द्वेष करतों, लोभ करतों, प्रेम करतों, विविध आशा उराशीं बाळगतों. मनोरथ करतों, जें करायला नको होतं ते केलं आणि जें करायला हवं होतं तें राहिलं अशा दुहेरी जाणिवेनं व्याकूळ होतों, आणि कधी हंसत तर कधी सुस्कारे सोडीत जीविताची वाट चालत असतों.

उत्कृष्ट निबंधकार आपल्याला भेटला की ज्याचे अनुभव बहुतांशी आपल्यासारखेच आहेत परंतु जो त्यांचं वर्णन आपल्याला साधत नाही इतक्या मनोज्ञ रीतीनं करतो अशा एका सोबत्याची संगत आपल्याला मिळाल्यासारखी वाटते, व मग जीवितमार्गावरची सहल करण्यास आपल्याला नवा हुरूप येतो. उत्कृष्ट निबंधाच्या संग्रहाचं एखादं पुस्तक ज्याच्याजवळ असेल त्याला मार्मिक व सुंदर संभाषणांनी रिझविणाऱ्या मित्रांची वाण कधी भासणार नाही. निबंधसंग्रहाचं कुठलंहि पान उघडावं, आणि सन्मित्र संभाषणाचा आस्वाद घ्यावा !

नव्या तऱ्हेचा जो लघुनिबंध मी रूढ केला त्याचं स्वरूप हें अशा प्रकारचं आहे.

* * *

## ३ : मी लघुनिबंध कां लिहितों ?

१९२६ सालच्या सुमारास 'रत्नाकर' नांवाच्या मासिकाचं संपादन माझ्याकडे होतं. आम्ही काढलेल्या या मासिकाला अल्प कालांत मोठीच प्रतिष्ठा लाभली, याचं श्रेय त्या पिढींतल्या ज्येष्ठ साहित्यिकांना द्यायला हवं. त्यांनी कोणत्याहि प्रकारच्या मोबदल्याची मागणी तर राहोच, पण अपेक्षा देखील न करतां मुबलक लेखनसाहाय्य तत्परतेनं केलं. नवे नवे लेखक शोधून त्यांना लेखनास प्रवृत्त करण्याच्या कामांतहि मला यश मिळालं. तथापि सुमारे ऐंशी पृष्ठांचा अंक भरेल इतक्या मजकुराची जुळणी प्रत्येक महिन्याला वक्तशीरपणानं करण्याचं काम बरंच कठीण असे. लेखक लेखांचीं वचनं देत, परंतु त्यांच्याकडून या बाबतींत चालढकल साहजिकच होत असे. उत्तम वाचनीय मजकुरानं भरलेला अंक दरमहा वाचकांच्या हातीं तर द्यावयास हवा असे. या अडचणींतून मार्ग काढण्यासाठी शक्य तितका मजकूर स्वतःच लिहून तयार करण्याची योजना करावी लागली.

माझी कादंबरी तर 'रत्नाकर' मध्ये चालू असेच. ज्याखाली मी सही करीत नसे, असाहि बराच मजकूर मी अंकासाठी तयार करीत असे. परंतु एवढ्याने भागण्यासारखं नव्हतं. या गरजेमुळेच क्रिकेटचे सामने, हॉकीचे सामने, मल्लांच्या कुस्त्या असे अनेक विषय मी शोधूं लागलों आणि त्या त्या विषयांवर माझ्या सहीनं लिहूं लागलों. हे विषय तोंपर्यंत मराठी लेखकांनी कांहीसे दुर्लक्षित केले होते. या कारणानंच या विषयावरील माझ्या लेखनांत वाचकांना विशेष नावीन्य वाटूं लागलं. आता चालू घटकेला क्रीडा, संगीत या विषयांना मराठी साहित्यांत मानाचं स्थान मिळालेलं आहे. मासिकं आणि वृत्तपत्रं यांनी या विषयांचं महत्त्व ओळखलं आहे.

मर्मज्ञ आणि चटकदार शैलीनं लिहिणारे नवे नवे लेखकहि उदयास आलेले आहेत. परंतु पस्तीस वर्षांपूर्वी या विषयांना मराठी साहित्यांत प्रविष्ट करण्याचं श्रेय 'रत्नाकर' मासिकांतील माझ्या लेखांकडे जाईल असं वाटतं. चूकभूल द्यावी, घ्यावी.

'रत्नाकर' मासिकांत लेखनाचे नित्य नवे नवे प्रयोग करीत असतांनाच 'लघुनिबंधा'ची कल्पना माझ्या मनांत आली. त्या सुमारास इंग्रजी कथा-कादंबऱ्यांचं वाचन जसं मी पुष्कळ करीत होतों, त्याचप्रमाणे नव्या धर्तींच्या इंग्रजी निबंध-साहित्याशींहि माझा परिचय वाढत होता. गार्डिनर, ल्यूकस यांसारख्या लेखकांचे सुटसुटीत आणि चुरचुरीत निबंध फार लोकप्रिय ठरले होते. 'आल्फा ऑफ दी प्लाऊ' या टोपण नांवानं लिहिले जाणारे इंग्रजी लघुनिबंध मराठी वाचकांच्या वाचण्यांत बऱ्याच मोठ्या प्रमाणावर येत होते. 'पिलर्स ऑफ सोसायटी' अशा सामान्य मथळ्याखाली लिहिलेल्या शब्द-चित्रांच्या धर्तींच्या त्याच्या निबंधांतील जगविख्यात क्रिकेटर रणजीत यांजवरील निबंध विशेष गाजला होता. गार्डिनर, ल्यूकस, अशीं कांही निबंधलेखकांचीं नांवं मराठी वाचकांना बरींचशीं परिचित होतीं. रिचर्ड किंग नांवाचे एक लेखक 'टॅट्लर' नांवाच्या एका इंग्रजी साप्ताहिकांत अशा प्रकारचेंच निबंधलेखन करीत असत. त्यांचं नांव मराठी वाचकांना फारसं माहीत नव्हतं. मला मात्र या लेखकाचं लिहिणं फारच मोहक वाटत होतें.

आधुनिक धर्तीच्या इंग्रजी लघुनिबंध-साहित्याशीं माझा परिचय जों जों वाढला तों तों माझ्या मनांत अधिकाधिक तीव्रतेनं येऊं लागलं की हा वाङ्मयप्रकार मराठींत आणला पाहिजे. ही कल्पना मनांत दृढ होऊं लागली तेव्हा इंग्रजी लघुनिबंधाचं वाचन मी अधिक डोळसपणाने करूं लागलों. या वाङ्मयप्रकाराचं वैशिष्ट्य कोणतं ? हा वाङ्मयप्रकार लिहितांना लेखकानं कोणतीं पथ्यं पाळलीं पाहिजेत ? कोणता हेतु मनाशीं धरला पाहिजे ? कोणत्या शैलीचा अवलंब केला पाहिजे ? इत्यादि प्रश्नांचीं उत्तरं मी शोधूं लागलों. 'पर्सनल एसे,' 'इंटिमेट एसे' अशीं नांवं या वाङ्मयप्रकाराला इंग्रजींत रूढ झालीं होतीं. या दोन्ही नांवांतील अभिप्राय एकत्र करून 'गुजगोष्टी' हें नांव वापरावंसं मला वाटलं. या नांवाखालीच मी लघुनिबंधाचा हा नवा प्रकार 'रत्नाकर' मध्ये लिहूं लागलों. 'सुहास्य' नांवाचा जो पहिला

लेख लिहिला तो एकदम लोकप्रिय झाला. माझी खात्री पटली की अशा कांही तरी नव्या प्रयोगाची ऐतिहासिक गरज होती ती मी भागविली होती. मराठींत ' निबंध ' या नांवानं लिहिलेलं साहित्य विपुल होतं, फार मोठ्या सामर्थ्याच्या माणसांनी निबंधसाहित्य संपन्न केलं होतं. त्यांच्या निबंधांनी समाजजागृतीचं कार्यहि मोठ्या प्रमाणावर साधलं होतं. वाचकांच्या कित्येक पिढ्यांनी ' निबंध ' आस्थेनं वाचला होता. आणि तरीहि नव्या तऱ्हेच्या निबंधाची ऐतिहासिक गरज होतीच.

चिपळूणकरांपासून सुरू झालेली निबंधाची परंपरा खंडित झालेली नव्हती. जुन्या घाटाचा निबंध अजूनहि लिहिला जात होताच. ज्या प्रतिज्ञेनं चिपळूणकरांनी निबंधलेखनासाठी लेखणी उचलली होती त्याच प्रतिज्ञेनं अनेक मातबर लेखक निबंधलेखन करीत होते. जुन्या थाटाच्या या निबंधाचं कार्य चालू होतंच. निबंधाचा जो नवा प्रकार रूढ करण्याचा प्रयत्न मी करीत होतों त्याचं जुन्या निबंधाशीं भांडण बिलकुल नव्हतं. जुन्या निबंधाचं उणं काढून नव्या निबंधाला लोकप्रियता मिळावयाची नव्हती. जुन्या निबंधाचं जें क्षेत्र ठरलेलं होतं त्या क्षेत्रांत नव्या निबंधाला लुडबूड करायची नव्हती. नवं क्षेत्र दिसत होतं, आणि त्या क्षेत्रांत वाचकांना संतुष्ट करण्याची त्याची प्रतिज्ञा होती. जुन्या निबंधाच्या घरांतून त्याला बाहेर काढून त्यांत प्रवेश मिळविण्याची नव्या निबंधाची इच्छा नव्हती. त्याची महत्त्वाकांक्षा एवढीच होती की जुन्या निबंधाच्या जुन्या पेशवाई थाटाच्या वाड्याजवळ आपलंहि एक लहानसं नव्या धर्तीचं बंगलीवजा टुमदार घर बांधावं आणि आधुनिक मराठी वाचकांना तें एक रमणीय विश्रामस्थान वाटावं.

जुन्या मराठी निबंधामागची मुख्य प्रेरणा प्रचाराची होती. समाजाला कांही तरी शिकविण्याची होती, जागृत करण्याची होती. आणि समाजाला शिकविण्याचा अधिकार आपल्याला आहे ही गोष्ट सिद्ध करण्यासाठी निबंधलेखकाला विद्वत्ता आणि आपलं पांडित्य प्रगट करावं लागत असे. म्हणजे जुन्या मराठी निबंधाचा हेतु ' प्रचार ' होता आणि ' पांडित्य ' ही त्याची विशिष्ट प्रकृति आणि लक्षण होतं. निबंधाचा जो नवा प्रकार रूढ करावासा मला वाटला तो हेतु आणि प्रकृति या दोन्ही दृष्टींनी जुन्याहून अगदी वेगळा होता. या नव्या निबंधाला समाजजागृति किंवा प्रचार

साधायचा नव्हता. इतकेंच नव्हे तर अमुक एका हेतूच्या सिद्धतेसाठीं तो लिहिला जावयाचा नव्हता. वाचकाला अमुक एक गोष्ट पटविण्यासाठी म्हणून नव्या निबंधाचं लेखन व्हायचं नव्हतं. अर्थात् नव्या निबंधाच्या लेखकाजवळ पांडित्य असावयास हवं अशीहि गरज नव्हती. जुन्या निबंधाचे विषय साहजिकच मोठे गंभीर होते. उलट नव्या निबंधाचं स्वरूप असं असणार होतं की गंभीर तर राहोच, परंतु अमुक एक विषय निवडला आणि लेखकानं त्या विषयावर लिहिलं असं देखील व्हायला नको होतं. साध्या विषयांत सुद्धा कांही तरी रमणीय आशय कवीला आढळतो अशा अर्थाचं जें एक सुभाषित आहे त्याच्या अनुरोधानं नवा मराठी निबंध लिहिला जाणार होता. म्हणजेच असं की हा जो मराठी निबंध अवतीर्ण व्हावयाचा होता त्याचं कवितेशीं फार जवळचं नातं होतं.

या भूमिकेवरून मी नव्या प्रकारचा लघुनिबंध लिहिण्यास प्रारंभ केला. जो वाङ्मयप्रकार मी लिहूं लागलों तो निबंधाच्याच जातीचा खरा, परंतु निबंधाहून त्याचं स्वरूप फार वेगळं कल्पून मीं तो प्रचारांत आणला. मला नुसते लहान निबंध लिहावयाचे असते तर ' लघुनिबंध ' हें नांव मी वापरलं असतं. परंतु ' गुजगोष्टी ' असं नांव मी वापरलं. कारण मला असं सूचित करायचं होतं की या लेखनप्रकाराचं स्वरूप निकटवर्ती मित्रांशीं केलेल्या गुजगोष्टीसारखं असावं. मी लिहूं लागलों. परंतु जो वाङ्मयप्रकार लिहीत होतों त्याचं तंत्र, जसं जसं अधिक लिहिलं तसं तसंच मला अधिक कळलं. माझ्या लक्षांत येऊं लागलं की या लेखनप्रकारांत मार्मिक विचारांना अवकाश असतो, परंतु एखाद्या विषयाचा सांगोपांग विचार करण्याची खटपट केली तर ती सौंदर्यविघातक ठरते. तसंच या लेखनप्रकारांत उपमालंकारांना स्थान असतं, परंतु काव्याचा अतिरेक त्याला खपत नाही. मार्मिक आणि नवे विचार आणि ते पुढे मांडण्याचं लालित्य हीच या लेखनप्रकाराची मुख्य सामग्री आहे.

आधुनिक मराठी लघुनिबंधाची लघुता म्हणजे कांही त्याचं व्यवच्छेदक लक्षण नव्हे. चमत्कृति हा त्याचा आत्मा आहे. ही चमत्कृति विषयाच्या निवडींत असेल किंवा विषयाच्या मांडणींत असेल. या चमत्कृतीच्या अनुरोधानं लघुनिबंधांत लेखकाची एक विशिष्ट वृत्ति प्रगट होत असते. लिहिणारा अशा वृत्तीनं लिहितो की जणू त्याच्यांत आणि वाचकांत कांही परकेपणा नाही.

आपल्या अनुभवांच्या बऱ्यावाईट गोष्टी, आपण केलेलीं सत्कृत्यें आणि आपल्या हातून घडलेल्या चुकाहि, आपल्या आवडीनिवडी, खोडी-लहरी––सारं कांही निबंधाच्या ओघांत लेखक खुशाल सांगत असतो. लेखक आणि वाचक यांच्या-मधलं अंतर जितकं नाहीसं होईल तितका लघुनिबंध सरस वठेल. वाचक म्हणजे आपल्या अंतरंगांतले मित्र आहेत अशा भूमिकेवरून लघुनिबंध लिहिला जातो. या कारणानंच मी या वाङ्मय प्रकाराला ‘ गुजगोष्टी ’ च म्हणतों.

गुजगोष्टींसारखे हे लघुनिबंध मला लिहावेसे वाटतात त्याचं मुख्य कारण हें की कथा, कादंबरी, नाटक या सर्वांपेक्षा या वाङ्मयप्रकारांत आत्मप्रकटीकरणाला अधिक अवकाश आहे. लघुनिबंध लिहितांना मला स्वतःबद्दल लिहितां येतं. खरी गोष्ट अशी की लेखक जें जें लिहितो तें तें कमीअधिक प्रमाणांत आत्मचरित्रच असतं. माझ्या कादंबऱ्या वाचून जेव्हा एखादा चहाता मला समक्ष भेटून किंवा पत्र लिहून सुचवितो की मी आत्मचरित्र लिहावं, तेव्हा मी उत्तर देतों, माझ्या कादंबऱ्यांत आत्मचरित्र नाही तर दुसरं काय आहे ? परंतु हें बोलणें किती झालं तरी लक्षणार्थी आहे. माझ्या कादंबऱ्यांत माझे स्वतःचे अनुभव जागोजाग आहेत, परंतु ते उघड माझे म्हणून सांगितलेले नाहीत. एखाद्या पात्राचे म्हणून वर्णिलेले आहेत. लघुनिबंध लिहितांना मात्र असा आडपडदा ठेवावा लागत नाही. लपवाछपवी करावी लागत नाही. सरळ सरळ स्वतःविषयी मला लिहितां येतं. माझ्या अंगचे गुणच नव्हे तर दोष देखील वर्णितां येतात. ज्याला इतर लोक लघुनिबंध म्हणतात आणि मी ‘ गुजगोष्ट ’ म्हणतों त्या वाङ्मयप्रकाराचं मुख्य आकर्षण हें आहे. काव्य म्हणजे सृष्टीपुढे धरलेला आरसा असं एक सुभाषित आहे. या न्यायानं असं म्हणतां येईल की लघुनिबंध म्हणजे लेखकानं स्वतःपुढे धरलेला आरसा, त्यांत दिसणाऱ्या स्वतःच्या प्रतिबिंबाचं केलेलं वर्णन. ललित लेखकाला सृष्टींतले सर्वच विषय प्रिय खरे परंतु त्याचा सगळ्यांत आवडता विषय कोणता ? तर ‘ मी ’. या ‘ मी ’ बद्दल मनःपूत लिहिण्याची संधि मिळते लघुनिबंधांत, म्हणूनच मला लघुनिबंध लिहावेसे वाटतात. इतर कुणा लेखकाची साक्ष घ्याल तर ती अशीच पडेल याबद्दल मला संशय नाही.

* * *

भाग दुसरा

# लघु-निबंध

## ४ : शब्द ! शब्द ! शब्द !

परवा मी फिरायला गेलों तो कितीतरी दिवसांनी ! मध्यंतरीं दहाबारा दिवस पावसानं अशी कांही झोड उठाविली होती की संध्याकाळच्या वेळेस फिरायला जाण्यासाठी बाहेर पडणं मुष्किल होतं. असा कंटाळा आला होता पावसाचा ! पावसावांचून धान्य पिकायचं नाही आणि धान्यावांचून जगतां यायचं नाही हा विचार अर्थात् उघड आहे. तेव्हा सतत पाऊस लागला म्हणून चिडण्यांत कांही अर्थ नाही हें मला समजतं. मृग नक्षत्र कोरडं गेलं की ' अजून पावसाचा पत्ता नाही ! आता कसं करायचं ? ' असे उद्‌गार आल्यागेल्याजवळ काढतांना चिंतातुर चेहऱ्याचा अभिनय मी इतका बेमालूम करतों की माझ्या मालकीची शेतजमीन असली पाहिजे असा ऐकणाऱ्याचा गैरसमज व्हावा ! पण हें सारं खरं असलं तरी दहाबारा दिवस पाऊस-पाण्याची गळती सारखी सुरू राहिली की मला फार राग येतो. अशा पावसामुळे कांही मोठमोठ्या गैरसोयी तर होतातच, परंतु बारीकसारीक गोष्टींत जे अडथळे उत्पन्न होतात ते माझा अंत जास्त पाहतात. उदाहरणार्थ, सिगरेट ओढण्याची तल्लफ तर फार येते. परंतु केसमधील सिगरेट काढली की तिच्यातली तंबाखू सरदलेली आढळते, काड्यांच्या पेट्यांतल्या काड्यादेखील सरदलेल्या असतात. दहा ओढाव्या तेव्हा एक पेटते, आणि अखेर सिगरेट शिलगाविल्यावर मारे जिवाचा आटापिटा करून झुरका ओढावा तों हवा तो चटका मिळत नाही. गेल्या दहाबारा दिवसांत मिळून सिगारेटच्या दसपट काड्या मीं ओढल्या. केव्हा एकदा पाऊस उघडेल असं मला झालं होतं.

मात्र एखादा पाहुणा केव्हा एकदा जाईल असं वाटूं लागलेलं असावं, आणि त्यानं अखेर जातांना घरांतल्या मुलांना भरपूर खाऊ द्यावा, सुंदर खेळणीं द्यावीं, म्हणजे 'अरेरे ! आपण उगीच त्या पाहुण्याला शिव्या दिल्या' असं ज्याप्रमाणे माणसाला वाटूं लागेल तसं परवाच्या त्या पावसानं मला वाटायला लावलं. कारण, तो गेला तो प्रसन्नतेची आणि सौंदर्याची किती विपुल आणि विविध संपत्ति मागं ठेवून ! अज्ञान, व्यामोह, दुःख, निराशा, चिंता इत्यादींचीं किल्मषं धुऊन निघालीं की मन स्वच्छ, प्रसन्न आणि हलकं होतं, त्याप्रमाणे सृष्टीच्या अंगावरचा सारा मळ झाडून, धुऊन, पुसून या दहाबारा दिवसांच्या पावसानं तिला असं कांही रमणीय स्वरूप आणलं आहे की कुठेहि नजर टाकली तरी वाटतं घटकानघटका तिकडेच पाहत बसावं. शहरापासून दूर गेल्यानंतर ज्या ठिकाणीं भोवतालचा देखावा पाहत बसावंसं वाटतं अशा माझ्या आवडत्या अनेक जागा आहेत. रानावनांत स्वच्छंदानं हिंडण्याचा, रेंगाळण्याचा, पडून राहण्याचा षोक ज्यांनी केला असेल त्यांच्या एक गोष्ट लक्षांत आली असेल ती ही की जिथे बसलं की चहूं बाजूंनी लहानमोठ्या टेकड्यांनी घेरल्यासारखं वाटतं आणि लतावृक्षांची शोभा दृष्टि उंच केली तरच दिसते अशी संपुटांतली खोलगट जागा, आणि बादशहानं आपल्या सिंहासनावरून दृष्टि टाकावी त्याप्रमाणे जिथून भोवताली नजर टाकतां येते आणि कित्येक मैलांचा विस्तार एका दृष्टिक्षेपांत दिसतो अशी उंचवट्याची जागा— दोन्ही सारख्याच रमणीय वाटतात.

माझ्या आवडत्या जागांपैकी एक उंचवट्याची जागा शहरापासून फार दूर नाही. या ठिकाणीं जाऊन बसलं की शहरांतली गडबड अस्पष्टपणे भासत असते, परंतु नित्याच्या सामान्य व्यवहारांची सरहद्द आपण ओलांडली आहे असं सुखकारक समाधान मनाला वाटण्याइतपत निसर्गाचा एकान्त सहवासहि मिळतो. इथे झाडाच्या बुंध्याला टेकून कातळावर बसलं की जो देखावा पुढे पसरलेला दिसतो तो सगळ्याच ऋतूंत नयनमनोहर असतो. परंतु परवा त्या देखाव्याकडे पाहतांपाहतां माझ्या मनांत आलं, वर्षाकालाच्या आरंभीचा जोराचा पाऊस उघडल्यानंतर लगेच हें सौंदर्य पाहण्यांत विशेष आल्हाद आहे. एखादी लावण्यवती स्त्री केव्हाहि दृष्टीस पडली तरी डोळ्यांना आनंद होतो; परंतु ती स्नानगृहांतून बाहेर पडतांना टॉवेलनं अंग अर्धवटच

झाकलेलं आहे. केशभार मोकळा सुटलेला आहे, स्नानाचे श्रमदेखील जास्त झाल्यामुळे श्वास लागल्याची साक्ष वक्षभाग आणि नाकपुड्या देत आहेत आणि साऱ्या अंगाअंगावर निर्मलपणाची, ताजेपणाची, लालसर, पवित्र प्रसन्न कांति पसरलेली आहे, अशा स्वरूपांत तें लावण्य चुकून एखादे वेळीं दिसलं तर कांही वेगळाच आनंद होतो! परवा त्या माझ्या आवडत्या ठिकाणीं बसलों असतांना सृष्टि अशाच स्वरूपांत मला दिसत होती.

पाहतांपाहतां माझ्या मनांत आलं, जें मी बघतों आहें तें बघण्याच्या क्षणींच शब्दांत पकडतां येईल का मला? 'सुखदुःखाचे अनुभव, आठवून सांगितले की साहित्याची निर्मिति होते' असं एका पंडितानं म्हटलं आहे. यांतला 'आठवून' हा शब्द महत्त्वाचा आहे. 'Joys and sorrows remembered' असं तो म्हणतो. म्हणजे साहित्य तयार होतं ते साक्षात् अनुभवाच्या क्षणीं नव्हे, अनुभव ताजा गरमागरम असतांना नव्हे– तर अनुभव जरा मागं पडल्यावर. कथाकार आपल्या साहित्यांत सृष्टीचीं वर्णनं करतो तींदेखील आठवूनच करतो, नाही का? सृष्टिशोभा प्रत्यक्ष पाहण्याच्या क्षणीं नव्हे. पण परवा एक नवा प्रयोग करून पाहण्याची मला लहर आली. वाटलं, एखाद्या देखाव्याच्या रचनेचीं व रंगाचीं पेन्सिलीनं आणि ब्रशानं एखादा चित्रकार टाचणं करून ठेवतो' त्याप्रमाणे माझ्यासमोर पसरलेल्या त्या सृष्टिसौंदर्याचं शब्दचित्र बसल्या जागीं कां काढूं नये? काढावं.

ज्या ज्या शोभेचा अनुभव मीं घेत होतों ती ती शोभा मीं शब्दांत पकडली असं मला क्षणभर वाटलं. परंतु तो वर्णनात्मक मजकूर जेव्हा मीं वाचून पहिला तेव्हा माझी मलाच निराशा वाटली. त्या वर्णनांत जिवंतपणा मला आढळेना. माझ्या स्वतःच्याच अनुभवाचा संपूर्ण आविष्कार मी करूं शकलों असं वाटेना.

क्षितिजापर्यंत दूरवर पसरलेला भूभाग, शेतं, वृक्षांची गर्दी, मधेच दिसणारे लहानमोठे जलसंचय, मंदिरांचे चमकणारे कळस, उजव्या हाताला दूरवर दिसणारी कुठल्यातरी कारखान्याची चिमणी, सभोवारचे डोंगर, माथ्यावरच्या स्वच्छ निळ्या आकाशाचा विस्तार, अंतराळांत भरारी घेणारे पक्षी इत्यादि सर्व गोष्टी त्या वर्णनांत होत्या. परंतु त्या वर्णनांत माझा त्या घटकेचा अनुभव पूर्णतेनं व्यक्त झाल्यासारखा मला वाटेना, नेत्र, श्रुति

आणि स्पर्श या तीन इंद्रियांना त्या घटकेला ज्या अनेक सूक्ष्म सुखसंवेदना होत होत्या त्या माझ्या वर्णनांत मला सापडेनात. मीं काढलेलं तें शब्द-चित्र मोहक होतं, परंतु तें पूर्ण नव्हतं. गंध, स्पर्श, रुचि आणि नाद हे सृष्टीचे धर्म असे कांहीं सूक्ष्म आहेत की शब्दांतल्या जाळ्यांत त्यांना पकडतां येत नाही. शब्दांच्या सामर्थ्याचा आपण अभिमान मिरवितों, परंतु तो व्यर्थ आहे.

बाह्य सृष्टीच्या वर्णनाच्या कामीं जर शब्दांचं सामर्थ्य उणं पडतं तर अंतःसृष्टीचं रूप सांगतांना हा उणेपणा अधिकच जाणवावा हें अगदी क्रमप्राप्त म्हणावं लागेल. हवामानाची नोंद करणाऱ्या वेधशाळेंतल्या यंत्रांचे काटे किती नाजुक असतील ? उष्णतेच्या प्रमाणांत अणुमात्र फरक पडला की ते काटे तत्काल मागेपुढे झालेच पाहिजेत. परंतु त्यांपेक्षाहि अधिक सूक्ष्म आणि हळुवार माणसाचं मन आहे. या मनाचीं आंदोलनं, त्याचे विकार भोवतालच्या हवेवर किती अवलंबून असतात ! वसंतागमनानं सृष्टि फुलली की माणसाला प्रेम सुचतं, असा साहित्यांत एक संकेत रूढ आहे. सांतायाना नांवाच्या एका अमेरिकन प्रोफेसराबद्दल अशी आख्यायिका सांगतात की एकदा आपल्या तत्त्वज्ञानाच्या विद्यार्थ्यांपुढे व्याख्यान देत असतांना त्याची दृष्टि सहज खिडकींतून बाहेर गेली, तेव्हा व्याख्यान थांबवून तो बघत राहिला आणि कांही वेळानं 'Gentlemen, it's spring !' येवढाच उद्‌गार काढून तो वर्गांतून बाहेर चालता झाला ! त्याला अर्थातच म्हणायचं होतं : बेट्यांनो, वसंतऋतूच्या स्पर्शानं सृष्टीचं अंगन् अंग पुलकित झालेलं दिसतंय. या घटकेला सौंदर्याचा साक्षात्कार घेण्याऐवजी तत्त्वज्ञानाची चर्चा कसली करायची ? सांतायानाचा कित्ता साऱ्या प्रोफेसरांना गिरवितां येण्यासारखा आहे की नाही तें मी सांगणार नाही. परंतु सृष्टीच्या विवक्षित स्वरूपामुळे माणसाच्या अंतःकरणांत कांही विशिष्ट भावना तरंगूं लागतात येवढं खचित ! आणि हेंदेखील खचित की या भावनांचा साक्षात्कार व त्यांचा शब्दरूप आविष्कार यांत मोठंच अंतर राहणार !

परवा दहाबारा दिवस वृष्टि झाली. परंतु ती सुरू होण्याच्या आधी मोठी चमत्कारिक हवा पडली होती. दर वर्षीच कांही दिवस असली हवा पडते.

उन्हाळा संपलेला असतो, वळीवाचे चारदोन पाऊस होऊन गेलेले असतात, पण वर्षाऋतूचा प्रारंभ व्हायला मात्र अवकाश असतो, अशा संधिकालांत ही हवा पडते. आभाळ किती चमत्कारिक दिसत असतं. ढग नसतात, पण सगळीकडे मळभ पसरलेलं असतं. आरसे स्वच्छ करायचे झाले की त्यावर चुना फासतात ना, त्याप्रमाणे सबंध आभाळावर कुणींतरी राखेच्या हातानं सारवण केल्यासारखं वाटतं. एखाद्या स्त्रीनं तोंडभर पॉवडर फासली असतांना तिला अचानक पकडली तर तिचा चेहरा जसा दिसेल तसं दिसत असतं आभाळ ! त्याचा स्वच्छ निळसर रंग अजिबात लुप्त झालेला असतो. प्रकाश इतका मंद झालेला असतो की जणु सूर्यास्त होऊन अर्धी घटका लोटली आहे. दिशा धुंद झालेल्या असतात. वारा बिलकुल नसतो. झाडांचीं पानं हालत नसतात. सृष्टि जणु कसल्या तरी आठवणी काढीत जागच्या जागीं स्तब्ध राहिलेली असते. अशी हवा पडली की माणसाच्या अंतः-करणाची अवस्थाहि तशीच होते. स्तब्ध ! धुंद ! तें सुखाच्या समृद्धीनं भारावलं आहे, की एरवीं लक्षांत न येणारं दुःख असमाधान त्याच्या पृष्ठभागावर येऊन तरंगत आहे, तें सांगतां येत नाही. जिथे जावंसं वाटतं पण जातां येत नाही, जें हवंसं वाटतं पण हवं म्हणतां येत नाही, जें जिंकावंसं वाटतं पण जिंकतां येत नाही त्याची ओढ मनाला लागल्यासारखं वाटतं. कसल्यातरी अस्पष्ट वासनांच्या आवरणांत जीव गुदमरल्यासारखा होतो. हुरहुर वाटते. पण कसली ती आपली आपल्यालाच कळत नाही.

ही हुरहुर शब्दांनी यथार्थपणे सांगतां येईल का ? हा अनुभव वाचकां-पर्यंत जसाच्या तसा पोचेल अशा प्रकारें त्याला शब्दरूप देतां येईल ? मला नाही वाटत.

मनुष्याला ' शब्द ' सापडला तेव्हां त्याच्या जीवनांत मोठीच क्रांति झाली. एक नवं सामर्थ्य माणसाला उपलब्ध झालं. एक नवाच आनंद त्याच्या जीवनांत प्रविष्ट झाला. शब्दांची शक्ति वाढविण्यासाठी मनुष्य कित्येक सहस्र वर्षं प्रयत्न करीत आहे. त्याच्या प्रयत्नाला यशहि येत आहे. परंतु कित्येक वर्षं लेखनाचा उद्योग केल्यामुळे माझा अनुभव असा की शब्दांचं

सामर्थ्य कितीहि वाढलं तरी प्रत्यक्ष अनुभव शब्दांच्या कक्षेच्या पलीकडेच राहणार. मोठमोठ्या कवींची आणि लेखकांची साक्षहि अशीच पडेल. 'शब्द-सृष्टीचे ईश्वर' अशा शब्दांनी समर्थ रामदासांनी लेखकाचा गौरव केला असला तरी लेखकानं तो परमार्थानं घेऊं नये. शब्दांवर प्रेम करावं, शब्दांची शक्ति वापरण्याचा आनंद घ्यावा, परंतु त्याचबरोबर लेखकानं हेंहि लक्षांत ठेवावं की साक्षात्कार म्हणून कांहीतरी वेगळाच आहे, आणि तेथपर्यंत शब्द पोचूं शकत नाहीत. 'जीं अमृताशीं देखील पैज जिंकतील अशीं रसिक अक्षरं मिळवीन!' अशा प्रतिज्ञेनं मराठीचा गौरव ज्या ज्ञानेश्वरांनी केला, "सूर्यबिंब जरी बचकेचि येवढें। तरी प्रकाशा त्रिभुवन थोकडें। शब्दांची व्याप्ति तेणें पाडे। अनुभवावी॥" अशा उद्गारांनी शब्दांची झेप किती मोठी आहे तें ज्या ज्ञानेश्वरांनी सूचित केलं, त्यांनीच अनेक ठिकाणीं असंहि म्हटलेलं आहे की साक्षात्काराचा जो 'अमृतानुभव' मला वर्णावयाचा आहे त्याला शब्द-सामर्थ्य पुरण्याजोगं नाही. वक्ता, विषय आणि श्रोता अशा तीन घटकांवर आधारलेल्या प्रवचनाच्या साहाय्यानं होणारं शब्दरूप वर्णन कितीहि प्रभावी झालं तरी त्यापासून सत्यज्ञान होणार नाही. त्यासाठी साक्षात्कारच घडावयास हवा. शब्दाचं सामर्थ्य कितीहि वाढलं तरी त्या वाढलेल्या सामर्थ्यानिशी शब्दांना पोचायचं आहे कुठे? तर जिथे शब्द संपतात तिथे!– जिथे वक्ता, विषय आणि श्रोता या त्रिपुटीचा लोप होतो आणि भाषेचं प्रयोजनच उरत नाही तिथे!

* * *

## ५ : माझा विरंगुळा

'पोट कुणाला सुटलेलं आहे ?' किंवा 'साऱ्यांच्याच मागं पोट लागलेलं आहे' असे उद्‌गार आपण वारंवार काढतों. या उद्‌गारांचा अर्थ येवढाच, की माणसाला जगायचं असेल तर त्यानं उद्योग केलाच पाहिजे. त्यावाचून सुटका नाही. जो उद्योग पत्करला तो आवडो, न आवडो; माणसाला करावाच लागतो. ज्यांत मनाचं समाधान नाही, ज्यांत वृत्ति रमत नाही असा उद्योग करण्याचीच पाळी बहुतेक माणसांवर येत असते. त्यांना साहजिक वाटत असतं, केव्हा एकदा उद्योगाच्या जोखडाखालून मान दूर करतां येईल आणि घटकाभर विरंगुळा मिळेल. मात्र नावडते उद्योग करणाऱ्या लोकांनाच फक्त विरंगुळा किंवा विश्रांति हवीशी वाटते असं नव्हे. जे लोक अधिक भाग्यवान आहेत—म्हणजे ज्यांना आपल्या आवडीचे उद्योग करण्याची संधि मिळाली आहे, अशा लोकांनादेखील आपापल्या उद्योगाचा केव्हा ना केव्हा तरी कंटाळा येतोच, आणि मग विश्रांतीसाठी, घटकाभर विरंगुळा मिळावा यासाठी, दुसरीकडे वळावंसं वाटतंच.

आता माझीच गोष्ट पाहा ना. कॉलेजांत अध्यापनाचं काम मी करीत होतों तेव्हा तें मला मनापासून आवडत होतं. त्यांत माझी वृत्ति रमलेली होती. अध्यापनासारखा दुसरा आनंद नाही अशा वृत्तीनंच मी तो व्यवसाय करीत होतों. पण म्हणून शिकविण्याचा कंटाळा मला कधी येत नसे असं थोडंच आहे ? आधी एक गोष्ट अशी, की कोणतीहि गोष्ट

कर्तव्य म्हणून करावी लागली की तिच्याविषयी थोडीशी अप्रीति मनांत उत्पन्न होतेच होते. नाटक पाहणं म्हणजे किती गमतीची गोष्ट! परंतु जीं जीं नाटकं होतील त्या त्या नाटकांचे प्रयोग पाहायचे आणि त्यांवर अभिप्राय लिहायचे असा धंदा ज्यानं पत्करला त्याला त्या गोष्टीचा केव्हा ना केव्हा तरी कंटाळा येतो, वीट येतो. प्रवास म्हणजे किती मौजेचा! लहानपणीं तर कुठं जायचं या प्रश्नाला महत्त्व नसतंच. केवळ आगगाडींत बसायला मिळेल या कल्पनेचाच अपूर्व आनंद होतो. माझे वडील मामलेदार होते. ते नेहमी फिरतीवर जायचे. मला त्यांचा फार हेवा वाटायचा आणि फिरतीवर जायचं म्हटलं की ते नाराज कां असत तें मला कळत नसे. आता मोठेपणीं मला तें कळतंय्. उद्योग म्हणून सक्तीनं प्रवास करावा लागला, की त्यांतली गंमत खलास झाली.

या न्यायानंच कॉलेजांत अध्यापन करण्याचा उद्योग माझ्या आवडीचा होता खरा; परंतु तो कर्तव्य म्हणून करावा लागत होता. त्यांत एक प्रकारची सक्ति होती. इच्छा असो नसो, अकराचे ठोके पडले की वर्गांत जावं लागत होतं, पाऊण तास व्याख्यान द्यावं लागत होतं; त्यामुळे अनेक वेळां तें नकोसं होत होतं. त्याचा शीण येत होता. विरंगुळ्याची इच्छा होत होती.

आता गेलीं दहा वर्षे अध्यापनाचा माझा व्यवसाय सुटला. पूर्वी लेखनाचा जो उद्योग मी बऱ्याच अंशीं विरंगुळा म्हणून करीत होतों तो आता माझा मुख्य व्यवसाय बनला आहे. तसं झाल्यामुळे आता कित्येकदा या लेखनाचा कंटाळा येतो आणि वाटतं, विश्रांति घ्यावी; विरंगुळ्यासाठी दुसरं कांही तरी करावं.

विश्रांति लाभावी, विरंगुळा मिळावा म्हणून जी गोष्ट करायची तिच्यांत कर्तव्याचा भाग बिलकुल असतां कामा नये, केवळ आपली लहर येवढा एकच कायदा असला पाहिजे. क्रिकेटचा सामना बघितला की नित्याच्या उद्योगानं आलेला शीण मी विसरूं शकतों, विश्रांति मिळाल्यासारखं मला वाटतं. इंग्रजींत ज्याला रिलॅक्सेशन म्हणतात तें मला मिळतं. परंतु सामन्याचा वृत्तान्त एखाद्या वृत्तपत्रांत लिहिण्याची कामगिरी पत्करून मी

सामना बघूं लागलों की त्या बघण्याला उद्योगाचं स्वरूप येतं, जबाबदारी उत्पन्न होते, कर्तव्याचा भाग निर्माण होतो आणि मग त्या खेळांतील विरंगुळा देण्याची शक्ति नाहीशी होते.

म्हणजे असं नाही का म्हणावं लागणार की माणसाच्या श्रमलेल्या मनाला विरंगुळा देण्याचा गुण अमुक एका वस्तूंत आहे, असं नव्हे तर माणसाच्या मनोवृत्तींतच आहे. क्रिकेट, टेनिस, फुटबॉल, हॉकी अशा खेळांचे सामने पाहणं, किंवा असे खेळ खेळणं. नाटक पाहणं किंवा नाटकांत एखादी भूमिका करणं, संगीताची मैफल ऐकणं किंवा स्वतः गाणं म्हणणं अगर वाजविणं, बुद्धिबळं, गंजिफा, पत्ते असा एखादा खेळ खेळणं— यांपैकी कोणत्याहि गोष्टींत तुम्हांला विरंगुळा मिळेल, तुम्ही काय करतां या गोष्टीला महत्त्व नाही. ती गोष्ट कशी करतां याला महत्त्व आहे.

विरंगुळा हवासा वाटला की अमुक एका ठराविक विरंगुळ्याचा आश्रय, मी घेत नाहीं. विश्रांति हवीशी वाटली, दिवसभरच्या कामाचा शीण घालवावासा वाटला तर कांही एक ठराविक गोष्ट करण्याचा कित्येक लोकांचा परिपाठ असतो. कुणी आपल्या आवडीच्या पुस्तकाचं वाचन करतात, कुणी गप्पा मारण्यासाठी मित्रांकडे जातात किंवा मित्रांना आपल्या घरीं बोलावतात, कुणी हिंडायला जातात, कुणी बागकाम करतात. एक प्रसिद्ध इतिहाससंशोधक लाकडं फोडीत असत. मला विचाराल तर विश्रांतीचं असं एकच ठराविक ठिकाण अगर साधन मीं ठरविलेलं नाही. आरामासाठी आपण काय करतों त्यापेक्षा जें करायचं तें कसं करतों याला खरं महत्त्व आहे असं मी मानीत असल्यामुळे, आणि मला अनेक गोष्टींची आवड असल्यामुळे, त्या त्या वेळेस जें सहज साध्य असेल तें मी करतों. लहान मुलांत मिसळून क्रिकेट खेळतों. कॅरमचा किंवा पत्त्यांचा डाव टाकतों. रेडिओवर ध्वनिमुद्रिका ऐकतों. माझ्या राणी कुत्रीला घेऊन फिरायला जातों. यांपैकी कोणतीहि गोष्ट केली तरी मला हवी ती विश्रांति मिळून कामानं आंबून गेलेली माझी वृत्ति ताजीतवानी, टवटवीत होते.

माझं मत असं आहे, की कोणताहि खेळ विश्रांतीसाठी खेळायचा असेल तर तो ‘ खेळ ’ म्हणून खेळला जावा, त्याला गंभीर जबाबदारीचं

स्वरूप आलं की त्यांत राम नाही. राम नाही म्हणजे आराम नाही. ब्रिज खेळणं मला आवडतं, पण अगदी टिच्चून, मन लावून, हिशोब करून, चित्ताची एकाग्रता करून खेळणं आपल्याला जमायचं नाही. चुकला डाव तर चुकला अशा कांहीशा बेफिकिरीनं खेळणं मला आवडतं. पत्त्याच्या डावापासून खरं रिलॅक्सेशन हवं असलं तर हुकली खेळी तर हुकली अशा धोरणानं तर खेळावंच, पण शिवाय इतर गप्पाहि अधूमधून चालू ठेवाव्या. पत्ते पिचतांना सहज विषय काढावा, "अमकाअमका चित्रपट पाहिलात का रामभाऊ?" आणि यांतून अलीकडचे चित्रपट, नटनटींचीं प्रेमप्रकरणं असल्या कांहीं गमतीदार गप्पा निघाल्या तर खुशाल हातांतलीं पानं न वाटतां उगीचच तीं पिचीत राहावं. गप्पांच्या अशा तोंडीलावण्यानं पत्त्यांच्या खेळाची मेजवानी अधिक रुचकर वाटते की नाही बघा. पत्ते खेळतांना अशा नुसत्या गप्पाच नव्हे तर थोडासा आरडाओरडादेखील पाहिजे. राण्या, राजे, एक्के अशा बड्या पानांची काटछाट करतांना अवसानानं कांहीं बोलायचं नाहीं यांत काय गंमत आहे? एकानं ओरडावं, हा तुमचा राजा एक्क्यानं बडविला बघा. दुसऱ्यानं म्हणावं, असे पुष्कळ पाहिलेत हो एक्के; ही पाहा हुकुमाची दुर्री सुटली त्याच्यावर सुदर्शन चक्रासारखी. आणि विजयाची आरोळी ठोकीत डाव गोळा करावा. अशा उलटसुलट ललकाऱ्यांच्या साथसंगतीसकट पत्त्यांचा डाव चालला तर–तरच त्याचीं खरी मजा! तरच तो खेळ म्हणायचा!

आरामासाठी, विरंगुळ्यासाठी काय वाटेल तें करावं पण अशा वृत्तीनं करावं. आपल्या खिडकीसमोर आरामखुर्ची मांडावी, सिगरेटचे झुरके घेतांघेतां रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनांच्या आणि माणसांच्या गर्दीकडे बघत राहावं. असं केल्यानं देखील आराम कांहीं कमी मिळत नाही! लहान मुलं गॅलरीच्या कठड्यावर रेलून रस्त्याकडे पाहत घटकान्‌घटका कशीं उभीं राहतात, याचं आपल्याला आश्चर्य वाटतं. पण मोठेपणींच्या साऱ्या चिंता मनावेगळ्या करून, मन निर्मळ करून, म्हणजेच लहान होऊन रस्त्यांतून येणाऱ्याजाणाऱ्या माणसांकडे आणि गाडीघोड्याकडे आपण बघत राहिलों तर आपल्यालादेखील त्यांत अवीट गोडी घेतां येईल.

दूर कुठंतरी फिरायला जाण्यासारखा विरंगुळा मिळविण्याचा दुसरा रामबाण उपाय नाही, मोठमोठीं गजबजलेलीं शहरं या बाबतींत कुचकामाचीं. परंतु बाकीच्या ठिकाणीं आजूबाजूस निसर्गशोभेचीं एकांत स्थळं हवीं तेवढीं असतात. अशा एखाद्या ठिकाणीं जावं, उंच टेकडीवर हिरव्यागार गवतानं झाकलेल्या एखाद्या जागीं बसावं, वारा अंगावर घ्यावा, पश्चिम क्षितिजावर सूर्यास्ताच्या वेळेस चालणारा रंगाचा खेळ बघावा– वाटल्यास खुशाल हातपाय पसरून उताणं पडावं, वरच्या आभाळाकडे नजर रोखावी—— असं केल्यान या विश्वाचा पसारा केवढा प्रचंड आहे त्याची जाणीव मनाला स्पर्श करून जाते, त्या स्पर्शाची गोडी चाखावी. काय बिशाद दिवसभरच्या कामानं आलेला शीण जागेवर राहील ! साऱ्या श्रमांचा निचरा होतो, मन हलकं होतं ! वृत्ति ताजीतवानी होते, प्रसन्न होते !

दोन घटका मजेंत जाव्या म्हणून नाटक अगर चित्रपट पाहतांना किंवा गाणंबजावणं ऐकतांना माझ्या मनांत कधीकधी एक गमतीदार विचार येतो. तो असा, की ज्या कलावंताची कला मला आणि माझ्यासारख्याच इतर हजारो प्रेक्षकांना आणि श्रोत्यांना विरंगुळा देत असते, तो कलावंत मात्र त्या कलेकडे घडीभरचा विरंगुळा म्हणून बघूं शकत नाही. जन्माचा व्यवसाय, काय-मचं पत्करलेलं व्रत, कठोर कर्तव्य, एक अखंड तपश्चर्या या दृष्टीनंच त्याला आपल्या कलेकडे बघणं भाग असतं. इतकंच काय, त्यानं जितक्या प्रमाणांत अविश्रांत श्रम केले असतील तितक्या प्रमाणांत त्याचा कलाविष्कार मला विरं-गुळा देण्यास समर्थ ठरेल. त्याची कला घटकाभर रिझविते; परंतु त्याला ती झिजविते. घडीभरच्या विरंगुळ्यासाठी त्याला दुसऱ्याच कोणत्या तरी गोष्टीकडे वळलं पाहिजे. मीं लिहिलेल्या कथावाङ्मयापासून वाचकांना विरंगुळा मिळतो. जवळचे, दूरचे वाचक मला समक्ष भेटतात किंवा पत्र लिहितात आणि सांगतात की तुमची अमुक कथा किंवा अमुक कादंबरी वाचली आणि दोन घटका सारं विसरून गेलों आणि एका निराळ्याच वातावरणांत हिंडल्यासारखं वाटलं. परंतु माझ्या कथा आणि कादंबऱ्या अशा प्रकारचा विरंगुळा मला देऊं शकत नाहीत. कारण त्या कथा-कादंबऱ्यांची निर्मिति हा माझा व्यवसाय किंवा उद्योग होऊन बसला आहे. डोळ्यांना सारं जग दिसतं; परंतु डोळे डोळ्यानं बघूं शकत नाहीत, अशा-

पैकीच कांहीसा हा प्रकार आहे. माझं साहित्य इतरांना विरंगुळा देऊं शकतं; परंतु त्या साहित्यनिर्मितीचाच मला कधीकधी शीण येतो आणि मग विरंगुळ्यासाठी मी अमुक एकच गोष्ट करतों असं नव्हे. क्रिकेट खेळेन, पत्ते खेळेन, नाटक पाह्यला जाईन, गाणं ऐकायला जाईन, फिरायला जाईन– जें करण्याची लहर लागेल तें करीन आणि तें करतांना कोणत्याहि जबाबदारीची, कर्तव्याची जाणीव मनांत ठेवणार नाही. एकाच जागीं पुष्कळ वेळ अवघडून बसावं लागलं की आपण म्हणतों, 'आता जरा पाय मोकळे करूं या. मनाचीदेखील अशीच तऱ्हा आहे. एकाच उद्योगांत मनाला दीर्घ काळ गुंतविलं की तें अवघडून जातं. आपण पाय मोकळे करतों त्याप्रमाणेच मनदेखील अधूनमधून मोकळं करण्याची गरज असते. त्यासाठी अमुकच गोष्ट करावी असा नियम नाही सांगतां येणार. ज्याच्या त्याच्या आवडीवर किंवा छंदावर तें अवलंबून आहे. मन साऱ्या जबाबदारींतून निवृत्त करणं या गोष्टीला महत्त्व आहे. यालाच म्हणतात विश्रांति ! यालाच म्हणतात विरंगुळा !

* * *

# ६ : आजी

छोट्या बेबीचा तो प्रश्न ऐकून मी चकितच झालों. तिच्या वाढदिवसानिमित्त ' आजीच्या गोष्टी ' नांवाचं एक छोटंसं सुंदर, सचित्र पुस्तक मी तिला दिलं होतं. आणि तें हातांत घेऊन मुखपृष्ठावरच्या तीन रंगी चित्राकडे ती बघत होती. " छान आहे का ? आवडलं का ? " ह्या माझ्या प्रश्नाला, " छान आहे ! आवडलं ! " असें उत्तरहि तिनं देऊन टाकलं होतं. पण तें दिल्यानंतर पुस्तकाचं नांव पुन्हा एकदा वाचून ती मला विचारीत होती, " आजीच्या म्हणजे काय हो ? आजी म्हणजे कोण ? कुणाला आजी म्हणतात ? "

तिचा तो प्रश्न मला फार चमत्कारिक वाटला. मी मनाशीं म्हणालों, " आजी म्हणजे कोण ते ह्या मुलीला माहीत नाहीं ! आता काय म्हणावं ! "

छोट्या बेबीला मीं त्या शब्दाची फोड करून सांगितली. पण माझ्या मनांतलं आश्चर्य मात्र नंतर किती तरी वेळ रेंगाळत राहिलं. मी मनाशीं म्हणत राहिलों, ' पणजा ' ' पणजी ' हे बिचारे शब्द तर दूरच राहोत, पण ' आजा ' ' आजी ' ह्या शब्दांचे अर्थ देखील हल्लींच्या लहान मुलांना सांगावे लागतात ह्याला काय म्हणावं ! ' आई ', ' बाप ' हे शब्द तरी अजून समजतात हें भाग्यच म्हणायचं ! "

कांही वेळानं माझ्या मनांत आलं, ' आजी ' ह्या शब्दाचा अर्थ बेबीला माहीत नव्हता हा तिचा दोष नव्हता; बदललेल्या परिस्थितीचा दोष होता.

'आजी' ही व्यक्तीच बेबीसारख्या मुलांना परिचित नव्हती. कुटुंबसंस्थाच इतकी आकसली होती की, तिच्यांत मिया, बीबी, आणि दोन बच्चे एवढ्यांनाच स्थान होतं. शेकडा नव्वद घरांत 'आजी' उरलीच नव्हती. मग 'आजी' ह्या शब्दाचा अर्थ बेबीनं मला विचारावा ह्यांत आश्चर्य कुठे होतें? पन्नास वर्षांपूर्वीचं मराठी साहित्य आणि आजचं मराठी साहित्य ह्यांत गुणविशेषाच्या दृष्टीनं काय फरक असेल तो असो, परंतु एक फरक मात्र नजरेंत भरण्यासारखा आहे. पूर्वींच्या काळांतले कवि 'रमानाथ', 'जानकीतनय', 'कुमुदबांधव' अशीं नांवें लावीत असत. हल्लींचे कवि 'मंगेश पाडगावकर', 'सदानंद रेगे' अशीं नांवें लावतात. कवीची जात स्त्रीची की पुरुषाची अशा बुचकळ्यांत वाचकांना टाकणारीं 'विंदा करंदीकर' सारखीं नांवंहि ते पसंत करतात. 'कुसुमाग्रज', 'बा. भ. बोरकर' हीं नांवं म्हणजे जुन्या जमान्याच्या रेंगाळणाऱ्या खुणा! कथालेखकदेखील 'गंगाधर गाडगीळ' 'अरविंद गोखले' अशा नांवांनीं लिहितात. बापाच्या नांवाची लाज वाटूं लागली आहे; किंवा गरज सरली आहे, मुलानं बापाचं नांव काढावं म्हणतात. अलीकडच्या कवींनी आणि लेखकांनी एका निराळ्याच अर्थानं तें 'काढलं' आहे खरें! संस्कृत लेखक आपल्या काव्याच्या अगर लेखनाच्या शेवटीं 'अमक्याचा अमुक सूनु' असा स्पष्ट उल्लेख कटाक्षानं करीत असत. आजघटकेच्या लेखकांना ही पद्धति मंजूर नाहीसं दिसतं. क्रांतिकारक वृत्तीची ही खूण आहे खरी! जो बापाला बाप म्हणावयाला तयार नाही तो कथालेखनाचं तंत्र, कवितेचं वृत्त, छंद, मात्रा ह्यांची मात्रा चालूं देणार नाही हें उघड आहे! सारांश, आजच्या मराठी नवकथेंतून आणि नवकाव्यांतून बापाची देखील हकालपट्टी झाली आहे. बदलत्या काळाचं हें लक्षण आहे!

प्रत्यक्ष व्यवहारांत आई, बाप, अजून शिल्लक आहेत. पण आजोबा आणि आजी मात्र निकालांत निघूं लागलीं आहेत. नवरा, बायको आणि दोन चार मुलं एवढाच कुटुंबाचा छोटा परीघ झाला आहे. सासू, सासरा, दीर, नणंदा इत्यादि पात्रं कुटुंबसंस्थेच्या रंगमंचावर जुन्या नटांप्रमाणे क्वचित रेंगाळतांना दिसतात. 'आजी' नांवाची व्यक्ति आजघटकेला

शेकडा किती घरांत दिसते ह्याची पाहणी कुणी केली तर ती मनोरंजक आणि उद्‌बोधक ठरल्यावांचून राहणार नाही. ' पण लक्षांत कोण घेतो ? ' ह्या हरिभाऊ आपट्यांच्या कादंबरींत नायिका यमू आपल्या लहानपणाच्या गोष्टी सांगतांना आजीच्या पांघरुणांत निजून, तिची चौघडी पांघरून, तिला बिलगून, तिच्या कमरेवर पाय टाकून निजण्यांत केवढं अपूर्व सुख असतं त्याचं वर्णन करून सांगते. ह्या वर्णनाची गोडी आजच्या वाचकांना निदान लहान वयाच्या वाचकांना कळण्याचा संभव फार कमी. हल्लींच्या बायकांच्या नेसण्याची लांबी नऊ वारांवरून पांचावर आली असल्यामुळे ' चौघडी ' ही वस्तूच घरांत पाहावयाला मिळत नाही. आणि आजी तरी कुठे पाहावयाला मिळते आहे ?

समाजाच्या राहणींतला हा बदल कोणत्या कारणांनी झाला त्याची चर्चा मला करावयाची नाही. एवढं मात्र मला वाटतं की ज्या घरांत आजी नाही त्या घरांतलीं मुलं खरोखर दुर्दैवी म्हटलीं पाहिजेत ! आजीवांचून घराला कांही शोभा आहे म्हणतां ?

' आई 'वरच्या कविता मी ऐकल्या आहेत. आईच्या माहात्म्याचीं वर्णनं मी वाचलेलीं आहेत. आईच्या प्रेमाची सर दुसऱ्या कशाला नाही हें मला माहीत आहे. परंतु मी जर कवि असतों तर ' आई ' वर कविता करण्याच्या आधी ' आजी 'च्या प्रेमाचं वर्णन मी केलं असतं.

माझ्या लहानपणीं माझी आई मला अधिक आवडत नव्हती असं कसं म्हणूं ? परंतु माझी आजी मला अधिक आवडत होती हें खचित. ती आंधळी असल्यामुळे सदा माजघरांतल्या एका कोपऱ्यांत बसलेली असे. तिच्या गोधडीच्या एका कोपऱ्याखाली एक डबी असे. त्यांत तिचे पैसे असत. आणि खडीसाखर, मनुका अशा वस्तूंनी भरलेली एक छोटीशी कांचेची बरणी तिच्याजवळ असे. तिच्यापेक्षा आम्हां लहान मुलांनाच खोकल्याची दास अधिक येत असे; आणि तिच्या बरणींतल्या मनुका आणि खडीसाखर तिच्या वांट्याला फार क्वचित येत असे. तिच्या डबींतल्या पैशावर आमचा डोळा असे. आणि एकादशीच्या दिवशीं त्या डबींतले पैसे तर आम्हांला मिळतच असत; परंतु शिवाय, बोरें, कलिंगडें, काबली अशा वस्तू दारावर विकायला

आल्या आणि आईनं पैसे दिले नाहीत की आजींकडून आम्हांला ते हटकून मिळत असत. रोज रात्रीं तिच्यासाठी उपासाचा कांही तरी पदार्थ तयार होत असे. आणि तिच्यापुढे आईनं तो ठेवला की आम्हांला हांक मारून ती म्हणे, " या रे ! " मग आम्ही तिच्याभोंवतीं कोंडाळं करून बसत असूं. आणि तिला उगीच अपचन होऊं नये म्हणून तिच्यापुढे ठेवलेल्या पदार्थांचा आम्हीच समाचार घेत असूं ! " अरे, त्यांना कांही शिल्लक ठेवतां की नाही ! " असं आईनं ओरडावं आणि आजीनं म्हणावं, " घेऊं देत ग. खाऊं देत. " आईपेक्षां आजीचंच प्रेम अधिक असल्याबद्दल आमची खात्री पटत असे. तिच्यासाठी तयार होणाऱ्या त्या पदार्थांना विलक्षण रुचि असे. एकादशी, शिवरात्र अशा दिवशीं घरांत फराळाचे पुष्कळ जिन्नस तयार होत असत; आणि आम्हांला ते पोटभर खाण्याची परवानगी असे. परंतु आजीसाठीं रोज रात्रीं तयार करण्यांत येणाऱ्या लापशीची किंवा खिचडीची चव त्या ढीगभर पदार्थांना असे म्हणतां काय !

मी कितव्या यत्तेंत आहें, अभ्यास करतों की नाही, पास झालों की नापास झालों, असले प्रश्न आजी मला कधीदेखील विचारीत नसे. तिचं काम एवढंच की, मी तिच्याजवळ गेलों की तिनं मला थोपटावयाचं, कुरवाळायचं, खाऊ द्यावयाचा, पैसे द्यावयाचे, आणि गोष्ट सांग म्हटलं की सांगावयाची. किती गोष्टी तिला माहीत होत्या ! आणि एकेक गोष्ट अशी की ती तीन तीन, चार चार रात्रीं चालावयाची ! चातुर्मास आला की मग कांही विचारूंच नका. आज शिवामुठीची कहाणी, उद्या मंगळागौरीची कहाणी, परवा जिवतीची कहाणी, असा धडाका चालावयाचा. रामायण आणि महाभारत मला वाचावं लागलं नाही. सारं आजीच्या तोंडून ऐकलं मीं. रामायण–महाभारतांतल्या कथा पुस्तकांत वाचावयाला मिळत असत. आणि ठिकठिकाणच्या देवळांतून होणाऱ्या कीर्तनांतूनहि ऐकावयाला मिळत असत; पण आजीच्या तोंडून त्या ऐकण्यांत विशेष गोडी होती. कारण, त्या ऐकतांना तिच्या चौघडींत आणि कुशींत निजतां येत असे. आणि गोष्ट ऐकतां ऐकतां झोपीं जाण्याची देखील मनाई नसे. माझा 'हुंकार' बंद झाला की आजी रामाला तसाच अरण्यांत सोडीत असे, किंवा भीमाचं गदायुद्ध अर्ध्यावरच टाकीत असे, आणि मग आपल्या हातांच्या टाळीचा

ताल धरून ती भजनं म्हणूं लागे. प्रत्यक्ष झोप लागण्यापूर्वीच्या अर्धवट गुंगींत मला तिचा आवाज ऐकूं येत राही. 'पतीतपावन नाम ऐकुनी आलों मी दारा, पतीतपावन नव्हेस म्हणुनी जातों माघारा', हें तिचं भजन मला फार गोड वाटावयाचं. हें भजन संपलं कीं दुसरं सुरू होई. 'विठूचा गजर हरिनामाचा झेंडा रोविला!' आजीचा गोड आवाज ऐकतां ऐकतांच माझी जागृति संपून मला झोप लागत असे. सकाळीं उठून मी बघें तों मी निराळ्याच अंथरुणांत असल्याचं मला आढळून येई. माझं स्थलांतर केव्हा झालं तें मला कळत नसे.

माझ्या आजीच्या अशा कित्येक आठवणी म्हणजे माझ्याजवळचा एक अमोल ठेवा आहे. असा ठेवा ज्यांच्याजवळ आहे तीं माणसं मला भाग्यवान वाटतात. आणि त्यामुळं ज्यांना 'आजी' ह्या शब्दाचा अर्थ सांगावा लागतो अशीं बेबीसारखीं लहान मुलं पाहिलीं की माझ्या मनांत येतं, हीं किती कमनशिबी! आयुष्यांतल्या एका अपूर्व सुखाला हीं मुलं अंतरलेलीं आहेत. आमच्या वांट्याला जीं आलीं नव्हतीं अशीं अनेक सुखं चालू पिढींतल्या लहान मुलांना मिळत असतील; सुंदर सुंदर चित्रपट तीं पाहत असतील; रेडिओ ऐकत असतील; शाळेतर्फे निघणाऱ्या सहलीला जात असतील; गणित, भूगोल इत्यादि ज्या विषयांची आम्हांला भीति वाटली त्या विषयांची समजूत, सुधारलेल्या शिक्षणपद्धतीमुळे त्यांना अधिक असेल; त्यांना खेळावयासाठीं आता क्रीडांगणं झालीं असतील; त्यांच्यासाठी शहरांत ठिकठिकाणीं उद्यानं झालेलीं असतील; अनेक दृष्टींनी आज चीं हीं लहान मुलं आमच्यापेक्षा अधिक भाग्याचीं ठरतील. परंतु ह्या मुलांना आजीचं प्रेम कसं असतं त्याची कल्पना नाही. आजीच्या चौघडीची ऊब ह्यांना कधीं मिळालेली नाहीं. आमच्या लहानपणांतलं आणि तारुण्यांतलं अवर्णनीय संगीत आणि वैभवशाली नाट्य ज्याप्रमाणे काळाच्या पडद्याआड कायमचं गेलं आहे त्याप्रमाणेच आजीचे लाड, आजीचा खाऊ, तिची कुशी, तिचीं भजनं, ह्या गोष्टीही आता दुर्मिळ झाल्या आहेत. 'आजी' नांवाची संस्थाच झपाट्यानं नामशेष होत आहे. लहान मुलांचीं मनं अधिकाधिक संस्कारी करण्याच्या अनेक निमसरकारी खटपटी चाललेल्या बघितल्या की माझ्या मनांत येतं, आजीच्या मायेच्या काव्यमय संस्काराला हीं अभागी मुलं मुकलीं त्याची वाट काय?

एकीकडे शाळेच्या शिक्षणाचा परीघ वाढत आहे; पण दुसरीकडे कौटुंबिक संस्कारांचा परीघ कमी होत आहे. पूर्वीचे मोठाले वाडे गेले. अडीच खोल्यांचे ब्लॉक जिकडे तिकडे दिसूं लागले आहेत ! पूर्वीचीं मोठालीं एकत्र कुटुंबं गेलीं. साडेतीन माणसांचीं कुटुंबं जिकडे तिकडे दिसूं लागलीं आहेत. ह्या नव्या छोट्या घरांना आणि कुटुंबांनाहि शोभा असेल. परंतु जुन्या काळांतल्या मोठमोठ्या घरांतल्या आजोबा, आजी, सासू, सासरा, दीर, नणंदा, सुना, नातवंडें ह्यांनीं गजबजलेल्या कुटुंबांत लहान मुलाच्या मनावर होणाऱ्या संस्कारांची शोभा कांही वेगळीच होती ! मोठीं घरं नाहींत, मोठीं अंगणं म्हणून आताशा खिडकीपुढच्या लहानशा कट्ट्यांत छोट्या छोट्या कुंड्या मांडून बगीचे तयार करण्याची रीत रूढ होऊं लागली आहे. अशा बगीच्यांना Window Gardens म्हणजे 'गवाक्ष बगीचे' म्हणतात. ते आपल्या परी शोभिवंत दिसतातहि. परंतु विस्तीर्ण आंगणांतल्या वृक्षलतांनीं गजबजलेल्या बागेची सर ह्या टीचभर लांबीरुंदीच्या बगीच्यांना कधीं येईल काय ?

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलभाग
अनुक्रम.......................... दि: ....................
क्रमांक .......................... नों: दि: ....................

# ७ : वर्षा ऋतु

वसंतऋतूचं वर्णन करतांना कवींनी त्याला अनेकदां ' ऋतुराज ' म्हटलं आहे. पण त्यांनी ही पदवी विचार करून वसंतऋतूला दिली अशांतला भाग नाहीं. कोणत्याहि मित्राला पत्र लिहितांना ' मित्रवर्य अमुक ' असा मायना केवळ गौरवून लिहिण्यासाठीं आपण वापरीत नाही काय ? त्याप्रमाणेच कवींनी वसंताला ऋतुराज म्हटलं हें केवळ औपचारिक असलं पाहिजे. निदान मी तरी तें तसं समजतों. कारण कोणत्या ऋतूला ' ऋतुराज ' ही पदवी देतां येईल याचा नीट विचार केला तर आपल्या लक्षांत येईल, कीं त्या पदवीवर एकट्या वर्षा ऋतूचाच हक्क पोहोचतो. सारेच ऋतु आपापल्यापरी शोभिवंत असतात; परंतु एखाद्या राजाला शोभेल असा थाट फक्त वर्षा ऋतूचाच असतो. वसंत ऋतूच्या नानाविध शोभेविषयीं संशय नाही. आम्रमंजिरीच्या पहिल्या स्पर्शानं सुगंधित झालेला वारा, कोकिलेचा शब्द व त्या शब्दाचा उठणारा प्रतिध्वनि, सृष्टींत जिकडे तिकडे भासमान होणारं नवचैतन्याचं स्फुरण—अशी वसंताची बहुविध रमणीयता असते. इतर ऋतूंचीहि कोणती ना कोणती तरी विशिष्ट शोभा असतेच. प्रत्येक ऋतूजवळ विशिष्ट अलंकार आहेत, व त्या त्या ऋतूंत त्या त्या अलंकारांनीं सजलेली सृष्टि, मुळांतच लावण्यवती असलेली स्त्री कोणत्याहि वस्त्राभरणांत रमणीय दिसावी, त्याप्रमाणे, कोणत्याहि ऋतूंत सुंदरच दिसते. कोणत्या ऋतूंतलं सृष्टिसौंदर्य कुणाला विशेष आवडेल हें त्या माणसाच्या वैयक्तिक आवडीनिवडीवर अवलंबून राहील, व त्या बाबतींत कुणी कुणाशीं

वाद घालूं नये. पण ‘ ऋतुराज ’ ही पदवी कोणत्या ऋतूला द्यायची या प्रश्नावर भिन्न मताला जागाच नाही. एखादा सामान्य माणूस एखाद्या सभास्थानीं येतो, तो गुपचूप येतो, व आपल्या जागीं बसतो. पण राजाचं आगमन असं गुपचूप होत नाही. तो वाजत गाजत येतो. त्याच्या आगमनाच्या वेळेस नगारे–नौबती वाजतात, भालदार–चोपदारांच्या ललकाऱ्या उठतात, रस्त्यांवर सडासंमार्जन झालेलं असतं. अशाप्रकारं वाजतगाजत दुसरा कोणताच ऋतु येत नाही. फक्त वर्षा ऋतु येतो. म्हणून ‘ ऋतुराज ’ ही संज्ञा कोणत्या ऋतूला शोभण्यासारखी असेल तर ती फक्त वर्षा ऋतूलाच !

म्हणून आमच्या संस्कृत कवींनीं आणि आमच्या संगीतकारांनी वर्षाकालाच्या वर्णनांतला सर्वांत प्रमुख संकेत ठरविला. तो त्याच्या बादशाही थाटामाटाच्या उत्साहपूर्ण आगमनाचा. केवळ वर्षाकालाचाच नव्हे, तर सर्वच ऋतूंच्या शोभेचीं वर्णनं संस्कृत कवींनी मोठ्या उत्साहभरानं केलेलीं आहेत. जुने मराठी कवि निसर्ग–सौंदर्याशीं तद्रूप झाले नव्हते, ही तद्‌रूपता हा आधुनिक मराठी काव्याचा एक विशेष होय, हा दावा कदाचित् खरा असेलहि. परंतु तो तसा असला तरी ज्या संस्कृत काव्याचा वारसा मराठी भाषेकडे आला त्या काव्याला मात्र तो लागू म्हणतां येणार नाहीं. अगदीं श्रीमद्‌भागवतापासून तों विक्रमोर्वशीयसारख्या नाटकापर्यंत अथवा मेघदूतासारख्या काव्यापर्यंत संस्कृत साहित्य सृष्टिवर्णनांनीं खचून भरलेलं दिसतं. निरनिराळ्या ऋतूंत निसर्गसौंदर्याचे जे विलास दिसतात त्यांचीं वर्णनं करण्यांत संस्कृत कवींची प्रतिभा रंगलेली आढळते. आणि वर्षाकालाचं वर्णन करतांना प्रत्येक कवीनं त्याच्या आगमनाचा समारंभ वर्णिलेला आहे. मेघांचा गडगडाट, विजांचा कडकडाट इत्यादि प्रकारांनीं आपलं आगमन जाहीर करीत वर्षा ऋतूची स्वारी एखाद्या नरेंद्राप्रमाणे कशी येते त्याचं शब्दचित्र रेखाटण्यांत संस्कृत साहित्यकारांमध्ये अहमहमिका लागलेली दिसते. श्रीमद्‌भागवताच्या दहाव्या स्कंधांत पर्जन्याच्या आगमनाचं फार सुंदर वर्णन आहे. मधून मधून आकाशांत गडगडाट होत आहे, विद्युल्लतेच्या स्फुरणानं आकाश वारंवार उजळून निघत आहे, पाण्याच्या भारानं काळसर निळसर झालेले ढग अभिषेक करायला उत्सुक झालेले आहेत, अशा समारंभानं पर्जन्य येतो—असं श्रीमद्‌भागवतांत वर्णन आहे.

कालिदासानं ऋतुसंहारांत वर्णन केलेलं आहे, तें देखील असंच, की वर्षाकाल गुपचूप येत नाही तर त्याच्या मार्गावर आधी मोठमोठे मेघ मत्त कुंजरांसारखे झुलत चाललेले दिसतात, आणि विद्युल्लतेच्या झळाळणाऱ्या पताका आकाशभागांत फडकलेल्या दिसतात! आमच्या संगीतकारांनीं देखील वर्षाऋतूच्या या वाजतगाजत येण्याचं वर्णन अनेक चिजांतून केलेलं आहे. सूरदासी मल्लार रागांतील एका चिजेचा प्रारंभच 'गरजत आये' अशा शब्दांनी झालेला आहे.

मेघ, त्यांचा गडगडाट, विद्युल्लता, तिचा लखलखाट, जलधारा हीं वर्षाऋतूचीं प्रमुख स्थलवैशिष्ट्यं होत. त्यांचीं वर्णनं करतांना संस्कृत कवींनी उपमा-अलंकारांची लयलूट उधळलेली आहे. एकाहून एक बहारीचीं अशीं हीं वर्णनं एकत्र केलीं तर त्यांचा एक मोठा ग्रंथ होईल. त्यांतलीं कांहीं सांगतों. वीज क्षणांत या ढगांत तर क्षणांत त्या ढगांत चमकते. डोळे दिपविणाऱ्या तिच्या तेजाप्रमाणे चांचल्य हें तिचं मुख्य लक्षण आहे. या चांचल्याला उद्देशून श्रीमद्‌भागवतांत असं म्हटलेलं आहे, की कितींहि गुणी पुरुष असला तरी कामिनी ज्याप्रमाणे त्याच्याजवळ स्थिर राहत नाही, नाचरेपणा करते, दुसऱ्या पुरुषांचा समागम शोधीत जाते, तशी ही विद्युल्लता आहे. स्त्रीस्वभावसुलभ चांचल्य तिच्या ठिकाणीं असल्यामुळे ती एकदा या मेघाला एकदा त्या मेघाला आलिंगन देत हिंडते. दुसऱ्या एका ठिकाणी असं म्हटलं आहे की विद्युल्लता म्हणजे एक चाबूक आहे. त्या चाबकाचे फटकारे मेघांच्या गलेलठ्ठ शरिरावर बसायला लागले, की चाबकाचा काडकाड असा आवाज ऐकूं येतो, आणि तें ताडन असह्य झालं, की मेघ आक्रंदन सुरू करतात तेंहि ऐकूं येतं. वाल्मीकि रामायणांत याहूनहि सुंदर वर्णन आहे. काळे कुळकुळीत ढग, पांढऱ्या शुभ्र जलधारा, आपल्या ठिकाणीं स्थिर राहिलेले पर्वत, व त्यांच्या गुहांतून शिरून बाहेर पडणाऱ्या वाऱ्याचा गंभीर नाद, या भव्य दृश्याकडे पाहून कवि म्हणतो : अहो हे पर्वत नाहीत, तर ज्यांनी मेघरूपी कृष्णाजिनं पांघरलेलीं आहेत व जलधारारूपी यज्ञोपवीतं धारण केलेलीं आहेत असे हे ऋषी असून त्यांच्या मुखांतून जो वेदघोष चालला आहे तो ऐकूं येत आहे. असंच सुंदर वर्णन

वाल्मीकि रामायणांत आणखी एका ठिकाणीं आहे. पर्वतशिखरांवर टेकलेल्या व मधून मधून गर्जणाऱ्या ढगांकडे पाहून कवि म्हणतो : माथ्यावर पाण्याचं खूप मोठं ओझं घेऊन निघालेले हे प्रवासी विश्रांतीसाठीं डोंगराडोंगरावर क्षणभर टेकत आहेत, आणि ओझीं वाहणारे लोक ओझ्याचा विसर पडावा म्हणून सामुदायिक गीत गातात त्याप्रमाणे हे ढग मधून मधून शब्द करीत आहेत. वाल्मीकि रामायणांतलंच आणखी एक वर्णन सांगण्यासारखं आहे. तें ऐकल्यावर तुमची खात्री पटेल की आधुनिक साहित्यकारच शृंगारिक लेखन करतात व रामायण महाभारतासारखीं प्राचीन महाकाव्यं अगदी सोवळीं आहेत ही समजूत शुद्ध वेडेपणाची आहे. वर्षाकालांत आकाश-मार्गातून ज्या जलधारा पृथ्वीवर खालीं पडतात त्यांचं वर्णन करतांना संस्कृत साहित्यकारांनी परोपरीच्या उपमा दिलेल्या आहेत. वाल्मीकि रामायणांत एके जागीं असं म्हटलेलं आहे की, अहो, या जलधारा नव्हेत, तर रतिक्रीडेच्या झटापटींत स्वर्गातल्या स्त्रियांच्या कंठांतील मौक्तिकहार तुटले, त्या मोत्यांचे सर खाली पडत आहेत! कालिदासानं ऋतुसंहारांत असं वर्णन केलं आहे, की वर्षाकालाच्या आरंभी जमिनीवर जिकडे तिकडे छोटे छोटे पाण्याचे प्रवाह वाहूं लागले, की ते नागमोडी वळणानं सळसळत जाणाऱ्या सर्पांप्रमाणे भासतात, आणि बेडूक त्यांना भिऊन दूर पळण्या-साठी उड्या मारूं लागतात. आणखी एका ठिकाणीं कालिदास म्हणतो, पर्जन्यवृष्टीनं आनंदित झालेले मोर जेव्हा आपला पिसारा पसरतात तेव्हा त्यांतले निळ्या रंगाचे डोळे पाहून भुंग्यांना वाटतं, कीं ही निळ्या रंगाची इंदीवर कमळंच आहेत, आणि ते त्याभोंवतीं गुंजारव करूं लागतात.

त्या त्या ऋतूंत विशिष्ट फळाफुलांना बहर यावा, आणि जीवसृष्टीपैकी विशिष्ट प्राण्यांच्या हालचाली प्रामुख्यानं दिसाव्यात असा निसर्गाचा क्रम आहे. निसर्गाचं यथातथ्य चित्र रेखाटणाऱ्या काव्यांत या क्रमाचं प्रतिबिंब साहजिकच पडतं; आणि या वर्णनांचा साचा इतका ठरून जातो की एखाद्या फुलाचा अगर पक्ष्याचा उल्लेख येतांच हें अमक्या ऋतूचं वर्णन आहे, असं आपण सांगूं शकतों. आम्रमंजिरी किंवा पिक हे शब्द वाचतांक्षणींच कवि वसंत ऋतूचं वर्णन करतो आहे ही गोष्ट आपण ओळखूं शकतों. पावसाळ्यांतहि विशिष्ट वनस्पतींची आणि प्राण्यांची हालचाल होत असते, आणि काव्यांत

दा. क्र. 14929

त्यांना प्रमुख स्थान मिळतं. वर्षाकालाच्या वर्णनांत बेडूक, मयूर–मयूरी, बगळे, चातक, काजवे आणि कोकिळ हटकून येतात; त्याचप्रमाणे हरिततृण, कर्दळी, दूर्वा यांचेहि उल्लेख असावयाचेच. आम्रफलांचा देखील अगदीच अस्त झालेला नसतो, आणि त्याचादेखील अंतर्भाव कवि पुष्कळदां करतात. पण कविमनाचा विशेष हा की, सृष्टींतल्या हालचालींचं केवळ तथातथ्य वर्णन केल्यानं कवीचं समाधान होत नाही, त्या हालचालींचं कोणत्या तरी हेतूचा आरोप तो करीत असतो. आणि या आरोपांत सौंदर्य असल्या-मुळे इतर कवीहि तो करूं लागतात, व त्याला ठरीव संकेताचं स्वरूप येतं. श्रीमद्‌भागवतांत एके ठिकाणीं असं वर्णन आहे, वर्षाकालांतील अंधेऱ्या रात्रीं जिकडे तिकडे काजवे चमकूं लागतात, आणि कलियुगांत ज्याप्रमाणे वेद-विद्यापारंगत विद्वानापेक्षा उथळ बुद्धीच्या पाखंडी लोकांचंच तेज अधिक पडतं, त्याप्रमाणे या काजव्यांचा चकचकाट पाहून आकाशांतील ताऱ्यांचा विसर पडतो. पण हें वर्णन केवळ एका सुंदर दृष्टांतानं नटलेलं आहे एवढंच. यांत संकेत नाही. पांढऱ्या शुभ्र बगळ्यांच्या पंक्तीच्या पंक्ति इतस्ततः उडतांना दिसतात असं वाल्मीकि–रामायणांत अनेक ठिकाणीं वर्णन आहे. परंतु त्यांतहि संकेत नाही. संकेतासकट जेव्हा कवि वर्षाकालीन सृष्टीचं वर्णन करूं लागतो, तेव्हा त्या वर्णनांत विशेष सौंदर्य खुलविणारे असे जे वर्षाकालीन संकेत कवींनी, चित्रकारांनी, व संगीतकारांनी ठरविलेले आहेत त्यांतील दोन प्रमुख आहेत. एक संकेत असा की चातकपक्षी वर्षाकालाची वाट बघत चोंच उघडून वर करून बसलेला असतो, आणि त्याच्या तोंडांत पहिल्या वृष्टीचे जलबिंदु पडले, की त्याला विलक्षण आनंद होतो. दुसरा संकेत असा, की आकाशांत ढग जमलेले दिसले, की मोर–मयूरी हर्षभरित होऊन नाचूं लागतात. आणि मोर आपले सुंदर पिसारे पसरतात.

या दोन संकेतांत उत्कंठा आणि हर्ष या भावनांना कवींनीं प्राधान्य दिलेलं आहे. कारण वर्षाकालासंबंधी त्यांनीं सामान्यतः अशी कल्पना केलेली आहे, कीं समागमाची उत्सुकता वाढविण्याचा गुण वर्षाकालांत आहे. पावसाची पहिली भेट व्हावी म्हणून पृथ्वी उत्कंठ झालेली असते, आणि ती भेट झाल्याबरोबर पृथ्वीच्या ठिकाणीं धान्याचा गर्भ राहतो. पावसाळा सुरू झाला की, नाजूक हिरव्यागार गवताचीं पातीं डोलूं लागलेलीं

आपल्याला दिसतात; पृथ्वीला डोहाळे लागल्याचं तें चिन्ह आहे, असं एका कवीनं म्हटलेलं आहे. आणि गर्भधारणा व्हावी या इच्छेनं समागमासाठी उत्सुक होणं हा गुणविशेष केवळ पृथ्वीच्याच ठिकाणीं दिसतो असं नव्हे, तर पशुपक्षांत, स्त्री-पुरुषांतहि तो आढळतो, अशा संकेत काव्यांत आणि संगीतांतहि रूढ झालेला आहे. विरहव्याकुलता व कामातुरता हे दोन मनोधर्म वर्षाकालानं जिकडे तिकडे उत्पन्न केलेले कवींना दिसतात. मनःसृष्टीवर बाह्यसृष्टीचा परिणाम होतो किंवा नाही, याबद्दल शास्त्रज्ञांत मतभेद असतील. परंतु तो परिणाम होतो ही गोष्ट कवींनीं आणि गीतकारांनीं अविवाद्य म्हणून मानलेली आहे. निसर्गांतील हालचालींमुळे मनाचीहि विवक्षित हालचाल होते, हा सिद्धांत चुकीचा म्हणून त्याज्य ठरविला, तर जगांतलं अर्धं काव्य नाहीसं होईल. मनाची विवक्षित चलबिचल करण्याच्या बाबतींत भिन्न भिन्न ऋतूंच्या ठिकाणीं भिन्न भिन्न गुण आहेत. ते काटेकोर शास्त्राच्या दृष्टीनं मान्य होण्यासारखे असोत अगर नसोत, कवींनी ते मान्य केलेले आहेत. आणि वर्षाऋतूचा जो विशेष त्यांनी संकेतानं ठरविला आहे तो हा, की या ऋतूच्या आगमनामुळे पृथ्वीच्या ठिकाणीं व पशुपक्षी आणि मनुष्य यांच्याहि ठिकाणीं गर्भधारणेची आर्तता उत्पन्न होते, आणि त्या आर्ततेमुळे समागमाची विलक्षण उत्कंठा निर्माण होऊन विरह असह्य होऊं लागतो.

'मेघदूत' काव्याची बैठक या संकेतांवर बरीचशी आधारलेली आहे. अलकापुरींतून हद्दपार झालेला यक्ष वास्तविक कार्तिक महिन्यांत घरीं परत जाणार होता. आपल्या स्त्रीपासून दूर त्यानं नऊ महिने काढलेहि होते. आता फक्त तीनच महिन्यांचा सवाल उरला होता. हत्ती गेला शेपूट राहिलं अशी त्याच्या शिक्षेची स्थिति होती. हे उरलेले तीनच महिने त्यानं मन घट्ट करून काढायला कांही हरकत नव्हती. पण आकाशांत मेघांचा संचार जेव्हा सुरू झाला आणि वर्षाकालाच्या आगमनाचीं इतरहि चिन्हं त्याला भोंवतालच्या सृष्टींत दिसूं लागलीं, तेव्हा आपल्या स्त्रीचा विरह त्याला असह्य झाला. समागमासाठी तो विलक्षण आतुर झाला, आणि आपल्या स्त्रीची प्रत्यक्ष भेट होणं अशक्य आहे, तर निदान तिच्यासाठी आपण कसे झुरत आहोंत; हें तरी तिला कळवावं अशा विचारानं

त्यानं मेघाला दूत करून त्याच्याबरोबर संदेश पाठविला. प्रेमाचा निरोप नेणाऱ्या दूताचं काम करण्यास मेघ योग्य आहे, असं ज्या अनेक कारणांनीं यक्षाला वाटलं, त्यांतलं प्रमुख हें की, हा मेघ आपली प्रियकरीण जी विद्युल्लता तिला बरोबर घेऊनच सर्वत्र संचार करीत असतो. म्हणजे प्रेमीजनांना विरह किती असह्य असतो याची त्याला कल्पना आहे. व ती असल्यामुळे आपला विरहव्यथेचा निरोप तो आपल्या स्त्रीला अगत्यानं पोंचवील ! 'आषाढस्य प्रथम दिवसे' या शब्दांनीं कालिदासानं आपल्या 'मेघदूत' काव्याच्या पहिल्या श्लोकाचा प्रारंभ केला, यांत अशाच संकेताचा अभिप्राय आहे की, वर्षाकाल सुरू झाल्याबरोबर पशुपक्षांच्या आणि स्त्री-पुरुषांच्या ठिकाणीं प्रियसमागमाची ओढ निर्माण होते. हत्ती हत्तिणींशीं क्रीडा करूं लागतात, मयूरींचें मन सुप्रसन्न करण्यासाठी मयूर आपले सुंदर पिसारे पसरून नृत्य करूं लागतात, आणि ऋतुसंहारांत एके ठिकाणीं म्हटल्याप्रमाणे, 'अभिसारिका आपल्या प्रियकरांना भेटण्यासाठी लताकुंजांकडे उत्कंठित अंतःकरणानं जाऊं लागतात.'

अंतःकरणांत प्रेमाची हुरहुर उत्पन्न करण्याचा गुण वर्षाकालांत आहे हें एकदा मान्य केलं की, या कल्पनेभोंवतीं काव्याचा आणि संगीताचा वाटेल तेवढा फुलोरा फुलविण्यासारखा आहे. आणि आमच्या कवींनी, चित्रकारांनी व गायकांनी तो मनःपूत फुलविलाहि आहे. वर्षाकालांतील निसर्गाचं स्वरूप पाहिल्यानं स्त्री-पुरुषांच्या अंतःकरणांत चुंबनालिंगनाची इच्छा उद्भवते; आणि उलट मनांत ही इच्छा उद्भवल्यावर मनुष्य निसर्गातली जी जी वस्तु पाहील तिच्यांत त्याला समागमसूचक अभिप्राय आढळतो. निसर्गानं कामुक भाव उत्पन्न करावा, आणि उलट त्या भावनेच्या दृष्टींतून पाहिलेल्या प्रत्येक वस्तूंत कामोद्दीपन करण्याचा गुण दिसावा, असा हा दुहेरी संकेत आहे. या संकेताला मानसशास्त्राचा आधार आहे. कारण मानसशास्त्रांत कल्पनांच्या अन्योन्याश्रयाचा (Association of ideas चा) सिद्धांत मान्य समजतात. म्हणून संस्कृत काव्यांत पाण्यानं भरलेले ढग, विद्युल्लता, पर्वत, आकाश इत्यादींचीं स्वरूपं वर्णितांना कवींनी त्यांवर कामसूचकतेचे आरोप केलेले आढळतात. वाल्मिकी-रामायणांत असं वर्णन आहे की, श्रीरामचंद्र सुग्रीवाच्या किष्किंधा नगरींत असतांना वर्षाकाल

सुरू झाला, व त्या कालांतील निसर्गस्वरूपाकडे दृष्टि टाकल्यावर सीतेचा विरह त्याला अधिकच असह्य वाटूं लागून रावणावर स्वारी करून तिची सुटका केव्हा एकदा करतों असं त्याला झालं. आसमंतांत जे 'मन्दमारुत-निश्वास' सुटलेले होते, ते कामातुर पुरुषाच्या उसाशांसारखे त्याला वाटले, आणि त्यानं वर नजर टाकली तेव्हा 'कामातुरमिवांबरम्'– म्हणजे आकाश कामोत्सुक झाल्यासारखं त्याला वाटलं. ऋतुसंहारांत कवि एके ठिकाणीं मेघाचं वर्णन करतांना असं म्हणतो की, या वर्षाकालीन मेघांचा वर्ण गर्भिणीच्या स्तनाच्या वर्णाप्रमाणे भासतो.

वर्षाकाल सुरू होताच स्त्रीपुरुषांना तीव्र कामुक उत्कंठेचा अनुभव यावा या संकेतामागं एक महत्त्वाचं सामाजिक कारण आहे, ही गोष्ट विसरतां कामा नये. प्राचीन कालापासून चालत आलेली वहिवाट अशी, की पावसाळ्याच्या आधीच्या काळांत घराघरांतले कर्ते पुरुष दूर देशीं गेलेले असायचे, आणि पावसाळा आला की, त्यांनी घरीं परत यायचं. पराक्रम करण्यासाठी दूर दूर गेलेले लढाऊ लोक, धंद्यासाठी बाहेर पडलेले व्यापारी, रोजगारासाठी गेलेले शेतकरी, ही सर्व मंडळी पावसाळ्याच्या आरंभी घरोघर यायची. संध्याकाळ झाली, की पक्षी घरट्यांकडे परत येतात त्याप्रमाणे ही सारी मंडळी वर्षाकालाबरोबर आपापल्या घराकडे परत वळायची. सबंध पावसाळा या मंडळींनी घरीं काढायचा, शेतांत पेरण्या व्हायच्या. धान्यधन भरघोस उगवायचं, त्याच्या कापणीला प्रारंभ व्हायचा आणि अशा रीतीनं घराघरांत सारी समृद्धि झाली, वृष्टि थांबली, कीं मग पुरुषांनी निश्चित मनानं व नव्या उत्साहानं विजयादशमीच्या सुमुहूर्तावर नवे देश जिंकण्यासाठी म्हणा, व्यापारासाठी म्हणा, अगर साध्या रोजगारासाठी म्हणा बाहेर पडायचं. सामाजिक जीवनाचा हा ठरीव क्रम होता. त्यामुळे ज्या काळांत परस्पर विरह संपून स्त्रीपुरुषांचं पुनर्मीलन होतं तो काल म्हणजे वर्षाकाल असा सामाजिक आचरणाचाच संकेत ठरून गेला होता. आणि या संकेताला काव्याचं स्वरूप देतांना कवींनी तो नाना प्रकारांनी नटवावा हें ओघानंच आलं. कालिदास ऋतुसंहारांतल्या वर्णनांत म्हणतो, की या वर्षाऋतूंत अंतःकरण उत्कंठित करण्याचा जसा गुण अहे तसाच रुसवा घालविण्याचाहि गुण आहे. "प्रियकरानं शंभर

अपराध केले असले तरी त्याची भेट शयनमंदिरांत झाल्याबरोबर समागमासाठी उत्सुक झालेल्या स्त्रीला त्या अपराधांचा विसर पडतो."

दूर देशीं गेलेले पुरुष पावसाळ्याच्या आरंभीं परत यायचे हा सामान्य क्रम ठरलेला खरा, पण सारेच नवरे आणि सारेच प्रियकर या क्रमानुसार परत येतातच असं नाही. कित्येकांना घरीं यायला उशीर होतो. कुणाचीं कामं आटपत नाहीत म्हणून, कुणी प्रेमाच्या लफड्यांत सांपडले म्हणून. आणि मग त्यांच्या स्त्रिया अथवा प्रेयसी त्यांची वाट पाहतां पाहतां विरहानं आणि शंकेनं घाबऱ्या होतात. स्त्री-पुरुषांच्या पुनर्मीलनाच्या आनंदोत्सवाप्रमाणेच स्त्रियांची ही विरहव्याकुलता म्हणजे कवींच्या प्रतिभेला मोठं खाद्य ठरलं आहे. कां कोण जाणे, रसांचा राजा असं जरी शृंगाराला नांव आहे तरी करुण रसांत कांहीतरी विशेष गोडी रसिकाला वाटते. त्यामुळे प्रियकराच्या आलिंगनांत रममाण झालेल्या स्त्रीपेक्षा त्या आलिंगनासाठी झुरणाऱ्या स्त्रीचा विषय कवींना, चित्रकारांना व गायकांना अधिक प्रिय असल्यासारखा वाटतो. वर्षाकालाचं वैभव निसर्गांत जिकडे तिकडे पसरलेलं आहे अशा पार्श्वभूमीवर व्याकुल मनानं प्रियकराची वाट पाहणाऱ्या स्त्रीचं चित्र चित्रकारांनीं विशेष तन्मयतेनं रंगविलेलं आढळतं. ऋतुसंहारांत एके ठिकाणीं कालिदास वर्णन करतो, "इंदीवरकमलासारख्या डोळ्यांतून विरहव्यथेमुळे ओघळलेल्या आसवांनी ज्यांचे कोवळ्या पल्लवासारखे अधरबिंब भिजलेले आहेत, व ज्यांच्या अंगावरचा गंधपुष्पादि साजशृंगार सुकून गेला आहे, अशा प्रमदा प्रवासाला गेलेल्या प्रियकराची वाट बघून बघून निराश मनानं उभ्या असतात!"

कालिदासाच्या वर्णनांतले हे 'प्रवासी प्रियकर' आणि 'निराश झालेल्या प्रेयसी' म्हणजे आमच्या गायकांच्या गीतांचे अगदी ठरलेले विषय आहेत. आपल्या संगीतांत वर्षाऋतूचं वर्णन करण्यासाठी मल्लार रागाची योजना केलेली आढळते. मल्लार रागाचे अनेक प्रकार आहेत. मेघमल्लार, मियामल्लार, गौडमल्लार, सूरदासी मल्लार, रामदासी मल्लार, नटमल्लार, मिराबाईका मल्लार, असे किती तरी. आपण प्रचारांत जो विशेष ऐकतों तो मियामल्लार होय. पण या सर्व रागिणींतील चिजा एकत्र केल्या, आणि त्यांकडे पाहिलं तर वर्षाऋतूच्या वर्णनाचा एक ठराविक साचा

त्यांत दिसतो. ' घटा भयी घन घोर, गरजत थरररर, छूटे पवन, भवन दूर रह्यो ,' ' आये घेर घोर कारे बादर चहु ओर, प्यारे कुकत मयूर गण, डारे डारे कोयलिया चातक हुलसात है ' ' आयो अब बरखारुत, चमकत दामनीपताक, डंका भयो अशनीरव, बहुधार घन बरसत, चातक कुल सब हुलसत '– अशीं वर्णनं किती तरी चिजांत पुनरुक्त झालेलीं आहेत. आणि या सृष्टिवर्णनांपेक्षाहि अधिक पुनरुक्त विरहव्यथेचीं वर्णनं आहेत. " बारखारुन बैरी हमारे मास अखाड घटा घन गरजत पियु परदेश हमारे ।। दादर मोर पपैया चात्रक पियु पियु करत पुकारे अब न सहल सखि पिया-बिरह दुख निकसत प्राण हमारे " या अर्थाच्या मल्लार रागिणीच्या किती तरी चिजा काढून दाखवितां येतील. साहित्यांत ज्याप्रमाणे प्रादेशिक वाङ्मय असा एक प्रकार संभवतो त्याप्रमाणे संगीतांत त्या त्या ऋतुकालांत गाण्यासाठी म्हणून मुद्दाम तयार केलेलीं गीतं आढळतात. चैत्र महिन्यांत गावयाच्या गीतांना ' चैती ' म्हणतात. श्रावण महिन्यांत गीतं गायचीं त्यांना 'सावनी' म्हणतात. परंपरेच्या संकेताप्रमाणे राग जसे त्यांच्या ठरीव प्रहरींच गावयाचे, त्याप्रमाणेच हीं ऋतुगीतं त्या त्या ऋतूंतच म्हटलीं जातात. या गीतांचं वैशिष्ट्य असं, की हीं सारी ठुमरीच्या अंगानं म्हणायचीं असतात. म्हणजे त्यांची गणना गंभीर प्रकृतीच्या रागिणींत नव्हे, तर तरल संगीतांत करायला हवी. ' सावनी ' गीतांतला मजकूर ठरीव सांच्याचा असतो. केवळ सृष्टिवर्णनात्मक असं त्यांचं स्वरूप नसतं. ' लगते सावन घर आयी ' म्हणजे श्रावण महिना सुरू झालेला आहे तेव्हा माझा प्रियकर घरी येईल– अशा प्रकारें संगमोत्सुक झालेली स्त्री आपली विरहव्यथा सांगत आहे आणि लवकर ये म्हणून प्रियकराची विनवणी करीत आहे—हा ' सावनी ' गीतांतला ठरीव मजकूर आहे.

जुन्या संस्कृत वाङ्मयांत आणि संगीतांत वर्षाकालीन उत्सवांचीहि वर्णनं आलेलीं आहेत; तथापि तीं थोडीं आहेत. आधुनिक मराठी काव्य आणि कथा व चित्रपट संगीत असल्या वर्णनांनी समृद्ध आहेत. चित्रपटांतील गीतांमध्ये ' घटा घन घोर ' ' बादल ' ' बिजली ' यांचा केवढा धुमाकूळ माजलेला आहे तें सर्वांना माहीत आहेच. नागपंचमीच्या दिवशींचा ' झूला ' हा गीतांचाच नव्हे, चित्रपटांतील कथेचा देखील विषय झालेला आढळतो.

पावसाळ्यांतले मुख्य सण म्हणजे नागपंचमी, नारळी पौर्णिमा, गोकुळाष्टमी, गणेश चतुर्थी, घटस्थापना आणि विजयादशमी. या सणांच्या दिवशीं ग्रामीण स्त्री-पुरुष कोणत्या प्रकारं उत्सवमग्न होतात त्याचीं वर्णनं आधुनिक मराठी कवितेंत विपुल आहेत. अर्थात या वर्णनांत देखील प्रियकराची वाट पाहणारी स्त्री, माहेरीं किंवा सासरीं जाणारी नववधू, गर्द राईतल्या एकांतांत अगर मोटेवर भेटणारे आशुकमाशुक, यांनाच विशेष प्राधान्य मिळालेलं आहे. वर्षाकाल म्हणजे विरहसमाप्तीचा आणि प्रीतिसंगमाचा काल हा संकेत अगदी प्राचीन कालापासून जो सुरू झाला तो अजूनहि कायम आहे. वसंत ऋतूंत लताकुंजांत भेटणाऱ्या प्रियजनापेक्षा वर्षाऋतूंतल्या सृष्टिवैभवाच्या पार्श्वभूमीवर एकमेकांना आलिंगन देणारे प्रियजन कवींना, चित्रकारांना, व गायकांना अधिक मोह नेहमीच पाडीत आलेले आहेत. वर्षाऋतूचं नांव घेतल्याबरोबर कोणतं चित्र डोळ्यांपुढं येतं, असं मला जर विचाराल तर मी सांगेन, मृच्छकटिक नाटकांतील चारुदत्त आणि वसंत-सेना यांचं. मेघांच्या गर्जनेला आणि विजांच्या कडकडाटाला न जुमानतां चारुदत्ताकडे जाणारी वसंतसेना, त्या दोघांच्या भेटीच्या वेळीं सुरू झालेली वृष्टि, आणि "ज्यांचीं अंगं जलधारांनी भिजलेलीं आहेत अशा ललना आपण होऊन येऊन ज्यांना मिठी मारतात ते पुरुष मोठे भाग्यवान होत" असे उद्गार काढणारा चारुदत्त व त्याला बिलगलेली वसंतसेना हें वर्षा-ऋतूचं सगळ्यांत प्रातिनिधिक आणि सगळ्यांत चित्ताकर्षक चित्र होय अशी माझी समजूत आहे.

* * *

८ :

# कश्मिरांतील वसंत

"आला" ऋतु वसंत आला!"—अशी ललकारी कश्मीरच्या खोऱ्यांत प्रथम ऐकूं येते ती कतीज, सतूत अशा पक्ष्यांकडून. कश्मीरमधले कांही पक्षी असे आहेत की, त्यांना थंड हवा सोसत नाही. कश्मिरांत हिवाळा कडाकूं लागला की हे पक्षी पंजाबांत निघून जातात, तिकडेच तीन महिने राहतात, आणि ऋतु वसंत कश्मीरकडे निघाला की, एखाद्या राजाच्या भालदार चोपदाराप्रमाणे हे पक्षी त्याच्या आगमनाची कश्मिरी लोकांना वर्दी देण्यासाठी पुढे धावत येतात. या पक्षांची गोड किलबिल कानीं पडली रे पडली की, कश्मिरी स्त्री-पुरुष समजतात, शिशिर ऋतु आपली वाड-बिछायत गुंडाळून गेला असून वसंतऋतूची स्वारी कश्मीरच्या दिशेनं येत आहे.

वसंत ऋतूच्या आगमनाची गोड वर्दी देणाऱ्या या पक्षांची नावं कतीज, सतूत, पोषनूल, फपसीर, सोनचिचूर, चकोर अशीं आहेत. यांतला चकोर आपण महाराष्ट्रीय लोकांनी फारसा प्रत्यक्ष पाहिलेला नसला तरी काव्यांतून त्याचा चांगला परिचय आपल्याला झालेला आहे. हिवाळ्यांत पंजाबच्या दिशेनं चालते झालेले हे सारे पक्षी आपल्या मधुर शब्दांनी वातावरण भरून सोडूं लागले की, समजावं कश्मिरच्या खोऱ्यात वसंत ऋतुराजाचं अधिराज्य सुरू झालेलं आहे. मग साऱ्या सृष्टीचं रूप झपाट्यानं बदलूं लागतं. हिवाळ्यांत गोठून गारठून निद्रिस्त झालेली सृष्टी जागृत होऊं लागते. वसंत ऋतूच्या स्पर्शानं रोमांचित होऊं लागते. आणि सृष्टीच्या अंगावर उठलेले ते हर्षाचे रोमांच नाना स्वरूपांत जिकडे तिकडे दिसूं लागतात.

पहाट, जलप्रवाह, वनं, उपवनं, शेतं, माळरानं, मळे अशाप्रकारें ठायीं ठायीं नवजीवनाचे अंकुर फुटतात. अनंत रंगांचीं फुलं फुलूं लागतात. आकाशगर्भांत फाकलेल्या प्रकाशांत देखील परोपरीच्या रंगछटा झळाळूं लागतात. बगीच्याबगीच्यांत केवळ कश्मीरच्या भूमींतच उगवणाऱ्या अशा अनेक जातींच्या वेलींवर कुठे तांबडी, कुठे जांभळी, कुठे पिवळी, कुठे मोत्या-सारखीं स्वच्छ पांढरीं अशीं अति नाजूक फुलं घोसा-घोसांनी लगडूं लागतात. गुलाबांच्या ताटव्यांत जाड मखमलीसारख्या टवटवीत पाकळ्यांच्या गुलाबाचे कलशायेवढाले कंद डोलूं लागतात. सफरचंद, नारावत, अक्रोड, बदाम अशा फळझाडांच्या आगामी बहराची सूचना देणारीं तऱ्हेतऱ्हेचीं फुलं त्यांच्या शाखांवर प्रगट होऊं लागतात, आणि त्या फुलांच्या पाकळ्यांचे सडे जागो-जाग पडल्यामुळे कुरणाच्या हिरव्यागार पार्श्वभूमीवर नाना रंगांची रांगोळी काढण्याचा खेळ घडीभर करून कुणी अप्सरा भूलोकावर येऊन गेल्याचा भास होतो.

उंच उंच पहाडांच्या माथ्यावरचे बर्फाचे थर वितळून विरल झाल्यामुळे चमचम करणाऱ्या पारदर्शक वस्त्रासारखे भासूं लागतात. पहाडांचं अंग झाकणाऱ्या गर्द झाडींतल्या वृक्षावर फुलोरा विशेष नसतो. परंतु नव्या पालवीचे कुठे गडद, कुठे फिकट असे रंग खुलून दिसूं लागतात. त्या पहाडाकडे पाहिलं की, ज्यांनी आपले विशाल धिप्पाड देह नाना तऱ्हेचे रंग लेपून शृंगारलेले आहेत, अशा रानटी पुरुषांची आठवण होण्यासारखी असते. छोट्या आणि बड्या दल तलावांत कमळाच्या हजारो वेली प्रफुल्लित होतात. त्यांचीं विस्तीर्ण हिरवीं काळीं पानं कांही जलपृष्ठाखाली, कांही जलपृष्ठावर तरंगताना दिसतात, आणि उंच उंच देठावर पांढरीं, निळीं, तांबडीं कमळं डोलतांना आढळतात.

तलावांत गवताच्या झुपक्यांत ' टेच ' नावाचा पक्षी हळूच हलतांना दिसतो. या पक्षाचं मांस खायला गोड लागतं. आणि कश्मीरमधल्या लोकांना त्याची मोठी चटक आहे. मात्र या पक्ष्याची शिकार करणं हें मोठं कौशल्याचं काम असतं. कारण या टेच पक्षाला माणसाची चाहूल लागली की, तो एकदम गवतांत खोल शिरतो व पाण्याखाली बुडी मारून

जो पसार होतो तो एकदम मैल अर्धा मैल दूरच्या गवताच्या दुसऱ्या झुपक्यांत प्रगट होतो ! त्यामुळे दुरून भाला फेकून याची शिकार करण्याचा प्रघात आहे.

जेहलम नदीच्या दोन्ही बाजूंस कुठे कुरणात, कुठे बागेत, कुठे मळ्यांत, गुलाब, पंजीना, योस्मन, एशिकपंचान, खताई, कारिपत्य, लिलि अशी हजार तऱ्हांचीं वासंतिक फुलं फुलल्यामुळे वाऱ्याचे झोत सदा सुगंधित होऊन वाहूं लागतात. पक्ष्यांच्या नादमधुर शब्दांनी वातावरण गजबजून जातं. श्रीनगरचे लोक या वासंतिक आनंदाचा उपभोग आपापल्या परिस्थितीप्रमाणे घेण्यांत मग्न होतात. गरीब माणसं पुष्पमाला धारण करतात, जलविहार करतात; तमाशे बघतात, श्रीमंत माणसांच्या वासंतिक चैनीच्या तऱ्हा निराळ्या असतात. त्यांच्या चैनीच्या जागाहि वेगळ्या असतात. एखाद्या नर्तकीच्या घरांत रात्री दिव्यांचा झगझगाट दिसतो. बड्या बड्या लोकांचं हसणं खिदळणं ऐकूं येतं, नर्तकीच्या पायांतील नुपुरांचा झंकार बाहेर ऐकूं येतो, किंवा गायिकेच्या कंठांतून सारंग गीताच्या साथीवर निघणाऱ्या गझलच्या पालुपदाच्या पंक्ती ऐकूं येतात.

दिले नादाँ तुझे हुआ । क्या है
अखेर इसी दर्दकी दवा । क्या है—

अरे नादान हृदया, तुला झालंय तरी काय ? तुझ्या या दुःखावर औषध तरी कोणतं आहे ?

अनंत तऱ्हांच्या फुलांची लयलूट हें कश्मीरमधील वसंत ऋतूचं खरं वैशिष्ट्य आणि वैभव, ग्रीष्म ऋतु दूर असतो त्यामुळे जेहलमच्या पात्रांतून अजून मुबलक पाणी असतं. छोट्या व बड्या दलमध्येहि पाणी विपुल असतं. पर्वतावर हिवाळ्याप्रमाणे बर्फाचे दाट जाड थर नसतात. पण बर्फाचं विरल आच्छादन असतंच, आणि सूर्यप्रकाशांत त्याचा चमचमाट जसा पाहण्यासारखा असतो त्याचप्रमाणे चांदण्यांत त्याची काही एक अवर्णनीय शोभा दिसते. परंतु कश्मीरांतील वासंतिक निसर्गसौंदर्याचा मुख्य भाग म्हणजे जिकडे तिकडे फुललेलीं फुलं ! कश्मीर सरकार वसंतोत्सव

मोठ्या प्रमाणावर साजरा करतं. फुलांचं प्रदर्शन भरविलं जातं. लोकगीतांचे आणि नृत्याचे कार्यक्रम होतात. ते सर्वांना खुले असतात. जेहलमच्या पात्रांत परीपरीनं शृंगारलेल्या मोठमोठ्या नौकांची जी मिरवणूक निघते तिचा थाट तर कांही विचारूंच नका.

कश्मीरचं सौंदर्य बघावयास येणाऱ्या प्रवाशांची वसंत ऋतूंत गर्दी उसळते व निशात, शालीमार बगीचे बघण्यासाठी त्यांच्या झुंडीच्या झुंडी लोटूं लागतात. परंतु खुद्द कश्मिरी लोकांनादेखील या बगीच्याबद्दल अनिवार प्रेम आहे. असा साधारण शिरस्ताच आहे की रविवारचा सुटीचा दिवस सर्व लोकांनी-श्रीमंतांनीच नव्हे तर गरीबांनी आणि खेडुतांनी देखील बगीच्यांत वनभोजन करून साजरा करायचा. त्यामुळे बगीच्याकडे जाणारे रस्ते तर भरलेले असतातच; पण शिवाय दलच्या जलमार्गात शेकडो लोक शिकाऱ्यांतून निघालेले असतात. हे लोक पत्ते खेळत असतात, गाणीं गात असतात. फोनोग्राफ ऐकत असतात. सुरईसारख्या उंच समूवार नांवाच्या भांड्यांत तयार केलेला नमकीन चहा म्हणजे साखऱ्याऐवजी मीठ घातलेला चहा चिनी मातीच्या बसकट पेल्यांतून पीत असतात.

निशात बाग शालीमारपेक्षा लोकांना अधिक प्रिय असावी. शालीमारपेक्षा या ठिकाणीं लोकांची किती तरी अधिक गर्दी उसळलेली तुम्हांला दिसेल. तुम्ही जर दलमधून नौकेतून आलां असाल तर निशात बागेपुढल्या तलावाच्या काठाशी शिकाऱ्यांची अशी काही झुंबड उडालेली तुम्हांला दिसेल की, तुम्हांला वाटेल, तिच्यांतून मार्ग काढून नावाडी आपला शिकारा काठाला लावणार कसा ? परंतु शिकाऱ्यांच्या किचकट दाटींतून तुमचा नावाडी हां हां म्हणतां सफाईनं वाट काढील, आणि शिकारा किनाऱ्याला लावील !

सारा सवयीचा खेळ आहे. सायकलीवरून हिंडतांना आपण नाही का अशक्य वाटणाऱ्या दाटींतून वाट काढीत ? उद्यानापुढच्या हमरस्त्यावर मोटारींची, टांग्यांची एकच थाप लागलेली तुम्हांला दिसेल. मिठाईच्या, पुरीभाजीच्या दुकानांची दाटी झालेली आढळेल. फळांचा मोसम अजूनहि दूरच असेल. परंतु सुंदर ताजीं सफरचंदं सहा आणे डझनानं मिळतील.

शालीमार बागेला चारच मजले—यांना म्हणायचं मजगी—आहेत. पण निशात बागेला सात आहेत. शेवटची मजगी फारच उंच असून तिच्या

मागे अगदी चिकटून पर्वतांची रांग दिसते. शालिमारमध्ये एकच मंडप आहे. इथे दोन आहेत. शालीमार बाग जहांगीर बादशहानं १६१९ मध्ये तयार करविली आणि निशात बाग नूरजहान राणीचा आसफशाह यानं नंतर बांधली. हा बगीचा अधिकच मनोहर झालेला पाहून जहांगिराला विषाद वाटला, आणि या बागेत येणारं पाणी त्यानं कांही दिवस तोडलं होतं असं सांगतात. ही आख्यायिका खरी असो किंवा खोटी असो. येवढं खरं की हीं उद्यानं एकाच नमुन्याचीं असलीं तरी निशातची सर शालिमारला नाही ! म्हणूनच मला वाटतं, लोकांची खरी प्रचंड गर्दी या उद्यानावर दिसते. या गर्दींत श्रीमंतांपेक्षा सामान्य गरीब लोकांची संख्या अधिक असते हें विशेष. अंगावर साधे, मळके, क्वचित फाटके कपडे, त्यावर जुनी फाटकी शाल, किंवा कश्मिरी घोंगडी लपेटून घेतलेली, अशा वेषांत साधे खेड्डत ;किंवा कामकरी लोक आपले मित्र म्हणा किंवा आपलीं बायकामुलं म्हणा घेऊन आलेले दिसतात, आणि या मंडळींच्या तोंडावरचा उल्हास श्रीमंताहून काकणभर अधिकच असतो. क्वचितच खेडूत प्रेमिकांची तरुण जोडीही तुम्हांला आढळेल. आणि कश्मिरी भाषेंत चाललेल्या त्यांच्या गुजगोष्टी समजणाऱ्या नाहीत, याचं तुम्हांला वाईट वाटेल. उद्यानांत जिकडे तिकडे माणसांचा गजबजाट दिसेल. कुणी आस्ते कदम सहल करीत असतील, कुणी कारंज्यापुढे थबकलेले असतील, कुणी हिरवळीवर धावणाऱ्या अगर पुष्करणींतलं पाणी एकमेकांवर उडविणाऱ्या किशोरांचा खेळ पहात असतील, कुणी वृक्षांच्या गर्द छायेंत तृणांकुरावर खुशाल झोपले असतील, कुणी वनभोजन करीत असतील. जिकडे तिकडे चहा तयार होत असेल, सारं उद्यान आनंदानं आणि समाधानानं बहरून गेलेलं असेल. पुरुष, स्त्रिया, मुलं, म्हातारे, श्रीमंत, गरीब हे भेद या उद्यानांत घटकाभर नाहीसे झालेले असतात. सारीं माणसं एकाच पातळीवर आलेलीं असतात. क्रीडोद्यानांत विहार करणारीं हीं सारीं माणसं असतात. हें रमणीय उद्यान सगळ्यांच्या मालकीचं आहे. या ठिकाणीं कश्मीरच्या वासंतिक शोभेची आणि उन्मादाची मजा कुणी किती लुटावी याला बंधन नाही !

* * *

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थव
अनुक्रम.................. वि: ..........
क्रमांक .................. नों: वि: ........

# ९ : सुंदर स्त्रीची माझी कल्पना

स्त्रियांच्या सौंदर्यसाधनांची निर्मिति हा अमेरिकेच्या धंद्यांपैकी पांचव्या नंबरचा मोठा धंदा आहे, असं एका आंकडेशास्त्रज्ञाचं म्हणणं आहे. भारतांत या धंद्याचा क्रमांक कितवा लागतो त्याचा शोध कोणी केला नसावा. तथापि मासिकांत आणि वृत्तपत्रांत सौंदर्यप्रसाधनांच्या ज्या जाहिराती येतात, त्यांचं प्रमाण बघितलं तर आपल्या देशांतसुद्धा स्त्रियांच्या सौंदर्यप्रसाधनांचं उत्पादन बऱ्याच मोठ्या प्रमाणावर होत असलं पाहिजे असं वाटतं. आणि हें साहाजिक आहे. कारण भारतांतले पुरुष इटली किंवा फ्रान्स देशांतल्या पुरुषांइतकं स्त्री-दाक्षिण्याचं आणि रसिकतेचं प्रदर्शन करीत नसले, तरी ते स्त्रीसौंदर्याचे चाहते खचितच आहेत. मेनकेला बघतांच 'वेडावून' जाणाऱ्या आणि दीर्घ तपश्चर्येवर खुशाल पाणी सोडणाऱ्या विश्वामित्राचे वंशज आहेत ना भारतांतले पुरुष ! स्त्रीसौंदर्याची पारख त्यांना कशी नसेल ? उगाच का आमच्या समाजांतल्या बायका नानातऱ्हेच्या साड्या नेसतात, परोपरीचे अलंकार घालतात, केशरचनेचे नाना प्रकार करतात, डोक्यांत फुलं माळतात, तोंडाला स्नो-पावडर लावतात, ओठ रंगवतात ?

परंतु साजशृंगार करण्याची स्त्रियांची ही धडपड कशासाठी असते ?... सुंदर 'असण्या' साठी ? नव्हे ! नव्हे !...त्यांचा सारा खटाटोप असतो सुंदर 'दिसण्या' साठी ! पाहणारांनी आपल्याला सुंदर म्हणावं त्यासाठी त्या धडपडत असतात !...आणि पाहणारांनी म्हणजे पाहणाऱ्या बायकां-

पेक्षा पुरुषांनी !...आरशापुढे घटकान्घटका परोपरीची खटपट करून वेशभूषा करणाऱ्या स्त्रीचा हेतु कोणता असतो ? तर दहाजणींत उठून दिसण्याचा ? कुणाला दिसण्याचा ? अर्थात पुरुषांना ! पांच वारी साड्या नेसणाऱ्या, लांब बाह्यांच्या आखूड चोळ्या घालून अर्धी पोटं उघडीं टाकणाऱ्या, अश्वपुच्छासारखे केस बांधणाऱ्या, ओठ लाल भडक रंगविणाऱ्या अत्याधुनिक पोरसवदा प्रमदांचाच तेवढा हा हेतु असतो असं नव्हे, तर अगदी पु. भा. भाव्यांच्या नखशिखान्त आर्य-स्त्रीचा किंवा क्षीरसागरांना पसंत असलेल्या नव्या फॅशन्सना बळी न पडलेल्या, स्त्रीचा देखील हाच हेतु असतो ! भाव्यांची किंवा क्षीरसागरांची आदर्श आर्य-स्त्रीसुद्धा पुरुषाची चाहूल लागल्याबरोबर पदर ढळला नसला तरीदेखील तो सावरण्यासाठी हाताची हालचाल करते, आणि पुरुषाचं लक्ष स्वतःच्या वक्षभागाकडे जावं अशीच पर्यायानं योजना करते. आदर्श आर्य-स्त्रीदेखील पुरुषाचा चित्तवेध ( ! ) करण्याच्या बाबतींत कांही कमी चतुर असते असं नका समजूं ! पुरोगामी कॉलेजकन्येच्या रीतीहून तिच्या रीति निराळ्या एवढंच ! स्त्रियांच्या मनांत डोकावून बघितलं तर आपल्याला बघणाऱ्या पुरुषांनी आपल्याला सुंदर म्हणावं ही एकच इच्छा असते !...

परंतु गंमत अशी की पुरुषाच्या दृष्टीनं स्त्री-सौंदर्याचीं लक्षणं कोणतीं याचा विचार सहसा कोणतीच स्त्री करीत नाही. जी ती स्त्री आपल्या स्वतःच्या मतानं आपण कशामुळे सुंदर दिसूं तें ठरविते. पण खरं पाहतां या बाबतींत तिनं पुरुषांची सल्लामसलत घेतली पाहिजे.

ही मसलत पुरुष देईल किंवा न देईल ही गोष्ट वेगळी !

—आणि एका पुरुषाचं मत दुसऱ्या पुरुषाच्या मताशी कितपत जुळेल ही गोष्ट तर आणखीच वेगळी.

एक माणूस दुसऱ्या माणसासारखं नसतं, प्रत्येकाच्या शरीराची ठेवण वेगळी, प्रत्येकाची चेहरेपट्टी वेगळी, प्रत्येकाचा वर्ण वेगळा, हें तर झालंच पण शिवाय प्रत्येकाची सौंदर्याची दृष्टीदेखील वेगळी असते. एखाद्या पुरुषाला जी स्त्री सुंदर वाटेल ती दुसऱ्याला सुंदर वाटेलच असं नव्हे.

प्रेमानं झपाटलेल्या प्रेमिकांकडे बघून भोवतालचीं बहुतेक माणसं आश्चर्य करीत असतात, या दोघांना एकमेकांत येवढं काय आढळलं ? परंतु त्या पुरुषाला ती स्त्री प्रत्यक्ष रतीसारखी वाटत असते, आणि तिला तो पुरुष मदनाचा अवतार वाटत असतो. ऑथेल्लोसारख्या काळ्याभिट्ट, कुरूप पुरुषावर लुब्ध झालेल्या डेस्डिमोनासारख्या लावण्यलतिकेचं वर्णन शेक्स-पिअरनं साहित्यांत अमर करून ठेवलं आहे. याच्याच जोडीला गडकऱ्यांच्या सुविख्यात इंदूबिंदूसारख्या आफ्रिका हुंडीवर लट्टू झालेल्या पुरुषाचं वर्णन मात्र साहित्यांत आढळत नाही. याचं साधं कारण एवढंच की नाटकं, कथा, कादंबऱ्या लिहिण्याचा उद्योग अधिक अंशानं पुरुष करतात. समान हक्कांची बजावणी करण्यासाठी एखाद्या लेखिकेनं कुब्जेसारख्या बाईवर फिदा झालेल्या एखाद्या सुंदर पुरुषाचं वर्णन करण्याची वेळ खचितच आलेली आहे. साहित्यांत हा ढळलेला समतोल दुरुस्त करण्याची कामगिरी कुणातरी लेखकभगिनीकडून खरोखर व्हायला हवी आहे !

सांगण्याचा मुद्दा असा की साऱ्या जगाच्या दृष्टीनं कुरूप असलेलं माणूस त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या व्यक्तीला वेड लावण्याइतकं सुंदर दिसत असतं. स्त्रीच्या सौंदर्याचीं सर्वमान्य अशीं लक्षणें सांगतां येणार नाहीत. देशो-देशींच्या चालीरीती जशा वेगवेगळ्या, त्याप्रमाणेच सुरूपता, कुरूपता मोज-ण्याच्या फुटपट्ट्याहि भिन्नभिन्न असतात. लांबसडक निमुळत्या पावलांनी स्त्रीचं सौंदर्य वाढतं असं आपण समजतों; पण उलट चिनी-जपानी लोकांना आखूड, खुरटलेले, बिनबोटांचे पाय सुंदर वाटतात, आणि बायकांचं सौंदर्य वाढविण्यासाठी लहानपणापासून त्यांचीं पावलं चेचून खुरटीं करण्या-साठी आवळ बुटांत त्यांना ते चालायला लावतात. नाकाची कळी चाफेकळी-सारखी असावी असं आपण म्हणतों; परंतु स्त्रीच्या चपट्या नाकांत ज्यांना सौंदर्य दिसतं असे लोक पुष्कळ आहेत. टाचापर्यंत लोंबणारा विपुल केशभार म्हणजे स्त्रीच्या सौंदर्याची परमावधि झाली असं कालपरवापर्यंत आपण म्हणत होतों. परंतु आता सौंदर्याचं हें लक्षण झपाट्यानं मागं पडूं लागलं आहे. फार तर मानेचा भाग झाकला जाईल अशा बेतानं कापलेल्या लांड्या केसांचे घुंगुरवाळे सुंदर स्त्रीच्या वर्णनांत स्थान मिळवूं

लागले आहेत. ज्यांत सुवर्णालंकार गुंफले आहेत असा भलामोठा बाईच्या केसांचा ‘ खोपा ’ तर चालू पिढीनं बघितलाच नाही, परंतु ‘ अंबाडा ’ देखील चालू पिढीच्या देखतदेखत दिसेनासा झाला ! आता सर्रास दिसूं लागले आहेत. दोन वेण्यांचे ‘ झोपाळे ’ आणि क्वचित लांड्या केसांचे घुंगुरवाळे ! सगनभाऊच्या लावणींतली टीपदार कासोट्याची पट्टी महिला-जगतांतून केव्हाच हद्दपार झाली ! आता लेखकावर प्रसंग गुदरला आहे गोल साडीच्या आकर्षणाचं वर्णन करण्याचा !

आपल्याच सौंदर्याच्या कल्पना कालपरत्वें बदलत गेल्या आहेत. मग देशकाल-धर्मपंथ यांनी भिन्न असलेल्या लोकांच्या सौंदर्यदृष्टींत एकवाक्यतेची अपेक्षा कशी करतां येईल ? सौंदर्याच्या बाबतींत खरा निष्कर्ष असा काढावा लागतो की तें वस्तुनिष्ठ नसून व्यक्तिनिष्ठ आहे, आणि म्हणून सापेक्ष आहे. सौंदर्य स्त्रीच्या ठिकाणीं नसतं, तर तिच्याकडे बघणाऱ्या पुरुषाच्या नजरेंत असतं !

स्त्री-सौंदर्याची शास्त्रीय मीमांसा करूंच नये असा याचा अर्थ नाही. जगांतली कोणतीच गोष्ट शास्त्रज्ञांच्या कचाट्यांतून सुटत नाही. प्रत्येक गोष्टीचं शास्त्र बनविण्याची माणसाची धडपड असते, आणि ती असल्या-मुळेच मानवी संस्कृतीचा सतत विकास होत राहतो. या कारणानं स्त्री-सौंदर्याच्या बाबतींतदेखील शास्त्रीय चर्चा संभवतेच. इंग्रजींत ‘ क्लासिक ब्यूटी ’ असा शब्दप्रयोग करण्यांत येतो. शास्त्रसंमत स्त्री-सौंदर्य असा शब्द-प्रयोग आपण करूं. या शब्दप्रयोगाला कांहीतरी अर्थ आहेच. ‘ चंद्रानना ’ ‘ हरिणाक्षी ’ ‘ मदिराक्षी ’ ‘ कमलनयना ’ ‘ सिंहकटी ’ इत्यादि शब्द साहित्यात रूढ झालेले आहेत, त्यांत पुष्कळ अभिप्राय आहे. महत्त्वाचा मुद्दा एवढाच की या साऱ्या शास्त्रसंमत लक्षणांनी युक्त असलेली स्त्री प्रत्येकाला आवडेलच असं नाही.

माझीच गोष्ट पहा ना.

जिला ‘ चंद्रानना ’ म्हणतां येईल अशी स्त्री मला सुंदर वाटत नाही. वाटोळ्या चेहऱ्याचा पुरुष मला अगदीच आवडत नाही, अशा तोंडाचा पुरुष

बायक्या वाटतो. आणि गंमत अशी की चंद्रासारख्या वाटोळ्या चेहऱ्याची स्त्री मला आकर्षक वाटत नाही. जिचा चेहरा थोडासा लंबवर्तुळाकार आहे अशी स्त्री माझं लक्ष चटकन् वेधून घेते. त्याचप्रमाणे ठेंगणेपणा, ठुसकेपणा पुष्कळांच्या दृष्टीनं बाईच्या सौंदर्यात भर घालणारा ठरतो. परंतु मला उंच बाई आवडते. जिचे पाय लांबसडक आहेत अशी स्त्री मला सुंदर वाटते. अगदी धारदार नाक स्त्रीसौंदर्याचं लक्षण खरं, परंतु नाक सरळ पण टोकाशीं जरा गोबरं झालेलं असल्यामुळेच एखादी स्त्री मोहक दिसते. रुंद भालप्रदेश जसा स्त्रीला शोभतो त्याचप्रमाणे जरा अरुंद कपाळ दाट केसांच्या मेहरपींत असल्यानं एखादी स्त्री देखणी वाटते. पातळ ओठांची स्त्री मला आवडत नाही. अशा पातळ ओठांच्या स्त्रीच्या ठिकाणीं मनाचा करारी-पणा नसतो असं म्हणतात हें तर खरंच, पण शिवाय– जरा विनोदानं बोलण्याची परवानगी घेऊन म्हणतो की– अशा पातळ ओठांत 'अधरामृत' कितीसं असेल, अशी रास्त शंका मला आल्याशिवाय राहात नाही. स्त्रीचे ओठ जरा मांसल आणि जाडच असायला हवेत– काबुली द्राक्षासारखे ! निदान खालचा ओठ तरी !

अकस्मात अरण्यांत दिसलेल्या सुभद्रेला बघून 'सुवर्णकेतकीपरि जो दिसतो रंग नव्हे दुसरीचा !' असं म्हणणाऱ्या अर्जुनाला गोऱ्या रंगामुळे सुभद्रा आवडली होती असं दिसतं. 'कर्पूरगौर' असंहि स्त्रीच्या वर्णाचं वर्णन काव्यांत रूढ झालेलं आहे. परंतु गोरी स्त्री हटकून सुंदर असतेच, किंवा गौर वर्णावांचून स्त्री सुंदर असूं शकत नाही, या दोन्ही कल्पना चुकीच्या म्हटल्या पाहिजेत. गोऱ्या 'मडमा' फारच क्वचित सुंदर असतात. नासलेल्या दुधासारखी त्यांची कातडी कुणाला मोहक वाटत असेल ती वाटो ! अशी कातडी बघितली की माझ्या अंगावर रोमांचा-ऐवजी शहारे येतात. काळ्यासावळ्या रंगानं स्त्रीला कांही वेगळंच सौंदर्य प्राप्त होतं. काश्मीरमधल्या गौरांगी आणि केरळमधल्या श्यामला यांत अधिक सुंदर कुणाला म्हणावं या प्रश्नाचं उत्तर मी तरी केरळांतल्या स्त्रियांच्या बाजूनं देईन. लावणीकरांनी स्त्रीच्या कृष्णवर्णाची 'माझ्या काळ्या मांड्या झाका.' यासारख्या शब्दांत अनेक ठिकाणीं प्रशंसा केलेली आढळते. रतिक्रीडेसाठी गोऱ्या स्त्रीपेक्षा शाम वर्णाची स्त्री अधिक चांगली

असं वात्स्यायनानं कामसूत्रांत सांगितलेलं आहे. सुंदर स्त्रीच्या माझ्या कल्पनेंत गौर वर्णापेक्षा कृष्णवर्णाला अधिक महत्त्व निश्चित आहे.

सुंदर स्त्रीचं वर्णन करतांना कधीकधी ‘ कृशांगी ’ हें विशेषण वापरलेलं आढळतं. प्रियकराच्या विरहानं झुरत राहिल्यानं स्त्री ‘ कृशांगी ’ झाली असेल तर एक वेळ मी तिचं कौतुक करीन. परंतु एरवी कृश स्त्री माझा चित्तवेध करूं शकत नाही. स्त्रीच्या शरीराला शोभा देते अवयवांची पुष्टताच. विशेषतः स्त्रीच्या भुजलता पुष्ट आणि गोलच असायला हव्यात. नितंब-देखील कसे परिपुष्ट असले पाहिजेत. आणि वक्षःस्थळ तर भरदार पाहिजेच पाहिजे ! सपाट छातीच्या बायका माझ्या मनांतून ताबडतोब उतरतात. स्त्रीचा वक्ष कसा हवा, तर त्याचं वर्णन ‘ वक्षभाग ’ या शब्दांत नव्हे तर ‘ वक्षभार ’ याच शब्दानं करायला लागावं. नितंबांच्या भारामुळे जिच्या गतींत नृत्य आलं आहे आणि स्तनभारामुळे जी किंचित झुकली आहे—असं जें वर्णन स्त्रीच्या बाबतींत केलं जातं त्यांत मला खरी रसिकता दिसते. आणि निसर्गाचा कोणता रासायनिक चमत्कार आहे कोण जाणे, परंतु गोऱ्या बायकांचे वक्षभाग सहसा चांगले नसतात, आणि कृष्णवर्णी स्त्रिया मात्र ‘ सुस्तनी ’ असतात, म्हणूनच गोऱ्यागोमट्या बायांपेक्षा काळीसावळी स्त्री मला अधिक मोह घालते.

मोठेमोठे पाणीदार डोळे म्हणजे स्त्रीच्या आयुधागारांतलं एक मोठं प्रभावी अस्त्र होय, यांत शंका नाही. परंतु हा न्यायदेखील निरपवाद नाही. स्त्रीच्या डोळ्यांच्या आकारापेक्षा तिची ‘ नजर ’ अधिक महत्त्वाची म्हणावी लागेल. मोठ्या आकाराच्या डोळ्यांत भाव नसेल तर ती स्त्री खुळ्यासारखी वाटते. याच्या उलट कधीकधी बारीक डोळ्यांत अशी कांही नजर आढळून येते की तिचं आकर्षण जबरदस्त असतं. इंग्रजींत ज्याला ‘ एरोटिक ’ म्हणतात, तशी ‘ कामोद्दीपन करणारी ’ नजर बारीक डोळ्यांची देखील असूं शकते. इतकंच काय, एखादी निराळ्या डोळ्यांची स्त्रीदेखील अशा नजरेची असूं शकते. एकदा सहज बडोद्यास गेलों असतांना लखनौची असगरी नांवाची एक नर्तिका आल्याचं मला कळलं, म्हणून तिच्या बिऱ्हाडीं गेलों. फार सुंदर नाचली ती मुलगी. असेल अठरा—एकोणीस

वर्षांची. परंतु कशी मोहक होती दिसायला. आणि मुख्य म्हणजे तिचा मोहकपणा विषेश उठून दिसत होता किंचित तिरळेपणामुळे ! नाहीतरी स्त्रीच्या सरळ कटाक्षापेक्षा तिरप्या कटाक्षाचा बाणच अधिक जिव्हारी लागतो, नव्हे काय ? गझल–कवालींत घोळूनघोळून वर्णिलेली आहे 'तिरछी नजर !'—

मात्र नाक, डोळे, हात, पाय, नितंब, स्तन इत्यादि अवयवांचं सौंदर्य म्हणजे काही झालं तरी पार्थिव सौंदर्य आहे. केवळ या पार्थिव सौंदर्यामुळे स्त्रीच्या दर्शनाला रमणीयता येत नाही. बघणाराला वेड लावील अशी रमणीयता स्त्रीच्या ठिकाणीं येण्यासाठी तिच्या अंगीं केवळ पार्थिव सौंदर्याहून वेगळंच असं 'कांहीतरी' असावं लागतं. या 'कांहीतरी'च वर्णन करतां येण्यासारखं नाही. विश्लेषण तर केवळ अशक्य आहे. कारण हें जें 'कांही तरी' तें हातापायांच्या आकारांत नाही. नाक-डोळ्यांच्या ठेवणींत नाही. तें अपार्थिव आहे. मात्र या 'कांहीतरी' ची व्याख्या, वर्णन, विश्लेषण इत्यादि गोष्टी अशक्य असल्या तरी त्याच्या आस्तित्वाबद्दल आणि प्रभावाबद्दल शंकेला मुळीदेखील जागा नाही. शाब्दिक वर्णनाच्या पलीकडलं असं हें जें 'कांहीतरी' तें जिच्या ठिकाणीं नाही त्या स्त्रीचे नाक-डोळे कितीहि रेखीव असले, तिचा बांधा कितीहि सुडौल असला तरी ती पुरुषाला मोह घालूं शकत नाही. उलट एखादी स्त्री नाकीडोळीं अशीतशीच असेल, रंगा-रूपानं यथातथाच असेल, परंतु या 'कांहीतरी' ची रोशनी तिच्या ठिकाणीं असली तर ती पुरुषाला घायाळ केल्यावाचून राहणार नाही. इंग्रजी भाषेंत या 'कांहीतरीला' 'It' म्हणतात. तें याचसाठी की त्याची अधिक फोड करून सांगतां येण्यासारखी नाही. अशा प्रकारचं जें हें 'तें' त्याचा प्रत्यक्ष अनुभव हाच 'तें' च्या अस्तित्वाचा पुरावा होय ! सृष्टीच्या अंतिम तत्त्वाचा ज्याप्रमाणे साक्षात्कारच व्हावा लागतो तशीच स्त्रीच्या सौंदर्याला खरी पूर्णता देणाऱ्या या अपार्थिव 'तें' ची गोष्ट आहे !

आपल्या लहान वयांतहि अमकी बाई सुंदर आहे असं आपण म्हणतों. नवतारुण्यांत आपल्याला स्त्रीचं आकर्षण वाटूं लागतं. एखाद्या स्त्रीवर प्रेम

करावं, तिचं प्रेम जिंकावं अशी ओढ आपल्याला वाटूं लागते. ज्या तरुण स्त्रियांशीं आपला परिचय होतो, ज्यांचा कमीअधिक सहवास आपल्याला घडतो, त्यांतली जास्तींतजास्त सुंदर स्त्री आपण निवडतों. तिला आपली 'प्रिय सखी' आपण म्हणतों. शक्य तर तिच्याशीं विवाहबद्ध होऊन तिची 'पत्नी' पदावर स्थापना करतों. परंतु भर ज्वानीच्या दिवसांत आपल्याला स्त्री-सौंदर्याचं खरं मर्म कळलेलं असतं असं थोडंच आहे? त्या वयांतलं सौंदर्यज्ञान, प्रेम, प्रणय, प्रियाराधन, इत्यादि साऱ्याच गोष्टी 'गद्धेपंचविशी' तल्या प्रकारांपैकी असतात. सौंदर्याचं खरं मर्म माणसाला कळूं लागतं त्याचं वय वाढतं तेव्हा. स्त्रीच्या सौंदर्याला खरी आकर्षकता देणारं जें 'कांहीतरी' तें कळूं लागतं जवळजवळ मनुष्य मध्यवयाचा उंबरठा ओलांडून वार्धक्यांत प्रविष्ट होतो तेव्हा! इतकंच काय, स्त्रीच्या पार्थिव सौंदर्याची खरी गोडी कशांत आहे आणि कशी घ्यावी हेंदेखील माणसाला कळूं लागतं केव्हा?— तर वयाच्या अशा अवस्थेंत की प्रेम करण्याची फारशी सोय राहिलेली नसते. म्हणजे पाहा, स्त्रीवर प्रेम करण्याचं जेव्हा वय असतं तेव्हा खरी सुंदर स्त्री कोणती तें समजण्याची माणसाला अक्कल नसते! आणि जेव्हा ही अक्कल येते, 'जाणकार' पणा येतो, चौदा कॅरेटचं सोनं कोणतं आणि शंभर नंबरी सुवर्ण कोणतं तें कळूं लागतं, स्त्रीच्या लावण्याला खरी पूर्तता देणारं जें 'कांहीतरी' त्याचा साक्षात्कार झालेला असतो, तेव्हा प्रेम करण्याचं माणसाचं वय निघून गेलेलं असतं!

मानवी जीवनांतली ही केवढी शोकांतिका म्हणायची! परंतु या शोकांतिकेला कांही इलाज नाही!...

* * *

# १० : मित्र ! मित्र !

'मृच्छकटिक' नाटकांत मैत्रेय जेव्हा चारुदत्ताला त्याच्या दैन्याचं वर्णन करून सांगतो तेव्हा आपल्या वैभवाची यादी करतांना "तुझ्या-सारखा मित्र मला आहे." असे उद्‌गार नाटककारानं चारुदत्ताच्या तोंडी घातलेले आहेत...हे उद्‌गार मला फार मार्मिक वाटतात. मित्ररूपी धनाचा योग्यता खरोखरच फार मोठी आहे. हें धन ज्याच्याजवळ असेल त्याला कोणतीहि विपत्ति सुसह्य वाटेल. उलट ज्याला एकहि मित्र नाही त्याच्या-सारखा हतभागी करंटा माणूस दुसरा नाही. माणसाच्या आयुष्याचं सार्थक होण्यासाठी त्याला मित्रपरिवार असायलाच हवा.

हॅम्लेट नाटकांत शालेय नांवाच्या एका वृद्धाचं पात्र शेक्सपीयरनं रेखाटलेलं आहे. हा म्हातारा स्वतःला फार व्यवहारचतुर समजत असतो, व ज्याला त्याला व्यवहारज्ञानाचे घुटके पाजीत असतो. ते पाजतांना तो अधून मधून मोठे मार्मिक बोलतो. उदाहरणार्थ, त्याचा मुलगा तीव्रजव परदेशी जावयास निघाल्यावर त्याला निरोप देतांना जो हितोपदेश त्यानं केलेला आहे तो लक्षांत ठेवण्यासारखा आहे. तो मुलाला सांगतो, "पोषाख भारी किंमतीचा असावा, पण भडक नसावा. कुणाच्या अध्यांत मध्यांत पडूं नये, पण पडल्यावर दुसऱ्याला चांगलाच हात दाखविल्याशिवाय राहूं नये. कुणाला ऋण देऊं नये अन् कुणाचं घेऊं नये." हा उपदेश भाषेच्या दृष्टीनं ऐकायला चटकदार आहे. परंतु पंचाईत एवढीच की त्याप्रमाणे वागण्याचा जो कोणी प्रयत्न करील त्याला कळून येईल की तसं वागणं

अशक्य नसलं तरी फार कठीण आहे. याच उपदेशांत म्हाताऱ्यानं पुढे असं म्हटलं आहे की, " मित्र दोन चारच असावेत पण ते पारखलेले असावेत. " हें वाक्य जेव्हा जेव्हा मला आठवतं तेव्हा तेव्हा माझ्या मनांत प्रश्न उभा राहतो की, खरा मित्र पारखायचा कसा ?

शेक्सपीअरनं कांही वृद्ध शालेयाच्या तोंडीं खुलासा घातलेला नाही. एका विनोदी लेखकांचं म्हणणं असं की आपण मागितल्याबरोबर जो आपणाला कर्ज देतो तो खरा मित्र. ही व्याख्या कांही वाईट नाही. परंतु ज्यांना नेहमीं ऋण काढावं लागतं त्यांच्याच फक्त ती उपयोगी पडण्यासारखी आहे. अर्थात् मित्राचा खरेखोटेपणा पडताळून पाहण्याच्या हेतूनं इतरांनीहि ऋण मागायला कांही हरकत नाहीं. परंतु माझ्यासारखा ज्यांचा स्वभाव असेल त्यांना ते जमणंच शक्य नाही. वडीलधारी माणसं आपल्याला पुष्कळदा सांगतात, की जो जिवाला जीव देईल तोच खरा मित्र. परंतु मित्रपरीक्षेच्या या तत्त्वाचा उपयोग सामान्य व्यवहारांत कसा करतां येणार ? कारण आपला जीव आधी संकटांत पडेल तेव्हाच या तत्त्वाप्रमाणे मित्रांचीं पारख करतां येणार ! ही कसोटी वाच्यार्थानं न घेतां लक्षणार्थानं घेतली, आणि अडचणीच्या वेळीं जो उपयोगी पडतो तो खरा मित्र असं जरी मानलं, तरी मित्राची पारख करण्यासाठी आपल्यावर आधी संकट यायला हवं. ही देखील कांही फारशी आनंदाची गोष्ट नव्हे. मी तर म्हणेन की संकटं आल्यावाचून मित्राची परीक्षा करतां येत नसेल तर ती करण्याचा प्रसंग माझ्या शत्रूवरसुद्धा येऊं नये.

मग खऱ्या मित्राची कसोटी कोणती ? त्याची व्याख्या काय ? इत्यादि प्रश्न शिल्लक राहतात. माझ्यापुरतं बोलायचं झालं तर मी म्हणेन या प्रश्नांचीं उत्तरं निश्चित केल्यावाचून आपलं कांही अडत नाही. कारण माझी अशी समजूत आहे की, खऱ्या मित्राची व्याख्या करणं जरी कठीण असलं तरी खरा मित्र ओळखणं फार सोपं आहे. तो आपल्याला भेटला की अगदी अल्प कालांत आपण त्याला ओळखूं शकतों. कुठल्याहि तात्त्विक व्याख्येच्या साहाय्यावाचून ओळखूं शकतों. खाडिलकरांच्या स्वयंवर नाटकांत श्रीकृष्णाला पाहिल्यावर रुक्मिणी आपल्या सखीला आनंदभरानं सांगते की, " त्यांना पाहतांच मी ओळखलं की तेच ते, व मला पाहतांच त्यांनी पण ओळखलं

की मीच ती, " तद्वतच खरा मित्र दिसल्याबरोबर आपण त्याला ओळखूं शकतों.

पहिल्या दृष्टिभेटींत उत्पन्न होणाऱ्या प्रेमाला कसोटी लावतां येईल काय ? कसोटी म्हटली की काळाचं अंतर उत्पन्न होणार ! आणि अंतर उत्पन्न झालं की दृष्टिभेटींतल्या प्रेमांतला जो अचानकपणा तो नाहीसा होणार ! म्हणजे त्या प्रेमाची तऱ्हाच अशी कीं तें पारखून, तोलून, तपासून घेण्यासाठी नसतं. ज्यांना पारखल्यावाचून कांही घेतां येत नाही त्यांच्यासाठी तें नव्हेच ! ज्यांना त्याच्या बावनकशीपणाचा मनोमन प्रत्यय घडतो त्यांच्यासाठी तें आहे. ज्या आकर्षणांतून तें उत्पन्न होतं त्याची शास्त्रीय उपपत्ति लावण्याचा प्रयत्न करणं किती वेडेपणाचं आहे तें सुचविण्यासाठी " आंतरः कोऽपि हेतु " असं कवीनं म्हटलेलं आहे. पहिल्या दृष्टिभेटींत प्रीति उत्पन्न होते त्या वेळेस पुरुष मनांतल्या मनांत एकदम समजतो की विधात्यानं जी आपल्यासाठी घडविली ती स्त्री हीच ! आणि तिलाहि ओळख पटते की आपण ज्याची आतुरतेनं वाट पहात होतों तो पुरुष हाच ! प्रीतीची व्याख्या करूं पाहणं चुकीचं आहे; आणि त्या व्याख्येची गरजहि नाही. ज्याला ती सापडते त्याला तिची ओळख ताबडतोब पटते. मित्राच्या बाबतींत हाच न्याय लागू आहे. खरा मित्र पाहिल्याबरोबर ओळखतां येतो. ज्याला तो ओळखतां येत नसेल त्याला मित्र मिळावेत अशी त्याची योग्यताच नाही असं खुशाल समजावं !

मित्रांची कसोटी पाहूं नये अशा मतांचा मी असल्यामुळे मैत्री व उपयुक्तता यांचा संबंध मी मानीत नाही हें ओघानं आलंच. जो आपल्या उपयोगी पडतो तो खरा मित्र हें तत्त्व मानणं माझ्या अगदी जिवावर येतं. मैत्री म्हणजे एक सुंदर वस्तु आहे. तिचं माप व्यावहारिक उपयुक्ततेनं ठरविणं म्हणजे तिच्या सौंदर्याची हानि करण्यासारखं आहे. जी वस्तु सुंदर असते ती अगदीच निरुपयोगी नसते. तिचा कांही ना कांही उपयोग असतोच. ती आपल्याला आनंद देते हाच मुळी तिचा एक मोठा उपयोग नाही काय ? परंतु यापलीकडेहि जे जे सुंदर त्याचा कमी अधिक उपयोग असतोच. सूर्योदय ही सृष्टींतल्या घटनांपैकी एक पराकाष्ठेची शोभेची घटना आहे. पण

त्या घटनेची व्यावहारिक उपयुक्तता कांही थोडी नाही. सूर्याचा अस्त, चंद्राचं चांदणं, आकाशगंगेतील तारकापुंज, मृगांचं चापल्य, आम्रमंजिरींचा सुगंध, भृंगांचा गुंजारव, वेलीवरचीं फुलं, इत्यादि सौंदर्यांपैकी प्रत्येकाची व्यावहारिक उपयुक्तता सांगतां येईल. परंतु उपयुक्तता हा त्यांचा आत्मा नव्हे. त्याचप्रमाणे उपयोगी पडणं हा खऱ्या मैत्रीचा आत्मा नव्हे. खऱ्या मैत्रीची ती खूण नव्हे. मित्र आपल्या उपयोगी पडतात हें मला मान्य आहे. परंतु जे खरे मित्र असतात ते अशा कांही चातुर्यानं आपल्या उपयोगी पडतात की ते आपल्या उपयोगी पडले ही गोष्ट ते आपल्याला कळूं देत नाहीत. वेळूच्या बेटांतून वाहणारा वारा मंजुळ ध्वनि उत्पन्न करतो, पण ते अगदी सहज नाजुकपणानं, वाहण्याची जी स्वतःची क्रिया ती करतां करतां जे खरे मित्र असतात ते आपल्या उपयोगी पडले तरी ते आपल्या लक्षांत न यावं म्हणून त्यांची गोड खटपट असते. मग जो उपयोगी पडतो तो मित्र ही कसोटी लावायची कशी ?

या संसाराच्या विचित्र विविध व्यवहारांत संकटं आणि अडचणी सर्वांच्याच वाट्याला येतात. त्याचप्रमाणे माझ्याहि वाट्याला त्या येतात. पण अशा वेळीं मित्रांकडे धाव घ्यावी असं मला वाटत नाही. परिस्थितीशी झुंज करण्याची वेळ आली की माणसानं आपल्या पायावर उभं रहावं आणि अंगांतल्या अस्सल गुणांचीं जीं हत्यारं असतील त्यानिशी लढावं, मित्रांच्या मध्यस्थीचीं अगर चांगुलपणाचीं हत्यारं उसनीं मागून घेण्यांत कांही अर्थ नाही, अशी माझी समजूत आहे. शिवाय मनांत असं येतं की एखाद्या मित्राचं साहाय्य मागितलं आणि त्यानं तें दिलं नाही, किंवा त्याला तें देतां आलं नाही, तर माझं संकट तर कायम राहणार आणि शिवाय त्या मित्राला मी गमावून बसणार. तेव्हा नकोच, मित्रांची परीक्षा पाहणं. विषाची परीक्षा पाहूं नये असं म्हणतात ना ? तीच गोष्ट प्रीतीची आणि मैत्रीची. या गोष्टींची परीक्षा कधी पाहू नये. सुंदर फूल हाती आलं की त्यांत मधाचे थेंब किती आहेत हें पाहण्यासाठी त्याच्या पाकळ्या तोडूं नयेत. मध आहेच ही खात्री ठेवावी. त्या फुलाच्या सुगंधाचा आस्वाद घ्यावा. तें सौंदर्य आपल्या हातीं आलं या भाग्याचा अभिमान बाळगावा. त्याचं व्यावहारिक शास्त्रीय विच्छेदन करूं नये.

जी दीर्घकाल टिकणारी ती खरी मैत्री असं पुष्कळ लोक समजतात. परंतु ही गोष्ट देखील मला मान्य नाही. कांही फुलांचा सुवास पुष्कळ वेळ टिकतो, कांहींचा थोडा वेळ टिकतो. कांही फुलांचा वास फक्त दुरूनच सुखाचा होतो, कांही फक्त रात्री सुगंध देतात. परंतु सुवास तो सुवासच. आपल्याला तो थोडा वेळ मिळाला नंतर फूल सुकून गेलं तरी जोपर्यंत आपण त्याचा वास घेतों तोपर्यंत तो सुवासच असतो. मैत्रीचं असंच आहे. ती थोडा वेळ टिकली तरी जोपर्यंत ती टिकते तोपर्यंत ती मैत्रीच असते. दोन व्यक्तींमध्ये तीस तीस चाळीस चाळीस वर्षांचा जुना स्नेह असलेला व टिकलेला मला आढळला की त्यांच्या दृढ स्नेहाचं मला कौतुक वाटतं. परंतु जुनेपणाला मित्रत्वाची कसोटी समजायला मी तयार नाही. मैत्री म्हणजे काय दारू आहे ? दारू जितकी जुनी आणि मुरलेली असेल तितकी अधिक चांगली समजली जाते. तें खरंहि असेल कदाचित. परंतु जो जुना मित्र तो खरा मित्र असं मानायला मी तयार नाही.

हे पहा, माझ्या टेबलावर एक पत्र पडलेलं आहे. तें दोनच दिवसांपूर्वी माझ्या टपालांत मला मिळालं. तोपर्यंत त्या पत्राखाली सही करणाऱ्या व्यक्तीच्या अस्तित्वाची देखील मला कल्पना नव्हती. परंतु कित्येक हजार मैलांपलीकडे आघाडीवरील एका अज्ञात ठिकाणीं लिहिल्या गेलेल्या या पत्रांत एकंदर मराठी भाषेविषयी व माझ्या पुस्तकाविषयी लढाईवर गेलेल्या त्या तरुण गृहस्थानं जो खूप खूप मजकूर सारा संकोच सोडून लिहिलेला आहे, त्यांतला जिव्हाळा पाहिल्यावर मला एक नवा मित्र मिळाला असं वाटल्यावाचून कसं राहील ? या पत्रलेखकाला मी कधी पाहिलेलं नाही. कदाचित् माझी त्याची प्रत्यक्ष भेट कधी होणार नाही. परंतु मी त्याचा मित्र आहे. आणि तो माझा मित्र आहे. प्रवासांत कित्येकदा असा एखादा मनुष्य मला भेटतो की थोड्याशाच संभाषणानं त्याच्या माझ्यात स्वभावाची व आवडीनिवडीची समानता असल्याचं मला आढळून येतं. मग संभाषणाला अधिक बहर येतो. चहापाणी, क्वचित् जेवणखाण एकत्र होतं. एकमेकांचे पत्ते आम्ही एकमेकांना देतों, आणि वारंवार पत्रलेखनाचीं आश्वासनं एकमेकाला देऊन आम्ही निरोप घेतों. तीं आश्वासनं क्वचित् पाळलीं जातात. तीं पाळलीं जाणार नाहीत ही गोष्ट त्यांची देवघेव

करतांना आम्हा दोघांनाहि माहीत असते. परंतु म्हणून ज्याची मला औट घटकाच का होईना सुखाची सोबत झाली तो माझा मित्र नव्हे काय? मला तरी तो मित्रासारखा वाटतो.

'तुझ्यासारखा मित्र मला आहे' असं मैत्रेयाला म्हणतांना चारुदत्तानं, किंवा 'मित्र दोन चारच असावेत पण ते पारखलेले असावेत' असा आपल्या मुलाला हितोपदेश करतांना वृद्ध शालेयानं मित्रांची कोणती कसोटी गृहीत धरली होती ते समजण्याला मार्ग नाही. परंतु माझी कल्पना मुळीं अशी की खरा मित्र पारखता येत नाही, आणि त्याची पारख करण्याचा उद्योग करूहि नये. खरा मित्र तो की ज्याची गाठभेट झाल्याबरोबर आपल्याला आन्तरिक ओळख पटते, की हा खरा मित्र!

उपयुक्तता किंवा जुनेपणा अशा कसोट्या मी मानीत नसल्यामुळे मित्रांच्या बाबतींत मी फार श्रीमंत आहें. माझ्याजवळ जें मित्ररूपी धन साचलेलं आहे तें अगणित, अमर्याद आहे. जुने, नवे, दूरचे, जवळचे, दिवसांतून चार वेळा भेटणारे, कधीच न भेटलेले, असे नानाप्रकारांचे असंख्य मित्र मी या आयुष्याच्या प्रवासांत जोडलेले आहेत. माझं गुप्त दुःख येवढंच, की त्यांपैकी फार थोड्यांशी मी प्रत्यक्ष बोलूं शकतों. दूरदूरच्या मित्रांचीं जीं पत्रं येतात त्यांपैकी बहुतेक पत्रांत मी उलट मोठं सविस्तर गप्पागोष्टींनी भरलेलं पत्र लिहावं अशी अपेक्षा केलेली असते. त्यांची ती अपेक्षा मी कशी पुरी करणार? रात्र थोडी सोंगं फार असा कामाचा पसारा वाढला की मनमोकळीं खाजगी पत्रं लिहिण्याचा मोह आवरावा लागतो. मित्रांशीं गप्पा मारण्याच्या आनंदाला मुकावं लागतं. मित्रांची नाराजी पत्करावी लागते.... परंतु या माझ्या दुःखांतहि एक सुख आहे तें अशा विचाराचं, की माझं साहित्य माझ्या सर्व मित्रांपर्यंत पोचू शकतं, आणि त्या साहित्याच्या रूपानं मी स्वतःच त्यांची भेट घेऊं शकतों... साहित्य म्हणजे लेखकाचा आत्माविष्कार होय. यांत काय संशय?

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
................ दि. ................
................ नों. दि. ................

## ११ : जन्माचा जोडीदार

जन्म आणि मृत्यु माणसाच्या आयुष्यांतल्या अत्यंत महत्त्वाच्या अशा दोन घटना ! दोन्ही अटळ ! आणि दोन्ही अशा की त्यावर माणसाच्या स्वतःच्या इच्छेचं नियंत्रणच नाही. कुठे आणि केव्हा जन्माला यायचं तें माणसाला ठरविता येत नाही. कर्णासारख्या पराक्रमी पुरुषाला देखील असं म्हणावं लागलं, की 'दैवायत्तं कुले जन्म !'–म्हणजे माझं कुळ ठरविलं दैवानं ! केव्हा मरायचं कुठे मरायचं तेंही माणसाला ठरवितां येत नाही. मरण चुकवितां येत नाही ही गोष्ट ठरलेली आहे. परंतु मरणाची जागा आणि मरणाची वेळ या गोष्टींत माणसाला स्वातंत्र्य नाही. भीष्माचार्यांसारखा इच्छामरणी एखादाच !

जन्म आणि मरण या दोन घटना सोडल्या तर त्याच्या खालोखाल ज्या घटनेला माणसाच्या आयुष्यांत महत्त्व असतं ती कोणती ? या प्रश्नाचं उत्तर एकच. लग्न !

जन्म-मृत्युप्रमाणेच लग्नाची घटनादेखील व्यक्तीच्या इच्छेप्रमाणे घडत नसून विधिलिखिताप्रमाणे घडत असतो, अशी हिंदुधर्मीयांतच नव्हे तर इतर धर्मांच्या लोकांतही समजूत आहे. स्त्रीचा पति परमेश्वरानं किंवा तिच्या दैवानं आधी ठरविलेला असतो, आणि त्याच्याशीच तिची जन्मगांठ पडत असते, आणि पुरुषाची पत्नीदेखील ईश्वरी सूत्रानं आधी ठरविलेली असते, आणि तीच त्याच्या वांट्याला येते, असं सामान्य माणसं समजतात.

Marriages are made in Heaven अशी पाश्चिमात्य लोकांचीहि समजूत आहे.

आधुनिक विचारांचीं सुशिक्षित माणसं मात्र असं प्रतिपादन करतात की पुरुषानं काय किंवा स्त्रीनं काय आपला जन्माचा जोडीदार स्वतः निवडावा. माणसाचं एकंदर सारंच आयुष्य दैवाधीन आहे, त्याच्या आयुष्यांतली प्रत्येक गोष्ट केव्हा घडायची, कशी घडायची ते आधी ठरलेलं आहे, अशा मताचे जे दैववादी पंडित आहेत, त्यांचा प्रेमविवाहाला विरोध नाही; परंतु ते असं म्हणतात की आपण आपल्या जोडीदाराचा प्रयत्न-पूर्वक शोध करून, त्याच्यावर प्रीति करून, आणि त्याची प्रीति संपादून त्याची निवड केली असं जे प्रीतिविवाह करणाऱ्याला वाटतं तो खोटा भ्रम आहे. कोणत्या व्यक्तीची कोणत्या व्यक्तीवर प्रीति जडायची हें त्या दोघांच्या दैवानं आधीच ठरविलेलं असतं, आणि दैवाच्या त्या सूत्राप्रमाणेच दोघांची गांठभेट होते, दोघांचीं मनं जुळतात, दोघं एकमेकांच्या प्रेमांत पडतात, दोघं विवाहबद्ध होऊन आयुष्याची वाट चालूं लागतात.

विवाहाच्या बाबतींत दैववाद खरा की प्रयत्नवाद खरा या प्रश्नाच्या खोल पाण्यांत शिरण्याचं आपल्याला काहीं कारण नाही. या दोहोंपैकीं कोणतंही मत खरं असलं तरी एक गोष्ट निर्विवाद आहे ती ही, की माणसाच्या आयुष्यांतली सर्वांत महत्त्वाची घटना विवाह. या घटनेचे परिणाम फार दूरवर होणारे असतात. आपल्याला जन्म देणाऱ्या आई-बापांची संगत जन्मभर पुरणारी नसते. त्यांच्या देहावसानाबरोबर ती संपते, किंवा आईबाप दीर्घायुषी झाले तरी आपल्या मोठेपणी आपण स्वतंत्र होतों आणि त्यांची संगत बहुधा सोडतों. आपण मित्र जोडतों खरे परंतु त्यांची मैत्रीदेखील जन्मभर टिकणारी बहुधा नसते. शाळासोबत्यांना आपण विसरून जातों. तारुण्यांत अनेक मित्र आपल्या आयुष्यांत येतात—जातात. ज्या व्यक्तीशीं आपण विवाह करतों ती व्यक्ति मात्र कायमची आपली होते, आणि आपण कायमचे तिचे होतों. म्हणूनच 'जन्माचा जोडीदार' अशा शब्दांनी त्या व्यक्तीचं वर्णन केलं जातं. विवाहाच्या वेळेस हिंदुधर्माप्रमाणे काय किंवा ख्रिस्तीधर्माप्रमाणे काय शपथ घ्यावयाची

असते ती अशी की ' तुझा मी कायमचा स्वीकार करीत आहे ! तुला कधीं अंतर देणार नाही ! मृत्यु आपली ताटातूट करील तोंपर्यंत आपलं जीवन एकरूप असेल ! तुझं सुख तें माझं सुख ! तुझं दुःख तें माझं दुःख !

अर्थात् कोणत्याहि व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाची जडण-घडण करणाऱ्या ज्या गोष्टी आहेत त्यांत सगळ्यांत अधिक महत्त्व दिलं पाहिजे त्याच्या जन्माच्या जोडीदाराला ! कोणत्याहि पुरुषाच्या आयुष्यांतलं सुखदुःख, त्याचं कर्तृत्व पुष्कळ अंशीं ठरत असतं तें ज्या स्त्रीशीं त्याची जन्मगांठ पडली त्या स्त्रीमुळे. उलट स्त्रीचं भाग्य बहुतांशीं अवलंबून असतं ज्या पुरुषाचा संसार ती करते त्या पुरुषावर !

मात्र गंमत अशी की अनेक थोर पुरुषांचीं चरित्रं बघितलीं असतां असं दिसतं कीं त्यांच्या लग्नाच्या स्त्रियांना त्यांत विशेष महत्त्वाचं स्थान नव्हतं. त्या स्त्रियांमुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडण-घडण झाली असं म्हणतां येणार नाहीं. त्या स्त्रियांनीं त्यांना खाऊं पिऊं घातलं, त्यांच्या सुखसोयी बघितल्या, त्यांच्यावर भक्ति ठेवली, पत्नीधर्माचं आचरण केलं, मुलां-बाळांना जन्म दिला, संसार केले, एवढंच ! यापलीकडे अधिक कांही या स्त्रिया करूं शकलेल्या दिसत नाहीत. त्यांच्या पुरुषांच्या व्यक्तिमत्त्वाची जी जडण-घडण झाली ती स्वतंत्रपणानं. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांना आपल्या पत्नीविषयी जिव्हाळा वाटत असेल. त्यांच्या पत्नीच्या मृत्यूची वार्ता मंडालेच्या तुरुंगांत त्यांना कळली तेव्हा ' कोणत्याहि दुःखाच्या धक्क्यानं मी खचून गेलो नाही, परंतु या दुःखानं खचून गेलों, ' असे उद्गार त्यांनी पत्रांत काढले असतील. तथापि भारताच्या स्वातंत्र्यासाठी झगडणारे नेते, झुंझार पत्रकार, गीतेचे भाष्यकार, तत्त्ववेत्ते, संशोधक अशा विविध पैलूंची ' लोकमान्य टिळक ' या नांवाची जी अवतार मूर्ति सिद्ध झाली तिच्या जडण-घडणींत त्यांच्या पत्नीचा कांही वांटा होता असं म्हणतां येणार नाही...अशाच प्रकारचीं इतर अनेक थोर व्यक्तींचीं चरित्रं आढळतात.

सॉक्रेटिस आणि त्याची पत्नी झांटिपी, तुकाराम महाराज आणि त्यांची बायको जिजाबाई यांचीं उदाहरणं तर अगदीच वेगळीं. सुप्रसिद्ध इंग्रज

ग्रंथकार कार्लाइल आणि त्याची बायको यांचंहि उदाहरण यापैकींच. या दांपत्यांत जन्मभर खडाष्टक होतं. या नवरा–बायकोंत जन्मभर त्रेसष्टा-ऐवजीं छत्तीसाचा आंकडा होता. बर्नार्ड शॉच्या संसाराचं स्वरूपहि कांहींसं असंच होतं. शॉची कीर्ति त्रिखंड गाजत होती. परंतु मिसेस शॉचं नांव कुणाच्या गांवीं नव्हतं. 'तुमची एवढी जगभर प्रसिद्धि, पण तुमच्या बायकोची प्रसिद्धि मुळीच कशी नाही?' असं कुणीतरी शॉला एकदा खवचटपणं विचारलं तेव्हा ती स्वारी काय म्हणाली ठाऊक आहे? शॉनं उत्तर दिलं, 'ती माझी बायको आहे, ही काय कमी प्रसिद्धि झाली!'

कोणत्याहि थोर पुरुषाचं चरित्र लिहितांना त्याची पत्नी कितीहि सामान्य असली तरी चरित्रकार तिच्याविषयी गौरवानं लिहितो. कवीचा, नाटक-काराचा, उद्योगपतीचा, नटाचा, गायकाचा, पुढाऱ्याचा, मंत्र्याचा सत्कार करण्यासाठी जाहीर सभा झाली की त्याच्या बायकोची लोक आठवण ठेवतात. व्यासपीठावरची मानाची खुर्ची तिला देण्यांत येते, तिच्या गळ्यांत हार घातला जातो, भाषण करणारेहि 'यांच्या यशांत यांच्या पत्नीचा मोठा वांटा आहे' असं गौरवानं म्हणतात. परंतु हे सारे प्रकार केवळ उपचारासाठी केलेले असतात...सगळ्यांना माहीत असतं की ही स्त्री या मोठ्या माणसाची बायको झाली एवढंच हिचं कर्तृत्व. या मोठ्या व्यक्ति-मत्त्वाची जी जडण-घडण झाली तिच्यांत या स्त्रीचा कांही वाटा नाही.

थोर पुरुषांच्या चरित्राचा हा सामान्य नियम झाला.

या नियमाला जीं अपवाद आहेत अशीं थोर पुरुषांचीं आणि थोर स्त्रियांचींदेखील चरित्रं आढळतात. आणि आपल्याला लक्षांत ठेवावीशीं वाटतात तीं असलींच चरित्रं! या चरित्रांत पतिपत्नींनी एकमेकांच्या व्यक्तिमत्त्वावर फार परिणाम केलेला असतो. एकमेकांच्या जीवनकार्यात सतत साथ केलेली असते. एकमेकांना स्फूर्ति दिलेली असते. एकमेकांपासून चैतन्य घेतलेलं असतं. एकमेकांची कीर्ति वाढविलेली असते. दोघांचं जीवितकार्य इतकं एकरूप झालेलं असतं कीं त्यांत पतीचा भाग किती आणि पत्नीचा भाग किती हें सांगणं कठीण असतं.

आपल्या समाजांत अशीं चरित्रं फार थोडीं आहेत. न्यायमूर्ति रानडे आणि रमाबाई रानडे, रेव्हरंड टिळक आणि लक्ष्मीबाई टिळक अशा कांही दंपतींचीं नांवं या संदर्भात सांगतां येतील. पाश्चिमात्यांत कांही दंपतींचीं उदाहरणं चिरस्मरणीय झालेलीं आढळतात. मादाम क्यूरी आणि तिचा नवरा या दोघांनीहि रेडियमचा शोध करण्यांत केवढं अलौकिक सहकार्य केलं त्याची आठवण जगाला विसरतां येणार नाहीं. या दोघांचं प्रेम आणि संशोधनासाठी त्यांनी केलेली धडपड. या [illegible] विषय झाल्या आहेत. राबर्ट ब्राऊनिंग आणि एलिझाबेथ ब्राऊनिंग यांच्या प्रेमकथेला साहित्यांत अमरस्थान प्राप्त झालेलं आहे. त्यांच्या प्रेमकथेवरचा चित्रपटहि जगभर गाजला होता.

तथापि ज्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडण घडण जन्माच्या जोडीदारामुळे झाली अशा असामान्य व्यक्ति एकंदरीनं थोड्याच.

परंतु या विषयाचा विचार अलौकिक थोर पुरुषांच्या किंवा स्त्रियांच्या संदर्भातच करावा असं थोडंच आहे ? सामान्य माणसाला अनुलक्षूनदेखील तो करतां येण्यासारखा खचित आहे. नव्हे, तसा विचार करणंच अधिक अगत्याचं आहे. बेताच्या आर्थिक कमाईवर संसार करणाऱ्या नवराबायकोचं व्यक्तिमत्त्व म्हणून कांहींतरी असतंच आणि ह्या व्यक्तिमत्त्वाच्या बाबतींत पतीचा पत्नीवर आणि पत्नीचा पतीवर थोडाफार परिणाम होत असतोच. किंबहुना असं म्हणावं लागेल कीं असामान्य पुरुष आपल्या पत्नीच्या सहवासांत जितका राहतो त्याच्या कितीतरी अधिक पटींनीं सामान्य संसारी नवराबायको एकमेकांच्या सहवासांत राहतात. एकाची संगीताची आवड दुसऱ्याला मुळांत नसली तरी लागते. बायकोला साहित्याविषयीं प्रेम असलं तर तिच्या सहवासानं नवऱ्याच्या अंगीं तें थोडंफार येतं. मुळांत स्त्रीला क्रिकेट-टेनिससारख्या खेळांची गोडी नसली तरी नवऱ्याच्या वेडाचे संस्कार अपरिहार्यपणें तिच्यावर होतात. खाण्यापिण्यांतल्या आवडी-निवडी, कपड्यालत्त्याचे षोक, करमणुकीचे प्रकार, प्रवासाची हौस अनेक बाबतींत नवराबायकोंत देवाण-घेवाण साहजिकपणें होत राहते.

ग्रंथकार कार्लाइल आणि त्याची बायको यांचंहि उदाहरण यापैकींच. या दांपत्यांत जन्मभर खडाष्टक होतं. या नवरा–बायकोंत जन्मभर त्रेसष्टा-ऐवजीं छत्तीसाचा आंकडा होता. बर्नार्ड शॉच्या संसाराचं स्वरूपहि कांहींसं असंच होतं. शॉची कीर्ति त्रिखंड गाजत होती. परंतु मिसेस शॉचं नांव कुणाच्या गांवीं नव्हतं. 'तुमची एवढी जगभर प्रसिद्धि, पण तुमच्या बायकोची प्रसिद्धि मुळीच कशी नाही ?' असं कुणीतरी शॉला एकदा खवचटपणं विचारलं तेव्हा ती स्वारी काय म्हणाली ठाऊक आहे ? शॉनं उत्तर दिलं, 'ती माझी बायको आहे, ही काय कमी प्रसिद्धि झाली !'

कोणत्याहि थोर पुरुषाचं चरित्र लिहितांना त्याची पत्नी कितीहि सामान्य असली तरी चरित्रकार तिच्याविषयी गौरवानं लिहितो. कवीचा, नाटक-काराचा, उद्योगपतीचा, नटाचा, गायकाचा, पुढाऱ्याचा, मंत्र्याचा सत्कार करण्यासाठी जाहीर सभा झाली की त्याच्या बायकोची लोक आठवण ठेवतात. व्यासपीठावरची मानाची खुर्ची तिला देण्यांत येते, तिच्या गळ्यांत हार घातला जातो, भाषण करणारेहि 'यांच्या यशांत यांच्या पत्नीचा मोठा वांटा आहे' असं गौरवानं म्हणतात. परंतु हे सारे प्रकार केवळ उपचारासाठी केलेले असतात...सगळ्यांना माहीत असतं की ही स्त्री या मोठ्या माणसाची बायको झाली एवढंच हिचं कर्तृत्व. या मोठ्या व्यक्ति-मत्त्वाची जी जडण-घडण झाली तिच्यांत या स्त्रीचा कांही वाटा नाही.

थोर पुरुषांच्या चरित्राचा हा सामान्य नियम झाला.

या नियमाला जीं अपवाद आहेत अशीं थोर पुरुषांचीं आणि थोर स्त्रियांचीदेखील चरित्रं आढळतात. आणि आपल्याला लक्षांत ठेवावीशीं वाटतात तीं असलींच चरित्रं ! या चरित्रांत पतिपत्नींनी एकमेकांच्या व्यक्तिमत्त्वावर फार परिणाम केलेला असतो. एकमेकांच्या जीवनकार्यांत सतत साथ केलेली असते. एकमेकांना स्फूर्ति दिलेली असते. एकमेकांपासून चैतन्य घेतलेलं असतं. एकमेकांची कीर्ति वाढविलेली असते. दोघांचं जीवितकार्य इतकं एकरूप झालेलं असतं कीं त्यांत पतीचा भाग किती आणि पत्नीचा भाग किती हें सांगणं कठीण असतं.

आपल्या समाजांत अशीं चरित्रं फार थोडीं आहेत. न्यायमूर्ति रानडे आणि रमाबाई रानडे, रेव्हरंड टिळक आणि लक्ष्मीबाई टिळक अशा कांही दंपतींचीं नांवं या संदर्भांत सांगतां येतील. पाश्चिमात्यांत कांही दंपतींचीं उदाहरणं चिरस्मरणीय झालेलीं आढळतात. मादाम क्यूरी आणि तिचा नवरा या दोघांनीहि रेडियमचा शोध करण्यांत केवढं अलौकिक सहकार्य केलं त्याची आठवण जगाला विसरतां येणार नाहीं. या दोघांचं प्रेम आणि संशोधनासाठी त्यांनी केलेली धडपड, या गोष्टी एका सुंदर चित्रपटाचा विषय झाल्या आहेत. रॉबर्ट ब्राऊनिंग आणि एलिझाबेथ ब्राऊनिंग यांच्या प्रेमकथेला साहित्यांत अमरस्थान प्राप्त झालेलं आहे. त्यांच्या प्रेमकथेवरचा चित्रपटहि जगभर गाजला होता.

तथापि ज्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडण घडण जन्माच्या जोडीदारामुळे झाली अशा असामान्य व्यक्ति एकंदरीनं थोड्याच.

परंतु या विषयाचा विचार अलौकिक थोर पुरुषांच्या किंवा स्त्रियांच्या संदर्भांतच करावा असं थोडंच आहे ? सामान्य माणसाला अनुलक्षूनदेखील तो करतां येण्यासारखा खचित आहे. नव्हे, तसा विचार करणंच अधिक अगत्याचं आहे. बेताच्या आर्थिक कमाईवर संसार करणाऱ्या नवराबायकोंचं व्यक्तिमत्त्व म्हणून कांहींतरी असतंच आणि ह्या व्यक्तिमत्त्वाच्या बाबतींत पतीचा पत्नीवर आणि पत्नीचा पतीवर थोडाफार परिणाम होत असतोच. किंबहुना असं म्हणावं लागेल कीं असामान्य पुरुष आपल्या पत्नीच्या सहवासांत जितका राहतो त्याच्या कितीतरी अधिक पटींनीं सामान्य संसारी नवराबायको एकमेकांच्या सहवासांत राहतात. एकाची संगीताची आवड दुसऱ्याला मुळांत नसली तरी लागते. बायकोला साहित्याविषयीं प्रेम असलं तर तिच्या सहवासानं नवऱ्याच्या अंगीं तें थोडंफार येतं. मुळांत स्त्रीला क्रिकेट-टेनिससारख्या खेळांची गोडी नसली तरी नवऱ्याच्या वेडाचे संस्कार अपरिहार्यपणें तिच्यावर होतात. खाण्यापिण्यांतल्या आवडी-निवडी, कपड्यालत्त्याचे षोक, करमणुकीचे प्रकार, प्रवासाची हौस अनेक बाबतींत नवराबायकोंत देवाण-घेवाण साहजिकपणें होत राहते.

ज्यांचा प्रीतिविवाह होतो तीं माणसं एकमेकांचे स्वभाव, आवडीनिवडी कमी अधिक पारखून विवाहबद्ध होतात. अर्थात् विवाह झाल्यानंतर अशा व्यक्तींच्या जीवनाच्या संवादी तारा अधिकच जुळतात, परंतु ज्यांचीं लग्नं जुन्या पद्धतीनं होतात त्यांच्या बाबतींत देखील नवऱ्याच्या आवडी–निवडी बायकोनं शिकणं आणि बायकोच्या आवडी–निवडी नवऱ्यानं शिकणं असा प्रकार घडून दोघांचं व्यक्तिमत्त्व अधिक संपन्न होण्याची क्रिया चालू राहतेच. ‘ कानडीनं केला मराठी भ्रतार ’ ह्या म्हणीप्रमाणे दोघांच्या भाषा वेगवेगळ्या असल्या तर दोघंही द्विभाषी बनतात. धर्म वेगळे असले तर दोघांनाही दोन्ही धर्मांचीं तत्त्वं अवगत होतात.

सारांश, सामान्य माणसांना अनुलक्षून बोलायचं झालं तर विवाह ही त्यांच्या आयुष्यांतली एक अत्यंत महत्त्वाची घटना म्हणावी लागते. विवाहपूर्व आयुष्यांत पुरुषाचं आयुष्य काय किंवा स्त्रीचं आयुष्य काय एकेरी असतं. विवाहानंतर त्या आयुष्याला दुहेरीपणा येतो. दोन प्रवाहांचा संगम घडून त्यांतून एक संयुक्त प्रवाह वहायला लागावा; त्याप्रमाणे पुरुषाच्या आणि स्त्रीच्याही जीवनाला वळण लागतं. कोणत्याही पुरुषाच्या काय किंवा स्त्रीच्या काय व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणींत विवाहाच्या घटनेला सगळ्यांत अधिक महत्त्व आहे आणि काव्याच्या दृष्टीनं सगळ्यांत अर्थपूर्ण आणि मधुर असे कोणते शब्द मराठी भाषेंत आहेत म्हणून विचारलं, तर मी निःशंकपणानं सांगेन ‘ जन्माचा जोडीदार ! ’

* * *

## १२ : नको ती दूर-चित्रवाणी !

आपल्या देशांत टेलीव्हिजनची सोय अद्यापि सर्वत्र झालेली नाही. म्हणून पुष्कळ लोक फार नाराज आहेत... मी मात्र नाराज नाही...उलट, टलीव्हिजनची सोय जितकी लांबणीवर पडेल तितकी बरी असं मला वाटतं. टेलीव्हिजनच्या फायद्यापेक्षा तोटेच अधिक आहेत अशी माझी समजूत आहे. आणि माझी गुप्त प्रार्थना अशी आहे की देव करो आणि टेलीव्हिजनचं भारतांतलं आगमन शक्य तितकं लांबणीवर पडो. ही माझी प्रार्थना परमेश्वर ऐकेल अशी फारशी आशा मला नाही. केव्हातरी माझ्या घरांतल्या रेडिओवर दूरचीं चित्रं दिसूं लागणार, आज जी नुसतीच ' आकाशवाणी ' आहे तिचं रूपांतर ' दूरचित्रवाणीं 'त होणार, ही गोष्ट मी समजून चुकलों आहें आणि या विचारानं मी धसकलों आहें. टेलीव्हिजन सर्रास सुरू झाल्यावर आकाशवाणी-वरचे कार्यक्रम फक्त ऐकण्यांत आज जो कांही थोडाफार आनंद मला मिळूं शकतो, त्यालाहि धक्का बसेल असं भय मला वाटतं.

तुम्ही म्हणाल, हें तुमचं भय मुलुखावेगळंच म्हटलं पाहिजे. टेलीव्हिजन नको म्हणण्याबद्दल तुम्ही मला जीर्ण, बुरसट मतांचा ठरवाल. परंतु जरा सबूर करा. मी काय म्हणतों तें ऐकून तर घ्याल ?... शास्त्रज्ञांनी केलेला प्रत्येक नवा शोध ज्ञानप्रगतीच्या दृष्टीनं स्वागतार्हच म्हटला पाहिजे हें मी कबूल करतों परंतु प्रत्येक नव्या शास्त्रीय शोधामुळे कलेचा आनंद वाढतोच असं नाही. उलट, तो कमी होण्याचा फार संभव असतो...

चित्रपटांचं उदाहरण घ्या. प्रारंभीं चित्रपट निःशब्द होते. संभाषणांच्या साहाय्यावांचून केवळ अभिनयाच्या सामर्थ्यानं भावना व्यक्त करण्याची आणि

कथानकं सांगण्याची करामत चित्रपटांतल्या नटनटींना करावी लागत होती. पुढे कोणे एके दिवशीं चित्रपटांना वाचा फुटली आणि पात्रं बोलूं लागल्याबरोबर काय गंमत झाली बघा! चित्रपट पूर्वी केवळ दृश्य होता तो श्राव्यहि झाल्याबरोबर त्याची रंजकता वाढली. परंतु निःशब्द चित्रपटांत जी लज्जत होती ती नाहीशी झाली म्हणून हळहळणारे कांही लोक आहेत. ते चांगले विचारवंत आहेत, आणि त्यांची विचारसरणी कांही चुकीची नांही. त्यांचं म्हणणं असं, की कोणत्याहि कलाकृतीमध्ये रसिकांच्या कल्पनाशक्तीला जितका अवसर दिलेला असेल तितका तिच्यापासून अधिक आल्हाद उत्पन्न होतो. सूचकता हा कलेचा प्राण आहे. वस्तूचं यथातथ्य चित्र उठविण्यापेक्षा तींत सूचकतेचा भाग जितका अधिक असेल तितका आल्हाद जास्ती. कादंबरींत नायक-नायिकेच्या चुंबनालिंगनाचं साऱ्या तपशिलांसह स्पष्ट समग्र वर्णन करणं ही कांही उच्च दर्जाची कला नव्हे. त्या गोष्टी नुसत्या सूचित केल्या पाहिजेत. या दृष्टीनं पाहिलं असतां निःशब्द चित्रपटाची कला अधिक उच्च दर्जाची म्हणावी लागेल. त्यांत आवाज उठवितां येत नव्हता. परंतु या मर्यादेमुळे चित्रपटांत सूचकता जास्त होती, आणि आल्हादाचा भाग अधिक होता. परंतु चित्रपट बोलके झाल्याबरोबर सूचकता नाहीशी झाली. आल्हाद नाहीसा झाला.

रसोत्पत्तीबद्दलचा हा तात्त्विक विचार तर खरा आहेच. परंतु चित्रपट बोलूं लागल्यामुळे कांही नव्या अडचणी आणि गैरसोयी उत्पन्न झाल्या. हा व्यावहारिक विचारहि महत्त्वाचा आहे. मूक चित्रपटांत सारा व्यवहार केवळ दृश्य सौंदर्याचा असल्यामुळे नटनटींच्या आवाजाचा अगर भाषेचा प्रश्नच नव्हता. तोतरा अगर मुका माणूस शिवाजीच्या भूमिकेला खपत असे. रत्नागिरी मालवणकडला अस्सल कोकणी नट जहांपन्हां औरंगजेबाच्या भूमिकेचं काम वठवूं शकत असे, आणि गोंव्याकडच्या प्रोज बायका तारकांच्या पदवीला चढूं शकत असत. पण चित्रपटांत शब्दाचा प्रवेश झाल्याबरोबर केवळ सुंदर बांधा आणि सुंदर चेहरा यांचे बाजारभाव एकदम गडगडले. नटनटींना उत्तम बोलतां व गातां आलं पाहिजे ही नवी आवश्यकता निर्माण होऊन किमतीची उलटापालट झाली. नटी दिसायला सामान्य असली तरी चालेल, परंतु ती गायनांत निपुण असली पाहिजे, अशी नवी

परिस्थिति उत्पन्न झाली. लोकांच्या केवळ डोळ्यांचंच नव्हे तर कानांचंहि पारणं फेडण्याची युक्ति शास्त्रज्ञांनी काढली खरी, परंतु चित्रपट-निर्मात्याचं काम त्यांनी अधिक अवघड करून ठेवलं, चित्रपटाच्या भोक्त्यांनी या नव्या शास्त्रीय शोधाला धन्यवाद दिले, पण निर्मात्यांनी धन्यवादाबरोबरच शिव्या-शापहि त्याला खचितच दिले असतील. स्वरूपानं देखण्या आणि शिवाय गायनांत कुशल अशा नटी मिळणं कठीण असल्यामुळे चित्रपटाची सशब्दता निर्मात्यांना अडचणीची वाटूं लागल्याबरोबर त्यांनी शास्त्रज्ञांकडे धाव घेतली, व जिला गाता येत नाही परंतु जी सुंदर आहे, अशा अभिनेत्रीचा उपयोग ज्यायोगे करतां येईल असा कांही तरी नवीन मार्ग शोधून काढण्याची त्यांना प्रार्थना केली. देवानं एखाद्याला शाप द्यावा व त्यावर उतारा म्हणून उःशाप त्यानं मागावा तशांतलाच हा प्रकार होता. शास्त्रज्ञांनी ' प्लेबॅक 'ची युक्ति शोधून काढली ! चित्रपटांतल्या धंद्यांत किमतींची पुन्हा उलटापालट झाली. प्रौज बायकांना पुन्हा भाव आला.

परंतु या सर्व स्थित्यंतरांकडे अस्सल शास्त्रज्ञ निर्विकार दृष्टीनं पहात आलेला आहे. कारण आपल्या शोधांचे केवळ चित्रपटाच्या धंद्यावरच नव्हे तर एकंदर मानवी व्यवहारावर कोणते परिणाम होतात, कोणाचं किती हित होतं अन् कोणाचं किती अहित होतं, याची विवंचना करणं, हें त्याचं कामच नव्हे. नव्या नव्या ज्ञानाचं संशोधन करणं, आणि निसर्गातल्या विविध शक्तींवर मनुष्याचं प्रभुत्व स्थापन करणं, एवढा एकच ध्यास त्याला लागलेला असतो. ज्या वेळेस चित्रपटांत शब्द उमटत नव्हता त्यावेळेस तोतऱ्या आणि मुक्या नटनटींनी दिलेले धन्यवाद, नंतर शब्द उमटूं लागतांच ज्यांचा भाव घसरला अशा बिनगाणाऱ्या नटींच्या शिव्या, पुढे प्लेबॅकची सोय झाल्यावर चित्रपटनिर्मात्यांनी सोडलेले सुटकेचे निःश्वास, यांपैकी कशाचीच नोंद शास्त्रज्ञांच्या हिशोबाच्या वहींत सांपडणार नाही.

आपण माणसं सामान्य ज्ञान मिळाविण्यास प्रवृत्त केव्हा होतों ? तर त्याची गरज उद्‌भवली म्हणजे. तहान लागली की विहीर खणणारे आहोंत आपण सगळे. एक साधन या दृष्टीनं आपण ज्ञानाकडे पहातों. परंतु शास्त्रज्ञाची भूमिका वेगळी असते. तो तहान लागल्यावर विहीर खणीत बसत

नाही किंवा असं म्हणूं की त्याला सदाच तहान लागलेली असते. गरजे-साठी ज्ञान नव्हे, तर ज्ञानासाठी ज्ञान मिळवीत असतो तो. ज्ञानाची अमर्याद हांव त्याला असते. नवं नवं ज्ञान मिळविण्यासाठी तो सतत धडपडत असतो. मनुष्यानं त्या ज्ञानाचा उपयोग करावा किंवा नाही, केला तर समाजाच्या दृष्टीनं त्याचे परिणाम चांगले होतील की वाईट होतील याची चिंता शास्त्रज्ञ करीत नाही.

साधं मोटारीचं, उदाहरण घ्या. शास्त्रज्ञांनी मोटारीचा शोध लावला. एक नवं ज्ञान माणसाच्या पदरांत पडलं. गावागावांतलीं अंतरं मोठीं वाटेनाशीं झालीं. प्रवास सोयीचा झाला. रहदारी सोपी झाली. परंतु या फायद्याबरोबर तोटेहि आलेच. चोर, दरोडेखोर यांना गुन्हे करून सहज पसार होतां येऊं लागलं. अनैतिक संबंध ठेवणाऱ्या स्त्रीपुरुषांची सोय झाली. कोणतंहि नवं शास्त्रीय ज्ञान उपलब्ध झालं की व्यक्तीच्या आणि समाजाच्या व्यवहारावर त्याचे चांगले आणि वाईट दोन्ही परिणाम होतातच. शास्त्रज्ञाला चांगल्याचा सोयरहि नसतो, वाइटाचं सुतकहि नसतं. 'ज्ञानासाठी ज्ञान' हें त्याचं ब्रीदवाक्य असतं...नवा शोध आला की कलेच्या प्रांतांतहि उलथापालथ होते. जुन्या मर्यादा ओलांडतां येतात, जुने संकेत नाहीसे होतात, नवे रूढ होतात, नव्या सोयी हातीं येतात. परंतु त्याबरोबरच नव्या पंचायती देखील उभ्या राहतात. या बाबतींत पुन्हा सिनेमाचंच उदाहरण मोठं मनोरंजक ठरण्यासारखं आहे.

मूक चित्रपटांचा उपयोग ज्याप्रमाणे आपण फक्त डोळ्यांनीच घेऊं शकत होतों, त्याप्रमाणे रेडिओ—निदान आपल्याकडे अजून तरी फक्त आपल्या कानांसाठी आहे. बहिऱ्या माणसाला मूक चित्रपट पहातां येत असत. आंधळ्या माणसाला रेडिओवरचे सर्व कार्यक्रम ऐकतां येतात. मनुष्याला केवळ दृश्य पाहिल्यानं जास्त आनंद होतो की शब्द ऐकल्यानं अधिक आनंद होतो हा मुद्दा मोठा मनोरंजक आहे. नार्मन कॉर्विन या नांवाचा एक अमेरिकन लेखक निष्णात रेडियो नाट्य लिहिणारा म्हणून प्रख्यातीस आला होता. त्याच्या 'Thirteen by Corvin' (Broadcast Plays : Henry Holt & Co. N. Y.) या पुस्तकाला प्रस्तावना लिहि-

णाऱ्या गृहस्थाचं मत असं आहे, की नुसतं पाहण्याचा आनंद हवा की नुसतं ऐकण्याचा आनंद हवा, एक कोणचा तरी मिळेल, बोला कोणता तो, असा सवाल टाकला तर मनुष्य म्हणेल पहाण्याचा आनंद मिळाला नाही तरी चालेल, ऐकण्याचा आनंद हवा. ह्या गृहस्थाचं हें मत मला मान्य नाही. परंतु हा मतभेदाचा प्रश्न सोडून दिला तर मला असं वाटतं, की केवळ डोळ्यांना अगर केवळ कानांना आनंद देणाऱ्या कलाकृतीपेक्षा जिच्या योगें दोघांचाहि आनंद साधेल अशी कलाकृति माणसाला हवी असते. म्हणूनच चित्रपट सशब्द झाले, आणि रेडिओत जें आपल्याला ऐकूं येतं तें डोळ्यांनी पहातांहि यावं अशी योजना करण्याची धडपड चालू आहे.

माणसाची जात किती हावरी आहे पहा. आंधळा मागतो एक डोळा आणि देव देतो दोन, या सुभाषिताच्या उलट माणसाचा स्वभावधर्म आहे. देवानं दोन डोळे दिले तर माणसाला चार हवेसे वाटूं लागतात. त्याचा संतोष म्हणून कधी होत नाहीं. पहाण्याची सोय झाली तर तो म्हणणार ऐकण्याची सोय करा. ऐकण्याची सोय झाली तर तो म्हणणार जें ऐकूं येतं तें दिसेल असं करा. सॉक्रेटिस म्हणत असे की साऱ्या प्रगतीच्या मुळाशी माणसाचा ' विस्मय ' आहे. मला वाटतं ' विस्मय ' म्हणण्यापेक्षा ' हावरेपणा ' म्हणणं अधिक सार्थ ठरेल. माणसाची हाव कधी थांबत नाही. म्हणून मुके चित्रपट बोलू लागले, आणि ज्या रेडिओच्या यंत्रांत आजपर्यंत नुसता ध्वनि ऐकूं येत होता त्यात आता दिसूंहि लागणार.

टेलिव्हिजनची ही नवी सोय झाल्यावर कोणते फायदे होतील याचा विचार करूं लागल्यास अनेक कल्पना मनांत येतात, आणि ही नवी सोय झाल्यानं रेडिओपासून होणारा आनंद वाढेल की कमी होईल याबद्दलचा निकाल देणं कठीण वाटूं लागत. आपण सध्या टेनिस, हॉकी फुटबॉल, क्रिकेट अशा सामन्यांचं नुसतं वृत्तच ऐकूं शकतों, परंतु टेलिव्हिजन प्रत्यक्षांत आल्यावर आपल्याला मैदानावर चाललेले सामने पाहतांहि येतील. इंग्लंड–ऑस्ट्रेलियामधील हिरवळीनं आच्छादलेलीं मैदानं आपल्याला प्रत्यक्ष दिसतील. धावांचे आकडे तिथल्या प्रचंड फळ्यावर चढलेले आपण पाहूं. कोण खेळाडू कसा उभा रहातो, कशी बॅट फिरवितो याचं वर्णन ऐकतां ऐकतां, आपल्याला तें प्रत्यक्ष पाहताहि येईल. पुन्हा तिसरं महायुद्ध

झालं तर नुसत्या युद्धाच्या बातम्या आपण ऐकणार नाही, प्रत्यक्ष रणधुमाळी कोचावर बसून आपण पाहूं शकूं. मग युद्धाच्या बातम्या सांगणाऱ्यांना फारशी थापेबाजी करता येणार नाही. अमुक शहरात आपली सेना घुसली असं खोटंच सांगून आपल्याला बनाविणं त्यांना शक्य होणार नाही. कुठे सेना घुसली ती दाखवा असं आपण म्हणूं शकूं. बाप दाखव नाही तर श्राद्ध कर अशा अर्थानं त्यांना हटकतां येईल. गेल्या महायुद्धात सुभाषबाबूंचा फक्त आवाजच आपल्याला ऐकूं येत असे. पुढच्या महायुद्धात जे नवे नेताजी होतील ते आपल्यापासून हजारो कोस दूर असले तरी आपल्याला दिसतील. चक्षुर्वै सत्यम् असा प्रकार होईल सगळा !

फार आनंदाची गोष्ट आहे ही. परंतु जें पहावंसं वाटतं तें पहातां येईल हे जसं खरं, त्याबरोबरच जें दृष्टीपुढे नको तें पहावं लागेल हेंहि खरं ! आणि त्यापासून ज्या यातना होतील त्यांची कल्पनाहि सहन करवत नाही. आमचे गायकगायिका प्रत्यक्ष डोळ्यांना आज दिसत नाहीत हेंच चांगलं आहे. त्यांपैकी बहुतेकांचं रूप म्हणजे झांकली मूठ सवा लाखांची आहे. रेडिओनं ती उघडली तर रेडिओवरचे गायनाचे कार्यक्रम ' लिसनर ' मध्ये पाहून ठेवण्याचे श्रम व्यायलाच नकोत. रेडिओवर नाटक करणं आज फार सोपं आहे. " प्रिये, अशा सुंदर चांदण्यांत या ओढ्याच्या कांठाशीं वृक्षाखालच्या शिळेवर बसून तुझ्या भाषणाचं संगीत ऐकतांना आणि तुझं अप्सरेसारखं लावण्य पहातांना मीं वेडा होऊन जातों. " हें रेडिओनाटकांतलं वाक्य बोलणारा मनुष्य आज वास्तविक एका बंद खोलींत एका खुर्चीवर बसलेला असला तरी चालतो आणि त्याची ती लावण्यवती प्रिया म्हणजे एखादी हडकुळी नकटी रेडिओ ' स्टार ' असली तरी चालते. रेडिओवरच्या नाटकांत आज मोटार, आगगाड्या, विमानं यांचा संचार खुशाल चाललेला आहे. कारण बोलाचीच कढी, बोलाचाच भात ! परंतु टेलीव्हिजन प्रत्यक्षांत आल्यावर रेडिओ नाटकांचं हें स्वैर स्वातंत्र्य एकदम बंद होईल. जें ऐकवायचं तें दाखवायला पाहिजे हा दंडक रेडिओच्या अधिकाऱ्यांना फार जाचक होणार आहे.

हा सर्व विचार केल्यावर टेलिव्हिजन पाहिजे की नको या प्रश्नाचं उत्तर देणं फार कठीण वाटायला लागतं. आणि या प्रश्नाचा मी जेव्हा जेव्हा

विचार करतों तेव्हा तेव्हा माझ्या मनात एक निराळीच कल्पना येते. मला असं वाटतं की ही टेलीव्हिजनची सोय झाली नाही तरी चालेल. परंतु रेडिओच्या बाबतीत दुसरी एक सोय अगदी ताबडतोब झाली पाहिजे. रेडिओवर बोलणारा वक्ता अगर गाणारा गायक आणि नाटकांचे कार्यक्रम ' पेश ' करणारा ' पेशवा ' यांच्यापर्यंत शक्यतों हात किंवा निदान श्रोत्यांचा आवाज ज्यायोगें पोंचेल अशी व्यवस्था झाली तर श्रोत्यांचे कितीतरी हाल बंद होतील. आज वक्ते, कलावंत, आणि हे ' पेशवे ' रेडिओच्या बंद गारीगार आरामशीर खोलींत सुरक्षितपणें बसून तुमचा आमचा वाटेल तसा छळ करूं शकतात. त्यांच्या महामूर्खपणाबद्दल आपण त्यांना कांहीच शासन करू शकत नाही. त्यांचा आचरटपणा अगदीच असह्य झाला तर रेडिओचं बटन बंद करणं एवढंच आपल्या हातीं असतं. परंतु झाडून साऱ्या श्रोत्यांनीं बटनं बंद केलीं तरी त्याची जाणीव त्यांना होऊं शकत नाही, उपसर्ग तर नाहीच नाही.

रंगभूमीवरच्या कलावंतांना प्रेक्षकाशी सरळ सामना द्यायचा असतो. प्रेक्षक हुश हुश करतील. ओरडतील, भजींसुद्धा मारतील या खात्रीचा वचक त्यांना असतो, आणि ताळ्यावर असणे त्यांना भागच असतं. रेडिओवरचा आर्टिस्ट भजीं खात असेल, पण फार निराळ्या अर्थानं. त्याची आणि श्रोत्यांची गांठ पडत नसल्यामुळे हा प्राणी आणि या प्राण्यांना खेळविणारे ' पेशवे ' कमालीचे उर्मट व मगरूर झालेले आहेत. वर्तमानपत्रांनी कितीहि ओरडा केला तरी यांना ऐकूं जात नाही. त्यांच्या कानांत सुरक्षिततेच्या आणि अधिकाराच्या खुंट्या आहेत. ज्यायोगें या खुंट्या निघतील, त्यांची आणि श्रोत्यांची प्रत्यक्ष गांठ पडेल, श्रोत्यांना आपली नापसंती जागच्या जागीं त्यांना कळवितां येईल, आणि श्रोत्यांचा वचक त्यांना वाटूं लागेल, असा शोध आज हवा आहे. टेलीव्हिजन पंचवीस वर्षं लांबणीवर पडलं तरी चालेल, परंतु हा शोध अगदी ताबडतोब लागला पाहिजे ! जो कुणी हा शोध लावील त्याला मनुष्याच्या एका मोठ्या दुःखाचा परिहार केल्याबद्दल नोबेल प्राईज अवश्य द्यावं ! हो, हलवायाच्या घरावर तुळशीपत्र ठेवायला आपलं काय जातं !

* * *

## १३ : एक रंगलेली बैठक

तात्यासाहेब केळकर, चिंतामणराव वैद्य, वामन मल्हार जोशी, हरिभक्तिपरायण पांगारकर, अशी चार बडी बडी साहित्यिक मंडळी एकत्र येण्याचा तो योग दुर्मिळ वाटण्यासारखा होता. त्यावेळेस मी कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजांत प्रोफेसर होतों, आणि कोल्हापूरची एक अत्यंत जुनी सांस्कृतिक संस्था करवीर नगर वाचन मंदिर हिचा अध्यक्ष होतों. या संस्थेचा महोत्सव मोठ्या प्रमाणावर करण्याची योजना आम्हीं आंखली होती, आणि या महोत्सवानिमित्त होणाऱ्या जाहीर व्याख्यानांसाठी वर सांगितलेल्या मंडळींना आमंत्रणं देऊन आणलं होतं. साहित्यसम्राट ही पदवी मिरविणारे केळकरांसारखे संपादक आणि पुढारी, वामन मल्हार जोशांसारखे मान्यवर कादंबरीकार आणि तत्त्वचिंतक, चिंतामणराव वैद्य यांच्यासारखे गाढे विद्वान आणि संशोधक, पांगारकरांसारखे संत-वाङमयावरील अधिकारी व रसाळ वक्तृत्वासाठी प्रसिद्ध असलेले भक्त—अशा प्रकारं साहित्याच्या विविध दालनांत ज्येष्ठ पदावर बसलेलीं चार माणसं एकत्र आणण्याचं भाग्य लाभलं होतं. त्यांच्या जाहीर व्याख्यानाकडे तर सामान्य जनतेचं लक्ष लागलं होतंच, पण शिवाय या चार अग्रगण्य साहित्यिकांच्या खाजगी बैठकींत सहजगत्या काव्यशास्त्रविनोदाचीं जीं संभाषणं रंगणार होतीं त्याकडे माझं स्वतःचं आणि इतर अनेक मंडळींचं लक्ष लागलं होतं.

'रागिणी' कर्ते वामन मल्हार जोशी यांनी आपल्या व्याख्यानांत मुद्दा मांडला कीं, लेखकाच्या अनुभवाचा प्रत्यक्ष क्षण आणि त्या

अनुभवाबद्दल तो लिहावयास बसतो तेव्हाचा क्षण यांत अंतर अपरिहार्य-पणे असतंच, प्रत्यक्ष अनुभवाच्या वेळेस लेखक त्यांत रंगलेला असतो. त्याची एकप्रकारं समाधि लागलेली असते. त्या समाधीच्या अवस्थेंत कवीचं काव्य किंवा लेखकाचं लेखन होण्याची शक्यता नाही. ही समाधि संपल्यानंतर कवी किंवा लेखक जेव्हा स्वतःचा आनंद किंवा दुःख आठवून पहातो तेव्हा तो लिहितो. प्रत्यक्ष अनुभवाचा क्षण आणि लेखकाचा क्षण यांत कधी कधी प्रदीर्घ काळाचं अंतर असेल; कधी फार थोडं अंतर असेल. परंतु अंतर असणारच ! म्हणून काव्याचं किंवा साहित्याचं वर्णन ‘ अनुभवाचं चित्रण ’ असं न करतां ‘ आठवलेल्या अनुभवाचं चित्रण ’ असं एका इंग्रज रसिक टीकाकार पंडितानं केलं आहे तेंच बरोबर आहे. तात्यासाहेब जोशांचं व्याख्यान सभेंतल्या बहुसंख्य श्रोत्यांच्या डोक्यावरून गेल्यासारखं दिसलं. व्याख्यानाचा विषय बराचसा तात्त्विक होता, तो रंगतदार करून मांडण्यास आवश्यक ती विवेचन पद्धति तात्यासाहेबांच्या ठिकाणीं नव्हती. त्यांनी दाखले वगैरे देऊन प्रतिपादन सजविण्याची खटपट केली नाहीं असं नाही. वरच्या पातळीवरच्या कांही निवडक श्रोत्यांना त्यांचं तें व्याख्यान मननीय आणि श्रवणीय वाटलंहि. परंतु तात्यांची वक्तृत्वशैली अगदीच सुमार ! यामुळे त्यांचं त्या दिवसाचं व्याख्यान सामान्य श्रोत्यांच्या दृष्टीनं ‘फेल’ गेलं.

चिंतामणराव वैद्यांचं व्याख्यान लोकांना अधिक आवडलं. महाभारतांतील श्रीकृष्णशिष्टाईचा प्रसंग त्यांनी वर्णिला. श्रीकृष्णाच्या चरित्रांतली राजकीय मुत्सद्दीपणाची बाजू बहारीनं रंगविली. श्रीकृष्ण-चरित्राकडे बघण्याची एक नवीच दृष्टि व्याख्याता आपल्याला देत आहे असं श्रोत्यांना वाटलं. ठेंगणं-ठुसकं शरीर, मळकट धोतर, उपरणं, पगडी असा वेष, वृद्धत्वामुळे डोळ्यांच्या टपोऱ्या पापण्या ओढल्यासारख्या आणि अर्ध्या झांकल्यासारख्या वाटणाऱ्या अशी चिंतामणराव वैद्यांची मूर्ति होती. परंतु त्या वयांतहि त्यांचा आवाज खणखणीत होता. विवेचनाच्या ओघांत मधेच ते एखादी गोष्ट कीर्तनकाराच्या ढंगानं सांगत, आणि सांगण्यापूर्वी सभेला विचारीत, “ फार मजेदार आहे गोष्ट ! सांगू का ? ” श्रोत्यांच्या होकाराची ते वाट बघत नसत. फक्त थोडंसं स्वतःशींच हंसत आणि जें सांगायचं तें सांगून टाकीत. त्यांच्या व्याख्यानानं श्रोते खूष झाले.

हरिभक्तिपरायण पांगारकरांनी व्याख्यान दिलं ज्ञानेश्वरीवर. शेती, व्यापार, उद्योग, सोनार, सुतार, लोहार, गवंडी अशा लोकांचे धंदे, पशु पक्षी याविषयींचे उल्लेख बिनचूक परिभाषेंत ज्ञानेश्वरींत किती ठिकाणीं आले आहेत त्यांची प्रचंड जंत्री त्यांनी दिली. त्यांना सिद्ध करायचं होतं असं कीं, ज्ञानेश्वरांचं ज्ञान आणि अवलोकन दोन्ही फार उच्च कोटींतलीं होतीं. त्यांचा हा सिद्धांत ठीक होता. परंतु त्या एकाच सिद्धांताभोवतीं एकेक प्रदक्षिणा होत होती, आणि त्यामुळे व्याख्यानाला रंगत म्हणून कशी ती आली नाही. ज्ञानेश्वरीचा अभ्यास करणारे पुष्कळ लोक कोल्हापुरांत होते. भक्तिमार्गी लोकांचे अड्डेहि होते. हीं सारीं माणसं पांगारकरांच्या व्याख्यानाला आदरून लोटलीं होतीं. पण पांगारकरांच्या त्या दिवशीच्या व्याख्यानांत अशा माणसांना देखील फारशी रुचि मिळाली नाही. ज्ञाने-श्वरींतली ओवी म्हणून दाखवितांना पांगारकरांच्या रसाळ वाणीचा क्षणभर प्रत्यय येई तेवढाच! रसाळ वक्तृत्वाचा ओघ लोकांना दिसला नाही.

व्याख्यान सगळ्यांत अधिक गाजविलं तात्यासाहेब केळकरांनीच! करवीर नगर वाचन मंदिर आणि राजाराम कॉलेज या कोल्हापुरांतल्या दोन–आणि कदाचित दोनच–प्रमुख सांस्कृतिक संस्था! या दोन संस्थांत असा अलिखित करारच होता की, एका संस्थेने एखादा पाहुणा वक्ता आमंत्रून आणला की त्याचा फायदा दुसऱ्या संस्थेनं घ्यायचा. यामुळे तात्यासाहेब केळकरांचीं दोन व्याख्यानं झालीं! एक वाचन मंदिरांत; आणि दुसरं राजाराम कॉलेजांत! तात्यासाहेब नामवंत वक्ते नव्हते. परंतु खोकून ठसकून बोलतांना देखील व्याख्यान रंगविण्याचं कसब त्यांनी आत्मसात् केलं होतं. त्यांचीं दोन्ही व्याख्यानं गाजलीं आणि राजाराम कॉलेजमधलं व्याख्यान विशेष गाजलं तें एका चमत्कारिक आगंतुक कारणानं! तात्यासाहेबांच्या व्याख्यानाला सुरुवात होऊन दहा पंधरा मिनिटं झालीं असतील नसतील तोंच वरच्या गॅलरींतून कुणी तरी अंडं फेकलं, आणि तें सरळ तात्यासाहेबांच्या छातीवर पडून फुटलं. या खेदकारक प्रकारानं श्रोते स्तिमित झाले. अध्यक्षस्थानी प्रिन्सिपॉल डॉ. बाळकृष्ण होते, त्यांचा चेहरा पडला. लोकांना कळेना की, आता पुढे काय होणार. परंतु स्वतः तात्या-साहेबांनी किंचितहि गोंधळून न जातां किंवा राग न दाखवितां जिकडून

अंडं आलं तिकडे वर नजर टाकली, आणि ते हंसत हंसत म्हणाले, " अहो, ज्या वस्तूचा मला कांही उपयोग नाही अशा वस्तूचा अहेर आपण मला फुकट केलात. मी विलायतेस गेलों होतों तेव्हा तिथल्या मुक्कामांतदेखील कधी अंडं खाल्लं नाही ! " तात्यासाहेबांच्या हजरजबाबी विनोदामुळे सभेंत मोठा हंशा झाला. सभेचा विरस झाला होता तो नाहीसा झाला. तात्यासाहेबांनी व्याख्यान पुढे सुरू केलं, आणि रंगविलं.

या चार नामवंत साहित्यिकांच्या सहवासाची आणि संभाषणाची खरी मजा आम्ही लुटली ती अर्थात् खाजगी बैठकींत ! रात्रीच्या जेवणानंतर ही बैठक भरली होती. मोठी मोठी साहित्यिक मंडळी आणि कलावंत हजर होते. प्रोफेसर माधवराव पटवर्धन होते, गोविंदराव टेंबे होते. अल्लादियाखाँचे चिरंजीव मंजिखाँ होते. श्रोत्यांना ज्यांचा अर्थ समजत नाही अशा हिंदी चिजा म्हणण्याऐवजी गवयांनीं, मराठी चिजा म्हणाव्या अशा मराठी चिजा साहित्यिकांनी मुद्दाम रचाव्या, असं केळकरांचं मत होतं, आणि त्या मताचं आग्रही प्रतिपादन त्या सुमारास ते करीत होते. ' पानी भरेली कौन अलबेली की नार, झमाझम ' या हिंदी चीजेच्या चालीवर त्यांनी एक मराठी पद रचून प्रसिद्धहि केलं होतं. गोविंदराव टेंब्यांना संगीताचं हें ' मराठीकरण ' बिलकुल मान्य नव्हतं. त्या रात्रीच्या बैठकींत हा विषय साहजिक निघाला आणि मग तात्यासाहेब आणि गोविंदराव यांच्यांत मोठंच वाग्युद्ध झालं ! गोविंदरावांनीं तात्यासाहेबांच्या मताची खूपच टर उडविली. संगीतांत शब्दार्थाला महत्त्व नाही असंहि त्यांनी प्रतिपादलं, आणि ते म्हणाले, " मराठीं चीजा गायिल्यानं संगीताचा खरा आनंद निर्माण होणं शक्यच नाही. " तात्यासाहेब हंसत हंसत म्हणाले, " शक्य नाही ? प्रयोग करूनच बघूं या ? " त्यांनी मंजिखाँकडे नजर टाकली, आणि विनंती केली, " खाँसाहेब तुम्ही कांही तरी मराठी गाऊन दाखवा हो. " मंजिखाँ म्हणजे मोठा आनंदी आणि उत्साही कलावंत ! त्यांनी लगेच हातांतल्या काठीवर बोटाचं नख आपटून ताल धरला, आणि माधवराव पटवर्धनांचीच एक कविता म्हणायला सुरवात केली. " ऐकीव तव मधु बोल, कोकिळे, ऐकीव तव मधु बोल ! "

मंजिखाँचा आवाज अत्यंत मधुर आणि प्रवाही ! मुरक्यांचे, खटक्यांचे माफक अलंकार घालून त्यांनी म्हटलेलं गीत ऐकून बैठकींतल्या साऱ्या मंडळींच्या तोंडांतून उद्‌गार निघाला, " वाहवा ! वाहवा ! " तात्यासाहेब गोविंदरावांकडे विजयी मुद्रेनं बघून म्हणाले, " आता बोला गोविंदरावजी ? " पण गोविंदरावजी म्हणाले, " ही कविता मूळ एखाद्या हिंदी चीजेच्या चालीवर असती तर ती हिंदी चीज ऐकल्यानंच अधिक आनंद झाला असता. मराठी पद्य म्हणूं नये असा कुठे माझा वाद आहे ? माझं म्हणणं एवढंच की जिथे हिंदी चीज उपलब्ध आहे तिथे केवळ शब्दार्थाचं अवडंबर माजवून मराठी चीजेच्या रचनेची आणि गायनाची खटपट करूं नये. " तात्यासाहेब केळकरांनी कपाळाला हात लावला, आणि म्हटलं, " आता तुमच्याशीं काय वाद करायचा कपाळ ! तुमचा वाद दुराग्रही हट्टाचा आहे." गोविंदरावहि कांही कमी नव्हते. त्यांनी उलट शेरा मारला, " आणि तुमचा वाद अरसिक आंधळेपणाचा आहे. "

बैठकीचं वातावरण खेळीमेळीचं होतं. चर्चा खुली होती. मीं वामनराव जोशांना विचारलं, " तात्यासासाहेब, तुमच्याविषयी असा एक प्रवाद आहे की, तुम्ही संशयात्मा आहांत. अमुक चांगलं, अमुक वाईट असं तुमचं ठाम मत कधीं असत नाही, हें खरं आहे का ? " तात्यासाहेब आपल्या विशिष्ट पद्धतीनं डावा डोळा बारीक करून फिसकन् हंसले, आणि म्हणाले, " माझ्याविषयीचा हा प्रवाद खोटा आहे, आणि हें माझं मत ठाम आहे. " माझ्यासकट सारीं माणसं खो खो करून हंसूं लागलीं. अधिक अवसान चढल्याप्रमाणे तात्यासाहेब पुढे म्हणाले, " मी संशयांत असतों. पण केव्हा ? प्रश्न मोठा असेल तेव्हा. उदाहरणार्थ, दैववाद खरा की, प्रयत्नवाद खरा यावर माझं मत निश्चित नाही; पण समजा, रात्रीचे साडेनऊ-दहा वाजले आहेत. अशा वेळी आमच्या वसतिगृहांतली विद्यार्थिनी माझ्याकडे आली, आणि म्हणाली, ' तात्या गावांतल्या एका मित्राला भेटायला जाऊं का ? तर मी अगदी ठामपणानं सांगेन, नको जाऊंस; असं जाणं बरं नाहीं ' आतां, सांगा मी संशयात्मा आहें का ? " बैठकींत पुन्हां हंशा पिकला.

अशा प्रकारें हास्यविनोदानं ती बैठक खूपच रंगली. शेवटी मी केळकर, जोशी, वैद्य आणि पांगारकर या चारी पाहुण्यांच्या हातीं कागदाचे तुकडे दिले, आणि म्हटलं, "एक गंमतीचा खेळ करायचा आहे. आपणास पुढचा जन्म एखाद्या पशुपक्ष्याचा किंवा कीटकाचा येणार आहे, फक्त कोणता जन्म आपणास हवा तेवढं आपण मागायचं आहे अशी कल्पना करायची, आणि या चिठ्टीवर कोणता जन्म हवा, आणि कां हवा हें लिहायचं. लिहिलेल्या चिठ्या आपण माझ्याकडे द्यायच्या, त्या मी सर्वांना वाचून दाखवीन." त्या चौघां साहित्यिकांनी माझ्याकडे हंसत पाहिलं. बैठकींतली मंडळीहि कांहीशी चकितच झाली. असल्या कांही गंमतीची त्यांनाहि पूर्वी कल्पना नव्हती. मी मात्र बैठकीला जाण्यापूर्वींच हा खेळ मनाशीं योजिला होता. चार साहित्यिक पाहुण्यांच्या समयसूचकतेची ती एक परीक्षाच होती. पाहुण्यांनी थोडे आढेवेढे घेतले. परंतु सर्वांनीं आग्रह केल्यावर चिठ्या लिहिण्याचं कबूल केलं. तात्यासाहेब विनोदानं म्हणाले, "आम्ही चिठ्या लिहितांना आमच्याकडे कुणी पाह्यचं नाही बरं का? प्रश्न लहानसहान नाहीं, पुढच्या जन्माचा आहे!" मीहि तितक्याच विनोदानं म्हणालों, "आम्ही सारे जण डोळे झांकतों हवे तर. मग तर झालं की नाही?" चारी चिठ्या माझ्या हातीं आल्यावर मी एकेक वाचून दाखविली. तात्यासाहेब जोशींनी लिहिलं होतं, "प्रश्न फार मोठा असल्यामुळे अमुक जन्म हवा असं निश्चयानं सांगता येत नाही." चिंतामणराव वैद्यांनी लिहिलं होतं, "महाभारताच्या अखेरीस कुत्र्याची महती वर्णिलेली आहे. इमान राखणारा कुत्रा होण्याची माझी तयारी आहे." तात्यासाहेब केळकरांनी लिहिलं होतं, "मुंगीचा जन्म घ्यावासा वाटतो, कारण तिच्यासारखा उद्योगी प्राणी नाहीं, आणि तिला साखर न मागतां मिळते म्हणून तिच्यासारखा नशीबवान प्राणीहि नाही." परंतु सगळ्यांत उत्तम उत्तर दिलं होतं पांगारकरांनी. त्यांनी लिहिलं होतं, पक्ष्याच्या जन्माला येऊनदेखील 'विठ्ठल विठ्ठल' असा नामगजर करणारा एकच प्राणी, पोपट! पोपटाचा जन्म घ्यावासं मला वाटतं."

* * *

भाग तिसरा

# आत्मनिवेदनपर निबंध

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम ........................ वि: ..........
क्रमांक ........................ नों. दि ..........

## १४ : आरशांत दिसणारं माझं रूप !

पदवी–परीक्षेसाठी तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना मानसशास्त्र शिकविताना एका मोठ्या उद्‌बोधक सिद्धांताची फोड करून सांगावी लागे. सिद्धांत असा की, माणसाला स्वतःविषयी जें ज्ञान होतं, तें पुष्कळ अंशानं लोक काय म्हणतात त्यावरून होत असतं. लोक मला सज्जन न समजत असले तर आपण सज्जन आहोंत असं मला वाटायला लागतं. मी उदार आहें असं लोक म्हणत असतील तर माझ्या ठिकाणीं औदार्य आहे अशी माझी समजूत होते. लोकमत हा एक प्रकारचा आरसा आहे, आणि त्या आरशांत आपलं प्रतिबिंब बघण्याची इच्छा प्रत्येक माणसाच्या ठिकाणीं आहे.

कांचेच्या आरशांत माझं फक्त बाह्य रूप दिसेल. मध्यम उंचीचा, सडपातळ बांध्याचा, नाकींडोळीं नीटस, नीटनेटका पोषाख केलेला नारायण सीताराम फडके हा माणूस मला दिसेल. आणि हें सांगण्यांत फारसं स्वारस्य नाही.

माझं खरं रूप सांगायचं असेल तर लोकमताच्या दर्पणांत मी कसा दिसतों तें सांगायला हवं. लोक माझ्याविषयी काय बोलतात, त्यांतलं किती खरं आहे किती खोटं आहे, तें मी सांगितलं तरच माझं खरंखुरं शब्दचित्र मला वाचकांपुढे उभं करतां येईल.

लोकमताच्या आरशांत मी बघूं लागलों कीं क्षणभर माझ्या मनाचा गोंधळ उडतो. कारण लोकांत माझ्याविषयीं परस्परविरोधी मतं आहेत असं मला आढळून येतं.

१९१२ सालीं मीं माझी पहिली कथा लिहिली, तेव्हापासून पन्नास वर्षं मीं अखंडपणे लिहीत आहें. माझ्या ग्रंथांची एकूण संख्या १४० च्या वर गेली आहे. एकूण तीस हजार छापील पृष्ठांचं लेखन मीं केलं आहे. सध्या जी कादंबरी मी लिहीत आहें ती ५५ वी कादंबरी आहे. सुमारे तीनशे कथा मीं लिहिल्या आहेत. नाटकं, काव्य, लघुनिबंध, टीका, अशा सर्व प्रकारांचं साहित्य मीं लिहिलेलं आहे. मराठीप्रमाणंच इंग्रजी लेखनहि मीं पुष्कळ केलेलं आहे. मराठीखेरीज इतर भारतीय भाषांत माझ्या पुस्तकांचीं भाषांतरं झालीं आहेत.

या सगळ्या गोष्टींचं कौतुक करणारा फार मोठा वाचकवर्ग आहे. माझ्या साहित्याचे चाहते दूर दूर पसरले आहेत. गेल्या वर्षीं राष्ट्रपतींकडून 'पद्मभूषण' ही पदवी मला मिळाली तेव्हा, 'पदवीमुळे फडक्यांचा नव्हे, तर फडक्यांमुळे पदवीचा सन्मान झाला आहे,' असे उद्‌गार माझ्या चाहत्यांनी काढले. माझं कोणतंहि नवं पुस्तक प्रसिद्ध झालं की हे माझे चाहते माझी प्रशंसा करतात. मला शाबासकी देतात. मला दीर्घायुष्य मिळावं अशी इच्छा व्यक्त करतात. 'आम्हांला तुम्ही फार हवे आहांत,' 'तुमच्या कादंबऱ्या म्हणजे आमच्या जीवनांतला फार मोठा आनंद आहे,' असं लिहितात.

लोकमताच्या दर्पणांतलं माझं हें रूप बघितलं की मला साहजिक फार आनंद होतो. स्वतःच्या कर्तृत्वाचा अभिमानहि वाटतो. जें लिहिलं त्याचं सार्थक्य झालं असं वाटतं. आणखी लिहिण्यास दुप्पट उत्साह येतो.

परंतु माझ्या साहित्यावर नाराज असणारीं माणसं काय म्हणतात तेंहि मला ठाऊक आहे. 'फडक्यांनी मराठी कादंबरी चटकदार केली, सुबक केली, आकर्षक केली, मराठी भाषेला सुंदर शैलीची देणगी दिली,' असं माझे चाहते म्हणतात; तर माझे टीकाकार म्हणतात कीं, 'फडक्यांनी कथेच्या तंत्राला वाजवीपेक्षा अधिक महत्त्व दिलं आहे. त्यांच्या कथा-कादंबऱ्यांत तंत्राचं सौंदर्य भरपूर आहे, परंतु आशयाची भव्यता नाही. तंत्र आहे, पण मंत्र नाही. कारागिरी आहे, खरी कला नाही.' येवढंच म्हणून माझे टीकाकार थांबत नाहीत. मी सतत पन्नास वर्षं लिहीत आहें, आणि आजघटकेलाहि माझ्या पुस्तकांचा खप पहिल्या प्रतीचा आहे, या

मराठी ... दा. क्र. १५१२९


माझ्या पराक्रमाबद्दल टीकाकारांना नुसता विस्मयच वाटत नाही, तर मत्सरहि वाटतो. ‘आता फडक्यांनी आपल्या लेखणीला रजा द्यावी, लेखनांतून मुक्त व्हावं,’ असा पोक्त सल्लाहि ते मला देतात !

लोकमताच्या दर्पणांत हीं दोन्ही चित्रं मला दिसतात. यांतलं कोणतं चित्र खरं आणि कोणतं खोटं, याचा निर्णय करण्याच्या फंदांत मी कधी पडत नाही. ‘तंत्राच्या आहारीं गेलेले फडके’ ही टीका आज कितीक वर्षं मी ऐकत आलों आहें, तरीदेखील माझी तंत्रावरची श्रद्धा ढळलेली नाही. कारण तंत्र म्हणजे कथासाहित्यावर कुणीतरी बाहेरून लादलेलं बंधन आहे, हें म्हणणं साफ चुकीचं आहे. चित्रकला, शिल्पकला, संगीत, नृत्य, साहित्य या सर्व कलांच्या क्षेत्रांत सौंदर्याचे म्हणून काही कायदे आहेत. त्या–त्या कलांची उपासना करणाऱ्या लोकांनी प्रत्यक्ष अनुभवानं मान्य केलेले असे हे कायदे आहेत. कादंबरी असो, कथा असो, निबंध असो—जें कांही लिहायचं असेल तें वाचनीय, चित्ताकर्षक, चटकदार झालं पाहिजे ना ? तसं तें व्हावं म्हणून जें कांही करायचं असतं त्यालाच ‘तंत्र’ म्हणतात. कादंबरींत एखाद्या मताचा प्रचार असो अगर नसो, पहिली गोष्ट ही कीं ती ‘कादंबरी’ असली पाहिजे, ती कथा असली पाहिजे, या अर्थानंच ‘कलेसाठी कला’ या मताचा पुरस्कार मीं सतत केला आहे.

जीवनाचा आणि कथासाहित्याचा कांही संबंध नाहीं असं मीं कधीच म्हटलेलं नाही. मानवी जीवन हाच ललित साहित्याचा विषय आहे. या अर्थानं मी जीवनवादीच आहें. जीवनाकडे पाठ फिरवून लेखकानं कथासाहित्य लिहावं असं मीं कधीच म्हटलेलं नाही. परंतु कथासाहित्याची खरी कसोटी सौंदर्याचीच कसोटी असली पाहिजे, हा माझा आग्रह आहे. आणि माझे टीकाकार कितीहि बडबडले तरी तो आग्रह सोडायला मी तयार नाही. कारण मला माहीत आहे की, सौंदर्य हीच माझ्या लेखनाची खरी शक्ति आहे. ‘फडके जें जें लिहितील तें तें सुंदरच असेल,’ असं माझे हजारो वाचक विश्वासानं म्हणतात हेंच माझं सामर्थ्य आहे.

‘कलेसाठी कला’ या प्रतिज्ञेनं मी सतत लिहीत आलों आहें, परंतु जीवनाच्या जितक्या प्रकारांवर मीं लिहिलं आहे तितकं मराठींतच नव्हे,

तर इतर भारतीय भाषांतदेखील दुसऱ्या कुणीं क्वचित् लिहिलं असेल. काँग्रेसच्या स्वातंत्र्य-लढ्याच्या एकूण एक अवस्थांचा इतिहास माझ्या कादंबरीवाङ्मयांत तुम्हांला सांपडेल. १९४२ चं जें प्रचंड आंदोलन झालं त्याचं चित्रण माझ्या कादंबऱ्यांत आलेलं आहे. फाळणीचे एकंदर भारतीय समाजजीवनावर जे परिणाम झाले ते माझ्या कादंबऱ्यांत चित्रित झालेले आहेत. कश्मीरच्या स्वातंत्र्य-संग्रामावर कादंबरी लिहिणारा मी एकटाच मराठी लेखक आहें. हैद्राबादच्या पोलिस-ॲक्शनवर लिहिलेली माझी कादंबरी 'सितारा मंझिल' विशेष गाजली आहे. सुभाषचंद्र बोस यांनीं आझाद हिंद फौजेची जी उठावणी केली तिच्यावर 'शोनान,' 'अस्मान' आणि 'तुफान' अशा तीन कादंबऱ्या लिहिणारा दुसरा कुणी भारतीय लेखक असेल तर मला ठाऊक नाही.

मग 'फडके फक्त कलावादी आहेत' किंवा 'फडक्यांच्या लिहिण्यांत तोचतोचपणा आहे,' अशा प्रकारचे जे उद्गार माझे टीकाकार वेळीं-अवेळीं काढतात त्याची मला कितीशी किंमत वाटणार ?

खरं म्हणजे धंदेवाईक टीकाकारांच्या टीकेला फारसं महत्त्व मी देतच नाही. आमच्या मराठी वृत्तपत्रांत जे जे अभिप्राय येतात ते पुस्तक वाचून दिलेले नसतातच. या बाबतींत गटबाजी फार माजलेली आहे. पुस्तक कसं आहे यापेक्षा पुस्तक कुणाचं आहे, आणि ज्याचं आहे तो आपल्या कळपां-तला आहे की नाही याचा विचार अधिक होतो. सगळ्याच भाषांतल्या वृत्तपत्रीय अभिप्रायांची अशीच तऱ्हा असावी असा माझा तर्क आहे. केंद्र सरकार किंवा राज्य-सरकारं प्रतिवर्षीं लेखकांना बक्षिसं देतात त्यांची देखील तऱ्हा हीच आहे. ग्रंथाच्या मूल्याकडे पाहून या बक्षिसांची वांटणी होत नाही. बक्षिसं कुणाकुणाला द्यायचीं हें आधीच ठरलेलं असतं. गेल्या कितीक वर्षांतल्या पारितोषिकांकडे बघून वाचकांची आता अशी समजूत झालेली आहे की, 'ज्या पुस्तकाला बक्षिस मिळेल तें वाईट असणारच.'

म्हणून माझ्या साहित्याची योग्यता टीकाकार ठरवतील ती किंवा सरकार ठरवील ती आहे असं मी मानीतच नाही. कुठल्यातरी दूरच्या अज्ञात व्यक्तीचं मला पत्र येतं कीं, 'असाध्य दुखण्यानं जर्जर झालेल्या

अवस्थेंत मी अंथरुणावर पडलेलों आहें, परंतु तुमच्या कादंबऱ्यांनी या जीवनांतहि मला प्रकाश दाखवला आहे. आनंद दिला आहे.' दुसऱ्या कुणाचं तरी पत्र येतं की, जीवनाकडे दुर्दम्य आशावादानं कसं बघावं तें तुमच्या कादंबऱ्यांनी मला शिकविलं.' आणखी कुणी लिहितं की, 'तुमची ही कथा वाचतांना मला सारखं वाटत होतं कीं माझीच कहाणी मी वाचीत आहें. पण तुमचा-माझा मुळीच परिचय नाही. मग तुम्हीं माझ्या संसाराचं चित्र हुबेहूब कसं रंगवलं ?' अशा प्रकारचीं पत्रं म्हणजेच माझ्या साहित्या-वरचे खरे अभिप्राय मी समजतों.

लोकमताच्या दर्पणांत केवळ माझ्या साहित्याबद्दलच उलटसुलट अभिप्राय मला आढळतात असं नाही, तर माझ्या स्वभावाबद्दलदेखील वेगवेगळ्या लोकांनी वेगवेगळे ग्रह करून घेतलेले दिसतात. कुणी म्हणतात, फडके फार अहंकारी आहेत, उद्धट आहेत. कुणी म्हणतात, फडके फार प्रेमळ आहेत. मी स्वतःशीं पुष्कळदा विचार करतों की मी खरा कसा आहें ? आणि मला उत्तर द्यावं लागतं कीं मी अहंकारी आहें आणि नम्रहि आहें.

मला अहंकार आहे तो फडके या व्यक्तीबद्दल नव्हे, तर फडके नांवाचा जो साहित्यिक आहे त्या साहित्यिकाबद्दल—साहित्यिक या नात्याच्या त्याच्या भूमिकेबद्दल. समाजाला किंवा राष्ट्राला ज्याप्रमाणे राजकारणी पुरुष हवेत, उद्योगपति हवेत, शूर लढवय्ये हवेत, शास्त्रीय संशोधक हवेत, त्याच-प्रमाणे कवि हवेत, कथाकार हवेत, कादंबरीकार, नाटककार हवेत. राज-कारणी पुरुषांपेक्षां साहित्यिकांची योग्यता कोणत्याहि दृष्टीनं कमी नाही. साहित्यिकाचा हा मोठेपणा समाजांत मानला गेला पाहिजे. आणि स्वतः साहित्यिकांनी नेहेमी लक्षांत ठेवलं पाहिजे कीं, आपण मोठे आहोंत, आणि आपण जिची आराधना करतों ती देवता मोठी आहे. साहित्य ही मोलाची वस्तु आहे. आणि समाजांत तिचं मोल झालंच पाहिजे. मीं माझी पहिली कथा लिहिली तेव्हा मी अवघा अठरा वर्षांचा कॉलेज-विद्यार्थी होतों, आणि तो काळ आजच्यापेक्षा निराळा होता. परंतु 'केरळ-कोकिळ' मासिकाच्या संपादकांनी जेव्हा मला सांगितलं, 'तुमची कथा चांगली आहे, ती मी छापणार आहें,' तेव्हा त्यांना मीं म्हटलं की, माझ्या कथेचा

मोबदला मला मिळाला पाहिजे. त्यांनी मला तो दिला. काय हिशेबानं कुणास ठाऊक, त्यांनी सोळा रुपये दिले. लेखनावरची ही माझी पहिली मिळकत मीं एका बँकेंत ठेवली. ती बँक लवकरच बुडाली ही गोष्ट निराळी.

तेव्हापासून चालू घटकेपर्यंत मी माझ्या साहित्याचं मोल घेत आलों आहें. याप्रमाणेच वक्त्याला फर्स्ट क्लासचा प्रवास–खर्च तर मिळाला पाहिजेच, परंतु शिवाय व्याख्यानाचं म्हणून स्वतंत्र मानधन मिळालं पाहिजे, असा आग्रह धरणारा पहिला वक्ता महाराष्ट्रांत मीच होतों. आता माझं हें तत्त्व मान्य झालं आहे, आणि इतर वक्त्यांनादेखील असं मानधन मिळूं लागलं आहे. व्याख्यात्याला आपल्या विषयाचं चिंतन करावं लागतं, श्रम करावे लागतात, व्याख्यान ऐकणाऱ्यांनी मोबदला द्यायलाच हवा, या माझ्या भूमिकेवर पुष्कळ टीका झाली, मला अनेकांनी दूषणं दिलीं. परंतु मी माझं म्हणणं सोडलं नाही. एक रुपया, आठ आणे, अशीं तिकिटं लावून लोक माझीं व्याख्यानं करूं लागले, उत्पन्न चांगलं होऊं लागलं. महाराष्ट्रांत प्रमुख शहरीं माझ्या सातसात व्याख्यानांच्या माला होऊं लागल्या. जशी लेखकाची प्रतिष्ठा मीं सिद्ध केली त्याचप्रमाणे व्याख्यात्याचीहि प्रतिष्ठा आता सर्वमान्य झाली आहे. मला जो अहंकार आहे त्याचं स्वरूप हें असं आहे.

परंतु माझ्या ठिकाणीं नम्रताहि आहे. मीं आतापर्यंत तीस हजार पृष्ठं साहित्य लिहिलं आहे, परंतु मीं अमुक केलं, तमुक केलं अशी बढाई मीं कधी मिरविली नाही. नवकवि किंवा नवकथाकार पुरत्या डझनभर कविता किंवा कथा लिहून झाल्या नाहीत तोंच, आपण साहित्यांत कोणती क्रांति करून राह्यलों आहोंत त्याच्या गप्पा मारूं लागतात. हे नवकवि आणि नवकथाकार आपापले गट बनवितात, दोनचार टीकाकारांना गटांत सामील करून घेतात, आणि परस्परप्रशंसेच्या सहकारी पेढ्या उघडतात. जुन्या साहित्यिकांना शिव्या देतात, आपल्या गटांतल्या कवींना आणि कथाकारांना ‘ युगकर्ते ’ अशी किताबत देतात. या बेट्यांचं ‘ युग ’ चारसहा वर्षांतच खलास होतं. या लोकांची प्रसूति थोडी आणि विव्हळणं जास्त. माझ्या पिढींतल्या साहित्यिकांनी असली सवंग गटबाजी आणि जाहिरातबाजी

कधी केली नाही. माझी स्वतःची श्रद्धा अशी की, माझ्या साहित्याचं जें कांही मोल असेल तें यथाकाल सिद्ध होईल. जाहिरातबाजीनं औटघटकेचा मोठेपणा मिळवितां आला तरी तो टिकायचा नाही. आपल्या पुस्तकावर चांगले अभिप्राय मिळविणं ही एक स्वतंत्र कला आताशा झाली आहे. यामुळेच मराठींतल्या टीकासाहित्याचा दर्जा अलिकडे खालावला आहे. इतर भारतीय भाषांतदेखील टीकासाहित्याची अवस्था अशीच असावी. चालू पिढींतल्या नव्या लेखकांना झटपट मोठं व्हायचंय्. त्यांना ' नांव ' हवं आहे. तपश्चर्या नको आहे, मेहनत नको आहे, उद्योग नको आहे.

माझे शत्रूदेखील दोन गोष्टी मान्य करतात. एक ही की, ' फडक्यांसारखी सुंदर, सुबोध, ओघवती भाषा लिहिणारा दुसरा कुणी नाही. मराठी साहित्याला सुंदर, डौलदार भाषेचं लेणं फडक्यांनी दिलं. ' आणि दुसरी गोष्ट ही की, ' फडक्यांच्या उद्योगाचा आदर्श सगळ्यांनी डोळ्यांपुढे ठेवावा. '

मी मराठी आणि इंग्रजी मिळून १४० च्या वर पुस्तकं लिहिलीं याचं एक कारण माझी उद्योगप्रियता. मासिकांच्या संपादकांची आणि प्रकाशकांची माझ्या लिखाणास इतकी मोठी मागणी आहे की एखादं पुस्तक सोडाच, परंतु छोटीशी कथा किंवा लहानसा लेख लिहून शिलकींत आहे असं मला कधीच म्हणतां येत नाही. मी जें जें लिहितों तें तें प्रकाशनाच्या वाटेवर असतं. मी सतत लिहीत असतों.

इतर लेखकांच्या मानानं मला फार गोष्टींचे छंद आहेत. क्रिकेट, टेनिस अशा खेळांची मला फार आवड आहे. कॉलेजच्या नोकरींतून निवृत्त होईपर्यंत हे खेळ मी खूप खेळलों. नाट्याची आणि संगीताची मला नवतारुण्यापासून आवड आहे. मी गाणं शिकलों, पेटी शिकलों, कलावंतांचीं गाणींवाजवणीं भरपूर ऐकलीं, नाटकं पाह्यलीं, नाटकांत कामं देखील केलीं. मैदानी खेळांत आणि गाण्यावाजवण्यांत आयुष्याचा मीं जितका भाग घालविला तितका कोणत्याहि मराठीच नव्हे, कोणत्याहि भारतीय लेखकानं देखील घालवला नसेल. सर्व क्रीडांचा आणि कलांचा मीं मनसोक्त उपभोग घेतला. या क्षेत्रांतलीं बडींबडीं माणसं बघितलीं, कितिकांशीं तरी मैत्री संपादन केली.

मात्र ही सारी मौज करतांना मी साहित्यिक आहें. हें मीं कधी विसरलों नाही, आणि लेखनाच्या उद्योगांत कधी खंड पडूं दिला नाही. मैदानी खेळ आणि चित्र–नाट्य–संगीत–कला यांचा रस मीं जाणतेपणानं घेतला. त्याचा परिणाम माझ्या साहित्यावर घडलेला आहे. माझ्या भाषेची घडण त्यामुळे झालेली आहे आणि ते सर्व खेळ आणि त्या सर्व कला माझ्या लेखनाचे विषय झाले आहेत.

१९२७ सालीं विंबल्डनच्या दंगलींत अजिंक्यपद चौघां फ्रेंच टेनिसपटूंनी मिळविलं. हे चौघेजण मुंबईंत आले होते. आणि त्यांचे प्रदर्शनी सामने झाले. या चौघांपैकीं ‘ कोशे ’ नांवाचा जो खेळाडू होता त्यानं पुरुषांच्या एकेरी सामन्यांत विंबल्डनचा मुगुट मिळवला होता. या खेळाडूंचा खेळ पाहण्यासाठीं मी मुद्दाम गेलों होतों आणि सामने पाहिल्यानंतर ‘Cochet–the Wizard of the Racket’ या मथळ्याचा जो इंग्रजी लेख मीं लिहिला तो ‘ टाइम्स ’मध्यें प्रसिद्ध झाला होता आणि ‘ टॉइम्स ’ च्या संपादकांना तो इतका आवडला होता की, त्याचं फ्रेंच भाषांतर करून घेऊन तें त्यांनी एका फ्रेंच वृत्तपत्रांत दिलं होतं. ‘ भारत विरुद्ध कॉमनवेल्थ संघ, ’ ‘ भारत विरुद्ध एम्. सी. सी. ’ अशा कसोटी-सामन्यांवर सविस्तर वर्णनात्मक इंग्रजी पुस्तकं मीं लिहिलीं. त्यांवर देशी–परदेशी खेळाडूंचे उत्तम अभिप्राय आले आणि ‘ Wisden ’ नांवाचं जें विख्यात वार्षिक निघतं त्यांतहि माझ्या या पुस्तकांची प्रशंसा आली. हीं पुस्तकं भारतापेक्षाहि इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया या देशांत खपलीं, आणि तिकडल्या प्रमुख क्लबाच्या ग्रंथालयांत तीं आहेत.

नाट्य आणि संगीत या दोन विषयांवर मी खूपच लिहिलं आहे. ‘ नादलुब्धाच्या आठवणी, ’ ‘ मुजरे ’ हीं या विषयावरचीं माझीं दोन ताजीं पुस्तकं.

हें सारं सांगितलं अशासाठी की, इतर कोणत्याहि लेखकानं केले नसतील असे विविध छंद मीं केले, खूप प्रवास केला, परंतु हें सारं लेखनासाठी केलं. साहित्यिक जें जें बघतो, अनुभवतो, त्याचा परिपाक

साहित्यांत व्हायलाच हवा. ‘ जीवनासाठी कला ’ नव्हे, तर ‘ कलेसाठी जीवन ’ अशा प्रतिज्ञेनं साहित्यिक जगत असतो.

जवळजवळ तीस वर्षं झालीं, मीं स्वतः हातानं लिहिण्याचं सोडून दिलं आहे. मी माझा सारा मजकूर तोंडानं सांगत असतों. मजकूर तोंडानं सांगण्याचा एक फायदा होतो असं मला वाटतं. तो असा की, भाषेच्या माधुर्याकडे माझं लक्ष अधिक राहतं. माझ्या लेखनांत दुरुस्ती, खाडाखोड असत नाही. रफ कॉपी, फेअर कॉपी असं कांही असत नाही. जें लिहीन तें सरळ छापखान्याकडे जातं. माझ्या हातून इतकं विपुल लेखन झालं त्याला हें एक कारण आहे.

माझ्या कथांचीं आणि कादंबऱ्यांचीं इंग्रजी भाषांतरं माझीं मीच करीत असतों. जर्मन, फ्रेंच, इटालियन, स्विस् अशा भाषांत माझ्या कथा प्रसिद्ध झाल्या. थोड्याच दिवसांपूर्वी पश्चिम–जर्मनींतील एका प्रकाशनसंस्थेनं आधुनिक भारतीय कथासाहित्याचा ४३१ पृष्ठांचा एक मोठा संग्रह प्रसिद्ध केला, त्यांत ‘ पार्वती ’ नांवाच्या माझ्या कथेचं जर्मन भाषांतर समाविष्ट केलेलं आहे. मात्र माझं मलाच असं वाटतं कीं विवेचनात्मक किंवा वर्णनात्मक इंग्रजी लेख मी जितका सरसपणें लिहितों तितक्या सरसपणें इंग्रजी कथा किंवा कादंबरी लिहिणं मला जमत नाही. माझ्या शैलींत कृत्रिमपणा राहतो. माझे संवाद असावेत तसे चटकदार, खुसखुशीत असत नाहीत. इंग्रजी कथासाहित्य लिहिणारा इंग्रज समाजांत वर्षानुवर्षें राह्यलेला असला पाहिजे. केंब्रिज, ऑक्सफर्ड अशा विद्यापीठांत त्याचं शिक्षण झालेलं असलं पाहिजे. मातृभाषेसारखी इंग्रजी भाषा त्याच्या तोंडीं घोळलेली असली पाहिजे. माझ्या बाबतींत असं कांही घडलेलं नाही. या गोष्टीची जाणीव मला आहे. आणि माझ्या इंग्रजी लिहिण्यांतला हा दोष आता यापुढे कसचा जातो ? जें कांही भांडवल आहे त्याच्यावरच आता भागवायचं.

अहंकार आणि नम्रता दोन्ही ज्याप्रमाणे माझ्या ठिकाणीं आहेत त्याप्रमाणे इतरहि कित्येक परस्परविरोधी गुण माझ्या ठिकाणीं असलेले मला दिसतात. मी नास्तिक आहें, परंतु श्रद्धावान् आहें. या विश्वाच्या चलन-वलनामागे एक शक्ति आहे, या दृष्टीनं मी परमेश्वराचं अस्तित्व मानतों.

परंतु या परमेश्वराला प्रसन्न राखलं पाहिजे, त्याची कृपा संपादन केली पाहिजे, या अर्थानं मी परमेश्वर मानीत नाही. परंतु जीं थोर माणसं होऊन गेलीं त्यांचे आदर्श डोळ्यापुढे ठेवले पाहिजेत अशी माझी श्रद्धा आहे. माझ्या बायकोवर किंवा मुलांवर माझा नास्तिकपणा मी लादीत नाही. कारण माझी विचारसरणी अशी की, मी सांगतों म्हणून त्यांनी नास्तिक होऊं नये. त्यांच्या स्वतंत्र बुद्धीला नास्तिक्य पटलं तर तें त्यांनीं स्वीकारावं.

मी सर्व प्रकारच्या चैनी केल्या, परंतु कोणत्याहि विषयाच्या आहारीं गेलों नाही. मी मांसाहार करतों, परंतु केवळ एखाद्या वेळीं चैन म्हणून. मी मद्य घेतों, परंतु त्याची मला चटक नाही. एकट्यानं मद्य घेणं तर मला बिलकुल आवडत नाही. कपड्यांची मला आवड आहे, परंतु त्याचाहि षौक नाही. 'बुश्शर्ट,' 'मनिला' असले कपडे मला आवडत नाहीत. सभा-समारंभाला जातांना मी सूटबूट घालतों, परंतु घरांत वावरतों साध्या धोतरांत. आणि उघड्या अंगानं बसणं मला फार आवडतं. तोंडानं मजकूर सांगत असतांना मधूनमधून सिगरेट ओढण्याची मला संवय आहे. पूर्वी पानतंबाखू खात असें. आताशा तें सोडून दिलं आहे. सिगरेट मात्र ओढतों. परंतु दिवसाकांठी किती सिगरेट्स् ? फार तर सहा-सात.

साहित्यांत मीं कुणालाहि गुरु मानलं नाही. माझ्या अगोदरच्या पिढींत जी मोठीमोठी लेखकमंडळी होती, त्यांच्याबद्दल मीं आदर ठेवला, परंतु कुणाचंहि शिष्यत्व पत्करलं नाहीं. परमार्थांतली बुवाबाजी ज्याप्रमाणे मला आवडत नाही, त्याचप्रमाणे साहित्यांतलीहि आवडत नाही. माझे कुणी गुरु नव्हते; त्याप्रमाणे मी कुणाचा गुरु नाही. ललित लेखनाची कला शिकता येते पण शिकवितां येत नाही, अशी माझी समजूत आहे. शिवाय संगीताची कला शिकायची असेल तर गुरूचा नित्य सहवासच झाला पाहिजे, त्याप्रमाणेच कथा–कादंबऱ्या कशा लिहाव्या हें शिकायचं असेल तर शिष्य सदैव आपल्या सहवासांतच असला पाहिजे. माझ्या सुदैवानं तसा एक शिष्य मला मिळाला आहे. तो शिष्य म्हणजे माझी बायको — कमला फडके ! १९३७ सालीं तिनं पहिली कथा लिहिली, आणि नंतरच्या अवधींत चार कादंबऱ्या, आठ कथासंग्रह, चरित्रं, प्रवासवर्णनं, अशीं तिचीं जवळजवळ

पंधरा पुस्तकं प्रसिद्ध झालीं असून तिनं जी लोकप्रियता मिळविली आहे ती पाहून मला धन्यता वाटते. ‘ शिष्यादिच्छेत् पराजयम् । ’ हें वचन तिच्या बाबतींत खरं झालेलं आहे.

कथा–कादंबऱ्या लिहिणारा लेखक परोपरीचीं कथानकं रचतो, लहान-मोठे प्रसंग योजितो, स्त्री–पुरुषांचीं पात्रं रंगवतो — या साऱ्या प्रपंचाचा उगम तरी होतो कुठे ? — या प्रश्नाविषयी वाचकांना साहजिक कुतूहल वाटतं. या प्रश्नाचं सविस्तर विवेचन ‘ प्रतिभासाधन ’ नांवाच्या माझ्या ग्रंथांत मीं केलेलं आहे. थोडक्यांत असं की, स्वतः अनुभवलेलीं सुख-दुःखं आणि सहानुभवाच्या शक्तीनं जाणलेलीं इतरांचीं सुख-दुःखं हाच कथा-लेखकाचा कच्चा माल आहे. अवलोकन, सहानुभूति आणि कल्पनाशक्ति हीं ललितलेखकांचीं मुख्य हत्यारं आहेत. यामुळेच लेखकाच्या कथा-साहित्यांत त्याच्या स्वतःच्या चरित्राचं चित्रण बऱ्याच अंशानं असतं. ‘ सारं कथासाहित्य आत्मचरित्रपर असतं ’ — या वचनांतला ‘ सारं ’ येवढाच शब्द काढून टाकला तर त्यांत सत्याचा भाग पुष्कळ आहे असं म्हणावं लागेल. ‘ जसा माणूस तशी त्याची भाषाशैली ’ — या उक्तीच्या धर्तीवर आपल्याला असं म्हणतां येईल कीं, जसं लेखकाचं चरित्र तसं त्याचं कथासाहित्य. इतर लेखकांचे काय अनुभव असतील ते असोत, माझ्यापुरतं मी असं सांगेन कीं, माझं कथासाहित्य माझ्या जीवनाबरोबर वाढत गेलेलं आहे.

बी. ए. च्या आणि एम्. ए. च्या परीक्षांसाठी मीं तत्त्वज्ञानाचा विषय घेतला होता. मुंबई विद्यापीठांत या विषयासाठी असलेली स्कॉलरशिप, सुवर्णपदकं आणि रोख बक्षिस, अशीं सर्व पारितोषिकं मीं मिळविलीं होतीं. नंतर बत्तीस वर्षं या विषयाचं अध्यापन मीं केलं. तर्कशास्त्र अभ्यासिल्यामुळे आणि शिकविल्यामुळे माझ्या सर्व लेखनांत तर्कशुद्धता आणि सुबोधता आली. मानसशास्त्राच्या व्यासंगामुळे माझ्या कथासाहित्यांतल्या स्वभावचित्रणाला आणि मनोविश्लेषणाला दुर्मिळ रंगत आली. चित्रकार, शिल्पकार, नट, गायक, नर्तक अशा कलावंतांच्या सहवासामुळे सौंदर्यदृष्टि मला प्राप्त झाली, आणि प्रवाहित्व आणि नादमाधुर्य या दोन गुणांचा माझ्या भाषेंत आविष्कार झाला.

१९२० सालीं गांधीजींच्या असहकार–चळवळींत मी सामील झालों. कॉलेजांतली प्राध्यापकाची नोकरी सोडून दिली, लोकमान्य टिळकांच्या ‘ केसरी ’, ‘ मराठा ’ पत्रांत उपसंपादकाचं काम करूं लागलों, आणि पुण्यास ‘ टिळक विद्यापीठ ’ नांवाची नवी राष्ट्रीय युनिव्हर्सिटी निघाली, तिच्यांत अध्यापनाचं काम करूं लागलों. परंतु चळवळीला पुरते सहा महिने झाले नव्हते तोंच शिक्षणावरचा आणि सरकारी कोर्टांवरचा बहिष्कार गांधीजींनी संपुष्टांत आणला. नवीन निघालेल्या राष्ट्रीय शिक्षणसंस्थांचं भवितव्य शंकास्पद वाटूं लागलं. गांधीजींची भेट घेऊन मीं त्यांना विचारलं कीं, ‘ शाळा–कॉलेजांवरचा आणि कोर्टांवरचा बहिष्कार तुम्हीं उठविलात, आता माझ्यासारख्या प्राध्यापकांनी आणि ज्यांनी तुमचा आदेश मानून वकिली सोडली त्या वकिलांनी काय करायचं ? त्यांना तुम्हीं खुशाल वाऱ्यावर सोडून दिलं आहे ! तुमच्या या अवसानघातकीपणानं तुमच्या चळवळीवरचा त्यांचा विश्वास उडाला आहे. ’ यावर आपलं सुप्रसिद्ध हास्य करून गांधीजी म्हणाले, ‘ तुमचा विश्वास उडाला असेल तर तुम्ही चळवळींत मुळीच राहूं नका. परत कॉलेजांत जा. ’ मीं म्हटलं, ‘ आम्ही बंडखोर म्हणून बदनाम झालों आहोंत. आम्हांला कॉलेजांत कोण परत घेईल ? ’ गांधीजी पुन्हा हंसले आणि म्हणाले, ‘ मी देतों तुम्हांला नोकरी. ’ दिल्लीच्या सेंट स्टीफन्स कॉलेजांतले प्रिन्सिपल रुद्र गांधीजींचे स्नेही होते. त्यांना गांधीजींनी माझ्याबद्दल पत्र लिहिलं, आणि मी त्या कॉलेजांत तत्त्वज्ञानाचा प्रोफेसर झालों. त्या कॉलेजांतले कायमचे तत्त्वज्ञानाचे प्रोफेसर युरोपच्या दौऱ्यावर गेले होते. त्यांच्या जागीं माझी नेमणूक झाली.

पण ही नोकरी हंगामी होती. तिची मुदत पूर्ण झाल्यावर नोकरीचा प्रश्न माझ्यापुढं पुन्हा उभा राहिला.

नंतरच्या पांच वर्षांत सिंध, हैद्राबाद, नागपूर अशा ठिकाणच्या कॉलेजांत मीं हंगामी नोकऱ्या केल्या; परंतु बहुतांशीं बेकारच राहिलों. हे माझे दिवस फार कष्टाचे आणि धडपडीचे गेले. परंतु या काळांत नोकरीच्या निमित्तानं दिल्ली, अलिगड, सिंध, हैद्राबाद, लाहोर, रावळपिंडी, भावनगर नागपूर अशा ठिकाणीं माझं कमीअधिक वास्तव्य झालं. नाना तऱ्हांचे

समाज मीं बघितले, रमणीय स्थळं पाहिलीं. गुजराथी, काठेवाडी, सिंधी, पंजाबी समाजाच्या चालीरीती बघितल्या, स्त्रीपुरुषांचे नमुने पाहिले.

माझ्या कादंबऱ्यांत हीं स्थळं आणि हीं माणसं पुढं मला चित्रित करतां आलीं. इतर कोणत्याहि मराठी कादंबरीकारापेक्षा माझ्या कादंबऱ्यांत स्थळांचं, प्रसंगांचं आणि पात्रांचं वैशिष्ट्य आलं तें यामुळे. पांच वर्षं मी आर्थिक दृष्ट्या रखडलों खरा आणि आयुष्याला दिशा नसल्याप्रमाणे भटकलों खरा, परंतु त्या काळांत कादंबरीकार या नात्यानं माझा अनुभव समृद्ध होत होता. माझ्या पुढच्या लेखनाची माझ्या नकळत तयारी होत होती. आपल्या दुःखांतून जीं गीतं निर्माण होतात, तींच गीतं सगळ्यांत अधिक श्रुतिमनोहर असतात, अशा अर्थाचं सुभाषित आहे तें खरं आहे. बेकारीच्या आणि भ्रमंतीच्या काळांत मी वैतागलों होतों. परंतु माझ्या आयुष्याचं सिंहावलोकन आता जेव्हा मी करतो, तेव्हा दुर्दैवाच्या त्या फेऱ्याविषयीं मला कृतज्ञता वाटते.

१९२६ सालीं कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजांत मी प्राध्यापक झालों आणि त्यानंतर माझ्या जीवनाला स्थैर्य आलं. या स्थैर्यामुळेच मी खूप खूप लिहूं शकलों हें खरं. परंतु कित्येक वेळां मला वाटल्यावांचून राहत नाही की, आणखी बेकारी, आणखी भ्रमंती माझ्या वांट्याला आली तर माझ्या जीवनांत आणखी रंगत येईल, आणि त्याचा परिणाम म्हणून माझं कथासाहित्य आणखी वैचित्र्यसंपन्न होईल.

लेखक आणि प्रकाशक हे दोघे एकमेकांचे वैरी आहेत अशा समजुतीनं कितिक लोक बोलतांना अगर लिहितांना मला आढळतात. प्रकाशक म्हणजे लेखकांना लुबाडणारा एक प्राणी — असं लेखक म्हणतात. आणि लेखक म्हणजे प्रकाशकाला पिळून काढणारा एक ऐतोबा — असं प्रकाशक म्हणतात. या बाबतींत माझा अनुभव फार वेगळा आहे. कदाचित् मी विशेष भाग्यवान् असेन, परंतु मला भेटलेले सर्व प्रकाशक माझ्याशीं फार आदरानं, प्रेमानं आणि सचोटीनं वागले आहेत. मराठी नियतकालिकांच्या संपादकांनी माझ्या लेखनाविषयी नेहमी अगत्य दाखविलं आहे. कदाचित् याचं कारण

असं असेल की, माझं साहित्य इतक्या मोलाचं आहे. परंतु हें मीं म्हणायचं नाही; त्यांनीं म्हणायचं आहे.

इंग्रजी नियतकालिकांच्या संपादकांशींहि माझे संबंध प्रेमाचे आहेत. ' इलस्ट्रेटेड वीक्ली ऑफ इंडिया 'चे माजी संपादक सी. आर. मँडी यांचा माझ्यावर विशेष लोभ जडला होता. त्यांच्या कारकिर्दींत माझ्या अनेक इंग्रजी कथा त्या नियतकालिकांत प्रसिद्ध झाल्या. माझ्या कथांवरील त्यांचे अभिप्राय मला मार्गदर्शक झाले. मराठी लेख, कथा-कादंबऱ्या लिहिण्याच्या कामांत मी इतका बुडून गेलेला असतों की इंग्रजी लेखन करायला मला सवडच सांपडत नाही. परंतु इंग्रजी कथासाहित्य लिहिण्याचा सराव ठेवावा, तें अधिकाधिक चांगलं लिहायला शिकावं, त्यांत प्रगति करावी, अशी माझी फार इच्छा आहे. दुर्दैव एवढंच की अशा लेखनाला भारतांत वाव नाही. इंग्रजी कथासाहित्य प्रसिद्ध करणारीं मासिकं आहेत कुठे ? इंग्रजी वृत्तपत्रांचे रविवारचे अंक आहेत, परंतु कथांचा मोबदला त्यांच्याकडून फारसा मिळत नाही. त्या अंकांत आलेली कथा फारशी कुणी वाचीतहि नाही. ती एक प्रकारं वायां जाते.

इंग्लंड–अमेरिकेंतल्या मासिकांकडे आणि प्रकाशकांकडे माझ्या कथा आणि कादंबऱ्या पाठविण्याचा प्रयोग मीं करून पाहिला. परंतु प्रांजलपणानं सांगितलं पाहिजे कीं, त्यांच्याकडे माझी डाळ अजून शिजली नाही. जर्मन, फ्रेंच, इटालियन भाषांतून माझ्या कथांचीं भाषांतरं प्रसिद्ध झालीं; परंतु इंग्लंड–अमेरिकेंतील संपादक मला कांही अजून दाद देत नाहीत. कदाचित् माझं लिखाण त्यांना हव्या त्या दर्जाचं नसेल. कदाचित् कांही अमेरिकन संपादकांनी आणि प्रकाशकांनी मला लिहून कळवलं तें खरं असेल कीं, ' आमचे वाचक स्वतःच्या जीवनविषयक प्रश्नांत इतके गढलेले आहेत की तुमच्या भारतांत काय घडून राहिलेलं आहे, त्याबद्दल त्यांना रुचि नाही. ' किंवा कदाचित् माझा एक समज आहे तो खरा असेल की, हिंदी लेखकाच्या इंग्रजी कथासाहित्याला केव्हा भाव येतो, तर तो केंब्रिज, ऑक्स्फर्ड, हॉवर्ड, न्यूयॉर्क, अशा विद्यापीठांत शिकलेला असेल तर, किंवा इंग्रज समाजांत वावरलेला असेल तर, किंवा श्रीमंत कुळांतला असेल तर,

किंवा तथाकथित समाजवादाचा प्रचार त्याच्या कथालेखनांत असेल तर. माझ्याजवळ यांतला एकहि गुण नाही. मग माझं लेखन इंग्रजी किंवा अमेरिकन संपादक–प्रकाशक कसं हातांत धरणार ?

इंग्रजी कथासाहित्य लिहण्याच्या माझ्या सामर्थ्याबद्दल भलत्या भ्रमांत मी नाही. माझ्या मर्यादा मी ओळखून आहें. परंतु भाभानी भट्टाचार्य, के. नारायण, मुल्कराज आनंद, के. अब्बास, इत्यादींच्या लेखनापेक्षां माझं लेखन कमी दर्जाचं आहे असं मला वाटत नाही. परंतु मी हें जाणतों की स्वतःबद्दलच्या माझ्या मतांचा काय उपयोग ? तें प्रकाशकांना आणि संपादकांना पटलं पाहिजे ना ? तें कसंहि असो. साहित्यिक या नात्याचीं माझीं दुःखं फार थोडीं आहेत. पण इंग्लंड–अमेरिकेंत माझं कथासाहित्य अजून प्रकाशित झालं नाही या गोष्टीचं दुःख त्यांतलं प्रमुख आहे, येवढं खरं.

पन्नास वर्षं मी लिहितों आहें आणि साहित्यिकानं आपली कला समाजासाठी आणि राष्ट्रासाठी राबवावी या भ्रामक मताच्या संकटापासून ललित साहित्याचं रक्षण करण्यासाठी लेखणी आणि वाणी हीं दोन हत्यारं वापरतों आहें. स्वातंत्र्यपूर्व काळांत आम्ही कथाकारांना असं सांगण्यांत येत होतं की आम्ही राष्ट्राच्या जागृतीसाठी कांही केलं पाहिजे. क्रांति घडवून आणण्यासाठीं लिहिलं पाहिजे. गांधीजींच्या चळवळी ज्यावेळेस ऐन भरांत होत्या त्यावेळेस असं एक तर्कदुष्ट मत प्रसृत झालं होतं की — किंवा असं म्हणूं या की गांधीवाद्यांकडून पद्धतशीरपणं प्रसृत करण्यांत आलं होतं की — गांधीवादाचा पुरस्कार जो करतो त्याचं कथासाहित्य श्रेष्ठ प्रतीचं समजावं आणि गांधीवादाचा पुरस्कार ज्यांत नसेल तें ललितसाहित्य कनिष्ठ प्रतीचं मानावं म्हणजे ललितसाहित्याच्या सरसनीरसतेची जी लालित्याची खरी कसोटी ती बाजूला टाकून प्रचाराच्या कसोटीनं ललित साहित्याची योग्यता ठरवावी, असं प्रतिपादलं जात होतं. आता स्वातंत्र्यानंतरच्या काळांत जो राजकीय पुढारी किंवा मंत्री उठतो तो कादंबरीकारांना सांगतो, — राष्ट्राची जडणघडण करा.' चिनी आक्रमणाच्या अगोदर कांही दिवस आमचे पुढारी

आणि मंत्री राष्ट्रीय एकात्मतेचा मंत्र जपूं लागले होते आणि या कामीं साहित्यिकांनी आपली प्रतिभा खर्चावी असं सांगूं लागले होते. आता चिनी आक्रमणानंतर तर कांही विचारूंच नका. संरक्षणाच्या कार्यात साहित्यिकांनी आपला वांटा उचलला पाहिजे असं प्रधानमंत्र्यापासून तो जिल्हापरिषदेच्या कर्मचाऱ्यापर्यंत सारे लोक सांगत सुटले आहेत.

या मताविरुद्ध पन्नास वर्षे मी झुंज देत आहें. माझ्या स्वतःच्या कादंबऱ्या तर कोणत्याहि एका राजकीय पंथाच्या प्रचारापासून मीं अलिप्त ठेवल्या आहेतच, आणि लालित्य हाच कादंबरीचा मुख्य गुण मानून मी लिहीत आलों आहेंच, परंतु माझ्या लेखांत आणि भाषणांत मी सतत सांगत आलों आहें कीं, कादंबरीची खरी श्रेष्ठता तिच्या प्रचारामुळे नव्हे, तर लालित्याच्या गुणामुळे ठरविली पाहिजे. कोणत्याहि प्रचारकार्याचा गुलाम होतां कामा नये. त्याचं स्वातंत्र्य अबाधित राहिलं पाहिजे. राष्ट्राची जडणघडण करणं, नवा भारतीय समाज निर्माण करणं, राष्ट्रीय एकात्मता साधणं, हीं कामं पुढाऱ्यांचीं आणि मंत्र्यांचीं आहेत. हातांत सत्ता असूनहि, चतुरंग सैन्य हाताशीं असूनहि सरकारला जीं हीं कामं करतां येत नाहींत तीं आम्हीं कादंबरीकारांनी लेखणीच्या फटकाऱ्यानं साधावीं या म्हणण्यांत शहाणपणाचा लेश तरी आहे काय? राष्ट्रीय एकात्मतेला ज्यायोगे तडे जातील असा कारभार नेहरूंनी आणि त्यांच्या सल्लागारांनी करायचा, आणि हे तडे सांधण्याचं काम आम्हीं करायचं होय? जागोजाग कलहाच्या आगी लावायच्या यांनी आणि त्या विझविण्यासाठी पाण्याचे बंब आणायचे साहित्यिकांनी होय!

दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीपासून आतापर्यंतच्या अठरा वर्षांत एका तरी कादंबरीकारानं युद्धाचा प्रचार केला होता काय? जगांतल्या झाडून साऱ्या कादंबरीकारांनी शांतीचे आणि मैत्रीचे गोडवे गाइले ना? पण तरी देखील जिकडेतिकडे शीतयुद्ध चाललंच आहे. चिनी फौजांनी भारताच्या उत्तर–सीमेवर झडप घातलीच. राज्यकर्त्यांनी आपल्या मूर्खपणानं, क्लीबत्वानं आणि झोंपाळूपणानं चिनी आक्रमणाची आपत्ति ओढवून घेतली. आता राष्ट्राचं संरक्षण मात्र साहित्यिकांनी करायचं होय?

या तर्कदुष्ट आणि भ्रामक विचारसरणीविरुद्ध मी सतत पन्नास वर्षं झुंजत आलों आहें.

माझ्या उद्योगांत मला सवड होत नाही म्हणून असेल, किंवा माझा स्वभाव कांहीसा एकलकोंडा आहे म्हणून असेल, परंतु ज्याला ‘ बैठकींतला माणूस ’ म्हणतात तसा मी नाही. कुणाकडे जावं, गप्पा ठोकाव्या, चहा–चिवडा घ्यावा, असं मला कधी वाटत नाही. ‘ चला जाऊं या फडक्यांकडे गप्पा मारायला ’ असं म्हणून कुणी माझ्याकडे येत नाही. म्हणून दिवसा-अखेर काम संपवून मी आणि माझी बायको ‘ राणी कुत्रीला घेऊन गांवा-पासून दूर कुठं तरी जातों, हिंडतों, कुत्रीला धावडवतों ’ सूर्यास्ताची शोभा पहातों. सिगरेट ओढतों. असं केल्यानं हवा तो श्रमपरिहार मला मिळतो. क्वचित् मी, माझी बायको आणि मुलं मिळून पत्ते खेळतों. पत्ते खेळायचे ते गंभीरपणानं विचार करून खेळूं नयेत, आरडाओरडा, दंगामस्ती, हास्यविनोद करीत खेळावेत, अशा मताचा मी आहें. लेखनाचं काम मी रात्रीं कधीच करीत नाही. रात्रीचा वेळ नवीं पुस्तकं वाचण्यांत घालवतों. रेडिओवर चांगलं गाणं असेल तर तें ऐकतों, क्वचित् नाटकाला, सिनेमाला जातों. तारुण्यांतला एक काळ असा होता की गाणं–वाजविणं ऐकण्याचा षोक मीं फार केला. त्या काळांत रात्रीं दीडदोन वाजण्याच्या आधी मी कधी निजलों नाही आणि सकाळीं नऊ वाजण्याच्या आधी कधी उठलों नाही. आता हें वेळापत्रक बदललं आहे. खूप काम करावं, खूप खेळावं, खूप खावं, प्यावं, खूप झोंप घ्यावी—या सूत्रानुसार मी जीवन अजूनहि जगत आहें.

माझ्या हातून विपुल साहित्य निर्माण झालं. मराठी साहित्यिकाच्या वांट्याला जेवढे सन्मान येण्यासारखे आहेत तेवढे सगळे मिळविले. ‘ पद्मभूषण ’ ही सन्मानाची पदवी देखील मिळाली. कधी कधी मनांत विचार येतो, कीं आपण कुणी तरी मोठे आहोंत खास! परंतु या विचारानं अहंकाराचा फुगा प्रमाणाबाहेर फुगूं लागला की मराठी साहित्यांत ज्या थोर व्यक्ती होऊन गेल्या त्यांची मी आठवण करतों. ज्ञानेश्वरांचा अलौकिक ग्रंथ ‘ ज्ञानेश्वरी, ’ एकनाथ, नामदेव, तुकाराम, रामदास इत्यादि संतांचं

आणि भक्तांचं साहित्य, मोरोपंतांची एक लक्ष आर्या, इतर पंडित कवींची प्रचंड रचना, लोकमान्य टिळकांचं 'गीतारहस्य,' हरिभाऊ आपटे यांच्या कादंबऱ्या, न. चिं. केळकर यांचा साहित्यसंभार—या सगळ्यांची आठवण केली की माझा अहंकार गळून जातो. आणि मराठी साहित्याची परंपरा पुढं चालविण्यास मीं अल्पसा हातभार लावला आहे एवढीच शुद्ध जाणीव शिल्लक राहते! या जाणिवेंत जो आनंद आहे तो मला पुरेसा आहे.

* * *

## १५ : माझा राजकीय पुढारीपणा

मी एम. ए. ची पदवी मिळविली १९१७ सालीं. हल्ली ' सर परशुराम भाऊ कॉलेज ' म्हणून ओळखलं जाणारं ' न्यू पूना कॉलेज ' निघालं होतं १९१६ सालीच ! आणि त्या कॉलेजांत तर्कशास्त्र आणि तत्त्वज्ञान या विषयांचा प्रोफेसर म्हणून मी काम करूं लागलों होतों. तीन चार वर्षांत अध्यापनाच्या कामांत माझा चांगला लौकिक झाला. चांगला वक्ता म्हणून लोक मला ओळखूं लागले. ' दादाभाई नौरोजी ' हें माझं पुस्तक प्रसिद्ध झालं. ' प्रभात ', ' मनोरंजन ' यासारख्या नियतकालिकांत माझ्या कथा, निबंध वगैरे लेखन येत होतं. लेखक या नात्यानं मला लोकप्रियता मिळूं लागली होती. ' न्यू पूना कॉलेज ' ज्या शिक्षणप्रसारक मंडळीनं काढलं होतं तिचा मी आजीव सभासद होतों. साहजिकच माझा भविष्यकाल लोकांना—आणि मलाहि !—दिसत होता तो असा की, ' न्यू पूना कॉलेजां 'त मी हयातभर काम करीन, अध्यापक, वक्ता आणि लेखक म्हणून कीर्ति मिळवीन, पुण्यांतच राहीन !

परंतु प्रत्यक्षांत घडलं तें फार वेगळं !

१९२० च्या नोव्हेंबर महिन्यांत शिक्षण प्रसारक मंडळीच्या आजीव सभासदत्वाचा मी राजीनामा दिला, ' न्यू पूना कॉलेज '. सोडलं, केसरी–मराठा संस्थेंत दाखल झालों !

माझ्या जीवितक्रमाला ही नाट्यपूर्ण कलाटणी कोणत्या कारणांनी आणि कशी मिळाली, याचा आता मी विचार करूं लागतों तेव्हा मला असं दिसतं

की, १९२० च्या सुमारास तीन वेगवेगळ्या वृत्ति माझ्या ठिकाणीं वाढत होत्या. आणि त्यांपैकी कोणत्या दोन मागे पडतील आणि कोणती एक माझ्या आयुष्याचा, अल्प कालापुरता का होईना, ताबा घेईल तें माझं मलाच सांगतां येण्यासारखं नव्हतं. भोवतालच्या परिस्थितींतल्या कोणत्या घटनेचा माझ्यावर किती प्रमाणांत परिणाम होईल त्यावर ती गोष्ट अवलंबून होती.

त्या कालांत मी तीन व्यक्ती मिळून बनलों होतों. एक व्यक्ति संगीताच्या मागे लागली होती. दुसरी गंभीर वृत्तीनं भक्तिमार्गाकडे झुकूं लागली होती. आणि तिसरी राजकारणाकडे वळून देशसेवेचीं स्वप्नं रचीत होती. माझ्या आयुष्याचा पूर्ण ताबा घेण्यासाठी या तीन व्यक्तींत झटापट चालली होती.

संगीताच्या आणि नाटकाच्या माझ्या षोकाचा माझ्या वागण्यावर परिणाम झाला होता. वाईट अर्थानं मी ‘ बिघडलों ’ होतों असं मुळीच नव्हे. परंतु माझ्या षोकामुळे ज्यांचा सहवास मला कमी अधिक घडला होता त्यांच्या सवयी आणि रीतिरिवाज मी उचलले होते. केसांचीं झुलपं वाढवावींत, निरनिराळ्या रंगांच्या उंची फरच्या टोप्या घालाव्यात, तलम विलायती मलमली धोतर वापरावं—तें सुद्धा नाटकी पद्धतीनं नेसावं—अंगावर शेरवानीसारखा लांब कोट चढवावा, पायांत पंप शू घालावे, असे षोक मी करूं लागलों होतों. त्या वेळीं कॉलेजांत जातांना मी सूटबूट घालीत असें आणि लहानमोठ्या व्याख्यानांच्या वेळेस जरीकाठी शुभ्र रुमाल आणि उपरणं असा पोषाख करीत असें. परंतु याव्यतिरिक्त इतर ठिकाणीं आणि प्रसंगीं ज्यांनी मला पाहिलं असेल त्यांना हा कोणीतरी नाटकी छाकटा आहे असंच वाटलं असेल. लोकांना तसं वाटण्यासारखं आपण वागतों यांतच मला आनंद होत असे, इतका मी नाटकांच्या आणि संगीताच्या षोकांत वाहत चाललों होतों.

आणि चमत्कार असा की याच वेळीं दुसरी एक अगदी भिन्न वृत्ति माझ्या ठिकाणीं बळावत होती.

ती वृत्ति मराठी संत वाङ्मयाच्या वाचनानं उत्पन्न झालेली होती. माझे वडील पट्टीचे वेदांती, योगाभ्यासी, आणि स्नान-संध्या, उपासना इत्यादींत

रमणारे असे अत्यंत चिकित्सक अभ्यासू होते. फडणिशीच्या आणि मामले-दारीच्या हुद्द्यावर ते असतांना त्यांनी परिश्रमपूर्वक बसवून हौसेनं केलेली कीर्तनं मी माझ्या लहानपणीं ऐकलीं होतीं. या गोष्टींचे संस्कार माझ्यावर झाले असलेच पाहिजेत. साहित्य क्षेत्रात थोडं नांव मिळवून जेव्हा मी विस्तृत वाचन करूं लागलों तेव्हा 'ज्ञानेश्वरी' मी हातीं घेतली, आणि त्या ग्रंथानं मला अगदी भारून टाकलं. या ग्रंथाचं मर्म कळावं म्हणूनच नामांकित सांप्रदायिकांचीं कीर्तनं–प्रवचनं मी ऐकूं लागलों. जोगमहाराजांचीं भजनी–कीर्तनं त्यावेळीं फार प्रसिद्ध होती. त्यांची गोडी मला अवीट वाटली. देशमुख नांवाचे एक पदवीधर गृहस्थ ज्ञानेश्वरीवरील त्यांच्या मार्मिक प्रवचनांबद्दल फार विख्यात होते. तीं ऐकायलाहि मी अगदी नेमानं जाऊं लागलों. उपासतापास मी कधी केले नाहीत, परंतु मनानं मी अगदी पूर्णपणे भक्तिमार्गावर प्रेम करूं लागलो. परमेश्वराच्या अस्तित्वाबद्दल खात्री बाळगून आपलीं सर्व कृत्यं कृष्णार्पण करण्याच्या बुद्धीनं आयुष्य कंठण्यांतच मानवी जन्माचं सार्थक आहे असं अगदी प्रामाणिकपणानं मला त्यावेळीं वाटत असे. नामस्मरणाची महतीसुद्धा मला पटूं लागली होती. इतकी की भास्करबुवांचं गायन तर मला अतिशय प्यार वाटेच, परंतु ते विश्रांति घेत स्वतःच्याच विचारांत मग्न होऊन बसले म्हणजे मधूनच स्वतःशी 'सद्‌गुरू! सद्‌गुरू!' असा उद्‌गार काढीत तो मला फार आवडत असे. भक्तिमार्गाची ही माझी ओढ वाढली असती तर कोणत्या थराला ती गेली असती कोण जाणे!

परंतु ही वृत्ति आणि प्रथमच सांगितलेली नाट्यसंगीतलोलुप वृत्ति याबरोबरच तिसरी एक वृत्ति त्या काळांत माझ्या ठिकाणीं बळावत होती, आणि १९२० च्या नोव्हेंबर महिन्यांत तिचा एकदम असा कांही अचानक स्फोट झाला की तिच्या आवेगापुढे बाकीच्या साऱ्या प्रवृत्ति अल्पकाला-पुरत्या का होईना, पार दडपल्या गेल्या. ही वृत्ति लोकमान्य टिळकांच्या राजकारणाबद्दल मला जो विलक्षण आदर होता त्यांतून निर्माण झाली होती.

१९०८ साली टिळकांना शिक्षा झाली त्यावेळीं मी अवघा चवदा वर्षांचा इंग्रजी सहाव्या इयत्तेतला विद्यार्थी होतों. परंतु टिळक मंडालेहून अचानकपणे सुटून १९१४ सालच्या जून महिन्यांतल्या १७ तारखेस

गायकवाड वाड्यांतल्या आपल्या निवासस्थानीं परत आले, तेव्हा चालू राजकारणाकडे दृष्टि ठेवण्याइतका मी जाणता झालों होतों. सहा वर्षांच्या बंदिवासानंतर परत आल्याबरोबर एक दिवसाचाहि विलंब न करतां राजकारणाची झुंज त्यांनी पूर्ववत चालू केलेली पाहून माझं मन त्यांच्याकडे विशेष आकृष्ट झालं, आणि तेव्हापासून त्यांची प्रत्येक कृति आणि चळवळ मी लक्षपूर्वक पाहूं लागलों. कॉंग्रेस पूर्णपणे राष्ट्रीय वृत्तीची व्हावी, यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न, हिंदुमुसलमानांचं ऐक्य घडवून आणण्यासाठी त्यांनी दाखविलेला मुत्सद्दीपणा, पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर ब्रिटिश राज्यकर्त्यांचे डाव हाणून पाडण्यासाठी त्यांनी स्वीकारलेली भूमिका, लोकजागृति करण्याकरिता त्यांनी काढलेला राघोभरारी दौरा. त्यांची विलायतेची सफर, इत्यादि गोष्टींमुळे त्यांचा लोकोत्तरपणा मला अधिकाधिक पटूं लागला होता. १९२० सालीं तर त्यांच्या सहवासांतच मी आलों, आणि त्यांच्या राजकारणांत शक्य तेवढा भाग घेण्याची इच्छा माझ्या मनांत अंकुर धरूं लागली. ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या तारखेस त्यांचं देहावसान झालं तेव्हा मला मनस्वी दुःख तर झालंच, परंतु त्यांचं ॠण फेडण्याच्या दृष्टीनं राजकारणाचं काम आपल्याला कितपत करतां येईल याचा विचार मी करूं लागलों. टिळकांच्या दहाव्या दिवशीं पुण्यांत ‘ रे मार्केट ’ च्या ( हल्लीच्या फुले मंडईच्या ) मागल्या पटांगणांत देशभक्त लाला लजपतराय यांच्या अध्यक्षतेखालीं जी अतिप्रचंड शोकसभा झाली तिच्यांत मी केलेलं भाषण अत्यंत भावनाप्रधान होतं. लाला लजपतराय यांनी मला भाषणाबद्दल शाबासकी देऊन म्हटलं, “ तुमच्यासारखीं माणसं चळवळींत पडलीं पाहिजेत ! ” त्यांच्या या चारच शब्दांचा माझ्या मनावर फार परिणाम झाला असला पाहिजे.

नाटकांतल्या आणि सिनेमांतल्या नटनटींविषयीं किंवा क्रिकेट खेळणाऱ्या खेळाडूंविषयी जसं एक प्रकारचं आकर्षण वाटतं, तसंच राजकारण करणाऱ्या पुढाऱ्यांविषयी देखील वाटण्यासारखं आहे. लोकप्रियतेचं एक प्रकारचं झगझगीत वलय नटनटी आणि खेळाडू यांच्याभोवतीं जसं असतं तसंच राजकारणाच्या क्षेत्रांत वावरणाऱ्या माणसाभोवतीहि असतं. अच्युत बळवंत कोल्हटकर यांच्याभोवती अशा प्रकारचं वलय होतं. टिळकांचं

जहाल राजकारण करण्याचं व्रत उचललेल्या ज्या व्यक्तींना सरकारचा छळ सोसावा लागला त्यांत अच्युतराव अग्रगण्य होते. दैनिक 'संदेश' हें त्यांचं पत्र विलक्षण लोकप्रिय झालं होतं. विशेषतः तरुण पिढीचे ते लाडके होते. त्यांच्या पत्नी माझ्या आईच्या मावस भगिनी. या नात्यामुळे अच्युतरावांच्या सहवासांत मी बराच आलों. माझ्या लेखनाची व वक्तृत्वाची त्यांनी नेहमी तारीफ करावी. मी कधी मुंबईस गेलों की त्यांच्याकडे उतरत असें. 'संदेश' पत्राचं काम मी हौसेनं मागून घ्यावं आणि माझ्या कामाबद्दल अच्युतरावांनी मला शाबासकी द्यावी. सभांचे वृत्तांत चटकदार कसे करावे तें त्यांनीच मला शिकवलं. त्यांनी नेहमी म्हणावं, "आप्पा, तुम्ही राजकारणांत पडा. तुमची लेखणी आणि वाणी दोन्ही फार प्रभावी आहेत तुम्ही संपादक म्हणून नावारूपाला चढाल." "केसरी-मराठा" संस्थेंतले श्री. बाबूराव गोखले हे त्या काळांतले दुसऱ्या रांकेंतले का होईना पण लोकप्रिय पुढारी आणि वक्ते होते. न्यू पूना कॉलेजांत प्रोफेसर म्हणून काम करूं लागल्यावर तीन चार वर्षांतच व्याख्याता म्हणून माझं नांव सर्वतोमुखी झालं होतं. त्या काळांत गणपति उत्सवाच्या दहा दिवसांत महाराष्ट्रांत ज्या त्या गावीं मेळे आणि व्याख्यानं यांची दंगल उडत असे. मला इतकीं आमंत्रणं येत असत की त्यांतलीं अर्धीं अधिक मला नाकारावीं लागत असत. माझ्या कांही व्याख्यानांना बाबूराव अध्यक्ष होते. माझं वक्तृत्व त्यांनी ऐकलं होतं. नियतकालिकांतलं माझं लेखन त्यांच्या वाचनांत आलं होतं. त्यांनी मला पुष्कळदा म्हणावं, "तुम्ही आमच्याकडे यायला पाहिजे"...सारांश टिळकांचा मृत्यु घडला त्याच्या आधीपासून कित्येक दिवस आपण संपादक व्हावं, राजकारणांत पडावं, अशी इच्छा माझ्या मनांत बळावूं लागली होती. लोकप्रियता हा एक अमली पदार्थ आहे. त्याची चव एकदा कळली की, माणसाला चटक लागते. आणखी आणखी लोकप्रियता मिळावी असं माणसाला वाटूं लागतं. मद्यपी माणसाचा 'डोस' जसा वाढत जातो त्याप्रमाणेच लोकप्रियतेच्या व्यसनाचंही आहे... वास्तविक एक कुशल अध्यापक म्हणून ऐन पंचविशींत लोक मला ओळखूं लागले होते. उत्कृष्ट वक्ता म्हणून माझा लौकिक पसरूं लागला होता. एवढ्यावर मी संतुष्ट असावयास हवं होतं. परंतु लोकप्रियतेचं

व्यसन मला लागलं होतं. ती आणखी मिळावी अशी ओढ वाटत होती. राजकारणाकडे मी आकृष्ट होत होतों. माझ्या मनाची अशी अवस्था असतांना लाला लजपतराय यांच्यासारख्या त्रिखंड कीर्तीच्या देशभक्तानं माझ्या पाठीवर थाप मारून मला म्हटलं होतं, "तुमच्यासारखीं माणसं चळवळींत पडलीं पाहिजेत." त्यांच्या या चारच शब्दांचा माझ्या मनावर फार परिणाम झाला असला पाहिजे.

टिळकांच्या मृत्यूच्या आधीपासूनच गांधींच्या असहकारितेच्या चळवळीचे वारे देशांत वाहूं लागले होते. त्यांनीं आपल्या चळवळीला टिळकांची संमति मिळविण्याचा प्रयत्न केला होता. टिळकांनी गांधींच्या विचारसरणीविषयी संशय व्यक्त केला होता. परंतु टिळक जगले असते तर गांधींनी कदाचित् त्यांचं सहकार्य मिळविलंही असतं. गांधींनी कदाचित् आपल्या योजनेंत टिळकांना हवे तसे बदल केलेही असते. भारतीय राजकारणाच्या आघाडीवर टिळक आणि गांधी दोघेहि हातांत हात घालून लढत असल्याचं दृश्य कदाचित् दिसलंहि असतं. टिळक स्वर्गवासी झाले नसते तर भारतीय स्वातंत्र्याची चळवळ कोणत्या मार्गानं गेली असती हा आता केवळ तर्काचा विषय आहे. प्रत्यक्षांत झालं तें असं की टिळकांचं निर्याण झाल्याबरोबर जणूं त्यांचाच अवतार घेऊन गांधी उभे राहिले, सारी जनता त्यांच्यामागे उभी राहिली, आणि स्वातंत्र्याच्या चळवळीचीं सारीं सूत्रं गांधींच्या हातीं गेलीं.

१९२० च्या ऑगस्ट, सप्टेंबर आणि ऑक्टोबर महिन्यांत देशांतली राजकीय चळवळ अशा कांही झंझावाती वेगानं फिरत गेली की पुसतां सोय नाही. कितीक वर्षांत जें घडलं नसतं ते अवघ्या तीन महिन्यांत घडलं. खिलाफतीच्या प्रश्नाला तोंड लागलं, हिंदु-मुसलमानांच्या ऐक्यानं वातावरण दुमदुमून गेलं, टिळकांच्या स्मारकासाठी एक कोटी रुपयांचा फंड जमविण्याची जी घोषणा गांधींनी केली ती ऐकून सबंध देशांत चैतन्याची सागर-लाट उसळून आली. कोट्यवधि जनतेचीं अंतःकरणं गांधींनी जिंकलीं. 'महात्मा बोले, आम जनता हाले' अशी परिस्थिति निर्माण झाली. गांधींनी योजिलेल्या असहकारितेच्या चळवळीचा विचार करण्यासाठी काँग्रेसचं जादा अधिवेशन भरलं. गांधींच्या चळवळीला विरोध करणारे

अनेक पुढारी देशांत होते. काँग्रेसच्या जादा अधिवेशनाला ते अशा तयारीनं गेले होते की, काय वाटेल तें करून गांधींचा ठराव हाणून पाडावयाचा. परंतु हा सारा विरोध फुंकरानं उडवून लावल्यासारखा गांधींनी उडवून लावला. त्यांनी अधिवेशन जिंकलं. गांधींच्या असहकारितेची चळवळ राष्ट्रानं स्वीकारल्याचा ठराव पास झाला त्यावेळेस राष्ट्रीय सभेच्या मंडपांत टाळ्यांचा एवढा प्रचंड गजर झाला की, त्या गजरानं लंडनमधल्या '१० डाऊनिंग स्ट्रीट' वरील कचेरी हादरली असेल! देशाच्या राजकीय मंचावर होणाऱ्या या नाट्यपूर्ण रोमांचकारक घटना ऐकून माझ्या मनांत विचारांचं काहूर उठत होतं. दिवाळीची सुटी चालू होती. कॉलेज बंद होतं. माझे स्नेही प्रो. दत्तोपंत घारपुरे—ज्यांच्या संघटनाचातुर्यामुळे आणि परिश्रमामुळे न्यू पूना कॉलेजचं स्वप्न साकार झालं होतं—त्यांनी गांधींची आज्ञा मान्य करून कॉलेज सोडण्याचं ठरवून आपला राजीनामा पाठवून दिला होता. चार वर्षांपूर्वी न्यू पूना कॉलेजच्या अध्यापकवर्गाची त्यांनी जुळवाजुळव केली तेव्हा त्यांच्या आग्रहामुळेच मी त्या कॉलेजांत सामील झालों होतों. आम्हा दोघा मित्रांची जोडी प्रसिद्ध होती. 'जिथे घारपुरे तिथे फडके!' असं लोक म्हणत असत. दिवाळीच्या सुट्टीचे अखेरचे दिवस इतर दोघा मित्रांबरोबर आम्ही खंडाळ्यास घालवीत होतों. एकत्र खातपीत होतों. हिंडत होतों. भटकत होतों. पोहत होतों. परंतु कॉलेजचा राजीनामा देण्याबद्दल त्यांनी एका शब्दानंदेखील मला आग्रह केला नाही. कॉलेज सोडावं की सोडूं नये याबद्दलच्या उलटसुलट विचारांचं वादळ माझ्या मनांत मात्र उठलेलं होतं...

सुटीनंतर कॉलेज सुरू झालं. मी कॉलेजांत जाऊं लागलोंही. दोन दिवस गेलों. तीन दिवस गेलों. अखेर चौथ्या दिवशीं माझा तर्कशास्त्राचा तास घेण्यासाठी म्हणून जो वर्गांत गेलों तो "मित्र हो, मी असहकारितेच्या चळवळींत सामील व्हावयाचं ठरविलं आहे, तेव्हा नमस्ते!" असं म्हणून वर्गाच्या बाहेर पडलों! आणि कॉलेजांत एक क्षणभर देखील न थांबतां घरीं आलों.

माझ्या या कृत्यानं केवढी खळबळ उडाली, आणि पुणे शहरांतल्याच नव्हे तर अखिल महाराष्ट्रांतल्या विद्यार्थी वर्गांत मी केवढा मोठा प्रचंड

उत्साह निर्माण करूं शकलों त्याची साक्ष देणारीं शेकडो माणसं अजूनहि सांपडतील...पुण्याच्या निरानिराळ्या भागांत माझीं व्याख्यानं रोज संध्याकाळीं होत होतीं. केवळ विद्यार्थ्यांचीच नव्हे तर नागरिकांची देखील प्रचंड गर्दी लोटत होती. पुण्याचीं कॉलेजं आणि शाळा विद्यार्थ्यांवाचून ओस पडत होत्या. जवळच्या दूरच्या शहरांतले कॉंग्रेसचे कार्यकर्ते मला आमंत्रण देत होते, माझीं व्याख्यानं घडवून आणीत होते, जिथे जिथे मी जाईन तिथे तिथे मोठ्या संख्येनं विद्यार्थी शाळा-कॉलेजांतून बाहेर पडत होते, आणि सामान्य जनतेचाहि प्रचंड पाठिंबा चळवळीला मिळत होता... या दिवसांतल्या माझ्या आवेशपूर्ण व्याख्यानांच्या आठवणी सांगणारीं माणसं आजदेखील मला भेटतात.

गांधींच्या चळवळींत उडी घेण्याचा निर्णय घेण्यापूर्वी मी माझ्या वडिलांना विचारलं नव्हतं. कॉलेज सोडलं, श्री. तात्यासाहेब केळकर यांच्या आमंत्रणा-वरून केसरी–मराठ्याच्या संपादक वर्गांत दाखल झालों, आणि नंतर वडिलांना सांगितलं की मी असं असं केलं आहे. ते कांही बोलले नाहीत. जें करावयाचं होतं तें करून बसलों होतों मी !... पुढे कित्येक वर्षांनंतर त्यांच्या बोलण्यावरून कळलं की, गांधींच्या चळवळींत मी सामील झालों ही गोष्ट त्यांना फार चिंतेची वाटली होती. ज्योतिषावर त्यांचा विश्वास होता, आणि कारागृहवासाचा योग माझ्या पत्रिकेंत त्यांना दिसत होता. माझ्या प्रत्येक व्याख्यानाला सरकारी गुप्त खात्यांतील रिपोर्टर हजर राहात होते. मी बोलून चालून देशभक्तीच्या भावनेनं भारून गेलों होतों. तरुण होतों. संयमाची संवय नव्हती. श्रोत्यांना शक्य तितकं अधिक चेतवण्यासाठी मी झटत होतों. राजद्रोहाच्या कलमाचा भंग न करतां कसं बोलावं याची अक्कल मला नव्हती. लोकांच्या टाळ्या घेऊन घेऊन माझं डोकं फिरलं होतं. आणखी आणखी जहाल भाषणं करावीं, लोकक्षोभाची ज्वाळा आणखी भडकवावी, या इच्छेला आवर घालावासं वाटत नव्हतं... एकदा तर बोलण्याच्या भरांत मी असं बोलून गेलों की, “ राणीच्या किंवा राजाच्या छापाचं चांदीचं नाणं तुमची देशभक्ति विकत घेऊं शकतं ? अरे, ठोकरा त्या तुमच्या गुलामगिरीचं चिन्ह अशा त्या नाण्याला ! सोडा सरकारी नोकरी आणि मायभूमीला स्वतंत्र करावयास निघालेल्या राष्ट्रपुरुषाच्या सेनेंत

व्हा सामील !"... अशा प्रकारचीं वाक्यं माझ्या तोंडून निघाल्याचं ज्या दिवशीं माझ्या वडिलांनी ऐकलं त्या दिवशीं ते मनाशी म्हणाले, आता खचित जातो हा तुरुंगांत !... मात्र त्यावेळेस ते मला कांहीच बोलले नव्हते. ही सारी हकिकत त्यांनी मला सांगितली कितीक वर्षांनंतर.

सरकारी व निमसरकारी शिक्षणसंस्थांवर बहिष्कार पुकारून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय शाळा आणि कॉलेजं काढण्याचा कार्यक्रम गांधींच्या चळवळींत अंतर्भूत होता. पुण्याला टिळक विद्यापीठाची योजना आखण्यांत आली. केसरी-मराठा पत्रांत मी लिहूं लागलों, आणि टिळक विद्यापीठांत अध्यापकाचंहि काम करूं लागलों. हीं दोन्ही कामं ज्या उत्साहानं मी करीत होतों त्याला खरोखर मर्यादा नव्हती.

माझ्या व्याख्यानांचा परिणाम घडून ज्यांनी शाळा-कॉलेजं सोडलीं त्यांच्यापैकी कितीक असे होते की ते शालान्त परीक्षेला बसणार होते किंवा बी. ए. ची पदवी त्यांच्या हातातोंडाशी आली होती. चळवळ सुरू झाल्या-नंतर थोड्याच अवधींत शाळा-कॉलेजांवरचा बहिष्कार गांधींनी माघारीं घेतला. तो घेतला नसता तर राष्ट्रीय विद्यापीठांचं काम उत्साहानं चिकाटीनं होत राहिलं असतं; त्यांच्या स्थैर्याविषयी आणि उपयुक्ततेविषयी विद्यार्थ्यांना भरंवसा वाटला असता, त्या विद्यार्थ्यांचं नुकसान झालं नसतं. परंतु तसं घडलं नाही. आणि त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांच्या आयुष्याची घडी विसकटून गेली. अशा माणसांपैकी कुणी आता भेटले की, खुल्या दिलानं गप्पा मारतां मारतां ते बोलून जातात की, तुम्ही आमचीं माथीं भडकविलींत, आणि त्याचेच दुष्परिणाम आम्हांला भोगावे लागले. त्यांचं म्हणणं अगदी खरं असतं. त्यांच्या नुकसानीला मी जबाबदार असल्याचं मला कबूल करावं लागतं. माझ्यादेखील आयुष्याची घडी थोडी विस्कळीत झाली नाही ! बेकारी आणि भ्रमंति यांचे भोग मला सहा वर्षं भोगावे लागले. आणि त्यांच्या भरीला कांही काळ सार्वजनिक आयुष्यांतली पत मी गमावून बसलों !

परंतु हा सारा चुकीचा हिशोब आता कळतो !

ज्यावेळेस मी गांधींचा पायिक बनून जळजळीत व्याख्यानं देत होतों, त्यावेळेस माझी अगदी प्रामाणिक समजूत होती की, मी जें करतों तें बरोबर

आहे ! नव्हे तेंच बरोबर आहे ! बाकी सारं आहे झूट ! चूक आहे ! जनतेच्या संमतीवाचून कुणाचंहि राज्य चालणं केवळ अशक्य आहे. देशांतल्या सर्व लोकांनी सक्त असहकार पुकारला तर परकीय राज्य बंद पडलंच पाहिजे आणि देश स्वतंत्र झालाच पाहिजे. हा सारा हिशोब मला अगदी उघड दिसत होता. लोकांना तो पटत कसा नाही याचं मला आश्चर्य वाटत होतं. त्यांना तो पटवून देणें आणि चळवळींत ओढणं हें मी माझं कर्तव्य समजत होतों. त्यासाठी माझ्या अंगचे सारे वक्तृत्व गुण मी पणाला लाविले होते. गांधींनी दाखविलेल्या मार्गानं देशांतले सारे लोक गेले तर स्वातंत्र्य दूर नाही अशी माझी अगदी मनोमय श्रद्धा होती...कारण भावी काळानं जरी माझं कृत्य चुकीचं ठरविलं तरी ज्यावेळेस मी गांधींच्या चळवळींत उडी घेतली आणि लोकांना उडी घेण्याची चिथावणी दिली, त्यावेळेस मी स्वतःची किंवा इतरांची फसवणूक मुळींच केली नाही. कितीक माणसांच्या नुकसानीला मी कारण झालों ! माझं स्वतःचं मी नुकसान करून घेतलं. परंतु याबद्दल मला खेद किंवा खंत वाटत नाही. कारण मी देशभक्तीचं सोंग आणलं नव्हतं. जें केलं तें स्वतःच्या सदसद्विवेकबुद्धीशी इमान राखून केलं होतं.

दुर्दैव एवढंच की, चळवळींत पडल्यावर माझा अपेक्षाभंग झाला ! फार लवकर झाला !

मी असहकारितेच्या चळवळींत पडलों होतों तो तिच्या यशाविषयीं किंचित्‌हि संशय मनांत न ठेवतां, आणि बहिष्काराच्या कार्यक्रमाबद्दल कोणताहि संकोच न बाळगतां. ‘ केसरी ’ पत्राचं धोरण तितकंच असंदिग्ध आणि निःसंकोच असेल असं मला वाटलं होतं. परंतु माझा हा अंदाज चुकीचा होता असं हळूहळू माझ्या लक्षांत येऊं लागलं. श्री. केळकर जरी महात्मा गांधींना सामील झाले होते, तरी चळवळींशीं तद्रूप झाले नव्हते. याबद्दल मी त्यांना दोष देऊं इच्छित नाहीं. कोणत्याहि गोष्टींत व्यवहार्यतेवर नजर ठेवणारा त्यांचा स्वभाव तद्रूपतेच्या आड येण्यासारखाच होता. गांधींच्या असामान्य व्यक्तिमत्त्वामुळेच केवळ बाह्यात्कारी त्यांच्या चळवळींत पडलेले केळकरांसारखे इतर अनेक दुय्यम पुढारी देशांत ठिकठिकाणीं होते.

ही गोष्टहि थोड्या अवधींत माझ्या लक्षांत आली होती. तेव्हा केळकर चळवळीशी तद्रूप झाले नव्हते हें मी सांगतों तें त्यांचं उणं काढण्याच्या बुद्धीनं नव्हे. परंतु त्यांच्या आणि माझ्या वृत्तींतल्या फरकाचे विचित्र परिणाम होऊं लागले, आणि त्यामुळे माझ्या मनाचा विरस होऊं लागला हें मला सांगितलं पाहिजेच.

या विचित्र परिणामांची थोडीशी कल्पना देण्यासाठी एकच गोष्ट सांगतों, ती पुरेशी व्हावी. माझ्या अंगच्या वक्तृत्वगुणामुळे त्या दिवसांत प्रचारक पुढाऱ्याची छोटीशी भूमिका माझ्याकडे आली होती. अनेक सभांतून मला बोलावं लागतं होतं. परंतु अशा सभांतलं माझं बोलणं आणि केळकरांचं ' केसरी 'च्या अग्रलेखांतलं लिहिणं या दोहोंत मेळ राहीना. पुष्कळदा असं होत असे की, सोमवारीं संध्याकाळीं एखाद्या सभेंत मी असहकारितेच्या चळवळीचा आत्यंतिक पुरस्कार करी, आणि दुसऱ्या दिवशीं सकाळच्या केसरींत असहकारितेच्या सीमांचं आणि वैगुण्यांचं विवेचन केळकरांनी केलेलं माझ्या पाहण्यांत येई. ही विसंगति माझ्या मनाला टोचत राही. ती मला टाळतां येईल असंहि चिन्ह दिसेना. माझ्या मनांतला विरस वाढतच राहिला.

तरी देखील ' केसरी ' कचेरींतलं काम चालू ठेवण्यास चिकाटी धरावी असं मला वाटलं असतं, परंतु त्याच सुमारास गांधींनी स्वतःच चळवळीचं एक पाऊल मागं घेतलं ! त्यांनी शिक्षणसंस्थांवरचा बहिष्कार रद्द केला. त्या संस्थांत ज्यांना जावयाचं असेल त्यांनी जावं अशी परवानगी त्यांनी जाहीर केली ! आणि हें पाहून मात्र आपण यापुढे राजकारणाच्या क्षेत्रांत रहावं की राहूं नये, असा विचार मी जोरानं करूं लागलों.

' केसरी ' कचेरींत मी नोकरी करीत होतों हें जरी खरं, तरी टिळक राष्ट्रीय विद्यापीठांत अध्यापनाचं जें काम मी विनावेतन करीत होतों तेंहि मला प्रिय होतं. नव्हे, तेंच मला अधिक प्रिय होतं ! गांधींनी शिक्षणविषयक बहिष्कार उठविल्यामुळे नुकत्याच अंकुर धरूं लागलेल्या टिळक विद्यापीठासारख्या राष्ट्रीय शिक्षण संस्थांची किती शोचनीय अवस्था होणार होती त्याची कल्पना सहज करतां येण्यासारखी होती. ज्यांत पुरते पाच

पन्नासही विद्यार्थी नाहीत अशा विद्यापीठांत यापुढे मला काम करावं लागेल हें मला उघड उघड दिसूं लागलं. या गोष्टीलाहि मनाची तयारी ठेवण्याचा जो खंबीरपणा इतर कांही त्यागी व्यक्तींनी दाखविला तो मला दाखवितां आला नाही. माझा उणेपणा कबूल केलाच पाहिजे. परंतु गांधींच्या लहरीपणाची आणि त्यांच्या या स्वभावामुळेच त्यांच्या अनुयायांना एकदा या दिशेनं तर एकदा त्या दिशेनं जावं लागावं या अनिश्चित अवस्थेची मला भयंकर चीड आली.

मी राजकीय चळवळींतून अंग काढून घ्यावयाचं ठरवलं !

आणि आपल्याला यापुढं राजकारणांत राहावयाचं नाही तर ' केसरी'-तही आपण कोणत्या नात्यानं राहूं शकतों असं वाटल्यामुळे ' केसरी ' कचेरीहि सोडण्याचा मी निश्चय केला !

मी न्यू पूना कॉलेज सोडलं तेव्हा त्या गोष्टीमुळे जशी खळबळ उडाली होती तशीच मी चळवळींतून अंग काढून घेतल्याचं कळतांच उडाल्यावाचून राहिली नाही. सगळ्यांत उच्च स्थानावर जे पुढारी असतात त्यांनी माघार घेतली अगर शब्द फिरविला तर त्यांच्या त्या पगडी फिरविण्यांतहि कांही खोल अर्थ असेल अशा भावनेनं त्यांच्या कृत्याचा विचार करायला लोक तयार असतात. ही सवलत इतरांना मिळण्यासारखी नसते. त्यांच्या वर्तनांत विसंगति दिसून आली की, लोकांच्या दृष्टीनं तिचा अर्थ भ्याडपणा किंवा बेइमान एवढाच होऊं शकतो. हा न्याय नेहमीचा ठरलेला आहे. तो माझ्या वाट्याला आला यांत आश्चर्य नव्हतं. चळवळींतून अंग काढून घेतांना लोकांची केवढी अप्रीति वाट्याला येईल तें मी पुरा जाणून होतों. परिणामांचा शक्य तितका विचार करून मी पाऊल टाकलं होतं. आपल्याला कदाचित् सार्वजनिक आयुष्यांतून कायमचं उठावं लागेल हें मी समजून होतों. त्यामुळे लोकमताचा जो प्रक्षोभ माझ्याविरुद्ध उठला तो मला अनपेक्षित वाटला नाही...मात्र तो सोसतांना मन खंबीर ठेवणं हें एक दिव्य होतं !

झाडून साऱ्या वृत्तपत्रांनी मला भ्याड ठरवून माझ्यावर यथास्थित टीका केली. तात्यासाहेब केळकरांनी एका जाहीर सभेंत ' घोडं सोडून

पळून गेलेला घोडेस्वार ' अशा शब्दांनी माझा उल्लेख करून माझा उपहास केला. त्यांचं म्हणणं बरोबर होतं. खरोखरीच घोडं सोडून मी पळून गेलों होतों. माझ्या भूमिकेचा खुलासा करण्याचं साधन माझ्या हातांत नव्हतं. केला असता तरी कोणाला पटला असता की नाही कोण जाणे. उपहास आणि विटंबना मुकाट्यानं सोसणं मला भाग होतं. रस्त्यानं मी निघालों की मला ऐकूं येईल अशा बेतानं लोक माझी चेष्टा करीत, ती मला ऐकून घ्यावी लागे. ' ज्यानं पाप केलं नसेल त्यानंच पापी माणसाला दगडधोंडे मारावेत ! ' या ख्रिस्ताच्या वचनाप्रमाणे दुनिया थोडीच वागत असते ? लोक तोंडाला येईल तें बोलत असत. परिणाम असा झाला की मी लोकमताविषयी बेफिकीरी दाखविण्याचा अतिरेक करूं लागलों. लोक काय म्हणतील त्याची मला बिलकूल पर्वा नाही असं उघड आव्हान दिल्याप्रमाणे मी वागूं लागलों !......

चळवळीच्या ऐन गर्दींत होतों, गांधींच्या मतांचा प्रचार करण्यासाठी व्याख्यानं देत होतों तेव्हादेखील खादीची पांढरी टोपी मी डोक्यावर घातली नव्हती. परंतु आता जाड्याभरड्या खादीचा लांडा पंचा, अंगांत विलायती कापडाचा कोट, आणि पायांत ( चार महिने सिंध हैद्राबाद येथील कॉलेजांत नोकरी करून आलों होतो तेव्हा येताना आणलेला, हिंदी पद्धतीचा ) लाल मखमलीचा ' शू '—अशा थाटांत मी खुशाल पुण्यांतल्या रस्त्यांतून हिंडूं लागलों !

असहकारितेच्या चळवळींतून अंग काढून घेण्यापूर्वी गांधींना भेटणं अवश्य आहे असं मला वाटलं. समक्ष भेटींत मी त्यांना म्हणालों, " शिक्षण संस्थांवरील बहिष्कार आपण रद्द केलात. त्यामागची आपली विचारसरणी केवळ अनाकलनीय आहे आपल्या विवेकबुद्धीला ती पटली आणि म्हणून आपण तो निर्णय घेतलात हें कबूल केलंच पाहिजे, परंतु मला ती सर्वथा चुकीची वाटते. शिक्षणावरच्या बहिष्काराचं काम झालेलं आहे असं आपण जें म्हणता, तें कशाच्या आधारावर ? परंतु प्रामाणिक मतभेदाचा म्हणून हा मुद्दा सोडला तरी मला हें सांगा की माझ्यासारख्या ज्या अध्यापकांनी

चळवळींत उडी घेतली त्यांना आपण वाऱ्यावर सोडल्यासारखं होत नाही काय ?... "

गांधी म्हणाले, " माझ्यावरचा तुमचा विश्वास उडाला असेल तर क्षणभरदेखील चळवळींत राहूं नका. बाहेर पडा. "

मी म्हटलं, " बाहेर पडून काय करूं ? "

गांधी म्हणाले, " पुन्हा न्यू पूना कॉलेजांत जा. नाही तर दुसऱ्या कॉलेजांत नोकरी बघा. "

मी म्हटलं, " न्यू पूना कॉलेजांत परत जायला मला तोंड आहे काय ? आणि दुसऱ्या कॉलेजांत कोण नोकरी देईल मला ? "

गांधी चटकन म्हणाले, " मी देतों तुम्हांला एक उत्तम नोकरी. "

दिल्लीच्या सेंट स्टीफन्स कॉलेजचे प्रिन्सिपॉल रुद्र गांधींचे स्नेही होते. त्यांना गांधींनी माझ्याबद्दल पत्र लिहिलं, आणि त्या कॉलेजांत तत्त्वज्ञानाचा प्रोफेसर म्हणून मी गेलोंही ! मात्र ती नोकरी हंगामी होती. ती सुटल्यावर मी सिंध हैद्राबादच्या कॉलेजांत गेलों. पण तीही सुटली तेव्हा नागपूरच्या हिस्लॉप कॉलेजात गेलों. तीही नोकरी मला सोडावी लागली.

मधून मधून नोकरी, मधून मधून बेकारी अशा अनिश्चिततेंत आणि भ्रमंतींत माझीं सहा वर्षे गेलीं. शीड फाटल्याप्रमाणे माझ्या आयुष्याचं तारू भरकटत राहिलं. अखेर कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजांत १९२६ सालीं मी गेलों. माझ्या आयुष्याला स्थिरता आली...मात्र या नोकरीसाठी दिवाण बहादूर अण्णासाहेब लठ्ठे—त्यावेळचे कोल्हापूरचे दिवाण—यांनी मला मुलाखतीला बोलावलं तेव्हा मी त्यांना स्वच्छ विचारलं, " माझा पूर्व इतिहास आणि माझीं राजकीय जहाल मतं तुम्हांला ठाऊक आहेत ना ? " विडीचा एक झुरका मारून आणि डोक्यावरचा पांढरा रुमाल आणखीच मागे सारून ते आपल्या खणखणीत आवाजांत म्हणाले, " ठाऊक आहे. तुमच्या पूर्वेतिहासांसकट आणि जहाल राजकीय मतांसकट मी तुम्हांला बोलावतों आहें. "

माझीं राजकीय मतं आणि माझा स्वाभिमान संभाळून कोल्हापूर संस्थानच्या नोकरींत राहणं माझ्यासारख्या ब्राह्मणाला सोपं नव्हतं. श्री. अण्णासाहेब लठ्ठे दिवाणपदावर होते आणि डॉ. बाळकृष्ण प्रिन्सिपल होते, तोंपर्यंत संस्थानिक वातावरणाचा उपसर्ग मला झाला नाही. परंतु तीं दोन माणसं गेल्यानंतर मला अनेक प्रसंगीं झुंज द्यावी लागली. विद्यार्थी वर्गातील माझी असामान्य लोकप्रियता आणि साहित्य क्षेत्रांत मी मिळविलेली कीर्ति या दोहोंचं बळ माझ्या पाठीशी होतं म्हणूनच प्रत्येक झटापटींत मी यशस्वी झालों—मात्र हें खरं की एकंदरींत राजाराम कॉलेजांतल्या नोकरीमुळे माझ्या भरकटलेल्या आयुष्याला स्थैर्य आलं, आणि स्वास्थ्य लाभून मला साहित्यसेवा मनःपूत करता आली. असहकारितेच्या चळवळीं-तून मी बाहेर पडलों तेव्हा जो दुर्लौकिक माझ्या वाट्याला आला होता तो पूर्णतः पुसला गेला, आणि समाजांतलं मानाचं स्थान मी परत मिळवूं शकलों.

गांधींच्या पत्रामुळे मिळालेली दिल्लीच्या सेंट स्टीफन्स कॉलेजांतील हंगामी नोकरी संपल्यावर मी परत आलों, आणि 'मानसोपचार' नांवाचा ग्रंथ लिहूं लागलों. त्या दिवसांत एका प्रसंगीं बॅरिस्टर जयकरांची आणि माझी भेट झाली. त्यांनी विचारपूस केली तेव्हा मी माझी हालहवाल सांगितली, आणि लोकनिंदा, उपहास, टवाळी इत्यादि गोष्टी माझ्या वाट्याला कशा आल्या होत्या त्याचंहि वर्णन एखादी विनोदी गोष्ट सांगितल्याप्रमाणे केलं. तेव्हा महात्मा गांधींच्या चंचल धोरणामुळे आपण स्वतःहि कसे असंतुष्ट आणि कष्टी आहोंत त्याचं वर्णन करून ते म्हणाले, "फडके, पब्लिक मेमरी इज व्हेरी शॉर्ट." (लोकांच्या लक्षांत गोष्टी फार थोड्या दिवस राहतात.) आज अप्रीतीची जी वावटळ तुमच्या विरुद्ध उठली आहे ती कांही दिवसांनी थंड होईल. आणि कांही दिवसांनी तुमचा मोठेपणा परत द्यावयास लोक तयार होतील...त्यांच्या त्या शब्दाचा खरेपणा पुढे सातआठ वर्षांनी मला कळत होता.

जवळ जवळ चाळीस वर्षं होऊन गेलीं माझ्या आयुष्यांतल्या या घटनांना! कोणा एका काळीं मी राजकीय पुढारी होण्याच्या मार्गाला लागलों होतों,

राजकारणावर व्याख्यानं देत होतों, ' केसरी 'त उपसंपादक म्हणून काम करीत होतों, या गोष्टी आजच्या नव्या पिढीला सांगितल्या तरी खऱ्या वाटण्यासारख्या नाहीत. त्याची आठवण मी करून पाहतों तेव्हा जणु दुसऱ्याच्या चरित्रांतल्या गोष्टीविषयी मी बोलतों आहें असं मला भासतं. त्या घटनांविषयीं एक प्रकारचा तटस्थपणा मला वाटतो... आणि तिऱ्हाईत-पणे विचार करतांना साहजिकच माझ्या मनांत प्रश्न येतो, की ' न्यू पूना कॉलेज सोडून गांधींच्या चळवळींत मी उडी घेतली ही चूक म्हणायची ? की चळवळींतून अंग काढून अध्यापकाच्या पेशाकडे मी पुन्हा वळलों ही चूक ? '

या प्रश्नाचं निर्णायक उत्तर देणं सोपं नाही...आणि या प्रश्नाचा विचार करतांना माझ्या मनांत असं देखील येतं की, गांधींच्या मार्गानं जाण्याचा निर्णय राष्ट्रानं १९२० सालीं घेतला ही तरी शंभर टक्के बरोबर अशी गोष्ट झाली काय ? अहिंसेच्या तत्त्वाचा स्वीकार भारतीयांनी केला ही गोष्ट निर्विवाद बरोबर होती असं म्हणतां येईल काय ?......त्यावेळीं ती गोष्ट पूर्णतः बरोबर वाटली. परंतु परचक्राची कृष्णछाया देशावर पडल्यामुळे जी नवी परिस्थिति आज घटकेला निर्माण झाली आहे तिच्या संदर्भांत अहिंसेचं धोरण चुकलं असं म्हणणं भाग आहेच ना ?......

वीर सावरकर १९४७ पासून सतत ओरडून सांगत होते की, स्वराज्य टिकवायचं असेल तर अहिंसेचा भलता जयजयकार बंद करा, लष्करी सामर्थ्य मजबूत राहण्याची काळजी घ्या, सरहद्दी संभाळा ! परंतु काँग्रेस-वाल्या राज्यकर्त्यांना सावरकरांच्या या इशाऱ्याकडे लक्ष द्यावं असं वाटलं नाही. असहकारितेच्या चळवळीमुळे ब्रिटिश लोक निघून गेले असा सिद्धांत त्यांनी हृदयाशीं कवटाळून धरला होता.

गांधींनी स्वराज्य मिळवून दिलं ही समजूत मुळांतच भ्रामक होती. सावरकरांच्या तुलनेनं मी एक सामान्य माणूस. परंतु जाहीर भाषणांतून आणि लेखांतून गेलीं पंचवीस वर्षे मी सतत प्रतिपादीत आलों आहें की, वैयक्तिक जीवनाचीं आणि राष्ट्रीय जीवनाचीं मूल्यं भिन्न मानायला हवींत आणि या दोहोंची गल्लत करण्याची फार मोठी चूक गांधींनी केली. कथा-

कादंबऱ्या लिहिणाऱ्यांनी गांधीवादाचा प्रचार केला पाहिजे, या आग्रहाला कडाडून विरोध करतांना मी नेहमी म्हणत आलों, की प्रचार ही गोष्ट कथासाहित्याचा हेतु असूं शकत नाही हें तर झालंच, पण शिवाय गांधीवादानं राष्ट्राचं कल्याण न होतां अकल्याणच होणार आहे. त्याग आणि अहिंसा हीं तत्त्वं व्यक्तीचं कल्याण करणारीं असतील पण राष्ट्राच्या अभ्युदयाला तीं पोषक नसून घातक आहेत.

गांधींच्या अहिंसात्मक चळवळीमुळेच इंग्रज राज्यकर्ते भारतांतून निघून गेले असं ज्यांना स्वतःच्या मतलबासाठी म्हणावयाचं असेल त्यांनी खुशाल म्हणावं, सत्य मात्र सर्वस्वी निराळं आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या श्रेयाचा वाटा जसा गांधींना द्यावयाचा तसाच त्या श्रेयावर इतर अनेकांचा हक्क आहे. ज्यांनी घातपाताचीं कृत्यं केलीं, त्यांचा आहे. ज्यांनी गोऱ्या लोकांचे खून केले आणि फासावरचं मरण पत्करलं त्यांचा आहे. ज्यांनी हिंसेची कास धरली आणि देशत्याग पत्करला त्यांचा आहे. ज्यांनी शस्त्रागारावर दरोडे घातले, तुरुंगवास सोसला, जन्मठेप भोगली त्यांचा आहे. आणि सुभाषबाबू व आझाद हिंद सेनेंतील त्यांचे शिपाई यांचा तर फार मोठा वाटा आहे !

परंतु भारत स्वतंत्र झाला तेव्हा ज्यांच्या हातांत सत्ता गेली त्यांना हें ऐतिहासिक सत्य मान्य करणं सोयीचं वाटण्यासारखं नव्हतं. ' राष्ट्रपिता ' ही किताब एकट्या गांधींना देण्यांत त्यांची सोय होती. अहिंसेचे गोडवे गाण्यांत त्यांचा विवेक सुटला होता. मध्यंतरीं बुद्ध जयंति झाली तेव्हा शांति, अहिंसा, अपरिग्रह यांचीं संकीर्तनं करण्याची छोट्या मोठ्या पुढाऱ्यांत अहमहमिका लागली होती ! रवींद्रनाथांची पुण्यतिथि साजरी करतांना त्यांच्या माथींदेखील बुद्ध देवाची शिकवण मारायला लोकांनी कमी केलं नाही !

परंतु गेल्या ऑक्टोबरमध्ये चिनी हल्ल्याचा जबरदस्त तडाखा बसला आणि लोकांचे डोळे उघडले ! आम्ही चुकलों अशी प्रांजल कबुली राज्यकर्ते न देवोत. परंतु नेहरूंनादेखील—ते कधी एकांतांत आत्मशोधन करीत

असतील तर स्वतःशी कबुली द्यावीच लागत असेल की गांधींच्या आहिंसेचा आपण भलता उदोउदो माजविला हें चुकलंच !

चिनी आक्रमणाच्या वेळेस आपलं राष्ट्र ' दक्ष ' नव्हतं, भारताचे राज्यकर्ते गाफील होते, योग्य त्या तयारीच्या अभावी सहस्रावधी भारतीय जवान प्राणाला मुकले, या शोककारक दुर्घटनेचीं कारणं आपण शोधूं लागलों तर या कारणपरंपरेचं आरंभस्थान म्हणून ४३ वर्षांपूर्वी गांधींच्या अहिंसात्मक चळवळीचा स्वीकार ज्या दिवशीं राष्ट्रानं केला त्या दिवसावरच बोट ठेवावं लागेल !...काँग्रेसच्या १९२० सालच्या जादा अधिवेशनांत असहकारितेचा ठराव राष्ट्रानं पास केला ही गोष्ट शंभर टक्के बरोबर होती की चूक होती या प्रश्नाचं उत्तर देणं सोपं नाही !

* * *

## १६ : माझ्या हातून घडलेला एक प्रमाद

' माणसाच्या हातून चुका व्हायच्याच ! ' अशा अर्थाचं एक इंग्रजी सुभाषित आहे. माणसाच्या जीवितावर ज्या कुणा अज्ञात शक्तीचं नियंत्रण आहे, तिच्याजवळ दया, माया फारशी नाही. कर्म घडलं की त्याचं कांही बरंवाईट फळ असेल तें भोगण्याची तयारी माणसाला ठेवावीच लागते. सत्कर्माचें फळ एक उशिरा मिळेल, किंवा मुळीच मिळणार नाही. परंतु चुकीचं प्रायश्चित्त माणसाला बहुधा घ्यावंच लागतं...कधी कधी मात्र असा चमत्कार होतो की आपल्या हातून घडूं नये तें घडतं, चूक झाली हें कळतंहि, चुकीचे परिणाम कोणते होणार तें सुद्धा दिसूं लागतं. परंतु वादळाची तयारी दर्शविणारे ढग वाऱ्यावर विरून जावे त्याप्रमाणे येणार येणारसं वाटणारं संकट टळतं. आपण शिरसलामत राहतों...चुकीची आठवण मात्र जन्मभर राहते. आणि जेव्हा जेव्हा ती होते तेव्हा तेव्हा आपण मनाशी उद्‌गार काढतों, " असं व्हायला नको होतं ! " चुकीचं प्रायश्चित्त चुकलेलं असतं. परंतु त्याबद्दलची शरम मनातून गेलेली नसते....आपण आपल्याशी आश्चर्य करीत राहतों, असं कसं झालं माझ्या हातून ?...

माझ्या हातून घडलेल्या ज्या गोष्टीबद्दल मी आता लिहिणार आहें, ती अत्यंत अनुचित होती. आज घटकेच्या माझ्या विचारसरणीप्रमाणे ती गोष्ट केल्याबद्दल मला फटक्यांचीच शिक्षा व्हावयास हवी होती...परंतु फटक्यांची तर रहो, पण कोणतीच शिक्षा मला झाली नाही हें केवळ माझं सुदैव म्हणायचं !...ही गोष्ट माझ्या हातून कशी घडली त्याचा खरोखर कांहीच

खुलासा नाही...ती घडायला नको होती, आणि तरी घडली एवढंच म्हणायला हवं. माझ्या या चुकीची वाच्यता मी आजपर्यंत जाहीरपणानं कधी केलेली नाहीच, पण निकटवर्ती मित्रांजवळदेखील माझ्या आयुष्यांतल्या त्या चुकीबद्दल बोललों नसेन.

काय झालं तें सांगतों.

१९१६ सालीं 'न्यू पूना कॉलेज,' (हल्ली ज्याला सर परशुरामभाऊ कॉलेज म्हणतात तें कॉलेज) निघालं. प्रारंभापासूनच त्यांत मी प्रोफेसर म्हणून काम करूं लागलों. एम्. ए. च्या परीक्षेला मला अद्यापि बसायचं होतं. परंतु बी. ए. च्या परीक्षेंत तत्त्वज्ञानाच्या विषयांतली युनिव्हर्सिटीची स्कॉलरशिप मी मिळविली होती, म्हणून नव्या कॉलेजच्या प्राध्यापक वर्गात माझा समावेश झाला होता. शिक्षण प्रसारक मंडळीची 'नूतन मराठी विद्यालय' नांवाची जुनी प्रसिद्ध शाळा होती. या शिक्षण प्रसारक मंडळीनं 'न्यू पूना कॉलेज' काढलं होतं. नूतन मराठी विद्यालयाचा मी विद्यार्थी. या नूतन मराठी विद्यालयांतले फार वर्षांचे मुख्याध्यापक श्री. विनायकरावजी आपटे हे 'न्यू पूना कॉलेजचे' पहिले प्रिन्सिपल झाले होते. नवं कॉलेज काढण्याची कल्पना श्री. दत्तोपंत घारपुरे यांची. सर्व प्रकारची खटपट आणि संघटनादेखील त्यांचीच. ते माझे परम मित्र. अशा अनेक कारणांनी नव्या कॉलेजची योजना झाली तेव्हा प्राध्यापक वर्गाची निश्चिति करतांना तर्कशास्त्र आणि तत्त्वज्ञान या विषयांचा प्राध्यापक म्हणून माझी नियुक्ति, मी एम्. ए. झालों नव्हतों तरी, करण्यांत आली होती. मी बी. ए. ची परीक्षा पास झालों १९१४ च्या अखेरीस. (त्या वेळेस विश्वविद्यालयाच्या सर्व परीक्षा नोव्हेंबर महिन्यांत होत असत)... बी. ए. पास झाल्याबरोबर नूतन मराठी विद्यालयांत शिक्षक म्हणून मी प्रविष्ट झालों. सहाव्या आणि सातव्या (आजच्या भाषेंत दहाव्या आणि अकराव्या) इयत्तांना इंग्रजी शिकवूं लागलों...भाषांतर आणि निबंधलेखन असे दोन विषय माझ्याकडे होते.

पुढे 'न्यू पूना कॉलेज' निघालं. दुसऱ्या वर्षांतील विद्यार्थ्यांना मी तर्कशास्त्र शिकवूं लागलों. परंतु तरी शाळेंतल्या सहाव्या-सातव्या इयत्तांना

इंग्रजी शिकविण्याचं काम मी करीतच होतों. न्यू पूना कॉलेजांतले सगळेच प्रोफेसर नूतन मराठी विद्यालयाच्या वरच्या इयत्तांना शिकविण्याचं काम थोडा वेळ करीत असत.

निबंधलेखन आणि भाषांतर शिकवितांना विद्यार्थ्यांना मी 'घरचा अभ्यास' नेमून देत असें, आणि तो विद्यार्थ्यांनी शक्य तितक्या उत्तम प्रकारें न चुकतां लिहून आणला पाहिजे यावर माझा कटाक्ष असे. माझी शिकविण्याची पद्धत कमींत कमी रुक्ष आणि जास्तींत जास्त मनोरंजक करण्याची दक्षता मी घेत असें. माझं अध्यापन खेळीमेळीचं असे. विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेची अशी गोडी लागावी की ती त्यांना जन्मभर पुरेल अशा धोरणानं माझं शिकवणं असे. विद्यार्थी माझ्यावर खूष असत. परंतु वर्गांतली शिस्त काटेकोरपणानं पाळली गेलीच पाहिजे असा माझा कटाक्ष असे. वर्गांतलं वातावरण शक्य तितकं हास्यविनोदानं प्रफुल्लित राहील अशा प्रकारें मी वागत असें. परंतु एखाद्या विद्यार्थ्यानं मुद्दाम कांही कुचाळी केली किंवा 'घरचा अभ्यास' करून आणण्यांत ढिलाई केली तर मी हातांतल्या छडीचा उपयोग केल्यावाचून रहात नसें...

होय ! छडीचा उपयोग !

त्या काळांत प्रत्येक शिक्षक वर्गांत प्रविष्ट होत असे तो हातांत छडी घेऊन !

आणि मी जरी अवघा बावीस वर्षांचा होतों तरी माझ्या हातींहि छडी आली होती !...छोट्या जॉर्ज वॉशिंग्टनच्या हातांत जशी कुऱ्हाड आली होती तशी !...या छडीनंच माझा घात केला ! ...मी ज्या चुकीबद्दल लिहिणार आहें ती चूक माझ्या हातीं छडी नसती तर झाली नसती !...

माझ्यांत आणि ज्यांना मी शिकवीत होतों त्या विद्यार्थ्यांत वयाचं अंतर फार थोडं होतं. ते सगळे विद्यार्थी सरासरीनं पंधरा-सोळा वर्षांचे होते. आता दहाव्या-अकराव्या इयत्तेंत एकोणीस-वर्षांचे विद्यार्थी कदाचित् दुर्मिळ असतील. परंतु त्या दिवसांत स्थिति वेगळी होती. प्रत्येक तुकडींत एखादा दुसरा विद्यार्थी वयानं माझ्या बरोबरीचा क्वचित् मोठासुद्धा होता.

अशाच एका विद्यार्थ्याचं आडनांव होतं गोवंडे. शाळेंत मी त्याचा शिक्षक होतों. परंतु शाळेबाहेर मी त्याचा संवगडी होतों...पुण्याच्या कुंटे

चौकांतल्या ज्या एका वाड्यांत मराठी ग्रंथसंग्रहालय बरींच वर्षे होतं (आता हें संग्रहालय डोलकर आळींत गेलं आहे.) तो जोगांचा वाडा म्हणून प्रसिद्ध होता. त्या वाड्यांत माझा भाऊ व कृष्णा आठवले राहात असे, आणि गोवंड्याचं बिऱ्हाड आठवलेच्या बिऱ्हाडाला लागूनच होतं. आम्हां समवयस्क मुलांचा क्रिकेटचा क्लब होता. आणि जोगांच्या वाड्याचं आंगण ही आमची खेळण्याची जागा होती. गोवंडे आमच्यांत नेहमी खेळत असे...

परंतु शाळेंत तो माझा विद्यार्थी होता. मी त्याचा शिक्षक होतों.

एके दिवशीं या गोवंड्यानं 'घरचा अभ्यास' लिहून आणला नाही. कां आणला नाही म्हणून विचारलं तेव्हा त्यानं काय उत्तर दिलं तें आठवत नाही. परंतु त्या उत्तरांत असा ध्वनि होता की, 'अरे तूं आमच्यांत रोज खेळणारा, कशाला एवढी ऐट दाखवितोस? नाही केला मी एक दिवस घरचा अभ्यास तर एवढं काय बिघडतं?'

माझ्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे मी हंसत खेळत गोवंड्याची कानउघाडणी करूं शकलों असतों. परंतु त्याच्या उत्तरांत असा गर्भितार्थ होता की तुझी माझी ओळख आहे तेव्हा करून टाक मला क्षमा!...गोवंडे माझ्या ओळखीचा होता म्हणूनच त्याच्या अपराधाची दखल विशेष घेतली पाहिजे, त्याला जास्तच शिक्षा दिली पाहिजे, असा विचार माझ्या मनांत आला... मी त्याला म्हटलं, "असा माझ्यापुढे ये!"

तो पुढे येऊन उभा राहिला, तेव्हा मी म्हटलं, "हात पुढे कर."

हात उचलून पुढे करण्याऐवजी एखाद्या गुरगुरणाऱ्या कुत्र्याप्रमाणे चर्या करून तो मख्खपणानं उभा राहिला.

सारे विद्यार्थी चकित झाले...माझी अवज्ञा केल्याचं दृश्य त्यांना प्रथमच दिसत होतं. आता पुढे काय प्रकार होतो याकडे सर्वांचे डोळे साहजिकच लागल्याचं मला कळत होतं!

गोवंड्याला मी पुन्हा ओरडून सांगितलं, "हात पुढे कर."

तो आणखीच गुरकावणारी चर्या करून उभा राहिला.

त्याबरोबर मी आपल्या जागीं उभा राहिलों. आणि छडीचे दोन फटकारे त्याच्या डाव्या खांद्यावर ओढले.

त्याबरोबर तो बाहेरच्या गॅलरींत गेला! मला न विचारतां! माझ्या परवानगीची पर्वा न करतां! माझा अधिकार ठोकरून!

मी ओरडलों, " गोवंडे! चाललास कुठे? मुकाट्यानं वर्गात परत ये. "

तो आला नाही, तेव्हा मी बाहेर गॅलरींत गेलों. रागानं त्याच्या अंगावर सपासपा छड्या ओढीत मी ओरडत राहिलों, " असं जाता येणार नाही तुला! परत फीर! वर्गात चल!"

गोवंडे माझ्या वयाचाच होता, पण शिवाय अंगानं भरभक्कम होता. चांगला तालीमबाज होता...त्यानं मनांत आणलं असतं तर मला उचलून व्हरांड्यांतून खालच्या फरशीवर फेकून देणं त्याला शक्य होतं...परंतु त्या क्षणीं मला हें भय सुचलं नाही. मी बेभान झालों होतों. एका विद्यार्थ्यानं शिक्षकाची आज्ञा धुडकावून लावली होती. शिस्त धाब्यावर बसविली होती. अशा विद्यार्थ्याला शासन केलं नाही तर वाईट उदाहरण घालून दिल्यासारखं होईल. सारेच विद्यार्थी माझी आज्ञा मानेनासे होतील. एवढ्याच एका विचाराच्या आहारीं मी गेलों होतों...गोवंड्याच्या अंगावर सपासप छडी ओढीत होतों व ओरडत होतों, " वर्गात चल!"

गोवंड्यानं माझ्यावर हात टाकला नाही हें एक आश्चर्य! आणि खुशाल निघून जाण्याचा बेत बदलून तो वर्गात परत फिरला हेंहि एक आश्चर्यच!

खरं पहातां माझं उघड कर्तव्य असं होतं की तास संपल्यावर मुख्याध्यापकांकडे मी जायला हवं होतं, आणि जें घडलं होतं त्याचा वृत्तान्त त्यांच्या कानांवर घालावयास हवा होता...पण तसं मी कांही केलं नाही. माझे परमस्नेही श्री. दत्तोपंत घारपुरे मुख्याध्यापक होते. म्हणूनच कदाचित् जें झालं त्याचा रिपोर्ट त्यांच्याजवळ करण्याची गरज मला वाटली नसावी.

परंतु जो प्रकार घडला होता तो उघड्या चावडीवर घडल्यासारखा घडला होता. माझ्या वर्गातल्या विद्यार्थ्यांनीच नव्हे, तर आजूबाजूला वर्ग

चालू होते त्या वर्गातल्या विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी तो बघितला होता. ज्यांनी ज्यांनी बघितला त्यांना त्यांना विलक्षण आश्चर्य वाटावं असाच तो प्रकार होता. खळबळ उडविणारा !......

घारपुऱ्यांच्या कानांवर त्या प्रकाराची बातमी गेल्यावांचून कशी राहील ?...फडक्यांच्या हातून असा असा प्रकार घडला हें वृत्त ऐकतांच त्यांनी मला शिक्षकांच्या खोलींत ताबडतोबीचं बोलावणं धाडलं, पण मी तिथे नव्हतों. त्यांनी शिपायाला माझ्या घरीं पाठविलं. तिथेहि मी नव्हतों !...दुसऱ्या दिवसापासून नाताळच्या सुट्टीनिमित्त शाळा बंद होणार होती.

जिथे जिथे म्हणून मी सापडण्याची शक्यता होती तिथे तिथे घारपुरे आणि श्री. विनायकरावजी आपटे यांनी माझा शोध केला. परंतु मी त्यांना कोठेहि सांपडलों नाही.

पुष्कळांना वाटलं असेल, फडक्यांनी घाबरून पुण्यांतून पळ काढला !...

खरी गोष्ट अशी होती की, मुंबईच्या प्रसिद्ध 'मनोरंजन' मासिकाचे संपादक श्री. मित्र ह्यांचं मला पत्र आलं होतं की ताबडतोब येऊन भेटा, म्हणून शाळेंतलं काम आटोपून घरी आल्याबरोबर दुपारच्या एक्सप्रेसनं मी मुंबईला गेलों होतों. नाताळची सुटी मजेंत घालवून परत येणार होतों.

मी पुण्यांतच राहिलों असतों तर माझ्या हातून झालेल्या अविचाराचे नंतरचे परिणाम मला दिसले असते. माझ्या चुकीची चिंता मी केली असती.

परंतु मी पुण्याहून दूर गेलों होतों. दृष्टिआड सृष्टि या न्यायानं मी गोवंड्याला मारल्याचा विचार माझ्या मनांतून गेला होता. मुंबईस जीं कामं करायचीं योजलीं त्या कामांत आणि मौज करण्यांत माझ्या कृत्याची आठवण मी विसरूनच्च गेलों होतों. अच्युत बळवंत कोल्हटकर त्या वेळेस वेदांचं भाषान्तर प्रसिद्ध करीत होते. 'श्रुतिबोध' नांवाचं नियतकालिक चालवीत होते. अच्युतरावांची बायको ही माझ्या आईची मावस बहीण. मुंबईला गेलों की मी अच्युतरावांकडे उतरत असें. आताहि त्यांच्याकडे उतरलों होतों. त्यांचं बिऱ्हाड काळबादेवी रोडवर होतं. अच्युतरावांची

संगत मोठी मजेदार असे. त्यांच्याकडे बडीं बडीं माणसं बसायला–बोलायला येत असत. त्यांचे हास्यविनोद ऐकण्यांत मोठी मजा असे. शिवाय अच्युतराव मला कांही काम सांगत, तें करण्याची मला मोठी हौस वाटे... माझी नाताळची सुटी खूप मजेंत जाणार होती...माझ्या हातून मूर्खपणाचं जें कृत्य घडलं होतं त्याची आठवण माझ्या गावी राहिली नव्हती !...

काळबादेवी रोडवर एक थिएटर होतं– मला वाटतं अजूनहि आहे, आता त्याचं नांव काय आहे कोण जाणे ? त्यावेळेस त्याचं नांव ' अल्हांब्रा ' असं होतं. त्यावेळेस मुंबईत गोरे सोजीर पुष्कळ होते. मुलकी गोऱ्यांची वस्ती पुष्कळ होती. त्यांच्या मनोरंजनासाठी इंग्लिश कंपन्या अधूनमधून येत असत. ज्या वेळची आठवण मी सांगतों आहें, त्यावेळेस अल्हांब्रा थिएटरांत एक इंग्लिश ' रेव्ह्यू ' कंपनी खेळ करीत होती. तिचा खेळ पाहण्यासाठी मी गेलों होतों. संध्याकाळचा प्रयोग होता. तो बघून अच्युतरावांच्या बिऱ्हाडीं मी परत आलों असेन रात्रीं नवाच्या सुमाराला... आल्याबरोबर मावशी ( अच्युतरावांच्या पत्नी ) मला म्हणाल्या, " दत्तोपंत घारपुरे आले आहेत. केव्हाचे येऊन तुझी वाट बघत बसले आहेत. "... अच्युतरावांच्या कचेरींत रात्रीं कुणी नसे. त्या जागेंत मी निजत असें... मी त्या खोलींत पाऊल टाकलं तों दत्तोपंत घारपुरे म्हणाले, " कुठे गेला होतास रे ! "

मी सांगितलं कुठे गेलों होतों तें.

दत्तोपंत घारपुऱ्यांनी दोन्ही हातांनी नमस्कार करून मला म्हटलं, " हद्द झाली बाबा तुझ्यापुढे ! अरे, तुझ्या डोक्याभोवती कुठलं वादळ फिरतयं, आणि तूं इकडे मुंबईला येऊस गोऱ्या बायकांचे नाच-तमाशे पाहतोस ? आता म्हणू तरी काय तुला ? अरे, त्या गोवंड्याला मरेमरेतो मारलंस ? परिणामांचा कांही विचार तुझ्या डोक्याला शिवला नाही ? "

दत्तोपंत घारपुरे वयानं माझ्याहून चार वर्षांनी मोठे होते. त्यांच्या माझ्यांत मित्रत्वाचा दाट जिव्हाळा होता. परंतु त्यांनी मला दोन श्रीमुखांत द्याव्या इतका वडिलकीचा अधिकार त्यांच्याकडे खचित होता...ते इतके

संतापून माझ्याशी बोलूं लागले की मला वाटलं ते आता माझ्या कानशिलांत भडकवणार...त्यांनी तसं केलं असतं तर मला तें मुकाट्यानं सोसणं भाग होतं...त्यांनी मला मारलं नाही, परंतु माझ्या अविचारी कृत्याचे कोणकोणते परिणाम घडले होते, आणि त्यांना आणि विनायकरावजी आपट्यांना कसा कसा मनस्ताप झाला होता, याचं चित्र त्यांनी माझ्या डोळ्यांपुढे उभं केलं...

गंमत म्हणून सांगतों, की त्यांचं बोलणं मी एकीकडे ऐकत होतों आणि दुसरीकडे माझ्या नाटकी मनाला आठवण होत होती ' हें चित्र पहा ! ' असं आईला म्हणणाऱ्या ' विकारविलसित ' नाटकांतल्या चंद्रसेनाची !...

परंतु माझं लक्ष घारपुऱ्यांच्या बोलण्याकडे होतं, त्यांनी सांगितलेल्या गोष्टी मी ऐकत होतों,...माझ्या अविचारी कृत्याचे अनेक परिणाम झाले होते....

अवघ्या बाविसाव्या वर्षी मी कॉलेजांतला प्रोफेसर झालों होतों, कुशल अध्यापनाबद्दल लौकिक मिळविला होता, लेखक व वक्ता म्हणून माझी प्रसिद्धि होऊं लागली होती. माझे चाहते खूप होते. पण म्हणूनच मला पाण्यांत पाहणारे माझे कांही वैरी देखील होतेच. गोवंड्याला बडविण्याचा अविचार माझ्या हातून घडला, याचा माझ्या वाइटावर असणाऱ्या लोकांना पुष्कळ फायदा उठवितां येण्यासारखा होता. त्यांनी गोवंड्याच्या आणि त्याच्या बापाच्या मनांत भरवून दिलं, की डॉक्टरांकडे जाऊन अंगावरचे वळ दाखवा, डॉक्टरांचं सर्टिफिकेट घ्या, आणि सरळ केस करा फडक्यांवर ! कोर्टांत चांगला ठणठणीत दंड होईल ! इतकंच काय, चार सहा महिन्यांची सजादेखील होईल !...

विनायकरावांचा मी एक लाडका विद्यार्थी होतों, आणि आता कॉलेजांत सहकारी झालों होतों. घारपुरे तर माझे जिवाभावाचे मित्र होते. त्यांना दोघांनाहि माझा अभिमानी स्वभाव माहीत होता. ' फडक्यांनी गोवंड्यांची लेखी माफी मागावी म्हणजे केसबिस कांही होणार नाही ' अशी सूचना कुणाकडून तरी पुढे आल्याबरोबर त्या दोघांनी सांगून टाकलं होतं,

'फडके कधी माफी मागतील ही गोष्ट शक्य नाही. केस झाली तरी हरकत नाही...'

हें सारं घारपुऱ्यांनी तावातावानं मला सांगितलं. अगदी निर्भर्त्सनेच्या स्वरांत सांगितलं...परंतु मग माझे दोन्ही खांदे धरून अगदी निराळ्या स्वरांत ते मला म्हणाले, "आम्ही गोवंड्याच्या वडिलांची समजूत घातली आहे. त्यांचंहि तुझ्यावर प्रेम आहे. त्यांनी या प्रकरणावर पडदा टाकायचं कबूल केलं आहे"...मग ते अगदी निराळ्या स्वरांत म्हणाले, "अरे आप्पा, हें काय केलं होतंस तूं ! याचे कोणते परिणाम भोगावे लागले असते !"

त्यांचे ते शब्द अगदी खरे होते !

माझ्यावर केस झाली असती तर माझा गुन्हा खात्रीनं सिद्ध झाला असता. मला शिक्षा झाली असती. लौकिकानं बहरूं लागलेल्या माझ्या तरुण आयुष्याची नासधूस झाली असती ! मला माणसांतून उठावं लागलं असतं !...हें कसं टळलं होतं तें माझं मलाच कळत नव्हतं !...

या सर्व विचारांनी भारावून गेलेल्या स्वरांत मी घारपुऱ्यांना एवढंच म्हटलं, "असं व्हायला नको होतं !—"

* * *

## १७ : प्राध्यापकाच्या पेशांतील सुख-दुःखें

मोठेपणीं कोणती नोकरी करायची तें वयाच्या दहाव्या वर्षींच मी ठरविलं होतं. आपण मामलेदार व्हायचं ! बस्स, असा माझा अगदी ठाम निश्चय झाला होता.

माझे वडील मामलेदार होते आणि मामलेदार होण्याचे अनेक फायदे मला दिसत होते. पाटीदप्तरांचं ओझं तें कितीसं असणार ? परंतु पट्टेवाल्या शिपायानं तें घेतलेलं आहे, आपण ऐटींत मोकळ्या हातांनी चाललों आहोंत, या थाटांत कांही विशेष मौज होतीच की ! माझ्या वडिलांची जेव्हा जेव्हा एका गावाहून दुसऱ्या गावीं बदली होत असे, तेव्हा तेव्हा त्यांना दहा ठिकाणीं पानसुपाऱ्या होत असत. कित्येकदा गोरा कलेक्टर उमद्या घोड्याच्या टांग्यांत बसून माझ्या वडिलांच्या भेटीसाठी येत असे. दोघांचं संभाषण इंग्रजींत चालत असे, त्यांतले कांही सोपे शब्द मी प्रयत्नपूर्वक लक्षांत ठेवीत असें आणि शाळेंतल्या सोबत्यांजवळ बोलतांना ते वापरून त्यांच्यावर मोठी छाप पाडीत असें. एस्, नो, बट्, ऑल राइट, शुअर असे सुमारे डझनभर शब्द फडाफडा बोलतां येणं म्हणजे काय सामान्य गोष्ट होती ? त्या शब्दांच्या अर्थाचा मला पत्ता नव्हता ही गोष्ट वेगळी. माझ्या वडिलांची नोकरी जास्त झाली नाशिक जिल्ह्यांत. त्या काळांत या जिल्ह्यांत दरोड्यांचं आणि अत्याचारांचं प्रमाण फार होतं. मामलेदार, फौजदार, फडणीस अशा अधिकाऱ्यांच्या घरावरदेखील डाका पुष्कळदा पडत असे. भुताखेतांचे प्रकारहि फार होते. प्रत्येक मोठ्या अधिकाऱ्याच्या घरीं रात्रीचा पहारा करण्यासाठी जागल्या नेमलेला असे.

आमच्या घरीं रामोशी जातीचा जो जागल्या येत असे तो मोठा गोष्टी-वेल्हाळ होता. भुताखेतांच्या आणि चोरांचिलटांच्या एकाहून एक सरस अशा सत्यकथा तो अशा कांही रंगवून सांगत असे की, आम्ही लहान मुलं त्यांत रमून जात असूं. नंतर झोंपेंत भयानक स्वप्नं पडत असत आणि आम्ही दचकून उठत असूं ही गोष्ट निराळी. एकदा, का कोण जाणे, एका खुनाच्या खटल्याची सुनावणी माझ्या वडिलांसमोर आमच्या घराच्या आंगणांत झाली, त्यावेळेस हातापायांत बेड्या घातलेला आरोपी पोलिस पहाऱ्यांत उभा असलेला मला अगदी जवळून पाहातां आला. वयाच्या दहाव्या वर्षींच मोठेपणी कोण व्हायचं, कोणती नोकरी करायची याबद्दल माझ्या मनाचा निर्णय झालेला होता. मी मामलेदार होणार होतों !

लहानपण मागं पडूं लागलं तेव्हा माझा हा निश्चयदेखील मागं पडला. सगळ्यांत उत्तम धंदा अगर नोकरी कोणती याबद्दलचा विचारच मी करीनासा झालों, मॅट्रिकची परीक्षा पास झालों. कॉलेजांतली एकेक परीक्षा देऊं लागलों, नोकरी करण्याचं वय जवळ जवळ येऊं लागलं, आणि आश्चर्य असं की, कोणती नोकरी सगळ्यांत चांगली किंवा कोणता धंदा सगळ्यांत अधिक सुखाचा आणि मजेचा याबद्दलचा विचारच मनांत येईनासा झाला. मामलेदार होण्याचं लहानपणचं स्वप्न केव्हाच विरून गेलं होतं. त्याची जागा दुसऱ्या कोणत्याहि स्वप्नानं घेतलेली नव्हती. मात्र देशांतल्या राजकीय चळवळीचा परिणाम मनावर झाला होता, आणि सरकारी नोकरी मानहानीची वाटूं लागली होती.

एम्. ए. ची परीक्षा दिल्यानंतर मी कोण व्हावं तें माझ्या वडिलांनी मात्र ठरविलं होतं. तो काळ असा होता की, आमच्यासारख्या कुटुंबांतले पितापुत्र कोणत्याच गोष्टीबद्दल मनमोकळी चर्चा करीत नसत. बाप आणि मुलगा या दोघांत मोकळेपणाचं नातं नसावं असाच संकेत होता. परंतु मी मोठेपणीं कोण व्हावं याबद्दल माझे वडील कांही निमित्तानं कुणाजवळ तरी उद्‌गार काढीत असत व ते माझ्यापर्यंत पोचत असत. मी वकील व्हावं अशी माझ्या वडिलांची इच्छा होती. मी उत्तम वकील होईन याबद्दल

त्यांची खात्री होती. ही खात्री त्यांना कशामुळे वाटत होती तें मला कळत होतं. बी. ए. च्या वर्गांत मी असतांना फर्ग्युसन कॉलेजांतील डिबेटिंग युनियनच्या सभा मी माझ्या भाषणानं गाजविल्या होत्या. स्नेहलता नांवाच्या एका बंगाली मुलीनं हुंडयाच्या प्रश्नावर तिचं लग्न मोडलं तेव्हा स्वतःला जाळून घेतलं, आणि त्या दुर्दैवी घटनेनं देशभर मोठीच खळबळ उडाली. हुंडयाचा निषेध करण्यासाठी आम्ही आमच्या डिबेटिंग युनियनतर्फे जाहीर सभा घेतली. त्या सभेंतलं माझं भाषण इतकं प्रभावी ठरलं की, कित्येक तरुणांनी व्यासपीठावर येऊन हुंडा न घेण्याच्या शपथा घेतल्या. पुढे कॉलेजच्या स्नेहसंमेलनांत मुख्य पाहुण्या म्हणून आलेल्या सरोजिनी नायडूंचे विद्यार्थ्यांतर्फे आभार मानण्यासाठी मी छोटंसं इंग्रजी भाषण केलं. तें तर इतकं गाजलं की, पुण्यांतले लोक मला वक्ता म्हणून ओळखूं लागले. माझ्या ठिकाणीं वक्तृत्वाचा गुण विशेष प्रमाणांत होता यामुळेच माझ्या वडिलांनी ठरविलं की, मी वकिलीचा धंदा करावा. त्यांच्या इच्छेप्रमाणे मी कदाचित् एलएल्. बी. ची परीक्षा दिलीहि असती आणि वकील झालोंहि असतों.

परंतु त्याच सुमारास फर्ग्युसन कॉलेजसारखंच दुसरं एक कॉलेज काढण्याचा बेत नूतन मराठी विद्यालयाच्या चालकांनी केला. या योजनेचे मुख्य सूत्रधार दत्तोपंत घारपुरे यांचा आणि माझा मोठाच स्नेह होता. नव्या कॉलेजच्या अध्यापक वर्गांत मी सामील व्हावं अशी इच्छा त्यांनी दर्शविली. नव्या कॉलेजचे जे प्रिन्सिपल होणार होते ते विनायकरावजी आपटे हे तर माझे गुरुजी. त्यांनीहि इच्छा दर्शविली की मी नव्या कॉलेजच्या योजनेंत सामील व्हावं. खरं म्हणजे या गोष्टीबद्दल वडिलांचा सल्ला मी घ्यावयास हवा होता. परंतु मघाशीच सांगितलं ना की, छोकरी काय. किंवा नोकरी काय आयुष्यांतल्या लहानमोठ्या घटना पितापुत्रांच्या मनमोकळ्या चर्चेनं घडाव्यात असा आचारच त्या वेळेस समाजांत रूढ नव्हता. वडिलांना न विचारतांच नव्या कॉलेजच्या संस्थापकांना मीं रुकार दिला. युनिव्हर्सिटीचं कमिशन आलं. कमिशननं नव्या कॉलेजची तयारी पाहिली, पसंत केलीं, न्यू पूना कॉलेज या नांवानं नवं कॉलेज अस्तित्वांत आलं. एम्. ए. ची परीक्षा देण्यापूर्वीच मी या नव्या कॉलेजांत लॉजिकचा प्रोफेसर म्हणून काम करूं लागलों.

प्राध्यापकाचा पेशा पत्करण्यापूर्वी मी फारसा विचार केला असं मला वाटत नाही. या पेशाचे फायदे कोणते, तोटे कोणते असं गणित मी मांडलं नाही. मांडण्याइतपत मला अनुभव नव्हता, ज्ञानहि नव्हतं. होतों केवढा ? अवघा वीस वर्षांचा. मिशी कदाचित् उगवूं लागली असेल, परंतु पक्कीं मतं खचितच नव्हतीं. सूटबूट घालीत होतों म्हणूनच विद्यार्थ्यांच्या घोळक्यांत प्रोफेसर म्हणून निराळा दिसत असेन. नोकरीचा निर्णय संपूर्ण विचारानंतर करण्याची कुवत माझ्या ठिकाणीं खासच नव्हती. माझे गुरुजी विनायकरावजी आपटे आणि स्नेही दत्तोपंत घारपुरे यांनी मीं प्रोफेसर व्हावं असं ठरविलं. मी प्रोफेसर झालों. योगायोगानंच झालों म्हणायला हवं.

मात्र ही नोकरी एकदा पत्करली ती कायमचीच पत्करली आणि जों जों वर्षांमागून वर्षं गेलीं तों तों या पेशांत मी रमत गेलों. मनाची खात्री पटत गेली की या पेशांत अर्थलाभ फार बेताचा खरा, परंतु तेवढा एक उणेपणा सोडला तर यासारखी दुसरी कोणतीहि नोकरी नसेल. चार तास शिकवावं, क्रिकेट, टेनिस मनःपूत खेळावं, सवडीचा वेळ मिळेल त्यांत साहित्यनिर्मिति करावी, आवडीचे इतर छंद पुरवून घ्यावे ! आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट ही की तरुण विद्यार्थ्यांत मिसळावं, त्यांच्या संसर्गानं स्वतःचं तारुण्य कायम राखावं मोठी मजा आहे प्रोफेसरच्या पेशांत !

आणि तरी देखील कधी कधी या पेशाचा असा कांही कंटाळा येत असे, की वाटे द्यावी सोडून ही नोकरी आणि करावा दुसरा कांही तरी उद्योग ! मला वाटतं, असा कोणताच धंदा अगर नोकरी नाही, की जिचा वीट माणसाला येत नाही. जी नोकरी मनाविरुद्ध पत्करलेली असेल आणि करावी लागत असेल तिची गोष्ट तर राहोच, परंतु जी नोकरी माणसानं स्वखुशीनं पत्करलेली असते—म्हणजे ज्या नोकरीशी त्यानं एक प्रकारचा प्रीतिविवाह लावलेला असतो—त्या नोकरींतदेखील वरचेवर कंटाळ्याच्या घटका येतातच. पत्करलेला उद्योग सक्तीच्या शापासारखा वाटूं लागतो. नकोसा होतो. धंद्यांत माणसानं यश मिळविलं की त्या यशाचाच एक प्रकारचा जुलूम सुरू होतो. यशस्वी क्रिकेटरला वाटूं लागतं, केव्हा एकदा निवृत्त होईन या जबाबदारीच्या जोखडांतून ? यशस्वी डॉक्टर,

यशस्वी वकील, अशा सगळ्याच पेशांतल्या लोकांना या कंटाळ्याचा अनुभव घ्यावाच लागतो. प्रोफेसरचा पेशा या नियमाला अपवाद कसा असेल? कितीकदा तरी मला वाटलं, ‘ नको ही नोकरी, नको हा पेशा ! ’

प्राध्यापकांच्या नोकरींत खूप मौज असते हें कितीहि खरं असलं, तरी रोजच्या रोज द्याव्या लागणाऱ्या व्याख्यानांचा मधूनमधून कंटाळा येतोच. मनाची लहर असो, नसो, घंटा वाजली की वर्गांत जावं लागतं. ज्या विषयावर व्याख्यान द्यायचं तो विषय शिळेपणानं नकोसा झाला असला तरी पाऊण तास बडबड करावी लागते. व्याख्यान ऐकणाऱ्या मुलामुलींच्या ध्यानांत आपला कंटाळा येणार नाही अशी दक्षता घ्यावी लागते. तिमाही, सहामाही अशा परीक्षांचं रहाटगाडगं चालू असतं. विश्वविद्यालयाच्या एखाद्या परीक्षेसाठी परीक्षक होण्याची वर्णी लागते. पेपरांचे गठ्ठे तपासतां तपासतां जीव आंबून तर जातोच, परंतु आपलं इंग्रजी बिघडेल की काय अशीहि भीति वाटूं लागते. जिमखान्याचं काम, वार्षिक संमेलनाचं काम कितीहि नकोसं वाटलं तरी करावंच लागतं. अनेक प्रसंगीं मन या नोकरीला विटून जातं. मनांत येतं की बस् झाली ही मास्तरकी ! हो, कॉलेजांतली नोकरी म्हणजेदेखील मास्तरकीच नव्हे तर काय ?

असा हा सक्तीचा शाप प्राध्यापकाला सोसावा लागतो.

तो सोसण्याची शक्ति देणारा एकच विचार असतो तो हा की ज्यांत कंटाळा कधी म्हणून येणार नाही, ज्याचा सासुरवास कधी वाटणार नाही, जो निरपवाद नित्य सुखाचा आणि मजेचाच वाटेल असा धंदा किंवा अशी नोकरी या जगांत कुठे नाहीच !

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ............ वि: ............
क्रमांक ............ नों. दि. ............

## १८ : ना खेद ! ना खंत !

परवा मला भेटावयास आलेले एक मित्र बोलतां बोलतां म्हणाले, " तुमचा एक विलक्षण फोटो आम्ही नुकताच पाहिला. त्यांत तुम्ही धोतर नेसलेले आहांत, अंगांत बंद कॉलरचा लांब पायघोळ कोट घातला आहे, गळ्याभोवती उपरणं आहे, आणि डोक्याला जरीकाठी पांढरा शुभ्र रुमाल आहे. कपाळाला गंध आहे की नाही नक्की आठवत नाही, पण आहेसं वाटतं ! स. प. कॉलेजच्या अध्यापकांच्या बैठकीच्या खोलींत आहे तो. अशा पोशाखांत तुम्ही कधीकाळी वावरलां असाल अशी कल्पना नसल्यामुळे ऐन सनातनी थाटांतला तुमचा तो फोटो पाहून आम्हांला खूप हसूं आलं. खरंच, तुमचाच का फोटो तो ? तुम्ही एकदा असे होतां ? विश्वास बसत नाही."

मी हसलों आणि म्हटलं, " अहो, प्रत्यक्ष फोटो पाहिल्यावर विश्वास ठेवलाच पाहिजे तुम्हांला. न्यायाच्या कोर्टांत देखील तो विश्वसनीय पुरावा म्हणून मानला जाईल."

" तरी पण– " ते आणखी कांही बोलणार होते.

परंतु त्यांना बोलूं न देतां मी म्हटलं, " पाहणाराला ज्याचं हसूं याव असा एवढा एकच माझा फोटो उपलब्ध आहे, असं समजूं नका–"

" आणखी आहेत ? कुठेकुठे आहेत ते सांगा तरी–"

" सगळेच कुठे आहेत तें मला सांगतां यायचं नाही. परंतु कांहींच वर्णन मी करूं शकेन. कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजांत माझे कांही फोटो

तुम्हांला दिसतील. त्यांत मी बूट, कोट, पॅन्ट, नेकटाय असा पोशाख केलेला आहे आणि डोक्याला अस्सल कोल्हापुरी ऐटीनं साफा बांधलेला आहे ! ''

" खरं सांगतां ? "

" अगदी खरं. जाऊन पहा वाटलं तर. माझा आणखी एक फोटो आहे, त्यांत माझा वेष कांही निराळाच आहे. पायांत काळा पंपशू, अगदी तलम धोतर, रेशमी शर्ट, रेशमी कोट, आणि डोक्याला काळीभोर रुंद पट्टीची फरची टोपी ! पहाणाराला वाटेल हा कुणी पेटी वाजविणारा किंवा तबलजी तर नव्हे ! "

" वा रे वा ! " ते मित्र हसूं लागले.

मी म्हटलं, " येवढ्यानं काय झालंय ? आणखी एक फोटो आहे माझा. कुठे आणि कोणाजवळ आहे सांगतां येत नाही. पण काढला होता खरा. त्यांत मी मांडी घातली आहे. अंगावर फक्त उपरणं आहे. कपाळाला बुक्का लावलेला आहे. पुढ्यांत ज्ञानेश्वरीची पोथी आहे. प्रवचन करतांना काढला होता तो. "

" आता कमाल झाली ! " ते मित्र हसत सुटले. कांही वेळानं ते म्हणाले, " खरंच, तुमचे हे सारे फोटो जमवून जपून ठेवले पाहिजेत. "

मी म्हटलं, " जमवून जपून ठेवण्याइतकं मी त्यांचं महत्त्व मानत नाही. तथापि ते सारे माझ्या स्मरणात आहेत."

" त्यांची आठवण झाली की आपण एके काळीं खरंच का असे होतों; असं आश्चर्य नाही तुमच्या मनांत येत ? "

मी म्हटलं, " येतं ना. परंतु त्या त्या वेळेस मी तसा तसा नसतों तर बरं झालं असतं, असं मात्र कधीच वाटत नाही. कारण आज माझं जें काही स्वरूप– शारीरिक नव्हे, तर मानसिक स्वरूप– आहे, तें घडविण्यास पूर्वीच्या त्या माझ्या अवस्थाच कारण झालेल्या आहेत. आजच्या घटकेवर उभं राहून मान मुरडून पाहिलं की त्या विसंगत दिसतील, हास्यास्पद सुद्धा वाटतील. परंतु त्या त्या वेळेस मी तसा होतोंच. इतकंच काय, तसा नसतों तर जसा दिसलों तसा दिसलों नसतों. "

मी याच गंभीर सुरांत आणखी बोलावं अशा इच्छेनं " हुं ! " म्हणून ते माझ्याकडे बघत राहिले. परंतु गप्पा मारायला आलेल्या पाहुण्याशी गंभीर चर्चा करणं मी सहसा टाळतों. मी विषय बदलला. कांही वेळानं माझे ते मित्र निघून गेले.

मी एकटा राहिलों. मग मात्र मघाचा तो विषय माझ्या डोक्यांत पुन्हा सुरू झाला. मनांत आलं, खरंच किती वेगवेगळीं अवस्थान्तरं या आयुष्यांत माझीं झालेलीं आहेत! १९२० च्या असहकारितेच्या चळवळींत ऐन आघाडीवर असतांना देखील मी डोक्याला कधी शुभ्र गांधी टोपी घातली नाही. ( माझ्या मनाचा कोणता गुप्त हट्ट होता कुणास ठाऊक ! ) परंतु सिंध हैद्राबादच्या कॉलेजांतली नोकरी सोडून पुण्यास परत आलों, तेव्हा तिकडे खरेदी केलेला सुंदर तांबड्या मखमलीचा स्लीपर पायांत आणि वर जाडया भरड्या हातखादीचं पंचेवजा टाचकं धोतर अशा वेषानं पुण्याच्या राजरस्त्यांतून मी हिंडलों ! आणि अशा वेळीं की असहकारितेच्या चळवळींतून निवृत्त झाल्याबद्दल पुणेरी जनतेची अप्रीति माझ्या वाट्याला आली होती ! लोकांनीं फक्त मला दगड मारायचंच काय तें शिल्लक ठेवलं होतं ! किंवा कदाचित् कमरेला तीन रुपयांचा पंचा आणि पायांत पंधरा रुपयांचा मखमली स्लीपर अशा त्या वेषांत मला पाहून पुणेरी लोक म्हणाले असतील, यानं धोंडे मारायचंच काय तें शिल्लक ठेवलं आहे ! त्या वेषांत मला पाहणारांनी मला वेडा ठरविलं असेल खास ! याहि पोशाखांतील माझे फोटो आहेत ! सिंधमध्ये गाढव हें प्रतिष्ठित जनावर समजलं जातं ! माझ्या विशेष आवडत्या विद्यार्थ्यांबरोबर मी वनभोजनाला जात असें, त्या वेळेस फोटोसाठी मी गाढवावर देखील बसलों होतों. हेहि फोटो कुठं तरी असतील ! कदाचित् माझ्या संग्रहांतसुद्धा असतील !

पण एखाद्या बहुरूप्याप्रमाणे मी नाना तऱ्हांचे वेष केले यांत आश्चर्य तें कसलें ? जीवनाच्या प्रवासांत मनुष्य अशीं नाना रूपं धारण करतोच. एकेक रूप म्हणजे त्या त्या वेळच्या एकेका मानसिक छंदाचा किंवा महत्त्वाकांक्षेचा बाह्य आविष्कार असतो. मनाचे छंद कांही काळ टिकतात, उत्कट होतात, किंवा अजिबात विराम पावतात; नवे छंद जडतात, त्यांना साजेसं माणूस

वागूं लागतो. त्याहि छंदांची उकळी गार होते– आणि हे सारे बदल होत असतांना माणूस आयुष्यांत पुढे पुढे जातच असतो! एकेका छंदाचा, महत्त्वाकांक्षेचा थोडा फार अवशेष बरोबर घेऊन! एखादा छंद त्यानं अजिबात सोडला, तरी देखील त्याच्या मानसिक पिंडावर त्याचा परिणाम झालेला असतोच!

माझंहि आयुष्य अशाच प्रकारं घडलेलं आहे. भावनेच्या ऊर्मीप्रमाणे वागण्याचा किंवा निर्णय घेण्याचा माझा स्वभाव आहे. हा दोष आहे की गुण आहे, तें ठरविणं कठीण आहे. या स्वभावामुळे कधी माझं नुकसान झालेलं आहे, क्वचित फायदा झालेला आहे; परंतु गुण कोणता आणि दोष कोणता हें ठरवितांना नंतरच्या परिणामांची फूटपट्टी वापरणं मला पसंत नाही. अमुक गोष्ट करावी अशा इच्छेची ऊमा माझ्या मनांत आली, की तिच्या आहारीं मी जातों. स्वहिताचे उलट सुलट विचार मी झुगारून देतों. लोकमताची पर्वा करीत नाही. स. प. कॉलेज ( त्या वेळचं न्यू पूना कॉलेज ) निघालं तेव्हा त्याच्या पहिल्याच प्राध्यापक मंडळांत मी दाखल झालों, तो अशाच ऊर्मीच्या भरांत.

स. प. कॉलेजांत असतांनाच ज्ञानेश्वरीचा उत्तम अभ्यास करण्याची लहर मला आली. उपलब्ध असलेल्या ज्ञानेश्वरीवरच्या सर्व टीका मिळवल्या, आणि त्या वाचूं लागलों. तेवढ्यानं समाधान होईना. अधिकारी व्यक्तींच्या तोंडून ज्ञानेश्वरी ऐकली पाहिजे असं वाटूं लागलं. म्हणून जोग महाराजांचीं भजनी कीर्तनं ऐकूं लागलों. त्यांच्या प्रासादिक, आवेशयुक्त, प्रेमळ वाणीनं मंत्रमुग्ध झालों. श्री. देशमुख नांवाचे एक पदवीधर गृहस्थ नित्यनियमानं रोज एके ठिकाणीं संध्याकाळीं ज्ञानेश्वरी सांगत असत, त्यांचीं प्रवचनं ऐकायला जाऊं लागलों. त्यांच्या प्रवचनांत श्रद्धा, भक्ति, आणि आधुनिक चिकित्सा यांचा सुंदर मिलाफ मला आढळला आणि ज्ञानेश्वरीचा खरा आनंद आणि आस्वाद मला मिळत आहे, असं वाटूं लागलं. हळुहळू मी स्वतः ज्ञानेश्वरीचीं प्रवचनं करूं लागलों. भजनी दिंड्यांत उभा राहूं लागलों, भक्तिमार्गाचा आणि वारकरी पंथाचा अनुयायी बनण्याची माझी इच्छा प्रतिष्ठेचे सारे बांध फोडून वाहूं लागली! पंढरीच्या वाटेनं सुरू झालेला

माझा हा प्रवास असाच चालू राहिला असता, तर काय झालं असतं त्याची कल्पना करणं अवघड नाही !

पण तितक्यांत—

महात्मा गांधींच्या असहकारितेच्या चळवळीचं रणशिंग वाजलं ! तें ऐकतांच देशभक्तीच्या भावनेची विलक्षण ऊर्मि माझ्या मनांत उसळली. मी चळवळींत उडी घेतली ! भक्तिमार्गाची वाटहि सोडून एकदम एका निराळ्याच वाटेनं मी जाऊं लागलों ! राजकारणाच्या वाटेनं !

परंतु त्या वाटेचं स्वरूप मला वाटलं होतं, त्यापेक्षा फार निराळं आहे याचा उमज मला थोड्या दिवसांत पडला. पुन्हा दुसरी ऊर्मि आली ! पुन्हा कुणालाहि न विचारतां रस्ता सोडला, दिशा बदलली ! जवळ जवळ सहा वर्षं नाना ठिकाणीं भटकलों ! एकदा वाटलं सिंध हैद्राबादचाच मी कायमचा नागरिक होणार ! पण झालों नाही ! एकदा वाटलं माझं सारं आयुष्य नागपूर शहरांत जाणार ! पण तसंहि घडलं नाही. अखेर कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजांत स्थिर झालों. तिथेहि असे अनेक प्रसंग आले की वाटलं, ही संस्थानची नोकरी सोडावी लागणार. परंतु प्रत्येक वेळेस चमत्कार घडला. माझ्या स्वाभिमानाचा विजय झाला !

या साऱ्या भिन्न भिन्न अवस्था आठवल्या की क्षणभर मनांत येतं त्या त्या अवस्थांत आणि वेषांत खरोखर मीच होतों काय ? शिक्षणाच्या कार्यासाठी स्वार्थत्याग करण्याची उसळी आल्यामुळे स. प. कॉलेजांत अध्यापक होणारा, भक्तिमार्गाची आणि वारकरी पंथाची मोहिनी वाटल्यामुळे भजनी दिंड्यांत उभा राहणारा आणि प्रवचनं करणारा, असहकारितेच्या चळवळींच्या प्रारंभीं हजारो विद्यार्थ्यांचीं अंतःकरणं हालवून सोडणारा, चळवळींतून मागं परतून लोकांचे शिव्याशाप खाणारा— हीं सगळीं माझींच रूपं होतीं ? होय ! तीं माझींच रूपं होतीं ! आणि—त्या त्या वेळीं मीं तीं रूपं घेतलीं याचा मला खेद वाटला नाही, वाटत नाही ! तीं रूपं मी टाकलीं याची मला खंत वाटली नाही, वाटत नाही ! आज माझं जें कांही शारीरिक व विशेषतः मानसिक रूप आहे, त्यांत पूर्वीच्या त्या सर्व रूपांचे अवशेष

थोड्या फार अंशांनी आहेतच! आज माझीं मतं नास्तिकाचीं आणि निरीश्वरवाद्याचीं झालीं असलीं, तरी भक्तिमार्गी आनंदाचं स्फुरण माझ्या अंतःकोशांत कुठे तरी असेल! देशभक्त पुढारी होण्याच्या रस्त्यांतून मी माघारी फिरलों असलों तरी माझ्या अंतःकरणांतली देशभक्तीची तार पुनः पुनः स्पंदन पावते. त्या त्या वाटेनं त्या त्या वेळीं जातांना जीं सुखदुःखं मी अनुभविलीं तीं एक प्रकारं अविनाशी आहेत!

अगदी सरळ रस्त्यानं आयुष्यभर प्रवास करणारा माणूस फार क्वचित असेल. आपण जीवनाच्या रस्त्यानं निघतों. या दिशेनं जावं, त्या दिशेनं जावं, असा आपल्याला मोह पडतो. आपण वाट बदलून चालूं लागतों, कांही वेळ रमतों. पुन्हा मूळ रस्त्याला परत येतों. आपल्या आयुष्याच्या वृक्षाला उजवीकडे डावीकडे फाटे फुटतात. वृक्षाची वाढ ऊर्ध्व दिशेनं व्हावयाची तशीच होते. ती तशीच कां व्हावी याला कांही उत्तर नाही. निदान मला तें सांपडलेलं नाही. एवढं खरं की आज घटकेला मी जो कुणी आहें, तो मी असा असा आहें, यांत माझा आनंद आहे! माझा अभिमान आहे! आणि गतकालांत होऊन गेलेल्या माझ्या भिन्न भिन्न अवस्था कितीहि विसंगत, चमत्कारिक, हास्यास्पद देखील वाटल्या तरी त्यांच्याविषयीची माझी स्वतःची वृत्ति 'ना खेद, ना खंत!' अशीच आहे! नव्हे, त्या सर्व अवस्थांबद्दल एक प्रकारची कृतज्ञता मनांत आहे!

* * *

## भाग चवथा

# स्थलचित्रं व व्यक्तिचित्रं

## १९ : पन्नास वर्षांपूर्वीची माझी शाळा !

आताच्या पुणे शहराच्या मानानं माझ्या लहानपणाचं पुणं किती लहान होतं ! आणि शहराचा एकंदर जीवनक्रम किती आटोपशीर होता ! नूतन मराठी विद्यालय, न्यू इंग्लिश स्कूल, आणि भावे स्कूल येवढ्या तीनच प्रमुख शाळा शहरांत होत्या. मुलींसाठी हुजूरपागा होती. आणि या सर्व शाळांत विद्यार्थ्यांची संख्या प्रत्येकी चारशे पाचशेच्या पुढे नव्हती. मास्तर आणि विद्यार्थी यांचे संबंध अधिक निकट आणि जिव्हाळ्याचे होते. छडीवर बहिष्कार नव्हता, परंतु तिचा प्रसाद देणाऱ्या मास्तरांकडून विद्यार्थ्याला जिव्हाळ्याचं प्रेमहि मिळत असे. शाळा-शाळांत अनेक बाबतींत स्पर्धा असे. खो खो, आट्यापाट्या, हे देशी खेळ विद्यार्थी हौसेनं खेळत, आणि या खेळांचे चुरशीचे सामने होत असत. प्रतिवर्षी लांब उडी, उंच उडी, अशा खेळांच्या आंतरशालेय स्पर्धा होत असत. मात्र गावांत कुठे सोयीचं मैदान नसल्यामुळे त्या लष्करांत होत असत. या मैदानी खेळांकडे लक्ष पुरविण्याचीं साधनं गावांतल्या गरीब शाळांपेक्षा लष्करांतल्या शाळांजवळ अधिक असल्यामुळे धावणं, लांब उडी मारणं, उंच उडी मारणं अशा शर्यतींचीं बक्षिसं गोऱ्या साहेबांचीं मुलं किंवा पारश्यांचीं मुलं मिळवीत असत. दोन संघांनी भला लठ्ठ जाड दोर परस्पर-विरुद्ध दिशांना ओढण्याची ' टग ऑफ वार् ' नांवाची एक स्पर्धा असे. या स्पर्धेचं बक्षीस आमच्या नूतन मराठी विद्यालयानं लागोपाठ कांही वर्षे मिळविलं. आमच्या शाळेनं या स्पर्धेसाठी विशेष तयारी करण्यासाठी लष्करी नोकरींतून निवृत्त झालेल्या

एका ऑफिसरला शिक्षक म्हणून ठेवलं होतं. या स्पर्धेसाठी रोज प्रॅक्टिस करायचं म्हणजे भले दांडगे मजबूत ताकदवाले फक्त अकरा विद्यार्थी असून भागण्यासारखं नव्हतं. त्यांच्या तोडीचे असेच मजबूत आणखी अकरा विद्यार्थी असणं अवश्य होतं. हल्लीच्या शाळाकॉलेजांत विद्यार्थ्यांमधून एकाहून एक भारी वजनाचे आणि ताकदीचे बावीस विद्यार्थी निघतील की नाही कोण जाणे ! परंतु आमच्या वेळेस नूतन मराठी विद्यालयांत असे बावीस जवान होते. कारण त्या काळांत खुद्द शाळेचा तालिमखाना जरी बेतास बात होता तरी गावांत नगरकरांची तालीम, लोखंडयांची तालीम, भटाची तालीम अशा अनेक तालमी होत्या आणि त्या तालमींत किती तरी शाळकरी विद्यार्थी जात असत.

हॉकी, फुटबॉल या खेळांचा प्रचार शाळांमधून विशेष नव्हता. परंतु क्रिकेट सर्व शाळांत खेळलं जात असे, आणि क्रिकेटचे चुरशीचे ढालीचे सामने प्रतिवर्षीं होत असत. क्रिकेटची ढाल मिळविण्यासाठी लष्करांतल्या शाळा खूप प्रयत्न करीत असत. पण न्यू इंग्लिश स्कूल बहुधा प्रत्येक वर्षी ही ढाल मिळवीत असे. न्यू इंग्लिश स्कूल आणि आमची नूतन मराठी यांच्यांत फार चुरस असे. परंतु आमच्या नूतन मराठीला सामन्यांत कधी जय मिळत नसे. ज्या दिनकर बळवंत देवधरांचं नांव अखिल भारतीय कीर्तीचे क्रिकेटर म्हणून पुढे गाजलं ते आमच्या वेळेस नूतन मराठीचे विद्यार्थी होते, आणि आमच्या क्रिकेट टीमचे ते एक आधारस्तंभ होते. परंतु तरी देखील विजयश्रीनं आमच्या शाळेच्या संघाला कधी माळ घातली नाही. याचं खरं कारण असं होतं की न्यू इंग्लिश स्कूलमधील श्रीयुत किनरे नावाचे एक मोठे हौशी आणि उत्साही मास्तर क्रिकेटचा संघ तयार करण्याच्या बाबतींत अतिशय परिश्रम घेत असत. इतर कोणतीच शाळा संघ तयार करण्याच्या बाबतींत विशेष दक्षता घेत नसे. अर्थात न्यू इंग्लिश स्कूलला मेहनतीचं जें फळ मिळावयाचं तें मिळत असे. परंतु आम्हीं हा साधा कार्यकारण-संबंध मानायला तयार नव्हतों. आम्ही म्हणत असूं की न्यू इंग्लिश स्कूलचे मास्तर ज्या विकेटवर सामना व्हायचा त्या विकेटखाली मंतरलेलं लिंबू आदल्या रात्रीं चोरून येऊन पुरतात. म्हणून त्यांचा संघ मॅच जिंकतो. आमच्या शाळेचा नेहमी पराजय होत असे त्याचं आमच्या

मतानं आणखी एक कारण होतं तें हें की आमचे हेड मास्तर अपशकुनी होते, अशी आमची समजूत होती. सामना पहायला ते येईपर्यंत आमच्या संघाची सरशी असायची; परंतु त्यांनी मैदानावर पाऊल टाकलं रे टाकलं की आमच्या खेळाडूंच्या दांड्यामागून दांड्या उडायच्या. हा अनुभव आम्ही वारंवार घेतला होता. ते सामन्याला गैरहजर रहातील तर आमचा खास विजय होईल याबद्दल आमची खात्री असे. परंतु ते कसले गैरहजर रहातात ? त्यांना कधी पडसं खोकलादेखील होत नसे !

आमच्या नूतन मराठी विद्यालयांत एक फार चांगली प्रथा त्या वेळेस होती.. वार्षिक परीक्षा संपल्या आणि उन्हाळ्याची मोठी सुटी आली कीं सुटी सुरू होण्याच्या आदल्या दिवशीं शाळेंतल्या सर्व विद्यार्थ्यांना उद्देशून कुणा तरी सन्माननीय पाहुण्यांचं उपदेशपर व्याख्यान सकाळीं होत असे आणि मग तिसऱ्या प्रहरीं व संध्याकाळीं शाळेच्या खर्चानं सर्व विद्यार्थ्यांसाठी वासंतिक रसपानाचा कार्यक्रम होत असे. सकाळच्या व्याख्यानाविषयीं विद्यार्थ्यांना फारसा उत्साह नसे. उपदेश ऐकण्याची विद्यार्थ्यांना कितशी उत्सुकता असणार ? अर्धा पाऊण तास निमूटपणानं पाहुण्यांचं व्याख्यान ऐकायचं आणि पाहुण्यांच्या भाषणाच्या छापील प्रती वाटल्या जात त्या घ्यायच्या येवढंच त्यांना करायचं असे, आणि ते येवढी गोष्ट शिस्तीनं करीत असत. परंतु त्यांचं खरं लक्ष असे तिसऱ्या प्रहरीं व संध्याकाळीं होणाऱ्या वासंतिक रसपानाच्या कार्यक्रमाकडे.

उसाचा ताजा रस आणि आंब्याची वाटलेली डाळ असा बेत असे. एक फुलपात्र भरून रस आणि डाळीचा एक छोटासा द्रोण प्रत्येक विद्यार्थ्याला मिळत असेल अशी साहजिक तुमची कल्पना होईल. परंतु असा दरिद्री बेत नसे. कुणीहि कितीहि रस प्यावा आणि हवी तेवढी डाळ खावी अशी योजना असे. हल्ली पुण्यांत उसाचा रस प्यायचा झाला तर एका पावशेराला दोन आणे मोजावे लागतात. आणि रस कसला मिळतो तर माणसानं फिरवायच्या छोट्याशा लोखंडी चरकावरचा ! आणि प्यावा लागतो कशांतून तर कांचेच्या ग्लासांतून ! अशा प्रकारं चार घोट रस ग्लासांतून पिण्यांत कांहीं काव्य आहे म्हणतां ? त्या वेळेस 'गुऱ्हाळ' नांवाचं जें ठिकाण असे त्याची शोभा काय वर्णावी ? बैल वाटोळ्या प्रदक्षिणा घालीत

लाकडी चरक ओढताहेत. घाण्याचा आवाज सारखा चालला आहे, हळदी-कुंकवानं पूजा केलेल्या गल्ल्याच्या पेटीजवळ गुऱ्हाळाचा मालक किंवा मालकीण बसलेली आहे, शेराशेराचे पितळी तांबे आणि पावशेर मापाचीं पितळी फुलपात्रं घांसून धुऊन चकचकीत करून ओस्याावर हारीनं मांडलेलीं आहेत, बांकावर बसलेलीं गिऱ्हाइकं पावशेर नव्हे तर शेर दोन शेर रस घेऊन पीत आहेत, असा देखावा प्रत्येक गुऱ्हाळावर दिसायचा! रसाचा भाव असे रुपयाला वीस बावीस शेर!

असा स्वताईचा आणि सुबत्तेचा तो काळ होता. त्यामुळे आमच्या शाळेचं जें वार्षिक रसपान होत असे त्यांत कुणीही कितीहि डाळ खावी आणि यथेच्छ रस प्यावा अशी व्यवस्था असे. तालीमबाज विद्यार्थ्यांना मास्तर स्वतः आग्रह करून रस पाजीत आणि बसल्या बैठकीला आठ दहा तांबे खाली करणारे बहाद्दर विद्यार्थ्यांत असत.

हें वासंतिक रसपान फक्त नूतन मराठीच्या विद्यार्थ्यांसाठी असे. पास दाखवायचा आणि आंत शिरायचं अशी व्यवस्था असे, परंतु फक्त नूतन मराठीचेच विद्यार्थी रस पीत असत असं नका समजूं. इतर शाळेंतील विद्यार्थी कसे कोण जाणे पास मिळवीत, ते न मिळाले तर दाबून प्रवेश करीत, आणि आंब्याच्या वाटल्या डाळीवर आणि अमृततुल्य ताज्या रसावर खुशाल हात मारीत. घरचा कोण, बाहेरचा आगंतुक कोण, ते देखरेख करणाऱ्या मास्तरांना ओळखून काढतां येत नसे असं नव्हे, परंतु बाहेरच्या विद्यार्थ्यांनादेखील कधी कुणी हटकलं किंवा हाकललं नाही! बोलून चालून तो स्नेहसंमेलनाचा समारंभ असे. समारंभाचं गोड खेळीमेळीचं वातावरण बिघडविण्याचा क्षुद्र विचार कुणालाहि सुचत नसे.

हें स्नेहसंमेलन आटपलं की उन्हाळ्याची सुटी सुरू होत असे. या सुटींतला आम्हा विद्यार्थ्यांचा कार्यक्रम म्हणजे नदीच्या डोहांत किंवा ठिक-ठिकाणच्या विहिरींत यथेच्छ पोहायचं, हनुमानजयंतीच्या निमित्तानं गावां-तल्या जागोजागच्या मारुतीपुढे मोठमोठ्या गाजलेल्या कीर्तनकारांची कीर्तनं ऐकायचीं! दूर अंतरावरून बेटकुळ्या फेकून कीर्तनासाठी जमलेल्या श्रोत्यांत गडबड उडवायची!... अशा स्वच्छंद आनंदाचं माझं लहानपणहि आता परत येणार नाही! आणि तो सुबत्तेचा आणि मजेचा काळहि पुन्हा येणार नाही!

* * *

## २० : हें माझं पुणं !

पुणं म्हणजे कांही माझी जन्मभूमि नव्हे. परंतु माझं बहुतेक शालेय शिक्षण आणि संपूर्ण महाविद्यालयीन शिक्षण पुण्यास झालं. मध्यंतरीं जवळ जवळ तीस वर्षे मी पुण्यापासून दूर होतों. परंतु आता मी परत पुण्यास आलों आहें आणि स्थायिक झालों आहें. साहजिकच या पुणें शहरावर माझं फार प्रेम आहे.

गेल्या वीस वर्षांत पुणें शहराचा भौगोलिक विस्तार तर कल्पनेपलीकडे वाढला आहेच, परंतु शिवाय त्याचं अंतरंग आणि बहिरंग पार बदलून गेलेलं आहे. इतकं की सध्याच्या या पुणें शहरांत वावरतांना माझ्या मनांत तर नित्य येतं की ज्या पुण्यांत माझं शिक्षण झालं आणि माझ्या नव-तारुण्यांतलीं कांही वर्षे गेलीं तें पुणें शहर आहे तरी कुठे? काळाच्या उदरांत तें संपूर्णपणे गडप झाल्यासारखं मला वाटतं. एक निराळीच विस्तीर्ण बकाली नगरी निर्माण झाल्याचा भास होतो, नव्यानं अवतीर्ण झालेली ही नगरी मला आवडते हें निराळं. परंतु हेंच तें पूर्वीचं पुणं अशी मला ओळख पटायला थोडा वेळ लागतो.

आज घटकेला राजकीय आणि सामाजिक क्षेत्रांतलं पुण्याचं स्थान कोणतंहि असो, महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी पुणंच आहे. कदाचित् पुण्यावरील प्रेमामुळे मला असं वाटत असेलहि, पण वाटतं येवढं खास. आणि बाहेरच्या इतर लोकांना काय वाटतं त्याची पर्वा मी कशाला करूं?

पन्नास वर्षांपूर्वी तर परकीयांचं राज्य असून सुद्धा महाराष्ट्राची सर्व प्रकारची वैचारिक राजधानी इथे पुण्यांतच होती. 'पुणं बोले आणि महाराष्ट्र हाले'—नव्हे, 'पुणं बोले, सबंध हिंदुस्थान हाले' अशी वस्तुस्थिती होती. लोकमान्य टिळक पुण्यांत होते. आपल्या 'केसरी' पत्रांतून कोट्यवधि देशबांधवांशी ते बोलत होते, 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' या मंत्राची शिकवण देत होते, स्वातंत्र्याच्या साऱ्या चळवळींचीं सूत्रं इथे पुण्यांत हालत होतीं. केवळ राजकीय चळवळींचंच नव्हे तर सामाजिक, धार्मिक, औद्योगिक, शैक्षणिक, अशा सर्वच घडामोडींचं उगमस्थान आणि स्फूर्तिस्थान पुणं होतं. नमुनेदार विद्यालयं आणि महाविद्यालयं कुठे होतीं ? तर पुण्यांत. स्त्रियांचा उद्धार करण्याचं कंकण बांधून संस्था काढणारीं माणसं कुठे होती ? तर पुण्यांत. सामाजिक आणि धार्मिक चळवळींचं आणि वादविवादाचं केंद्रस्थान कुठे होतं ? तर पुण्यांत. गोखल्यांचा भारत सेवकसमाज कुठे होता ? तर पुण्यांत. जुन्या संस्कृत वाङ्मयाचं संशोधन करणारी एकमेव संस्था पुण्यांत होती. कादंबरी-कारांचे आणि नाटककारांचे अग्रणी पुण्यांत होते. एका नाटक कंपनीनं बांधलेलं महाराष्ट्रांतलं एकमेव नाटकगृह पुण्यांत होतं. संगीताचे खरे दर्दी पुण्यांत आहेत अशी कलावंतांची समजूत होती. मुत्सद्द्यांचं, नेत्यांचं, विद्वानांचं, पंडितांचं, रसिकांचं आगर पुणं होतं.

त्या काळांतलं पुणं शहर लांबी रुंदीच्या दृष्टीनं केवढंसं होतं. पूर्व दिशेला रास्त्यांचा वाडा, पश्चिमेला आता ज्या पुलाला संभाजी पूल म्हणतात, तो त्यावेळचा 'लकडी पूल', दक्षिणेला आता अनाथ विद्यार्थीगृह ज्या भागांत आहे त्या भागांतलं नरसोबाचं देऊळ, आणि उत्तरेला ओंकारेश्वर आणि उत्तरेश्वर हीं देवालयं—अशा चतुःसीमांत त्या काळांतलं पुणं सामावलेलं होतं. तीन मैलांची लांबी आणि दीड मैलाची रुंदी—बस्स ! येवढाच पुण्याचा विस्तार होता. या पुणें शहरांत परोपरीच्या चळवळी सतत चाललेल्या असत, परंतु एकंदरींत शहर लहानसंच होतं, शांत होतं. परक्यांचं राज्य असूनहि माणसं अधिक सुखी होतीं.

पुण्याचं हें जुनं स्वरूप आज घटकेला एखाद्या दंतकथेसारखं खचित वाटेल. आता पुण्याचं क्षेत्रफळ शतपटीनं वाढलं आहे. ज्या भागांत पूर्वीच्या

काळांत इतकं दाट जंगल होतं कीं सूर्यास्तानंतर तिकडे फिरकण्याचीदेखील सोय नव्हती ते भाग आता दाट वस्तीचे बनले आहेत आणि तिथे मध्य-रात्रीपर्यंत माणसांची रहदारी असते. लोकवस्ती संख्येनं तर भलतीकडे फुगली आहेच, परंतु शिवाय ती बहुरंगी झाली आहे. पन्नास वर्षांच्या पूर्वीच्या पुण्यांत ज्याची मायबोली मराठी नव्हती असा माणूस क्वचितच भेटत असे. आजच्या पुण्यांत पंजाबी, सिंधी, उर्दू, कानडी, तामीळ, मद्रासी, बंगाली अशा अनेक भाषा त्या त्या विभागांत कमीजास्त प्रमाणांत ऐकूं येतात. भारतांतील बहुतेक सर्व प्रांतांच्या वेशभूषेच्या तऱ्हा दृष्टीस पडतात. महाराष्ट्रीय तरुण मुलीदेखील पंजाबी पोशाख करून हिंडूं लागल्या आहेत. पूर्वीच्या पुण्यांत फार थोडीं विश्रांतिगृहं होतीं, आणि जीं होतीं तिथे फक्त अस्सल पुणेरी खाद्यपदार्थ मिळत असत. आता जिकडे तिकडे इराणी हॉटेलं झालीं आहेत, आणि तिथे मिळणाऱ्या मांसाहारी पदार्थांचा समाचार महा-राष्ट्रीय पुरुषच नव्हे, तर स्त्रियादेखील घेत आहेत. उडुपी हॉटेलवाल्यांनी पुण्यावर चांगलंच आक्रमण केलेलं आहे, आणि इडली डोसाचा प्रकार सर्रास झाला आहे. ज्या पुण्यांत पूर्वी टांगा हें एकच वाहनाचं साधन होतं—पुणेरी टांगेवाला म्हणजे साहित्याचा विषय होण्याजोगी एक अजब वल्ली होती—त्या पुण्यांत आता रिक्षा, मोटार-गाड्या, बसेस धावूं लागल्या आहेत, आणि सायकलींची संख्या तर लाखांनी मोजावी लागत आहे. आणि इतकं झालं तरी पुणं आणखी आणखी वाढतच आहे. किती वाढणार आहे कुणास ठाऊक !

मात्र अशा प्रकारं पुण्याचं बाह्य दर्शन ओळखूं न येण्याइतकं बदललं असलं तरी या शहराचं पूर्वीचं सांस्कृतिक महत्त्व अद्यापिहि कायम आहे, वाढत आहे. 'शिक्षणाचं आदर्श केंद्र' हें वर्णन अजूनहि या शहराला लागू पडण्यासारखं आहे, विद्यालयांची आणि महाविद्यालयांची संख्या मोठी तर आहेच, परंतु शिवाय पुणें विद्यापीठ आता स्थापन झालेलं आहे. इंग्रजांच्या राजवटींत मुंबई प्रांताचा गव्हर्नर जिथे रहात असे ती विस्तीर्ण नयनरम्य सृष्टिशोभेची जागा विद्यापीठाला मिळालेली आहे. आणि या जागेंत वावरतांना पुरातन कालांतील एकाद्या ऋषीच्या आश्रमांत प्रवेश

केल्यासारखं माणसाला वाटतं. शकुंतला, प्रियंवदा, अनुसुया इथे भेटण्याचा संभव असतो. मात्र त्या तापसी कन्या नसतात. ज्या डेक्कन कॉलेजांत टिळक, आगरकर शिकले, त्या डेक्कन कॉलेजचं आता विसर्जन झालेलं आहे, परंतु त्या जागी दुसरी एक महत्त्वाची संस्था कार्य करीत आहे. भांडारकर रीसर्च इन्स्टिटय़ूशन, गोखले इकानॉमिक इन्स्टिटय़ूशन, या जुन्या संस्थांतून संशोधनाचं कार्य चालू आहेच. हिंदी भाषेचा प्रचार व प्रसार करणाऱ्या संस्था जोरांत चाललेल्या असून त्यांच्या वेगवेगळ्या परीक्षांना हजारो विद्यार्थी बसत आहेत. महाराष्ट्र साहित्य परिषदेची कचेरी पुण्यांतच आहे. तिच्याहि परीक्षांचा फायदा हजारो विद्यार्थी घेत आहेत. पूर्वीच्या पुण्यांत नगरकरांची तालीम, लोखंड्यांची तालीम, चिंचेची तालीम अशा तालमींतूनच फक्त व्यायामाचं शिक्षण मिळत असे. शाळेंत ड्रिलचा तास असे पण तो फक्त चुकविण्यासाठी असे. खेळांची सोय शाळांतून असे, परंतु तीदेखील मर्यादितच. आता शाळांतून आणि कॉलेजांतून सर्व प्रकारच्या क्रीडाप्रकारांची संघटित सोय इथे झालेली आहे, आणि शिवाय केवळ व्यायामाचं शिक्षण देणाऱ्या महाराष्ट्रीय व्यायाम मंडळासारख्या संस्थाहि उत्तम प्रकारं चालत्या आहेत. क्लब ऑफ महाराष्ट्र, महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन यासारख्या संस्थांचा व्याप वाढत आहे. सारांश, विद्येचं आणि पांडित्याचं माहेरघर ही पुण्याची कीर्ति नुसती कायमच नाही तर वाढत आहे. सर्व प्रकारचं लष्करी शिक्षण देणारी डिफेन्स ॲकॅडमी पुण्याजवळच्या खडकवासल्यास असल्यामुळे पुण्याच्या शैक्षणिक महत्त्वांत आणखीनच भर पडली आहे. पुण्याच्या रस्त्यानं चालणाऱ्या माणसाला भेटणाऱ्या प्रत्येक दहा माणसांत एक विद्यार्थी आणि अर्धी विद्यार्थिनी असं गणित आकडेशास्त्रज्ञानं मांडलेलं आहे.

पन्नास वर्षांपूर्वीच्या पुण्यांत 'केसरी' आणि 'ज्ञानप्रकाश' अशीं दोनच वृत्तपत्रं होतीं. 'केसरी' साप्ताहिक होता. 'ज्ञानप्रकाश' दैनिक होता. आता सकाळचीं-संध्याकाळचीं अशीं कितीतरी वृत्तपत्रं पुण्यांत निघतात. त्यांच्या भरीला साप्ताहिकं आहेत, मासिकं आहेत. परगांवचीं मासिकं कितीतरी पुण्यास येऊन आपले संसार थाटीत आहेत. लोकशिक्षणाचं आणि मतप्रचाराचं

काम करण्यासाठी व्याख्यानं नित्य झडत आहेतच. पूर्वीं चार-पांचशे, हजार श्रोते हजर असले की ती मोठी सभा ठरत असे. आता मोठी सभा म्हटली कीं पंचवीस-तीस हजारांचा जमाव लोटतो. पंडित नेहरू बोलणार असले की लोकांची गर्दी लाखानं मोजावी लागते.

नव्यानं निर्माण झालेलं पुणे शहर अशा प्रकारं बहुरंगी आणि बहुढंगी झालेलं आहे. या नगरीची हवा सर्व ऋतूंत मोठी सुखाची आणि प्रसन्न असते. ' स्वस्ताई ' हा शब्दच आता आपल्या कोशांतून नाहीसा होत आहे. पूर्वीं मध्यम वर्गीय कुटुंबाची भाजी दोन आण्यांत खरेदी करतां येत होती. आता दिवसापुरती भाजी घ्यावयाची तर आठ-बारा आणे फेकावे लागतात, परंतु परोपरींच्या भाज्या आणि फळं इथे बारा मास मुबलक मिळतात. फुले मंडईत सकाळच्या प्रहरी घटकाभर हिंडा, तिथले त्याच्या भाज्यांचे व फळांचे ढीगच्या ढींग पाहून तुमचे डोळे खचित निवतील. लग्न थाटानं करावयाचं असेल तर पुण्यास करावं, असे बाहेरगांवचे लोक अजून म्हणतात.

आजच्या पुण्यांत वावरतांना पूर्वीच्या पुण्यांतल्या कांहीं कांही गोष्टी न दिसल्यामुळे मला कधी कधी खेद वाटतो. रसाचं गुऱ्हाळ म्हणजे पूर्वींची एक विलोभनीय संस्था होती. बैलांनी ओढल्या जाणाऱ्या घाण्याचा तो आवाज, दुकानाच्या दर्शनी भागांत मांडलेली स्वच्छ सुंदर पितळेची भांडी अशा गोष्टींमुळे त्या जागेला मोठी शोभा येत असे. आणि त्यावेळी एक रुपयाला सोळा शेर रस मिळत असे हे सांगितलं तर आज कुणाला खरंहि वाटणार नाही. पूर्वींच्या पुण्यांत फरासखान्यासमोरचा जो बुधवार पेठेचा भाग होता, तिथे फुलवाल्यांचीं दुकानं म्हणजे एक विलक्षण शोभा होती. तीं गुऱ्हाळं आता गेलीं, फुलवाल्यांचीं तीं दुकानं आता पूर्वींसारखी वाटत नाहीत. जुन्या पुण्याच्या सौंदर्याच्या अशा किती तरी खुणा काळानं पुसून टाकल्या आहेत. मुख्य म्हणजे शांत सुखी जीवनक्रम आता दुर्मिळ झाला आहे. आता या पुण्यांत जिकडे तिकडे गर्दी, धावपळ, घाई दृष्टीस पडते. अपघात वाढले आहेत. चोऱ्यामाऱ्या. वाढल्या आहेत. आयुष्य गुंतागुंतीचं झालं आहे. परंतु याचंच नांव कदाचित् ' आधुनिकता ' असेल. आणि

म्हणूनच त्याचा खेद मला वाटत नाही. हें पुणं आजदेखील मला अत्यंत प्रिय आहे. मी पुष्कळ प्रवास केला आहे. शहरं पाहिलीं आहेत, तीर्थक्षेत्रं पाहिलीं आहेत. काश्मिर, केरळसारख्या भागांतलीं निसर्गशोभेचीं रम्य स्थळं पाहिलीं आहेत. परंतु तीं पाहूनहि माझी अशीच भावना आहे कीं पुण्यासारखं दुसरं शहर नाहीं! 'नाही सर शहर पुण्याची' अशा शब्दांत लावणीकारांनी त्यावेळच्या पुण्याची जी प्रशंसा केली ती आजहि यथार्थच वाटते.

* * *

## २१ : खाऱ्या पाण्याखालची गंगा !

श्रीशिवाजी विश्वविद्यालय कमिशनच्या कामासाठी कांही महिन्यांपूर्वी कोल्हापुरास मी गेलों होतों, त्या वेळेस कोल्हापुरच्या जुन्या मित्रांनी मला वरचेवर एकच प्रश्न केला, 'तुम्ही कोल्हापुरास होतां त्या वेळच्या कोल्हापुरांत आणि आजच्या कोल्हापुरांत काय फरक दिसतो तुम्हांला ? वाढतंय का आमचं शहर ?' त्यांचा हा प्रश्न ऐकून माझ्या मनांत जे विचार येत होते ते सगळेच त्यांना आवडतील असे नव्हते, आणि म्हणून त्यांच्या त्या प्रश्नाचं संपूर्ण उत्तर देण्याचं टाळून मी त्यांचं बोलणं हसण्यावारी नेत होतों.

वाढतंय का आमचं कोल्हापूर ?...हें काय विचारणं ? हातच्या कांकणाला आरसा कशाला हवा ? कोल्हापूर शहराची चौफेर वाढ चाललेली अगदी उघडउघड दिसण्यासारखी आहे. देशांतलीं सारींच शहरं भरारा वाढता आहेत. कोल्हापूरसुद्धा वाढतं आहे. राजाराम कॉलेजांतल्या नोकरीच्या निमित्तानं १९२६ पासून तेवीस वर्षं मीं कोल्हापुरांत काढलीं. त्या काळांतलं कोल्हापूर आता इतकं पालटून गेलेलं आहे की त्याची खूण पटणं कठीण झालं आहे. राजाराम कॉलेजांतली नोकरी पत्करण्याच्या आधी मी कोल्हापुरास प्रथम गेलों १९१९ सालीं. त्या वेळेस शाहूमहाराजांची कारकीर्द चालू होती. त्या वेळचं कोल्हापूर तर आता काळाच्या उदरांत सर्वस्वी गडप झालेलं आहे !

शाहूमहाराजांच्या वेळचं तें कोल्हापूर म्हणजे ज्या शहराची संपूर्ण प्रदक्षिणा पायीं चालतांचालतां दोन घटकांत पुरी करतां यावी एवढ्याच विस्ताराचं

लहानसं शहर होतं. शहर कसलं ? जरा मोठ्या आकाराचं खेडेगांवच होतं म्हणा ना ! शांत, सुखासीन, झोपी गेल्यासारखं ! नागरिकांचे सारे व्यवहार कसे सावकाश, धीम्या, ठाय लयींत चालत असत. घाई, गडबड, धावपळ, धांदल हे शब्दच शहराच्या कोशांत नव्हते. शहरांत रुंद असा मोठा राजरस्ता एकच होता. नव्या राजवाड्यापासून जुन्या राजवाड्यापर्यंत जाणारा. ‘ बस ’ ही वस्तु लोकांनी कधी ऐकली नव्हती. मोटार दिसूं लागली होती. परंतु ती देखील क्वचित्. शाहू महाराजांच्या ‘ गराज ’ मध्ये चार किंमती मोटारगाड्या असतील. परंतु हें साहेबांचं वाहन महाराजांच्या मर्जीतलं नव्हतं. ते स्वतः शहरांतून हिंडत असत दोन किंवा चार घोड्यांच्या ‘ खडखडीं ’ तून ! त्यांची ही ‘ खडखडी ’ मुख्य रस्त्यानं कधी जाईल त्याचा नेम नसे. ‘ खडखडी ’ चा आवाज ऐकूं आला की, रंगीबेरंगी साफे बांधलेले पादचारी प्रजाजन दुतर्फा उभे रहात, महाराजांना वांकून अस्सल कोल्हापुरी थाटाचा मुजरा करीत. जुन्या राजवाड्याच्या कमानींत ‘ खडखडी ’ शिरली की, माथ्यावरच्या नगारखान्यांत टिपरी झडत असे. राजरस्त्यावरच्या बाजारपेठेंतल्या संथ आणि थंड वातावरणांत गडबड आणि धांदल यांची लहानशी लाट उठविणारी घटना एवढीच असे.

चालू शतकाच्या पहिल्या दोन दशकांतलं हें कोल्हापूर आता पूर्णतः नामशेष झालं आहे. स्वतः शाहूमहाराज कांहीं चमत्कारानं पुन्हा आले आणि आजच्या कोल्हापुराचं दर्शन त्यांनी घेतलं तर त्यांना आपल्या राजधानीची ओळख पटणार नाही. ते म्हणतील, “ हें माझं कोल्हापूर ! काय राव, मस्करी करतां व्हय ! ”

आणि राजाराम कॉलेजांतल्या नोकरीच्या काळांत जें कोल्हापूर मीं बघितलं तें तरी आज घटकेला जागेवर आहे म्हणतां काय ? काळाच्या पाणलोटानं पंधरा वर्षांपूर्वीचं तें शहर पार नाहीसं केलं आहे !

आधी मुळी कोल्हापुरच्या रेल्वे स्टेशनावर आज घटकेला मी उतरलों, की मोठा बदल लक्षांत येतो. कलात्मक बांधणीचं जुनं छोटंसं रेल्वे स्टेशन जाऊन आता त्या जागी खूप मोठं स्टेशन उभं राहिलेलं आहे. छोट्या स्टेशनाचं मोठं स्टेशन झालं याचा आनंद मला तरी होत नाही. कारण हें नवं स्टेशन मोठं

आहे, परंतु कलात्मकतेचा गंधदेखील त्याला नाहीं. इमारत मोठी आहे, परंतु ती बकाली वाटते. पूर्वी गाडींतून कोल्हापुरच्या स्टेशनावर पाय ठेवला की, कसं शांत, स्तब्ध वाटायचं. घरीं आल्यासारखं वाटायचं. तिथल्या विश्रब्ध वातावरणानं मनाला प्रसन्नता वाटायची. स्टेशनाच्या बाहेर पडलं की, दहा वीस टांग्यांची रांग दिसावयाची. टांग्यांना जोडलेले सारे घोडे कसे उमदे दिमाखदार असायचे. हाकायला बसलेले सारे टांगेवाले पहिलवानासारखे दिसायचे. त्यांच्या अंगावर खाकी मळकट गणवेष नसायचा. उत्तमपैकीं मलमलीचे शुभ्र मुंडेछाट खमीस, आणि मोतिया, केशरी, गुलाबी फिक्कट निळा अशा रंगाचे साफे—असा त्यांचा वेष असायचा. आता स्टेशनाबाहेर पडलं की, मरतुकड्या घोड्यांचे टांगे, मोटारी, टॅक्सी, ट्रक्स यांची बेशिस्त खिचडी दृष्टीस पडते, आणि असा कलकलाट कानांवर येतो की ऐकवत नाही.

कोल्हापूर शहराचा विस्तार चारी दिशांनी झाला आहे. पूर्वी कोल्हापुरला पाठविण्याच्या पत्रावर ‘ कोल्हापूर ’ एवढं लिहिलं की पुरत असे. आता कोल्हापूरच्या पुढे एक दोन तीन असा कांही क्रमांक लिहावा लागतो. यावरूनच शहराचा विस्तार केवढा झाला आहे बघा. परंतु हा सारा विस्तार अव्यवस्थित आहे, बेशिस्त आहे; यामागे पूर्वनियोजन नाही, नकाशा नाही, कलात्मक मांडणी तर मुळीच नाही. रानांतला निवडुंग वाढावा तशी वस्ती वाढली आहे, लहानमोठ्या इमारती बांधल्या गेल्या आहेत, धुळीनं माखलेले, खाचखळग्यांनी भरलेले रस्ते फुटले आहेत, छोटेछोटे कारखाने तर इतके बेसुमार वाढले आहेत की सांगतां सोय नाही. या कारखान्यांत सारखे यंत्रांचे आवाज होत असतात, खटखट चालू असते. कारखान्यांतल्या कच्च्या आणि पक्क्या मालांचे ढीग जिकडेतिकडे पडलेले असतात. त्यांतच बाजार भरलेला आढळतो. पादचारी माणसं आणि दोन चाकांचीं वहानं यांची रहदारी सतत चालू असते. अपघातानं माणसं मरत कशीं नाहींत याचं आश्चर्य वाटतं.

कोल्हापूर मोठं शहर झालं यांत शंकाच नाही. जिथली वस्ती पूर्वीं हजारानं मोजतां येत होती तिथली वस्ती आता लाखाच्या हिशेबानं मोजावी

लागते आहे. उद्योगधंदे वाढले आहेत. नागरिकांचं आरोग्य झपाट्यानं बिघडतं आहे, त्यामुळे डॉक्टरांच्या पाट्या जिकडेतिकडे दिसताहेत. प्रसूति-गृहांची संख्या वाढली आहे. कज्जेदलालीला जोर चढला आहे. वकिलांच्या पाट्या मुबलक झाल्या आहेत. शिक्षणाचा प्रसार झाला आहे. प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, यांची रेलचेल आहे. कॉलेजं आहेत. आता विश्वविद्यालय होऊं घातलं आहे. सारांश, मोठ्या शहराची साक्ष पटविणारे अठरा कारखाने कोल्हापुरांत सुरू आहेत...पूर्वीचा शांतपणा गेला, विश्रब्धता नाहीशी झाली, सुखासीनता हरपली. आता या शहरावर राज्य आहे कटकटीचं, धावपळीचं, बकालीपणाचं ! कोल्हापूरचा नागरिक आता एकजिनसी राहिला नाही. आता कोल्हापूरच्या रस्त्यांत केवळ मराठमोळा पुरुष आणि मराठमोळी स्त्री दिसत नाहीं. इथे पंजाबी आहेत, सिंधी आहेत, शीख आहेत. मद्रासी दिसतात, उडुपी दिसतात ! अस्सल कोल्हा-पुरी भाषा ऐकूं येण्याऐवजी साऱ्या भाषा ऐकूं येतात !...ऐतिहासिक परंपरेचं आणि महत्त्वाचं कोल्हापूर हरवल्यासारखं वाटतं आणि मनावर खिन्नता पसरते.

परंतु कोल्हापूर खरोखरच हरवलं आहे काय ?

कोल्हापूर शहराच्या परिसरांत हिंडणाऱ्या माणसानं जरा चौकस नजरेनं बघितलं तर जुन्या कोल्हापुराच्या खुणा पटविणाऱ्या कितीक गोष्टी त्याला दिसतील.

पूर्वीचं संस्थानी वैभव आता बिलकुल उरलेलं नाही. त्या वैभवाचे जे अवशेष आढळतात त्याचं दर्शन सुखाचं वाटत नाही. तीन राजवाडे आहेत. परंतु त्यांना केविलवाणी अवकळा आलेली आहे. राजाराम महाराजांनी शर्यतीच्या घोड्यांचा षोक केला. घोड्यांसाठी असे ऐश्वर्यसंपन्न तबेले बांधले की, माणसांना जनावरांचा हेवा वाटावा. आता त्या तबेल्यांची जागा मोकळी पडलेली दिसते. कोल्हापूरचा रिसाला होता, त्या जागेंत आता कचेऱ्या आल्या आहेत. हत्तींच्या साठमारीचा षोक शाहूमहाराजांनी केला, त्या ठिकाणीं आता फक्त पडक्या भिंती आणि ढांसळलेले बुरूज उरले आहेत. जुन्या राजवाड्यांतल्या अंबाबाईच्या देवळांत पूर्वी नित्य गाणं-

वाजवणं होत असे, तिथे आता उदासवाणी शांतता पसरली आहे. हीं स्थळं पाहिलीं कीं, ' गेले ते दिवस ! ' असा खेदाचा उद्‌गार तोंडांतून निघतो. परंतु इतर अनेक स्थळं अशीं आहेत की, ज्यांचं दर्शन जुन्या कोल्हापुराची साक्ष पटवितं आणि आनंदहि देतं.

कोल्हापुरचं राजाराम हायस्कूल आणि राजाराम कॉलेज दोन्ही जुन्या शिक्षणसंस्था आता भरभराटलेल्या आहेत. समर्थ विद्यालय स्थापणारे अण्णासाहेब विजापुरकर, सुप्रसिद्ध साहित्यिक वामन मल्हार जोशी, नामदार गोपाळ कृष्ण गोखले, अशा अनेक थोर व्यक्तींचा वावर या संस्थांत झाला होता. त्यांची परंपरा चालू ठेवण्यासाठी या संस्था झटत आहेत. राजाराम कॉलेजच्या सभागृहांत तुम्ही गेलांत तर ज्यांनी कॉलेजची कीर्ति वाढविली आणि राष्ट्राची सेवा केली अशा अनेक व्यक्तींचीं चित्रं तुम्हांला पाहावयास मिळतील. शिक्षणाप्रमाणेच संगीताच्या क्षेत्रांतही कोल्हापूर शहराला मोठी परंपरा आहे. आणि देवल क्लबाच्या इमारतींत तुम्ही गेलांत तर त्या परंपरेची साक्ष तुम्हांला पटेल. या इमारतीच्या समोर अल्लादिया खाँहेबांच्या सुंदर पुतळ्याचं दर्शन तुम्हांला घडेल, देवल क्लबापासून थोड्याच अंतरावर जुनं पॅलेस थिएटर केशवराव भोसल्यांच्या नव्या नांवानं खडं आहे. या रंगमंदिरांत जुन्या काळचीं किती गद्य आणि संगीत नाटकं रंगलीं. वीस वर्षांपूर्वी असा खडतर काळ येऊन गेला की, महाराष्ट्रांतल्या साऱ्या नाटकगृहांचं सिनेमा थिएटरांत रूपांतर झालं. त्या काळांत केवळ नाट्य-प्रयोगासाठीच खुलं राहिलेलं सबंध महाराष्ट्रांत पॅलेस थिएटर हें एकच होतं कोल्हापूरकरांच्या नाट्यप्रेमाची परंपरा या रंगमंदिरांत आज घटकेलाहि टिकलेली आहे. या रंगमंदिराच्या पिछाडीला कुस्तीचं मोठं मैदान आहे. या मैदानांत शाहू महाराजांच्या काळांत किती अविस्मरणीय कुस्त्या झाल्या, तिथल्या हौद्यांतली लाल माती अखिल भारतीय कीर्तीच्या किती कुस्तीगीरांच्या अंगाला लागली, त्याला गणती नाही. तीसतीस चाळीस चाळीस हजार प्रेक्षकांनी हें सुंदर भव्य मैदान फुलून जात असे. अजूनहि या मैदानांत कुस्त्यांची अशीं दंगल भरते.

जुन्या काळांत कोल्हापुरच्या दोन गोष्टी फार प्रसिद्ध होत्या. कोल्हापुरचा गूळ आणि बायकांनी गळ्यांत घालायचा कोल्हापुरी साज. या दोन्ही वस्तूंचं

माहात्म्य आजहि कायम आहे. रेल्वेस्टेशनावरून शहराकडे तुम्हीं निघालांत कीं, प्रारंभीच तुम्हांला गुळाची पेठ लागते. गुळाच्या मोसमांत या पेठेंत पांचशें गाडी उभी असलेली तुम्हांला दिसेल, सुंदर केशरी रंगाचे गुळाचे रवे हजारोंच्या ढिगांनी रचलेले दिसतील, सारं आसमंत गुळचट ओलसर उन्मादक सुगंधानं भरलेलं आढळेल. कोल्हापुरी साज विकणाऱ्या सराफ कट्टयावरच्या दुकानांत विक्रीची गडबड चाललेली तुम्हांला आढळेल... आणि जुन्या काळांतला भाविकपणा झपाट्यानं ओसरला असला तरी अंबाबाईच्या देवालयांत यात्रेकरूंची गर्दी बारा महिने सकाळीं संध्याकाळीं तुम्हांला आढळेलच.

आणि तुमची खात्री पटेल कीं, सहज ओळखूं येऊं नये इतकं कोल्हापूर बदललं असलं, तरी शहराचा जुना मुख्य गाभा कायम आहे. कोल्हापूरचा माणूस हा मूळचा मराठमोळा शेतकरी. अंबाबाईचा भक्त. तालमीचा षोक करणारा. जमेल तर व्यापार करणारा. पुढे शाहू महाराजांनी या मराठमोळा माणसांना शिक्षणाची गोडी लावली. संगीताची आणि नाटकांची रुचि शिकविली. कुस्त्यांचे फड दाखविले. ताराबाई राणीसाहेबांनी स्थापन केलेल्या या राजधानीच्या प्रकृतीला आणि व्यक्तित्वाला अनेक पैलू पडले. विद्येची गोडी, चित्रकलेचा ध्यास, संगीताचं आणि नाट्याचं व्यसन, मल्लयुद्धाची आवड, शेती आणि व्यापार यांतलं कसब, आणि अंबाबाईवरची श्रद्धा, अशीं अनेक वैशिष्टयं कोल्हापूर शहराच्या प्रकृतीला समाविष्ट झालीं.

हीं वैशिष्टयं आज घटकेला देखील कायम आहेत. कोल्हापूर शहर कितीहि बकाली झालं तरी त्या बकालीपणाच्या आवरणाखाली कोल्हापूरची मूळ प्रकृति आजहि स्पष्ट दिसण्यासारखी आहे. यांत्रिक प्रगतीच्या आणि शहरी जीवनाच्या खाऱ्या पाण्याचा लोंढा कितीहि वाढला तरी कोल्हापूरच्या अस्सल व्यक्तित्वाचं गंगोदक झुळूझुळू वाहतांना नेहमी दिसणारच !

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम.................................. वि: ..........................
.................................. नों: वि: ..........................

## २२ : पेशानं हुजऱ्या, परंतु वृत्तीनं रसिकाग्रणी

" या पाटील ! "

१९१७ सालीं मी कोल्हापुरास प्रथम गेलों तेव्हा ज्यांच्या घरीं उतरलों होतों ते श्री. बापूराव शाळीग्राम दाराकडे बघून म्हणाले, आणि मला त्यांनीं सांगितलं, " हे आमचे केशवराव पाटील."

" असं काय ? " असं म्हणून दाराच्या चौकटींत थबकलेल्या व्यक्तीकडे नजर टाकली, त्या व्यक्तीनं केलेल्या कोल्हापुरी थाटाच्या अभिवादनाचा उलट नमस्कारानं स्वीकार करून म्हटलं, " या बसा."

परंतु केशवराव पाटील बसले नाहीत. संस्थानी अदब त्यांच्या रोमरोमांत भिनलेली होती; ते उभेच राहिले.

बापूरावांनी उठून, त्यांचा हात ओढून " बसा हो ! " म्हटलं तेव्हा ते खाली टेकले. परंतु बैठकीच्या कडेला अवघडल्यासारखेच !

केशवराव पाटलांची आणि माझी ही पहिलीच भेट !

पुढच्या आठनऊ वर्षांत कोल्हापुरास माझ्या दोनतीन फेऱ्या झाल्या. १९२६ साली तर अण्णासाहेब लठ्ठे यांच्या आग्रहावरून मी राजाराम कॉलेजांतील नोकरी पत्करली, आणि नंतर जवळजवळ पंचवीस वर्षे मी कोल्हापुरांत राहिलों.

या दीर्घ काळांत माझा आणि केशवराव पाटील यांचा नित्य सहवास घडला, तो कोल्हापूर सोडून पुण्यास कायम राहण्यासाठी आलों तोंपर्यंत

कायम होता. आता मी कोल्हापुरास कधी गेलों की चुकल्या चुकल्यासारखं होतं. कारण केशवराव भेटत नाहीत. ज्या ठिकाणीं जाणारा मुशाफीर कधी परत येत नाही अशा ठिकाणीं ते गेले आहेत. माझ्या हृदयांत मात्र अगदी खोल जागीं त्यांची आठवण कोरलेली आहे. अगदी पहिल्या भेटीच्या वेळेस ते जसे मला दिसले होते तसे ते मला अजून दिसतात. तालमीचा षोक करून कमावलेल्या प्रमाणबद्ध अंगलटीचे; पैलवानी थाटानं कसलेले; स्वच्छ तलम धोतर, अंगांत परीटघडी शर्ट, किंमती गरम कापडाचा झोकदार कोट, मोतिया रंगाचा मलमलीचा कडकडीत साफा डोक्याला झोकदार रीतींनं बांधलेला अशा वेषांतले; भरदार मानेचे, मोठ्या डोळ्यांचे, सरळ नाकाचे, गव्हासारख्या तांबूस वर्णाचे ! हसतमुख !

केशवराव पाटलांची ही मूर्ति माझ्याप्रमाणे कितीक साहित्यिकांच्या, कलावंतांच्या, नटनटींच्या, अंमलदारांच्या, प्रवचनकारांच्या, कीर्तनकारांच्या, कुस्तीगीरांच्या स्मरणांत कायमची राहिलेली असेल.

असे हे केशवराव पाटील कोण होते ?

शाहूमहाराजांचे ते एक हुजरे होते. पुढे पुढे मोतीबाग कामगार हा हुद्दा त्यांना मिळाला होता.

यामुळेच कोल्हापुरास येणाऱ्या दरबारी पाहुण्यांची सरबराई करण्याची संधि त्यांना मिळत असे. आणि दरबारी आमंत्रणावरून नव्हे तर इतर कारणानं कुणीहि मोठा माणूस कोल्हापुरास आला की केशवराव पाटील आपल्याकडून होईल तेवढी त्याची सरबराई करीत असत. कोल्हापुरास येऊन जाणाऱ्या पाहुण्यावर केशवरावांच्या बुद्धीची, रसिकतेची, आणि नम्रतेची छाप पडल्यावाचून रहात नसे.

गोहरजानसारख्या अनेक गायिका, अल्लादियाँसारखे गवय्ये, गोविंदराव टेंब्यांसारखे कलावंत, गणपतराव जोश्यांसारखे नट, गामा-गुंगासारखे मल्ल, लेखक, कवी, वक्ते—साऱ्यांना केशवराव पाटील प्रिय होते.

या गृहस्थाचा पेशा होता हुजऱ्याचा. नोकरी होती राजकुलांतल्या व्यक्तींची सेवा करण्याची. धर्म होता “ जी हुजूर ” म्हणण्याचा, सर-

कारची मर्जी सांभाळण्याचा. परंतु या गृहस्थाचं मन आणि अंतःकरण फार विशाल होतं. अभिरुचि फार उच्च होती. व्यसन कलेचं होतं. वाचन कादंबरीपासून तों ज्ञानेश्वरीपर्यंत सर्व विषयांचं होतं. वृत्ति होती संगीत, नृत्य, कुस्ती, क्रिकेट, अशा साऱ्या कलांतला रस चाखण्याची!

गोविंदराव टेंबे यांनी आपल्या आत्मचरित्रांत केशवराव पाटील यांचा उल्लेख केलेला आहे. कोल्हापुरांतल्या एका मेळ्यांत पायपेटी वाजविण्याचं काम गोविंदराव टेंब्यांनी आपल्या संगीत तपस्येच्या प्रारंभीं केलं तेव्हां डोक्यावर पायपेटी घेऊन मेळ्याबरोबर हिंडले केशवराव पाटील! श्री. बाबूराव पेंढारकर यांच्या आत्मचरित्रांतहि केशवरावांचा उल्लेख आहे.

असे हे केशवराव पाटील माझे एक आवडते मित्र झाले यांत आश्चर्य कसलं? कोल्हापुरांतल्या ज्या कित्येक व्यक्ती माझ्या स्मरणांतून कधींहि जाणार नाहीत अशा व्यक्तींत केशवराव पाटलांना फार वरचं स्थान आहे.

माझ्याविषयी त्यांच्या भावनेचं स्वरूप थोडंसं अंधभक्तीचं होतं. परंतु हा भाग सोडला तर त्यांची बुद्धि मार्मिक आणि चिकित्सक होती. त्यांची वाहवा मिळाली की मला बरं वाटत असे. माझी प्रत्येक गोष्ट ते आवर्जून वाचीत असत. माझ्या प्रत्येक व्याख्यानाला ते हजर रहात असत. ते नेहमी मला म्हणायचे, "तुमच्या व्याख्यानाहून घरीं परतलेल्या लोकांच्या गर्दींत मिसळलं की लोकांचे आपापसांत जे प्रशंसोद्‌गार निघतात ते तुम्हांला कुठे ऐकायला मिळतात? ते आम्ही ऐकतों, आणि आमचं पोट भरतं!"

ज्याचं माध्यमिक शाळेंतलं शिक्षणदेखील जेमतेमच झालं होतं असा हा माणूस होता. परंतु निदिध्यासानं आणि अभ्यासानं यानं आपली रसग्रहण-शक्ति फार वाढविली होती. सामान्य दर्जाचं व्याख्यान किंवा लिखाण केशव-रावांना कधीच पटत नसे. आणि चांगल्या लेखनांतील सारे बारकावे टिपण्या-इतकी त्यांची नजर सराईत झाली होती. हा माणूस सौंदर्याचा विलक्षण भोक्ता होता. खरं सौंदर्य याला दिसलं की हा लुब्ध होत असे. कुस्ती असो, घोड्यांची शर्यत असो, क्रिकेटचा सामना असो, गाणंवाजवणं, नाच असो, नाटक असो, व्याख्यान असो, प्रवचन असो—जें सामान्य तें केशवराव पाटलांना कधीच पटलं नाही. आणि जें असामान्य, मोहक, सुंदर त्यानं केशवराव पाटील झपाटले गेले नाहीत असं कधी झालं नाही.

सुंदर आणि असुंदर यांच्यांतील फरकाचं वर्णन करतांना केशवराव पाटील एक फार बहारीची उपमा वापरीत असत. त्यांना जो कपड्यांचा जन्मजात षोक होता त्यामुळे त्यांना ती उपमा सुचली होती. 'कॉटन' म्हणजे' कमी प्रतीचा सुती कपडा, आणि 'वूलन' म्हणजे भारी किंमतीचा उंची कपडा. एखाद्या गवयाला उद्देशून ते म्हणत, "हें गाणं कॉटन आहे हो." आणि जें गाणं त्यांना आवडत असे त्याला ते "वूलन" हें विशेषण देत असत. एखादा माणूस लोभी, मत्सरी, अनुदार दिसला की "हा माणूस कॉटन आहे" असा उद्‌गार ते काढीत असत. अशा माणसांच्या संगतींत ते बिलकूल रमत नसत. त्यांचं बसणं, उठणं जाणं, येणं असे जीं माणसं त्यांना 'वूलन' वाटत त्यांच्यांत. आणि अशा 'वूलन' माणसांची कितीहि मैत्री झाली तरी केशवराव पाटील त्यांच्याशीं मांडीला मांडी लावून बसले असं कधी झालं नाही. जन्मानं, पेशानं, शिक्षणानं आपण फार खालच्या दर्जाचे आहोत याचा विसर त्यांना कधी पडला नाही.

त्यांची रसग्रहणशक्ति जशी उंच होती त्याप्रमाणेच त्यांची निरीक्षणशक्ति आणि जें पाहिलं तें वर्णन करण्याची शक्तीहि असामान्य होती. मी 'रत्नाकर' मासिकाचं संपादन करीत असतांना क्रिकेट, टेनिस, हॉकी, इत्यादि खेळांचीं वर्णनं मराठी वाचकांना सादर करण्याचा प्रयत्न विशेष कटाक्षानं केला. या क्षणाला मला नक्की साल आठवत नाही. परंतु बहुधा १९२६ साली, गामा आणि झिस्को यांची कुस्ती पतियाळाला झाली. तिचं वर्णन मी 'रत्नाकर' मासिकांत केलं तें कुस्ती पाहून आलेल्या पाटलांच्या तोंडचं वर्णन ऐकूनच !

कुस्ती हा पाटलांच्या मोठ्या आवडीचा विषय. त्यांनी पाहिलेल्या मोठमोठ्या कुस्त्यांचीं वर्णनं ते करूं लागले की मोठी मजा यायची. शाहू महाराजांच्या कारकीर्दींत अखिल भारतीय कीर्तीचे झाडून सारे मल्ल कोल्हापुरांत येऊन गेले. या मोठमोठ्या कुस्तीगीरांचीं, त्यांच्या विशिष्ट डावांचीं, त्यांच्या खुराकाचीं, मेहनतीचीं, स्वभावदोषांचीं वर्णनं करावींत पाटलांनीच. पाटील म्हणचे मल्लविद्येच्या इतिहासाचा चालताबोलता ग्रंथ होता.

कुस्त्यांच्या दंगलीसाठी मैदानांत हजर राहणारा हा माणूस गाण्या-वाजवण्याच्या मैफलींतहि तितक्याच उत्सुकतेनं हजर राहायचा. व्याख्यानाच्या सभागृहांतहि ! क्रिकेटच्या सामन्यांसाठीहि ! आणि ज्ञानेश्वरीवरचं प्रवचन ऐकण्यासाठीहि !

' ज्ञानेश्वरी ' म्हणजे पाटलांचा पूजाग्रंथ होता. पहाटे उठून थंड पाण्यानं स्नान केल्यानंतर पाटलांनी मोतीबागेतली सुंदर फुलं ज्ञानेश्वरीला वहावींत आणि ग्रंथाचं नियमानं वाचन करावं. आंधळेपणानं नव्हे. ओवी-ओवीचा अर्थ समजून. ही ध्यानधारणा आटोपल्यानंतर त्यांनी कपडे करावे. तेवढ्यांत सकाळीं रपेटीसाठी गेलेल्या राजकुळांतल्या मंडळींचं जुन्या राजवाड्याच्या प्रशस्त पटांगणांत आगमन व्हावं. सूर्याचीं कोवळीं किरणं पसरलेलीं असावीं. घामानं डबडबलेलीं घोडीं फुरफुरत लगामाला हिसके देत असावीं. घोड्यांवर आरूढ झालेल्या मंडळींना चहा देण्याचं काम पाटलांकडे असे. चहा आटपला, मंडळी निघाली, नगारखान्यावर टिपरी पडली, सनईचे उंच स्वर हवेंत घुमले, प्रवेशद्वारांतल्या फरशीवर बाहेर पडणाऱ्या घोड्यांच्या टापा वाजल्या म्हणजे केशवराव पाटील आपल्या ड्यूटींतून सुटायचे. मग स्वारी निघायची दर्शनासाठी. देवांच्या ! आणि मित्रांच्या !

जे मित्र त्यांना फार आवडत असत त्यांना ते ' देव ' म्हणत असत. साधींभोळीं, सरळ अंतःकरणाचीं प्रेमळ माणसं पाटलांच्या दृष्टीनं ' देव ' कोटींतलीं होतीं. " माझ्या हिराबाई माझ्या देव आहेत " हा त्यांचा ठराविक उद्‌गार. श्री गोविंदराव टेंबे आणि मी पाटलांच्या मतानं ' देव ' नव्हतों. टेंबे तर ' दैत्य 'च होते. मी दैत्य नव्हतों, पण देवहि नव्हतों. मधली कुठली तरी जागा माझी होती. पण गंमत अशी की, केशवराव पाटलांचं प्रेम देवांइतकंच दैत्यांवरहि होतं. ' दैत्य ' ही किताबत देखील त्यांच्या प्रीतीचीच निदर्शक होती. ' देवां 'ना कांहीहि खाऊं पिऊं घातलं तरी ते गोड करून घेत असत. पण आम्हां दैत्यांची सरबराई पाटलांना फार कसोशीनं करावी लागत असे. आणि ती करण्यांत त्यांना मोठी धन्यता वाटत असे.

महिना दीड महिना होऊन गेला की पाटलांच्या घरीं टेंब्यांना, मला, आणि चार निवडक स्नेह्यांना खरी ओली पार्टी असायचीच. सारा बेत अगदी पहिल्या प्रतीचा असायचा. व्हिस्की असायची ती आमच्यासाठी मुद्दाम राखून ठेवलेली—मोतीबागेच्या कोठीतली ! जेवण असायचं तें देखील खानदान मराठा पद्धतीचं, मुबलक उंची मसाल्याचं ! या बैठकींत जुन्या-नव्या गप्पा निघायच्या. फार मजा यायची. परंतु नेहमी कशावरून तरी केशवराव पाटील आणि गोविंदराव टेंबे यांचा वाद निघायचा. अगदी हमरीतुमरीवर बोलणं यायचं. केशवरावांच्या घराव्यतिरिक्त इतर ठिकाणीं अशी पार्टी झाली की या हमरीतुमरीचा कळस ठरलेला. केशवरावांनी रागारागानं डोक्याला साफा गुंडाळायचा आणि बैठकींतून निघून जायचं. या विचित्र प्रकाराची इतकी सवय आम्हांला झाली होती की पाटील असे तावातावानं निघून गेले की गोविंदराव टेंबे म्हणायचे, “झाला एकदा भरतवाक्याचा कोरस !”

आणि दुसऱ्या दिवशीं कॉलेजांत जातांना नित्यक्रमाप्रमाणे पान खाण्या-साठी आणि पाच मिनिटं गप्पा मारण्यासाठी गोविंदरावांची माडी चढून मी जावं आणि पहावं तों शुचिर्भूत ताजेतवाने झालेले, ऐटबाज कपडे केलेले पाटील गोविंदराव टेंब्यांच्या समोर बसलेले दिसायचे, आणि त्यांनी मोती-बागेंतून आणलेलीं सुंदर फुलं गोविंदरावांच्या बैठकीवर पडलेलीं असायचीं !

ज्या काळांत केशवराव पाटील लहानाचे मोठे झाले, वाढले, दरबारच्या नोकरींत राहिले तो काळ आजच्या मानानं फार सुबत्तेचा आणि स्वास्थ्याचा होता. शिवाय पाटलांची नोकरी दरबारची, खाजगी खात्या-कडची. यामुळे त्यांनी खाण्यापिण्याची नेहमी मोठी चैन केली. शाहू-महाराजांची एक गोष्ट अशी की दुपारच्या जेवणासाठी ते कुठे असतील त्याचा नेम नसे, आणि म्हणून तीन वेगवेगळ्या ठिकाणीं त्यांच्यासाठी आणि त्यांच्या परिवारासाठी पाचपन्नास माणसांचं उत्तमपैकी जेवण तयार असे. महाराज आपल्या परिवारासह जेवीत असत एकाच ठिकाणीं. बाकीच्या दोन जागींच्या तयार जेवणावर हात मारीत असत पाटलांसारखीं नोकर माणसं. यावरून बघा पाटलांचा पिंड कोणत्या अन्नावर पोसला असेल तो.

पाटलांना उत्तम प्रकारच्या जेवणाचं व्यसन होतं. 'जिथे पहिल्या प्रतीचं शौर्य आहे तिथे मी आहें, जिथे पहिल्या प्रतीची विद्वत्ता आहे तिथे मी आहें, जगांत जें जें उत्तम आहे तेथे माझें स्वरूप आहे' अशा अर्थाचं वर्णन भगवद्गीतेंत एके ठिकाणीं आहे. त्याचा आधार देऊन पाटील म्हणत असत, "उत्तम जेवण म्हणजे परमेश्वराचं स्वरूप आहे हो!" "ब्राह्मणो भोजनप्रियः" हें खरं असेल तर पाटील ब्राह्मण होते. कोल्हापूरच्या लोकांत शनिवारचा उपास करण्याची फार पद्धत आहे. आणि हा उपास करण्याची त्यांची चमत्कारिक रीत अशी की दुपारीं भरपूर जेवायचं आणि रात्रीचं जेवण वर्ज्य करायचं. आम्ही मुद्दाम अशी गंमत करीत असूं की खाण्या-पिण्याची बैठक शनिवारीं रात्रीं ठेवायची. पाटलांना जेवतां येऊं नये, त्यांचे हाल व्हावे, ही इच्छा. परंतु आमची ही इच्छा कांही पूर्ण व्हायची नाही. उपासाच्या कारणानं जेवायचं नाही, पण प्यायला काय हरकत आहे, असा शास्त्राधार काढून ते आमच्या पिण्यांत तर सामील व्हायचेच, पण शिवाय ताटं मांडलीं की खुशाल भरपूर जेवायचे! आणि स्वतःच्या विवेक बुद्धीचं समाधान करण्यासाठी म्हणायचे, उद्या संध्याकाळीं उपास केला म्हणजे झालं. कितीक वेळा तरी पाटलांना शनिवारचा उपास रविवारीं घडत असे! रविवारीं घडला तरी तो शनिवारच समजायचा, असं पाटलांचं म्हणणं असायचं. आणि गोविंदराव टेंबे संभावित चेहरा करून म्हणायचे, "अद्वैत दृष्टीनं बघितल्यावर शनिवार-रविवार यांत फरक कुठला उरला? सारेच वार शनिवार!"

पाटील नोकरींतून निवृत्त झाले आणि पेन्शनींत निघाले तेव्हा त्यांनी पाहिलेला वैभवाचा काळ सर्वस्वी पडद्याआड गेला होता. संस्थान विलीन होण्याच्या मार्गावर होतं. ज्या ज्या सुंदर सुंदर गोष्टी पाटलांनी पाहिल्या होत्या आणि भोगल्या होत्या, त्या सगळ्या भूतकालांत जमा झाल्या होत्या. त्यांच्यासारख्या एका साध्या कामगाराला पेन्शन तें कितीसं मिळणार? परंतु भोवतालची संस्थानी ऐश्वर्याची दुनिया गडप झाली आणि राहणीचं मान काटकसरीचं करावं लागलं तरी आमचे पाटील शक्य तितके मजेंत होते. कमलाबाईजवळ मनमोकळ्या गप्पा मारतांना एकदा ते सहज विनोदानं म्हणाले, "आता या बदललेल्या परिस्थितींत असं होतं की नवा

मलमलीचा साफा रंगवून आणावा तो कोट जुना झालेला असतो. नवा कोट शिवून आणावा तों धोतर फाटलेलं असतं! एकसंध साऱ्या नव्या कपड्यांचा सूट कांही जमत नाही!" परंतु ही विनोदाची भाषा सोडली तर पाटील अगदी अखेरपर्यंत शक्य तेवढ्या थाटामाटांत आणि रुबाबांत राहिले. ज्यांची त्यांनी सेवा केली अशीं मोठीं मोठीं माणसं कालवश झालीं. ज्यांच्या सहवासांत त्यांनी धन्यता मानली ते मित्र दुरावले. १९५१ सालीं कोल्हापूर कायमचं सोडून पुण्यास येण्याचं मी ठरवलं तव्हा पाटलांना फार दुःख झालं. "आता माझ्या डोळ्यांना तुम्हीं कसे दिसणार?" असा उद्गार ते वरचेवर काढीत, आणि त्यांच्या डोळ्यांत आसवं येत असत. आमची गाडी कोल्हापूर स्टेशनावरून सुटली तेव्हा आमच्या डब्याला धरून लांब लांब पावलं टाकीत चालणारे पाटील माझ्या डोळ्यांना अजून स्पष्ट दिसतात, आणि "आप्पासाहेब, लवकर या!" ही सद्गदित आवाजांतली त्यांची आरोळी मला स्पष्ट ऐकूं येते!

दुर्दैव असं की त्यांच्या तोंडचा मी ऐकलेला हाच शेवटचा शब्द ठरला!

आता मी कोल्हापुरास कधीमधी जातों. जुने मित्र भोवती जमा होतात. परंतु त्यांत केशवराव पाटील नसतात. मग पुष्कळदा वाटतं की एका लहानशा गल्लींतल्या लहानशा घराच्या ज्या त्यांच्या माडीत आम्ही एकत्र बसलों, प्यालों, जेवलों, गप्पा केल्या, ती माडी त्या गल्लींत जाऊन एकदा दुरून बघावी!

* * *

## २३ : नट-सम्राट गणपतराव जोशी

एकदा गणपतराव जोशी आपली नाटक कंपनी घेऊन कोल्हापूरला गेले. पॅलेस थिएटराच्या नजीक एका इमारतींत नाटक कंपन्यांची उतरण्याची व राहण्याची सोय होत असे, त्याप्रमाणे ' शाहूनगरवासी ' ची झाली. नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे सुरवातीच्या पहिल्या नाट्यप्रयोगाचं शाहूमहाराजांना आमंत्रण देण्यासाठी गणपतराव वाड्यावर गेले. महाराजांची भेट झाल्यावर औपचारिक कुशलाचीं प्रश्नोत्तरं झालीं आणि मग गणपतराव म्हणाले, " आजच्या प्रयोगाला महाराजांनी उपस्थित व्हावं अशी विनंती करण्यासाठी आलों आहें. "

महाराज म्हणाले, " गणू, माफ कर. मला नाटकाला येण्याचा आग्रह करूं नकोस. "

" असं कसं म्हणतां महाराज ? आपलं येणं झालंच पाहिजे. "

" गणू, मला येतां येणार नाही — "

" पण कां ? "

" कारणसुद्धा विचारूं नकोस. सांगण्यासारखं नाही. "

" तरीपण मला कळायला हवं. "

" अरे, आताशा मला लघवीचा त्रास होतो. आम्हीं नाटकाला येऊन बसावं, लघवीला लागली की वरचेवर उठावं, हें कांही बरं दिसणार नाही. म्हणून म्हणतों, तुझं नाटक बघण्यासाठी येण्याचा आग्रह करूं नकोस मला ! "

गणपतराव हात जोडून म्हणाले, " महाराज, आपण नाटकाला या. नाटक संपेपर्यंत आपल्याला लघवीची याद आली तर पुन्हा कधी तोंडाला रंग फासणार नाही मी ! "

प्रेक्षकांना तहान-भूक, शरीरधर्म विसरायला लावण्याची शक्ति आपल्या अभिनयांत आहे, याबद्दल गणपतराव जोशांचा केवढा हा जबरदस्त आत्मविश्वास !

ज्या काळांत अण्णा किर्लोस्करांच्या संगीत नाटकांची कीर्ति साऱ्या महाराष्ट्रभर दुमदुमत होती, अण्णांच्या नाटकापुढे इतर कंपन्यांच्या संगीत नाटकांची ' राळ उडाली ' असं वर्णन पवाड्यांत केलं जात होतं, त्या काळांत ' राणा भीमदेव ', ' पानिपतचा मुकाबला ', ' हॅम्लेट ', ' तुकाराम ' इत्यादि गद्य नाटकांतलीं गणपतराव जोशी आणि बाळाभाऊ जोग यांचीं कामं पाहण्यासाठी प्रेक्षकांची गर्दी लोटत होती. अण्णासाहेबांच्या ' शाकुंतल ' नाटकानं मराठी रंगभूमीच्या नव्याच युगाला आरंभ केला असं वर्णन आपण करतों. नाटकाच्या धंद्याला अण्णासाहेबांनी सामाजिक प्रतिष्ठा मिळवून दिली असंहि आपण म्हणतों. हें वर्णन सत्यहि आहे. परंतु तें करतांना आपण लक्षांत ठेवलं पाहिजे, की एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीच्या काळांत मराठी रंगभूमींत जी क्रांति झाली तिचं श्रेय जितकं अण्णा किर्लोस्करांकडे जातं तितकंच गणपतराव जोशांच्या अपूर्व अभिनयकौशल्याला द्यावंच लागेल. शाहूनगरवासी नांवाची नाटक कंपनी १८८१ सालीं प्रथम सुरू झाली. १८९० सालापर्यंत ही मंडळी मधूनमधून ' बुकिश ' नाटकं करीत असे. परंतु तिचा मुख्य भर होता पौराणिक नाटकांवरच. पुढे प्रो. वा. बा. केळकर, ना. गो. फाटक, नाटककार देवल, प्रिन्सिपल आपटे अशा मंडळींचा शाहूनगरवासीशीं संबंध आला, तेव्हा या नाटक मंडळीनं पौराणिक नाटकं कायमचीं सोडून दिलीं आणि ' त्राटिका ', ' झुंझारराव ', ' मानाजीराव ', ' हॅम्लेट ' यासारख्या शेक्सपियरच्या नाटकांमधून भाषांतरित केलेल्या नाट्यकृति रंगभूमीवर आणून गाजविल्या. अण्णांच्या संगीत नाटकांनी मराठी प्रेक्षकांना जितकं वेड लावलं होतं तितकीच ' शाहूनगरवासी ' च्या गद्य नाटकांवर मराठी रसिकांची दुनिया बेहद्द खूष होती.

एकदा ' शाहूनगरवासी ' कोल्हापुरांत खेळ करीत असतांनाच किर्लोस्कर संगीत मंडळीहि मुक्कामासाठी आली. किर्लोस्करांचं ' शाकुंतल ' आणि शाहूंचं ' त्राटिका ' अशीं नाटकं समोरासमोरच्या थिएटरांत एकाच रात्रीं लागलीं. ' त्राटिका ' नाटकाला म्हणण्यासारखं उत्पन्न झालं नाही. ' गणपतराव–चरित्र ' या पुस्तकाचे लेखक श्री. ल. ना. जोशी लिहितात, " त्यामुळे मंडळीला खिन्नता प्राप्त झाली आणि अहमहमिकेची जिगीषा उत्पन्न होऊन शृंगारिक करमणुकीला वीर-रसाचे चपेटे मारून चीत करण्यासाठी पुढील वारीं रात्रीं ' सौभद्रा 'च्या जोडीला ' राणा भीमदेव ' सामने उभा राहिला. वीररसाला शृंगाररस चीत करून आपल्या कह्यांत ठेवतो असा जो त्या रसाचा लौकिक तो त्या रात्रीं नष्ट झाला. भाऊरावांच्या कर्णमधुर आणि अद्वितीय ललकारीनं भरलेलं किर्लोस्करांचं थिएटर समोरच्या थिएटरांतला ' राणा भीमदेवाचा 'चा गगनभेदी आवाज ऐकतांच मोकळं होऊं लागलं. " ' सौभद्र ' पाहण्यासाठी आलेले प्रेक्षक ' राणा भीमदेव ' बघायला समोरच्या थिएटरांत गेले. ज्यांना शाहूंच्या थिएटरांत उभं राह्यलादेखील जागा मिळाली नाही तेवढेच प्रेक्षक काय ते किर्लोस्करांच्या थिएटरांत परत जाऊन बसले !

ही आख्यायिका थोडीशी अतिरंजित असण्याचा संभव आहे. परंतु येवढं खचित, की अण्णा किर्लोस्करांनी संगीत नाटकांच्या बाबतींत जी कामगिरी केली तीच गणपतराव जोशांच्या ' शाहूनगरवासी ' नं गद्य नाटकांच्या बाबतींत केली. ऐतिहासिक नाटकं आणि शेक्सपिअरच्या नाट्यकृतींचीं भाषांतरं रंगभूमीवर प्रथम आणण्याचा मान ' शाहूनगरवासी ' ला देतां येणार नाही. पौराणिक नाटकांकडून ' बुकिश ' नाटकांकडे मराठी रंगभूमीची वाटचाल आधीपासूनच सुरू झाली होती. सांगलीकर, इचलकरंजीकर, सोलापूरकर, कोल्हापूरकर, राजेबावसर वगैरे कंपन्यांनी ' बुकिश ' प्रोज नाटकांचा पायंडा आधीच पाडला होता. परंतु या कंपन्यांच्या नाटकांचा मराठी श्रोत्यांवर फारसा प्रभाव पडला नव्हता. ' शाहूनगरवासी ' च्या नाटकांनी मात्र गद्य मराठी रंगभूमीला प्रतिष्ठा, लोकप्रियता आणि वैभव मिळवून दिलं.

गणपतराव जोशांचा अवतार झाला, बाळाभाऊ जोग यांची जोड त्यांना मिळाली, म्हणूनच संगीत रंगभूमीच्या बरोबरीनं गद्य रंगभूमीची अत्यंत उज्ज्वल अशी परंपरा महाराष्ट्रांत निर्माण झाली. मराठी नाट्य-कलेचे आद्य शिल्पकार म्हणून अण्णा किर्लोस्कर, वाघोलीकर, नाटेकर, भाऊराव कोल्हटकर यांचीं नांवं जितक्या आदरानं घेतलीं जातात तितक्याच आदरानं गणपतराव जोशी आणि बाळाभाऊ जोग यांचींहि नांवं घ्यायला हवींत.

भाऊराव कोल्हटकरांचं दर्शन जसं मला कधी घडलं नाही, त्याच-प्रमाणे बाळाभाऊ जोग यांनाहि मीं कधी बघितलं नाही; परंतु त्यांचीं कामं ज्यांनी बघितलीं असे लोक सांगतात—आणि गणपतराव जोशांच्या चरित्रकारांनी असं लिहून ठेवलं आहे, की—नट या दृष्टीनं बाळाभाऊ जोग यांची योग्यता फार मोठी होती; इतकंच नव्हे तर मार्मिक चिकित्सा, त्या त्या भूमिकेविषयीची समजूत आणि अभिनयाची जन्मजात देणगी या गुणांत गणपतराव जोशांपेक्षाहि बाळाभाऊ श्रेष्ठ होते...' मॅक्बेथ ' नाटकांत झोपेंत चालणाऱ्या लेडी मॅक्बेथचा एक प्रवेश आहे. या प्रवेशांतल्या अप्रतिम कामाबद्दल बाळाभाऊंची फार ख्याति होती...एकदा मुंबईच्या एल्फिन्स्टन थिएटरांत मॅक्बेथचा प्रयोग झाला. तेव्हा बाळाभाऊंचं झोपेंतल्या प्रवेशाचं काम इतकं परिणामकारक वठलं, की तो प्रवेश पुन्हा करून दाखविण्यासाठी साऱ्या प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट आणि वन्स मोअरचा जयघोष चालू ठेवला. रावसाहेब पावगीसारख्यांनी भाषण करून प्रेक्षकांना पुष्कळ विनंती केली, परंतु लोक कांही केल्या ऐकेनात. शेवटी गणपत-रावांनी नटवेष उतरला आणि ते साध्या वेषांत रंगभूमीवर येऊन उभे राहिले, तेव्हा लोक आश्चर्यचकित होऊन ऐकूं लागले. गणपतराव म्हणाले, " आज रात्रीं नाटकाचा प्रयोग सुरू होण्याच्या आधी जसा साध्या पोषाखांत नाटकगृहांत आलों तशाच पोषाखांत आता आपल्यापुढे येऊन उभा राहात आहें. याचं कारण असं, की मी आता आपल्या परवानगीनं पडद्यांत जाऊन नाटकाचा प्रयोग पुन्हा पहिल्यापासून सुरू करण्याच्या व्यवस्थेला लागणार आहें. संगीत नाटकांत एखाद्या पदाला वन्स मोअर झाला तर तेवढंच पद पुन्हा म्हणतां येतं. गद्य नाटकांतला मधलाच एखादा

प्रयोग असा करतां येणार नाही. म्हणून बाळाभाऊंचा दर्याबाईच्या ( लेडी मॅक्बेथच्या ) झोपेंतल्या अभिनयाचा प्रयोग बघण्याची आपली इच्छा पूर्ण करण्यासाठी मॅक्बेथ नाटक पुन्हा पहिल्यापासूनच करून दाखवायला हवं. संपूर्ण नाटकाच्या प्रयोगाला तीन तास लागतात. आत्ता एक वाजून गेला आहे. पोलीसची परवानगी आणवितों म्हणजे झालं. आपली मात्र पुन्हा पहिल्यापासून नाटक बघण्याची तयारी असली पाहिजे "...गणपतरावांच्या या भाषणाची मात्रा लागू पडली, लोकांनी आपला आग्रह सोडून दिला. नाटकाचा प्रयोग पुढे सुरू झाला.

गणपतराव आणि बाळाभाऊ यांच्या अभिनयकौशल्याच्या तुलनेच्या संबंधानं तज्ज्ञांचं मत काय असेल तें असो; एक निर्विवाद विचार असा, की गणपतराव आणि बाळाभाऊंची गद्य मराठी रंगभूमीवरची नटरत्नांची एक अद्वितीय जोडी होऊन गेली. या जोडीच्या अभिनयाच्या किमयेनं १८९३ नंतरच्या सुमारे वीस वर्षांच्या काळांत असंख्य रसिकांना मंत्रमुग्ध करून टाकलं होतं आणि अण्णांच्या संगीत नाटकांप्रमाणेंच लोकांना गद्य नाटकांचेंहि वेड लावलं होतं. गणपतराव जेव्हा प्रथम कंपनींत दाखल झाले तेव्हा तिचं नांव ' श्री शाहूनगरवासी ' असं होतं. पहिल्या नऊ वर्षांत या कंपनीची सुस्थिति नव्हती. कंपनीची पुनर्घटना झाली तेव्हा नांवांतली श्री काढून टाकण्यांत आली आणि 'शाहूनगरवासी' असं साधं नांव ठेवण्यांत आलं. आणि चमत्कार असा, की ज्या ' श्री 'ची प्रसन्नता कंपनीला कधी मिळवतां आली नव्हती ती ' श्री ' नावांतून काढल्यापासून मात्र कंपनीवर प्रसन्न झाली ! बाळाभाऊ जोग यांच्या मृत्यूनंतर गाजलेल्या जोडीपैकी एकटे गणपतराव उरले. कंपनीच्या चढतीचा ऐन बहर ओसरला. नटांचा पहिला संच जागेवर राहिला नाही. ' शाहूनगरवासी 'ची प्रसिद्धि जशी गणपतरावांच्या असामान्य कलेबद्दल तशीच पडदे, देखावे, वेषभूषा या गोष्टींच्या दारिद्र्याबद्दल उरली. माझ्या पिढींतल्या माणसांना गणपतरावांचं दर्शन घडलं तें कंपनीच्या या विपन्नावस्थेंतच. परंतु गणपतरावांच्या लोकप्रियतेची आणि त्यांच्या चारित्र्याची साक्ष देणारी नोंद इतिहासांत आढळते ती अशी, की ' शाहूनगरवासी 'चा संसार गणपतरावांनी अखेर गुंडाळला तेव्हा सगळ्या सावकारांचं देणं त्यांनी देऊन टाकलं होतं. आणि गणपतराव

व्यवसायांतून निवृत्त झाले. ऋणमुक्त अवस्थेंत. ...संगीताच्या बळावर किर्लोस्कर नाटक मंडळीनं जो पराक्रम करून दाखविला त्याच्या तोडीचाच संगीताच्या साहाय्यावाचून केवळ अभिनयाच्या बळावर गणपतरावांनी करून दाखविलेला पराक्रम म्हणावा लागेल. भाऊरावांसारखा संगीत नट दुसरा झाला नाही. गणपतरावांसारखा गद्य नट दुसरा झाला नाही.

चालू घटकेला इंग्रजी नाटकाचं भाषांतर अगर रूपांतर करून बनविलेलं मराठी नाटक रंगभूमीवर आलं आणि तें पडलं की टीकाकार बहुधा पहिला विचार सांगतात तो असा, की आपल्या मराठी संस्कृतीशीं आणि राहणीशीं न जुळणारीं नाटकं लोकांना कशीं पटावींत ? हा विचार खराच म्हटला पाहिजे. परंतु या विचाराच्या पार्श्वभूमीवर गणपतरावांनी अमर करून सोडलेल्या 'हॅम्लेट' नाटकाच्या असामान्य लोकप्रियतेचा खुलासा कसा करायचा ? ' 'शाहूनगरवासी'च्या अगोदर इतर कांही कंपन्यांनी 'हॅम्लेट' नाटक रंगभूमीवर आणलं होतं. आगरकरांच्या भाषांतराच्या अगोदर इतरांचीं भाषांतरं उपलब्ध होतीं आणि त्यांचे प्रयोग मराठी रंगभूमीवर झाले होते. परंतु हें नाटक मराठी रसिकांच्या पसंतीस उतरलं नव्हतं. 'शाहूनगरवासी'च्या रंगभूमीवर आल्याबरोबर मात्र या नाटकानं लोकांचीं अंतकरणं काबीज केलीं. गणपतराव जोशी आणि बाळाभाऊ जोग याच्या अभिनयचातुर्यानं 'हॅम्लेट' नाटकाला अशी कांही अभूतपूर्व लोकप्रियता मिळवून दिली की थोडीथोडकीं नव्हे सत्तर वर्षं उलटलीं तरी या नाटकाचं आकर्षण टिकलेलं आहे. 'ज्या नाटकांत गणपतराव जोशांचं अभिनयचातुर्य टिपेला पोचलं होतं म्हणतात तें बघू या तरी' अशा विचारानं या नाटकाच्या प्रयोगाला लोक आजहि गर्दी करतात.

खरं पाहिलं तर शेक्सपीअरचं हें नाटक आपल्या मराठी संस्कृतीशीं आणि राहणीशीं बहुतांशीं विसंगत आहे. या नाटकांतलीं पात्रं मराठी समाजांतल्या माणसांसारखीं वाटणं फार कठीण आहे. शिवाय ज्या काळांत या नाटकाचा पहिला प्रयोग 'शाहूनगरवासी'नं दाखविला त्या काळांत मराठी समाज आजघटकेच्या मानानं कितीतरी मागासलेला, सनातनी होता. पुनर्विवाहाची किंवा विधवेनं केस राखण्याची सुधारणा तर राहोच,

साधी स्त्री-शिक्षणाची कल्पनादेखील त्या काळांतल्या मराठी समाजानं पत्करलेली नव्हती आणि असं असूनहि गणपतरावांचा 'हॅम्लेट' मराठी प्रेक्षकांच्या काळजाला एकदम भिडला आणि त्यानं लोकांची एवढी प्रीति संपादन केली की तिची हुंडी 'गणपतरावांची सर आम्हांला नाही' असं प्रांजलपणें सांगणाऱ्या नटांनीदेखील वटवावी. एक विलक्षण चमत्कार नव्हे काय हा ? आणि त्या चमत्काराचं श्रेय वाटतांना शेक्सपीअरला त्याचा योग्य तो वांटा दिला पाहिजे, आगरकरांच्या सुरस भाषांतरालाहि दिलाच पाहिजे, परंतु श्रेयाच्या फार मोठ्या वाट्यावर हक्क आहे गणपतरावांचा. 'हॅम्लेट'च्या प्रयोगांत गणपतरावांचं कसब जागोजाग असा झगमगाट निर्माण करी की जें नाटक आपण पाहात आहों तें आपल्या मराठी चाली-रीतींशीं किती सुसंगत आहे याचं भानच प्रेक्षकांना उरत नसे. हॅम्लेट, म्हणजे गणपतराव आणि गणपतराव म्हणजे हॅम्लेट, अशा प्रकारची जी कीर्ति गणपतरावांच्या मृत्यूला चाळीस वर्षं होऊन गेलीं तरी अजूनहि सर्वांच्या तोंडीं आहे, त्या कीर्तीच्या रूपानं गणपतराव अमर झालेले आहेत यांत शंका नाही.

कवि कालिदासाची ओळख अण्णा किर्लोस्करांनी महाराष्ट्राला 'शाकुंतल' नाटकानं करून दिली. शेक्सपीअरचीं थोरवी महाराष्ट्राला समजली ती गणपतरावांमुळे ! गणपतरावांनी 'हॅम्लेट'चा प्रयोग केला त्याच्या आधी शेक्सपीअरच्या नाटकांचीं मराठी भाषांतरं झालीं होतीं आणि इतर कंपन्यांच्या रंगमंचावर आलींहि होतीं. कांहीं नाटकं संगीत रूपांत 'नाट्यकला प्रवर्तक' सारख्या कांहीं कंपन्यांनी मराठी प्रेक्षकवर्गाला सादर केलीं होतीं. परंतु मराठी साहित्यांत आणि मराठी प्रेक्षकांच्या अंतः-करणांत शेक्सपीअरला कायमचं स्थान मिळवून दिलं गणपतरावांनीच.

मराठी संतांचीं चरित्रं रंगभूमीवर प्रथम आणण्याचं श्रेय गणपतरावांना देतां येणार नाही. परंतु 'त्राटिका', 'झुंझारराव', 'राणा भीमदेव', 'हॅम्लेट' या नाटकांप्रमाणेच गणपतरावांच्या 'तुकाराम' नाटकानं लोकांना वेड लावलं होतं ही गोष्ट महत्त्वाची समजायलाच हवी. साधारण-पणें १९०१ पासून १९०६ पर्यंतचा काळ गणपतरावांच्या चढत्या भाग्यो-

दयाचा म्हणतां येईल. या काळांत गणपतरावांनी लोकप्रियता आणि पैसा दोन्ही अमाप मिळविलीं. बडोद्याचे महाराज सयाजीराव यांचा आश्रय त्यांना लाभला. वर्षांतून एकदा बडोद्यास मुक्काम करायचा आणि तीन नाटकं दाखवून पांच हजार रुपये घ्यायचे, अशा स्वरूपाचा तो आश्रय होता. सयाजीरावांचा उदार आश्रय मिळविणारी पहिली नाटक कंपनी गंधर्व नाटक मंडळी नव्हे, तर शाहूनगरवासी होय. बाबासाहेब इचलकरंजीकर, जमखंडीचे अधिपति यांसारख्या संस्थानिकांचाहि गणपतरावांवर फार लोभ होता. सयाजीराव म्हणत, " इंग्लिश रंगभूमीवर आम्ही ' त्राटिका ' बघितली; परंतु शाहूनगरवासीच्या ' त्राटिके 'ची लज्जत कांही औरच आहे. इंग्लंडमधील त्राटिका आम्हांला नाटकगृहांतून बाहेर घालविण्यासारख्या कर्णकठोर किंकाळ्या मारून त्रास उत्पन्न करते, तर ' शाहू 'ची त्राटिका आम्हांला मनांतल्या मनांत गुदगुल्या करून प्रयोग संपेपर्यंत नाटकगृहाच्या बाहेर पडण्यास अवधीच देत नाही. " बाबासाहेब इचलकरंजीकर नेहमी सांगत, की " इंग्लंडमधे असतांना सर हर्बर्ट ट्री या प्रख्यात नटाचं हॅम्लेटचं काम मीं पाहिलं, परंतु आमचे गणपतराव तेंच काम त्याच्यापेक्षा कितीतरी पटींनी अधिक चांगलं करतात याबद्दल माझी खात्री आहे. " या भाग्यकालांत गणपतरावांचीं सारींच नाटकं महाराष्ट्रभर दुमदुमत होतीं. परंतु ' तुकाराम ' नाटकावर वऱ्हाडांत आणि खानदेशांत जो पैशाचा पाऊस पडला तो त्या काळांतला उच्चांक होता.

मात्र ' तुकाराम ' नाटकाला होणारी प्राप्ति हें गणपतरावांचं मुख्य समाधान नव्हतं. त्यांनी तें नाटक बसवायला घेतलं तें मुख्यतः लोकशिक्षणाच्या हेतूनं. गणपतरावांचं शिक्षण अगदी बेताचं होतं खरं, परंतु त्यांचं मन सुसंस्कृत होतं. विचार प्रगल्भ होते. लेखक, कवि, वक्ता यांच्याप्रमाणं आपणहि जनतेचे एक शिक्षकच आहोंत ही भावना त्यांच्या ठिकाणीं होती. ' तुकाराम ', ' रामदास ' यांसारखीं नाटकं त्यांनी जनतेला सादर केलीं तीं लोकशिक्षणाच्या हेतूनंच. १८९७ सालापासून ' केसरी फंडा ' सारख्या जितक्या देशकल्याणाच्या सार्वजनिक चळवळी झाल्या त्या सर्व चळवळींना गणपतरावांकडे कुणीहि मागणी न करतां, आपण होऊन ते ज्या मुक्कामीं असतील त्या मुक्कामावरून एकेका खेळाचं सबंध उत्पन्न शेकड्याच्या आकड्यांनी

त्यांनी घाडलं. विशेष हें, की ' खर्चं वजा जातां ' हे शब्द त्यांना कधी-देखील आठवले नाहीत.

गणपतरावांच्या स्वदेशप्रेमाची आणखी एक गोष्ट सांगण्यासारखी आहे. १९२० सालीं गांधींच्या नव्या चळवळीचा त्यांच्या मनावर फार परिणाम झाला आणि व्यवहारांतच नव्हे तर रंगभूमीवरदेखील खादीचे कपडे वापरण्यास त्यांनी सुरवात केली. हॅम्लेटमधील चंद्रसेन आणि त्राटिका नाटकांतील प्रतापराव या दोन्ही भूमिका गणपतरावांनी प्रथम पुण्याच्या रंगभूमीवर खादीच्या कपड्यांत प्रेक्षकांसमोर उभ्या केल्या.

पुरुष नटांनी शेंडीला चाट देऊन, डोक्यावर इंग्रजी पद्धतीचा क्रॉप राखून बोडक्यानं रंगभूमीवर येण्याचा उपक्रम प्रथम गणपतरावांनीच केला आणि त्यांचा कित्ता प्रोज आणि संगीत दोन्ही कंपन्यांनी उचलला. ही गोष्ट वरवर पाहतां जरी क्षुल्लक दिसली तरी नटांची केशभूषा कसकशी पालटत गेली याबद्दलच्या इतिहासाच्या दृष्टीनं तिला महत्त्व आहेच. आणि मराठी नाट्याच्या क्षेत्रांतलं गणपतरावांचं कार्य सांगतांना ही गोष्ट हिशेबांत घ्यायलाच हवी.

ऐतिहासिक, भक्तिरसपूर्ण, काल्पनिक आणि शेक्सपीअरच्या कृतींचीं भाषांतरं अशीं मिळून एकंदर सुमारे दोन डझन नाटकं गणपतरावांनी मराठी प्रेक्षकांना सादर केलीं. त्यांतलीं विशेष नांवाजलेलीं नाटकं ' राणा भीमदेव ' ' तुकाराम ', ' फाल्गुनराव ', ' त्राटिका ', झुंझारराव ', ' मानाजीराव ' आणि ' हॅम्लेट ( विकारविलसित ) ' हीं होत. या साऱ्या नाटकांतल्या गणपतरावांच्या भूमिका गाजल्या. ' राणा भीमदेव ' मधील शूर मर्द, ' तुकाराम ' मधील भगवद्भक्त संत, ' फाल्गुनराव ' मधील रेवतीवर अनुरक्त झालेला आश्विनशेठ, ' त्राटिका ' नाटकांतील एका कजाग, फटकळ, तोंडाळ पोरीला वठणीवर आणणारा प्रतापराव, ' झुंजारराव ' मधील संशयानं पछाडलेला साधासुधा शिपाईगडी, ' मानाजीराव ' मधील बायकोच्या नादानं खुनांत सामील होणारा सरदार आणि ' विकारविलसित ' मधील सूड घेऊं की न घेऊं अशा संशयचक्रांत सापडलेला उमद्या स्वभावाचा राजबिंडा चंद्रसेन– अशीं भिन्नभिन्न स्वभाव-

चित्रं लोकांच्या लक्षांत वर्षानुवर्षं राहावींत अशा प्रकारं वठविणाऱ्या गणपतरावांचं कौशल्य किती चौफेर म्हणावं लागेल ! या वेगवेगळ्या भूमिका करतांना गणपतराव अभिनयाची एकेक वेगळीच तऱ्हा दाखवीत असत. मात्र अभिनयाच्या या निरनिराळ्या तऱ्हा बघतांनादेखील गणपतरावांच्या अभिनयाच्या एका विशिष्ट वळणाचं सूत्र कायम असल्याचं जाणत्या माणसाला स्पष्ट दिसत असे.

असं म्हणतां येईल, की किर्लोस्करी वळण, शाहू वळण आणि महाराष्ट्र मंडळीचं वळण— असे अभिनयाचे तीन कित्ते मराठी रंगभूमीवर १८८० नंतरच्या चाळीस वर्षांत लोकांपुढे ठेवले गेले. गाण्याच्या क्षेत्रांत ग्वाल्हेर, किराणा, जयपुरी अशीं तीन घराणीं ज्याप्रमाणे गायकांना परिचित झाली आणि आपापल्या रुचीप्रमाणे गायकांनी घराणं निवडून मेहनत केली, त्याप्रमाणे किर्लोस्करी, शाहू, महाराष्ट्रीय अशा तीन कित्त्यांपैकी जो रुचला तो कित्ता नटांनी गिरवला. अगदी चालू घटकेच्या नवीन नटनटींची गोष्ट सोडून द्या, परंतु सुमारे पंधरा-वीस वर्षांपूर्वीची गोष्ट अशी होती, की कोणत्याहि नटाचं रंगभूमीवरचं काम बघितल्यानंतर हा अमक्या घराण्याचा किंवा वळणाचा म्हणून ताबडतोब ओळखतां येत असे. या तिन्ही वळणांची गुणदोषचर्चा केव्हा तरी करण्यासारखी आहे. परंतु ती करण्याचा मोह या ठिकाणीं टाळून इतकंच म्हणू या, की हातवारे, मुद्रा आणि आवाज यांचा कमालीचा साहजिकपणा व वाणीची शुद्धता हे गणपतरावांनी (आणि बाळाभाऊंनी) रूढ केलेल्या 'शाहू' वळणाचे विशेष होते.

एखाद्या गवयाचे कांही विशिष्ट राग 'चढलेले' असावेत त्याप्रमाणे वीर आणि करुण हे गणपतरावांचे दोन हातखंडे रस होते. हास्यरसाकडे त्यांचा विशेष कल नसावा. कारण देवलांच्या 'फाल्गुनराव' नाटकांत ते फाल्गुनरावाची भूमिका करीत नसत; आश्विनशेठची करीत असत. १९२२ सालीं शाहूनगरवासीची व्यवस्था, गंधर्व मंडळीची मॅनेजरशिप ज्यांनी एके काळीं बऱ्यावाईट अर्थानं गाजविली त्या बाळासाहेब पंडितांकडे होती. गंधर्व मंडळी आणि शाहू दोघांचेहि मुक्काम मुंबईत होते. पंडितांचे इतर गुणदोष कोणतेहि असोत, लोकांची नाडी ओळखून, नित्य

नव्या कल्पना काढून यशस्वी करून दाखविण्याची पंडितांची कल्पकता अविवाद्य म्हणावी लागेल. ' फाल्गुनराव ' नाटक संगीताचा साज चढवून ' संशय-कल्लोळ ' या नांवानं गंधर्वांच्या रंगमंचावर आलं होतं आणि विलक्षण लोकप्रिय झालं होतं. गंधर्वांच्या ' संशय-कल्लोळ ' मध्ये फाल्गुन-रावाच्या भूमिकेंत गणपतराव जोशी दिसले तर नाटकावर प्रेक्षकांच्या उड्या पडतील अशी कल्पना पंडितांनी काढली. तीन प्रयोगांत गणपतराव जोशांनी फाल्गुनरावाची भूमिका केली. ज्यांनी ती बघितली त्यांनी ' गणपतराव ते गणपतराव आणि बोडस ते बोडस ' असा अभिप्राय दिला म्हणतात.

परंतु वीर आणि करुण हेच गणपतराव जोशांचे आवडते रस होते यांत संशय नाही. त्यांच्या नाटकांतले वीर-करुण रसांचे कांही प्रसंग एकदा पाहिल्यानंतर डोळ्यांपुढून कधी पुसले जाऊं नयेत अशा प्रकारचे होते. चंपावतीच्या नवऱ्याच्या मृत्यूची बातमी राणा भीमदेव तिला सांगतो तेव्हा त्याचं बोलणं ऐकून घेतांघेतां चंपावती त्याच्या हेतूचा संशय घेते आणि मित्राच्या पत्नीविषयी अभिलाषा धरल्याबद्दल त्याची निर्भर्त्सना करते. चंपावतीचा हा आरोप ऐकल्याबरोबर आश्चर्यानं आणि दुःखानं चेहरा एकदम पांढराफटफटीत पडल्याचा जो अभिनय गणपतराव करीत असत तो शब्दांनी सांगतां येण्यासारखा नाही. ' पन्नारत्न ' नाटकांत राजपुत्राचे प्राण वांचविण्यासाठी आपल्या पुत्राचा बळी देण्याचं पन्ना ठरविते. त्या प्रवेशांत दोन्ही मुलांना दोन काखोटींत धरून अक्षरदेखील न बोलतां हुंदक्यांनी सद्‌गदित झाल्याचा जो अभिनय गणपतराव करीत असत त्याचं तरी वर्णन शब्दांनी कितीसं करतां येईल ! ' माझी बहीण ' नाटकांत राजाची पापी नजर ज्या बहिणीवर गेलेली आहे आणि राजाची एकान्तीं भेट घेण्याचा प्रसंग जिच्यावर गुदरला आहे त्या बहिणीचा निरोप घेतांनाहि गणपतराव अभिनयाची अशीच कमाल करून सोडीत असत. त्यांच्या अभिनयाचीं अशीं सौंदर्यस्थळं सांगावीं तेवढीं थोडींच होतील.

' हॅम्लेट ' विषयी तर किती लिहावं आणि किती न लिहावं अशी मनाची स्थिति होऊन जाते. कधीकधी मी स्वतःलाच असा प्रश्न करतों,

की या 'हॅम्लेट' नाटकांतला प्रमुख रस कोणता ?–वीर ?– करुण ?– शृंगार ? निश्चित उत्तर मला सुचत नाही; कुणी दिल्याचं मला आठवत नाही. या नाटकाची प्रकृति अशी विचित्र आहे, की त्यांत अमुक एक रस प्रामुख्यानं आहे असं म्हणतां येणार नाही. एका दुर्दैवी घटनेची छाया साऱ्या नाटकावर पडलेली आहे. साऱ्या पात्रांनाच जणू दुर्दैवाचा शाप भोगावा लागत आहे. एकंदर वातावरण गूढ, रहस्यमय आहे. त्यांत रौद्राची छटा आहे; भयानकतेची छटा आहे. अशा या विचित्र प्रकृतीच्या नाटकांत गणपतरावांच्या अभिनयाची एकएक जागा अशी येऊन जात असे, की प्रेक्षकांच्या अंगावर तो तो प्रवेश चढावा आणि प्रेक्षकांनी मंत्रमुग्ध होऊन जावं.

तिसऱ्या अंकाच्या पहिल्या प्रवेशांत चंद्रसेनाच्या तोंडीं 'जगायचं की मरायचं एवढाच प्रश्न उरला आहे' अशा आरंभाचं जें स्वगत आहे त्याची ख्याति फार आहे. परंतु या स्वगतापेक्षाहि चंद्रसेन-मल्लिका यांचा दोन पानांचा जो संवाद आहे त्या संवादांतील एकेका वाक्यागणिक गणपतरावांचा अभिनय मला अधिक चातुर्याचा वाटत असे, 'आपण एखाद्या मठांत चालत्या व्हा. पाजी लोकांचं आईपण आपल्या शिरावर कशासाठी घेतां ?' किंवा 'हें पाहा, याउलट आपल्याला लग्नच नको. जे आधीच त्या पाशांत सापडले आहेत त्यांपैकी एक मात्र सोडून बाकीचे आहेत तसे राहूं देत. पण अविवाहितांनी ब्रह्मचर्यच आचरलं पाहिजे. चल जा. एकदम मठाची वाट धर कशी !' अशा वाक्यांतला एकेका शब्दाचा उच्चार आणि त्या उच्चाराची धार वाढविणाऱ्या मुद्रा यांच्या बाबतींत गणपतरावांचं कसब केवळ वर्णनातीत म्हणावं लागेल.

तिसऱ्या अंकाच्या अखेरच्या प्रवेशांत चंद्रसेन आणि त्याची आई राणी या दोघांचा प्रवेश आहे. या प्रसंगीं चंद्रसेन आपल्या आईची अत्यंत जळजळीत शब्दांत कानउघाडणी करतो, तिच्या पापी दुराचरणाचं चित्र तिच्या पुढे उभं करतो. या प्रवेशांत गणपतराव अभिनयाची अगदी बहार करून सोडीत असत. तो सबंधच प्रवेश असा कांही रंगत असे, की अखेरीस अंकाचा पडदा पडला तरी प्रेक्षकांना भानावर येण्यास अवधि लागे. साऱ्या

प्रेक्षकांनी श्वास रोखून धरल्यामुळे निर्माण झालेली शांतता दोनचार मिनिटं तशीच राहात असे. त्या प्रवेशांतला गणपतरावांच्या अभिनयाचा परमोच्च बिंदु मला कोणता वाटत असेल तर–' हरामखोर, पाजी, रामोशिण ! राजा कसला हा ! चिंध्यांचा आणि धांतुऱ्यांचा राजा ' असे शब्द चंद्रसेनाच्या तोंडून बाहेर पडतात न पडतात तोंच त्याच्या बापाचा समंध त्याला दिसूं लागतो. ' तुझी आई फारच घाबरल्यासारखी दिसते. तिचं सांत्वन कर. तिच्याशीं दोन शब्द बोल. ' असं समंध सांगतो आणि समंधाच्या पुनर्दर्शनानं भेदरून, गोंधळून गेलेल्या अवस्थेंत समंधावरची नजर अचल ठेवून आईकडे न बघतां ' कसं काय आईसाहेब ? ' असा प्रश्न गणपतराव करीत असत !– त्या वेळचा ! समंधाच्या समाधानासाठी ते चार शब्द तोंडांतून काढतांना त्यांचा उच्चार करण्याची तऱ्हा, मुद्रेवरचा भाव आणि एकंदर पवित्राच गणपतराव असा कांही ठेवीत, की प्रेक्षकांच्या अंतःकरणाचा थरकाप उडत असे.

बालगंधर्वांच्या ' स्वयंवर ' नाटकाचा प्रयोग पाहण्यासाठी पुनःपुन्हा जाणारे प्रेक्षक रुक्मिणीच्या तोंडचीं पदं ऐकण्यासाठी जात असत. त्याचप्रमाणे गणपतरावांचीं नाटकं पुनःपुन्हा पाहणारे लोक त्या त्या नाटकांतल्या त्या त्या प्रवेशांतल्या गणपतरावांचं अभिनयकौशल्य पाहण्यासाठी जात असत. त्या त्या प्रसंगींचीं त्यांचीं भाषणं आणि त्यांच्या मुद्रा याची गोडी खरोखर अवीट होती. पहिल्या अंकाच्या शेवटच्या प्रवेशांत चंद्रसेन आणि प्रियाल यांचा संवाद चालू असतांना समंध प्रवेश करतो आणि प्रियाल म्हणतो, ' महाराज महाराज, तो पाहा आला.' त्याबरोबर ' मनुष्यांचं कल्याण चिंतणारे सर्व देव आणि गंधर्व आमचं संरक्षण करोत ! ' हें वाक्य ज्या स्वरांत गणपतराव म्हणत असत आणि त्या क्षणीं मुद्रेवर जो भाव दाखवीत असत तो केवळ अवर्णनीय होता ! पुढे समंधाच्या मागोमाग चंद्रसेन जातो. बरंच अंतर गेल्यावर तो समंधाला विचारतो, ' आता तूं मला कुठे नेणार ? बोल, मी पुढे येणार नाही. ' समंध म्हणतो, ' ऐक तर. ' त्यावर ' ऐकतों, ' एवढीं तीनच अक्षरं चंद्रसेनाच्या तोंडीं आहेत. परंतु त्या तीन अक्षरांत गणपतरावांचं केवढं कौशल्य प्रगट होत असे !

कंपित स्वरांतल्या त्या तीन अक्षरांनी ज्याच्या अंतःकरणाचा थरकाप उडत नसेल असा एकहि प्रेक्षक असणं शक्य नव्हतं. पुढे समंध खुनाची समग्र हकीगत सांगून चंद्रसेनाला म्हणतो, 'तुझ्या बापाच्या खुनाच्या अत्यंत घोर आणि अत्यंत दुष्ट कृत्याबद्दल सूड घे!' तें ऐकतांच 'खून?' असा एकच शब्द चंद्रसेनाच्या तोंडीं आहे. या एका शब्दाचा उद्गार काढतांना गणपतरावांचा खणखणीत आवाज अशी कांही टीप एकदम गाठीत असे, की प्रेक्षकांच्या चित्ताचा थरकाप उडविणारा तो शब्द क्षण दोन क्षण वातावरणांत रेंगाळत राहात असे.

'विकार-विलसित' नाटकांतील अशा किती म्हणून जागा आठवून सांगाव्या? समारोपादाखल एवढंच म्हणतां येईल, या नाटकांतलं गणपतरावांचं काम पाहणं म्हणजे एक अविस्मरणीय भावनात्मक अनुभव होता. त्याचं वर्णन शब्दांनी कितीहि केलं तरीहि तें थिटंच पडेल.

कित्येक लोकांचं असं मत आहे, की गणपतरावांची मध्यम उंची (पांच फूट तीन इंच), त्यांची ठेंगणी मूर्ति, अवयवांची गोलाई, चेहऱ्याचा भावपूर्ण सुबकपणा यांमुळे कोणत्याहि भूमिकेंत ते शोभून दिसत असत. परमेश्वरानं जणू कांही त्यांना नट होण्यासाठीच जन्माला घातलं होतं. गणपतरावांच्या ऐन ज्वानींत हें वर्णन खरं ठरण्यासारखं असेल, त्यांचं हें दर्शन मला घडलेलं नाही. मीं त्यांचीं नाटकं पाहिलीं तीं बाळाभाऊंच्या मृत्यूनंतर, गणपतरावांनी चाळिशी ओलांडल्यानंतर. त्या काळांत गणपतरावांचं शरीरसौंदर्य फारसं उरलेलं नव्हतं. त्यांचे डोळे टपोरे, पाणीदार (केशवराव भोसल्यांसारखे) नव्हते. त्यांच्या डोळ्यांची ठेवण कांहीशी झापड आल्यासारखी धुंद होती. (लाला लजपतराय आणि गणपतराव जोशी यांच्यातलं साम्य माझ्या मनांतून कांही केल्या जात नाही.) मीं गणपतरावांना बघितलं तेव्हा त्यांचं पोट बरंच सुटलेलं होतं. 'हॅम्लेटचं' काम करतांना साधा चोळणा, अंगांत मलमलीचा खमीस, डोकं उघडं, गळ्यांत मोत्यांचं एक पेंडं घातलेलं, असाच त्यांचा वेष असे. त्यांच्या झुपकेदार मिशा त्यांनीं काढलेल्या नव्हत्या. परंतु या वेषांतदेखील प्रेक्षकांना ते एखाद्या तरुण राजबिंड्या राजपुत्राप्रमाणे भासत असत. त्यांच्या अभि-

नयाचं आणि घंटेसारख्या खणखणीत वाणीचं आकर्षण असं जबरदस्त होतं, की त्यांच्या वेषभूषेकडे काय बिशाद कुणाचं लक्ष जाईल ?

गणपतरावांना दारूचं व्यसन होतं ही गोष्ट सगळ्यांना माहीत आहे. त्यांचं तें व्यसन लपवून ठेवलं पाहिजे असंहि मला वाटत नाही. सामान्य माणसाची व्यावहारिक नीति आणि कलावंताची नीति या दोन गोष्टी अगदी भिन्न आहेत. कलावंताचं कलात्मक चातुर्य हीच त्यांची नीति. कलावंताला चांगलं किंवा वाईट म्हणायचं तें तो किती वेळां स्नान करतो, देवदर्शन घेतो की नाही, खाण्यापिण्याचे विधिनिषेध पाळतो की नाही या गोष्टींचा विचार करून नव्हे; त्याची कला कोणत्या योग्यतेची होती तें पाहूनच त्याचं चांगलेंपण अथवा वाईटपण ठरवायला हवं.–होय ! गणपतराव दारू पीत असत–इतकी की कित्येकदा 'आज अमकं नाटक आहे' असं त्यांच्या कानांत सांगून त्यांना स्टेजवर ढकलावं लागे अशी एक आख्यायिका प्रचलित आहे. परंतु म्हणून काय झालं ? कलावंत या दृष्टीनं गणपतरावांची योग्यता सांगतांना असंच म्हणावं लागेल, की विमानांत बसून वैकुंठांत गेलेल्या संत तुकारामांनी गणपतरावांची 'तुकारामा'ची भूमिका पाहाण्यासाठी परत पृथ्वीवर यावं अशा दर्जाचा त्यांचा अभिनयविलास होता !

गांधींच्या असहकारितेच्या चळवळीचा फार मोठा परिणाम गणपतरावांच्या मनावर झाला होता. राष्ट्रीय मेडिकल कॉलेज मुंबईत निघालं होतं, त्याच्या मदतीसाठी म्हणून गणपतरावांनी 'त्राटिका' नाटकाचा प्रयोग बालीवाला ग्रँड थिएटरमध्ये केला. हा प्रयोग इतका उत्तम वाटला की जुन्या प्रेक्षकांना शाहू मंडळीच्या अगदी सुरवातीच्या दिवसांची आठवण झाली. त्या दिवशीं गणपतरावांचं प्रतापरावाचं काम फारच बहारदार झालं. परंतु दिवा विझण्यापूर्वी मोठा होतो त्यापैकी हा प्रकार ठरला. कारण नंतर थोड्याच दिवसांनी ता. ७ मार्च १९२२ रोजीं मंगळवारीं वयाच्या पंचावन्नाव्या वर्षी दुपारीं ११॥ वाजतां गणपतरावांनी आपली इहलोकींची यात्रा संपविली !

वयाच्या चवदाव्या वर्षी घरांतून पळून, आपल्या विधवा आईला टाकून, 'शाहूनगरवासी' मंडळींत दाखल झालेला, पुढे अधिकाधिक लौकिकास

चढलेला नाट्यरसिकांच्या गळ्यांतला ताईत बनलेला ' गणू ' आपली विधि-लिखित भूमिका संपवून जगाच्या रंगभूमीवरून अंतर्धान पावला ! रंगमंचावरची संत तुकारामाची अभंगवाणी स्तब्ध झाली. राणा भीमदेवाची समशेर कायमची म्यान झाली. ' जगायचं की मरायचं एवढाच प्रश्न शिल्लक आहे' असा प्रश्न करणाऱ्या हॅम्लेटनं या प्रश्नाचं उत्तर ठरवून मराठी प्रेक्षकांचा निरोप घेतला. ' हाय ! हाय ! गणपतराव गेले ! गेले ! ' अशा मथळ्याचीं हस्तपत्रकं मुंबईत वाटलीं गेलीं. अच्युतराव कोल्हटकरांच्या ' श्रुतिबोध ' कचेरींतून संध्याकाळीं सहा वाजतां निघालेल्या प्रेतयात्रेस हजारो लोक सामील झाले. त्यांच्या मृत देहावर तीनशे रुपये किंमतीचा भरजरी शेला घालून बालगंधर्वांनी गणपतरावांना अखेरचा मुजरा केला. गणपतरावांच्या पार्थिव देहाला स्पर्श करण्यासाठी पेटलेल्या चितेंतून जी पहिली ज्वाला उठली ती पाहिल्याबरोबर स्मशानभूमींत जमलेल्या लोकांचे हुंदके अनावर झाले !

गणपतरावांच्या निधनाची बातमी दुसऱ्या दिवशीं महाराष्ट्रभर पसरली तेव्हा लाखो लोकांनी उद्गार काढले, ' गणपतराव गेले !–गणपतराव अमर झाले ! मराठी रंगभूमीवरचं गणपतरावांचं युग संपलं ! '

* * *

## २४ : जुन्या निबंधकारांतील रसिकाग्रणी शिवराम महादेव परांजपे

१८८० पासून १९२० पर्यंतच्या चाळीस वर्षांच्या कालखंडांत मराठी साहित्यांत जुन्या थाटाचा निबंध वैपुल्यानं लिहिला गेला. आगरकर, चिपळूणकर, टिळक, शिवराम महादेव परांजपे, खाडीलकर, केळकर, 'भाला'कार भोपटकर, संदेशकार कोल्हटकर अशा एकाहून एक मातबर लेखकांनी निबंध लिहिले. हे सारेच सारस्वत आपापल्या परीनं श्रेष्ठ होते आणि मान्यताहि पावले. परंतु या सर्व मंडळींत शिवराम महादेव परांजपे यांचं स्थान विशेष आहे.

लघुनिबंध या नांवानं जो साहित्यप्रकार आधुनिक मराठी साहित्यांत ओळखला जातो त्याच्याहून पूर्वीचा निबंध वेगळा होता. त्याचा हेतु वेगळा होता. शैली वेगळी होती–एकंदर बैठकच वेगळी होती. कोणत्या तरी राजकीय, सामाजिक, धार्मिक प्रश्नांवर लोकजागृति करण्यासाठी चिपळूणकर, आगरकर, टिळक प्रभृति मंडळी निबंध-लेखन करीत असत. साहाजिकपणेच तो पांडित्यानं भरलेला असे. कांही तरी सिद्ध करण्यासाठी किंवा कोणतं तरी मत खोडून टाकण्यासाठी तो लिहिलेला असे. साहजिकपणेच त्याचा विस्तार मोठा असे.

सर्व जुन्या निबंधकारांच्या लेखनाला हें विधान लागू पडणार आहे. परंतु शिवराम महादेव परांजपे यांच्या निबंधलेखनाचे कांही विशेष गुण

होते, आणि त्या विशिष्ट गुणांमुळे. त्यांना त्या काळांतल्या सर्व निबंधकारां-मध्ये विशिष्ट स्थान प्राप्त झालं होतं. ... आज घटकेला देखील मराठी निबंधाची जुनी परंपरा मी आठवूं लागलो की मला चिपळूणकरांची आठवण होते. आगरकरांची होते, टिळकांची होते. परंतु शिवराम महादेव परांजप्यांची होते ती एका विशिष्ट संदर्भांत. त्यांचे म्हणून जे विशिष्ट गुण होते त्या गुणांसाठी !

टिळकांच्या निबंधाचा जो हेतु होता तोच परांजप्यांच्या निबंधाचा होता. परक्या ब्रिटिश सत्तेविषयी लोकांत असंतोष निर्माण करून स्वातंत्र्य-प्राप्तीच्या चळवळींत जनतेला ओढण्यासाठी टिळकांनी आणि परांजप्यांनी दोघांनीहि लेखणी चालविली. परंतु दोघांच्या विचारांतलं साम्य इथे संपलं. ... कारण शैलीचा आपण विचार करूं लागलों की टिळकांहून परांजपे वेगळे होते, ही गोष्ट आपल्या नजरेंत ताबडतोब भरते. एकाच विषयावर किंवा प्रश्नावर या दोघांनी लिहिलेले निबंध आपण घेतले तर टिळकांचं लिहिणं निराळं, परांजप्यांचं अगदी वेगळं असा प्रत्यय आपल्याला येईल...इतकंच नव्हे तर असं देखील विधान करावं लागतं की परांजप्यांची जी शैली होती ती खास त्यांची होती. खास त्यांच्यासाठी होती. प्रतिपक्षाला नुसतंच वादांत जिंकून शिवरामपंतांचं समाधान कधी होत नसे. त्याला हास्यास्पद करून टाकण्याची त्यांची प्रतिज्ञा असे आणि व्याजोक्ति, वक्रोक्ति, उपरोध अशा हत्यारांनी ते प्रतिपक्षाची अगदी धूळधाण करून टाकीत असत.

हा झाला शिवराम महादेव यांच्या निबंधलेखनाचा एक विशेष गुण.

परंतु याहूनहि कदाचित् अधिक महत्त्वाची दुसरी गोष्ट आहे. ती अशी की परांजपे हे जसे त्या काळांतले अग्रेसर राजकीय पुढारी होते, त्याच-प्रमाणे ते पंडित होते. आणि त्याहिपेक्षा अधिक अंशानं मोठे रसिक होते. किंबहुना असं म्हणावं लागेल की त्यांच्या समकालीन निबंधकारांपैकी इतर कुणाच्याहि अंगीं नव्हतं एवढं पांडित्य आणि रसिकत्व शिवरामपंतांच्या ठिकाणीं होतं. त्यांचा संस्कृत वाङ्मयाचा व्यासंग जबरदस्त होता आणि त्याचप्रमाणे काव्य, चित्र, नाट्य अशा क्षेत्रांतील कलाकृतींचा आस्वाद

घेण्याची पात्रता त्यांच्या ठिकाणीं विशेष करून होती. ... याचा परिणाम असा झाला असा की राजकीय प्रश्नावर ज्याप्रमाणे त्यांनी प्रदीर्घ निबंध लिहिले ( किंवा केवळ अविस्मरणीय अशीं दोन दोन अडीच अडीच तास व्याख्यानं दिलीं ) त्याचप्रमाणे त्यांच्या साहित्य व्यासंगाची आणि रसिक अंतःकरणाची साक्ष देणारे अनेक निबंधहि त्यांनी लिहिले.

हीं त्यांचीं ' रसग्रहणं ' म्हणजे मराठी साहित्याचीं मोठीं भूषणं म्हणावीं लागतील.

त्यांच्या रसग्रहणात्मक निबंधांत विशेष प्रत्यय येतो तो दोन गुणांचा. त्यांच्या कल्पनाशक्तीची झेप आणि त्यांच्या सौंदर्यसंवेदनेची तरलता आणि सूक्ष्मता.

कालिदासाच्या ' शाकुंतल ' नाटकाच्या पाचव्या अंकांत दुष्यंत राजा पुनःपुन्हा निक्षून सांगतो की, " या शकुंतलेला मी पूर्वी कधी बघितलेली देखील नाही, तिचा माझा विवाह झाल्याचं ती सांगते त्यांत काडीमात्र सत्य नाही, स्त्रिया आपल्या मतलबासाठी अशींच खोटीं कुभांडं रचीत असतात. या स्त्रीचा स्वीकार मीं करूं शकत नाहीं...." दुष्यंत राजानं पूर्वीं दिलेली अंगठी त्याला दाखवावी म्हणजे त्याला ओळख पटेल अशा विचारानं शकुंतला तसं करू जाते तों तिला आढळून येतं की आपल्या बोटांत अंगठी नाही. मग मात्र, तिचा मार्ग खुंटतो. ' हे धरणी माते दुभंगून मला पोटांत घे ! ' अशी आर्त स्वरांतली प्रार्थना ती करते तिचाहि कांहीं उपयोग होत नाही. मग ती रडत रडत राजाच्या अग्निशाळेतून बाहेर पडते. परंतु ती गेली न गेली तोंच राजाचा पुरोहित राजाला हकीगत सांगतो की ' प्रकाशाची एक मोठी ज्योति प्रगट झाली आणि त्या ज्योतीनं तिला उचलून आकाशांत नेलं.'

कालिदासानं ' शाकुंतल ' नाटकाचा पाचवा अंक या ठिकाणीं संपविलेला आहे... शिवराम महादेव परांजपे यांचा ' कालिदासानं न लिहिलेलं नाटक ' या मथळ्याचा एक अतिसुंदर लेख आहे. त्या लेखांत ते म्हणतात, " कालिदासानं अत्यंत निष्ठुरपणानं आपला अंक येथे संपविला

असेल ! पण त्याच्या रसिक प्रेक्षकांचा अंक येथे संपत नसून उलट त्यांच्या करुणरसाच्या अंकाला येथून सुरुवात होते... शकुंतला कुठे आहे तें कुणालाच कळत नाही. ती कुठे गेली, तिला कुणी कशाकरिता नेलं, ती बिचारी गरोदर आहे. या गरोदरपणात तिची काळजी कोण घेईल, या अनाथ शकुंतलेला जें मूल होईल त्याचं संगोपन कोण करील, असे अनेक प्रश्न या ठिकाणीं प्रेक्षकांच्या मनांत उत्पन्न होतात. यांपैकी कोणत्याहि प्रश्नाचं उत्तर कालिदासानं कांही सुद्धा दिलेलं नाही. त्यानं फक्त एवढंच सांगितलेलं आहे, की एक ज्योति प्रकट झाली आणि शकुंतलेला घेऊन गेली. तेव्हा आता ही ज्योति कोण, ती एकाएकी इथे का व कशी आली, आणि तिनं शकुंतलेला आकाशांत उचलून कां नेलं, वगैरे प्रश्नांच्या विवरणाकडे आपण वळूं...आणि येथूनच कालिदासानं न लिहिलेल्या नाटकाला सुरवात होत आहे."

म्हणजे कालिदासाच्या 'शाकुंतल' नाटकांत शिवराम महादेव परांजपे यांना एक पोकळी आढळली आहे. आणि ती भरून काढण्यासाठी त्यांनी आपल्या निबंधाच्या उत्तरार्धाची जवळ जवळ पंचवीस पानं लिहिली आहेत. कालिदासानं नाटकाच्या चौकटींतून जो कथाभाग वगळला तो त्यांनी आपल्या कल्पनेनं समजावून सांगितलेला आहे. विश्वामित्राचं सत्त्व-हरण करण्यासाठी आलेल्या मेनकेला त्याच्यापासून कन्यारत्न झालं, त्या अपत्याचा संभाळ करण्याचं त्यानं तर नाकारलंच, परंतु अप्सरांच्या नियमाप्रमाणे तिलाहि आपलं कन्यारत्न टाकून जावं लागलं...परांजप्यांनी अशी कल्पना लढविली आहे की मेनका जरी आपल्या तान्ह्या मुलीला टाकून गेली तरी तिचा जीव तिच्या भोवती सतत घोटाळत राहिला होता. शकुंतला वाढत गेली, मोठी झाली, दुष्यंतराजाच्या प्रेमांत सांपडली, त्याच्याशीं तिचा गांधर्व विवाह झाला – या एकंदर सगळ्या अवधीत मेनका गुप्तपणानं तिच्याभोवती घुटमळत होतीच, ती कुणाच्याहि दृष्टीस पडत नव्हती. परंतु गुप्त रूपानं ती आपल्या लेकीचं संरक्षण आणि संशोधन करीत होतीच.

जें नाटक कालिदासानं लिहिलं नाही परंतु जो कथाभाग परांजप्यांनी आपल्या कल्पनाशक्तीचा वापर करून लिहिला तो हा होय. हा लिहितांना

परांजप्यांच्या सहृदयतेला आणि कल्पनाचातुर्याला विलक्षण बहर आलेला आहे. त्यांच्या या सुंदर लिहिण्याचा एक नमुना बघा : तान्ह्या शकुंतलेला झोप लागली म्हणजे पाळणा थांबत असे आणि आश्रमवासी स्त्रियांना स्वस्थ झोपा लागत असत. पण त्यांतून मधेच कुणी जागृत झाल्यास शकुंतला रडत नसतांहि पाळणा हलत आहे आणि पाळण्याच्या दोऱ्या वाजत आहेत असा भास झाल्यासारखा त्यांना वाटे. कोण झोके देत आहे तें मात्र त्यांना कधी दिसलं नाहीं.'

अशा प्रकारचे कितीक टीकालेख परांजप्यांनी लिहिले. परंतु अशा स्वरूपाच्या त्यांच्या लेखांत सगळ्यांत गाजलेला लेख म्हणजे एका चित्रावरची त्यांची टीका –

१९२६ साली मी आणि आप्पासाहेब गोखले यांनी 'रत्नाकर' नांवाचं मासिक सुरू केलं. मासिकाच्या प्रत्येक अंकांत कुणातरी विख्यात चित्रकाराचं रंगीत चित्र आम्ही देत असूं. १९२८ च्या जुलै महिन्याच्या अंकांत श्री. ठाकूरसिंग या नामांकित चित्रकाराचं एक चित्र आम्ही दिलं होतं. एक सुंदर स्त्री अर्ध-विवस्त्रावस्थेंत पलंगाला टेकून उभी आहे. उजव्या हातांत तिनं साडीचं टोक धरलेलं आहे. ती साडी तिनं नीटशी परिधान केलेली नाहीं, तिचं वरचं अंग उघडं आहे, केशकलाप मोकळा आहे, तिनं आपला डावा हात मस्तकावर टेकलेला आहे, आणि तिच्या त्या हातांत एक पत्र आहे– अशा तऱ्हेचं तें चित्र होतं. या चित्रांत मूळचं नांव होतं, 'Letter-hit' (म्हणजे पत्रानं दुःख-विव्हल झालेली.) परंतु मी त्या चित्राला नांव दिलं होतं 'प्रणियिनीचा मनोभंग.'

या चित्राचं रसग्रहण करणारा खूप मोठा लेख शिवरामपंत परांजप्यांनी लिहिला. तो त्या वेळेस तर खूप गाजलाच, परंतु आज घटकेला देखील उत्कृष्ट रसग्रहणाचा नमुना म्हणून त्याकडे बोट दाखवितां येईल.

'प्रणयिनीचा मनोभंग' या चित्रावरचा जो लेख शिवरामपंत परांजप्यांनी लिहिला त्या लेखाची प्रस्तावना करणारा–त्या लेखासाठी पार्श्वभूमि तयार करणारा–दुसरा एक लेख त्यांनी आधी लिहिला होता. 'चित्र व चित्रकलेची टीका' अशा मथळ्याखालील त्या लेखांतलं परांजप्यांचं प्रतिपादन असं होतं,

की चित्रं आणि काव्य यांचे संबंध फार जवळचे आहेत. या दोन कला बहिणी बहिणी आहेत. साहित्यकलेला चित्रकलेचं साहाय्य आणि चित्रकलेला साहित्यकलेचं सहाय्य देतां येणं शक्य आहे, आणि दिलं पाहिजे. कवि काव्य स्वरूपांत जें कांही सांगतो त्यावरून चित्रकारानं चित्र तयार केल्यास त्याचा परिणाम रसिकाच्या मनावर कदाचित् अधिक होईल. आणि त्याचप्रमाणे सुंदर चित्राच्या स्पष्टीकरणासाठी साहित्यिकानं लेखणी चालविल्यास मूळ चित्राचा आस्वाद पूर्णत्वानं घेण्यास रसिकाला मोठीच मदत मिळण्याची शक्यता आहे. साहित्याचं शास्त्र बोलकं शास्त्र आहे. चित्र म्हणजे हस्तकौशल्याचा एक प्रकार आहे. हस्तकौशल्याचं शास्त्र हें कांही झालं तरी मुकं आहे. तें फक्त हातानं कृति करूं शकतं. पण त्या हाताला जीभ नसल्यामुळे त्या मानानं हें हस्तकौशल्याचं शास्त्र लंगडं पडतं. त्यांतल्या हस्तकौशल्याचे गुण कुणी वर्णन करून सांगितले तर ते जास्त विशद होण्याचा संभव असतो. चित्रांच्या स्पष्टीकरणासाठी काव्य असणं अत्यंत आवश्यक आहे.

या विचारसरणीच्या पार्श्वभूमीवरून ‘ प्रणयिनीचा मनोभंग ’ या चित्रावरचा प्रदीर्घ लेख परांजप्यांनी लिहिलेला आहे. चित्रकलेचं मर्म जाणणारीं माणसं फार थोडीं असतात. सामान्य लोकांना तें कळत नाही. ते चित्राकडे पाहतात. ‘ वाहवा ’ असा उद्‌गारही त्यांच्या तोंडून निघतो परंतु चित्राचं मर्म त्यांना समजत नाही. तें कुणीतरी सांगण्याची आवश्यकता असते. या भूमिकेवरून परांजपे ठाकुरसिंगाच्या चित्राकडे बघतात, आणि लिहितात, “ प्रस्तुत चित्रांतली प्रणयिनी ही कोण आहे ? कुठली आहे ? कोणत्या वयाची आहे ? तिचा मनोभंग कशानं झालेला आहे ? इत्यादी उद्‌भवणाऱ्या अनेक प्रश्नांची प्रत्येक माहिती आपल्याला बिलकुल नाही व ती आपल्याला सांगावयालाहि येथे कुणी नाही. आणि ती कुणी प्रत्यक्ष सांगितली तर मग त्यांत कांही चमत्कारहि उरणार नाही. आपल्या अनुमानांनी ती सर्व माहिती आपण निश्चित केली तर त्यांतच चमत्कार आहे. त्यांतच व्यंजनावृत्तीचं सार्थक आहे. ”

मग या चित्राकडे बघायला शिवरामपंत आपल्याला सांगतात. तेंहि आपल्याबरोबर चित्राकडे पाहण्याची आपली दृष्टि अनभिज्ञ असल्यामुळे आपल्या मनांत जे प्रश्न कधी उपस्थित होण्याचा संभव नाहीं असे प्रश्न

परांजप्यांची कल्पना उपस्थित करूं लागते. आणि त्यांची प्रतिभा त्या प्रश्नाचीं उत्तरं देऊं लागते. परांजप्यांचा सबंध लेख म्हणजे त्यांची तरल कल्पना आणि प्रखर प्रतिभा यांच्यांतलीं प्रश्नोत्तरं आहेत. तो एक अत्यंत हृदयंगम असा संवाद आहे. संगीतांतली परिभाषा वापरावयाची झाल्यास ती एक ' जुगलबंदी ' आहे. चित्रांत दिसणारी स्त्री बाला आहे, की मध्यमा आहे, का प्रौढा आहे, ती स्वकीय आहे का परकीय आहे, पलंगाच्या ज्या बाजूला टेकून ती उभी आहे ती बाजू उशागतची आहे की पायगतची आहे, हिच्या अंगावर थोडेच अलंकार का आहेत, आणि त्या अलंकारां-वरून कोणत्या प्रांतांतली ही स्त्री असावी, वेळ दिवसाची आहे की रात्रीची आहे, ज्या पत्रानं तिचा मनोभंग केला आहे ते पत्र तिला कुणाकडून आलेलं असावं, त्यांत काय मजकूर असावा, असे प्रश्नांमागून प्रश्न परां-जप्यांनी उपस्थित केले आहेत आणि त्यांचीं उत्तरं देतांना अशी काही मार्मिकता प्रकट केली आहे की त्यांच्या या लेखाचा आस्वाद म्हणजे बुद्धीला चकित करणारा आणि अंतःकरणाला हालवून सोडणारा एक अनुभव ठरावा.

लेखाच्या अखेरीस परांजपे लिहितात, " जग हें असं आहे ! एका क्षणापूर्वीं या प्रणयिनीची किती आनंदमय स्थिति होती ! पण एक पत्र आलं आणि त्यानं सगळ्या सुखाच्या दुधांत मिठाचा खडा टाकला ! एका क्षणांत सगळ्या शृंगाररसाचं करुण रसांत परिवर्तन झालं ! सज्जन असूनही या वासक सज्जेला शय्येवरील सुख न मिळतां तिच्या कपाळीं एका लहानशा क्षणामध्ये विरहोत्कंठितेचं दुःख भोगण्याची पाळी आली ! मोकळे सोडलेले केस तसेच राहिले ! तोंडांतील विड्याचा आरक्तपणा फुकट गेला ! दोन भिवयांच्या मधील तो बारीक कुंकुमतिलक निरुपयोगी झाला ? या सीमं-तिनीच्या भांगामधील शेंदूरहि अकृतार्थ झाला ! आणि तें दुर्दैवी पत्र मात्र अखेरीस या सगळ्या सुखसामग्रीच्या शिरोभागी आरूढ होऊन राहिलं ! हें या चित्रांतलं शेवटचं दृश्य किती दुःखदायक आणि किती दुर्दैवाचं द्योतक आहे ! दुर्दैवापुढे मनुष्याचं कांही चालत नाही ! सगळं जग हें असंच आहे ! या दुर्दैवी जगामध्ये परमेश्वराच्या कृपेवाचून दुसरी कोणतीहि स्पृह-णीय वस्तू नाही ! '

* * *

## २५ : कादंबरीकारांचे मूर्धाभिषिक्त राजे–हरिभाऊ !

सर परशुरामभाऊ कॉलेज १९१६ सालीं स्थापन झालं तेव्हा त्याचं नांव 'न्यू पूना कॉलेज' असं होतं. शिक्षण प्रसारक मंडळीचं हें नवं कॉलेज निघालं तें माझे स्नेही प्रो. दत्तोपंत घारपुरे यांच्या खटपटीनं. त्यांच्या अविश्रांत श्रमांना ज्यांची मोठीच मदत झाली त्या व्यक्तींत पहिलं नांव घेतलं पाहिजे तें कै. हरि नारायण आपटे यांचं. या कॉलेजच्या अध्यापकवर्गांत मी प्रारंभापासून होतों, आणि ज्या अवधींत मी अध्यापनाचं काम केलं त्या अवधींत संस्थेसाठी मोठमोठ्या धनिकांच्या देणग्या मिळविण्याचं काम मीं उत्साहानं केलं. माझा आणि हरिभाऊंचा परिचय घडून आला आणि वाढला तो साहित्याच्या निमित्तानं नव्हे तर न्यू पूना कॉलेजच्या कामाच्या निमित्तानं.

एकाहून एक अधिक सुंदर कादंबऱ्या लिहिणारे प्रतिभासंपन्न कादंबरीकार म्हणून हरिभाऊंची कीर्ति त्या काळांत गाजत होती. माझी पहिली कादंबरी 'अल्ला हो अकबर !' प्रसिद्ध झाली होती, आणि ती लिहिल्याबद्दल माझी थोडीफार वाहवाहि झाली होती. परंतु असं असूनहि हरिभाऊंच्या पुढे मी प्रथम उभा राहिलों आणि त्यांचा पदस्पर्श करून मी त्यांना प्रणाम केला तो साहित्याच्या क्षेत्रांत पदार्पण केलेला एक तरुण म्हणून नव्हे ! तर ज्या नव्या कॉलेजचं पालकत्व हरिभाऊंनी आनंदानं पत्करलं होतं त्याच्या अध्यापकवर्गाचा वयानं सर्वांत लहान सभासद म्हणून ! आणि हरिभाऊंशीं झालेला हा माझा परिचय वाढत गेला तो मोठमोठ्या धनिकांकडून देणग्या मिळविण्याच्या कठीण कलेंतले धडे हरिभाऊंकडून मीं घेतले म्हणून.

## महत्पदाचा दरारा

मी तर त्यांच्या कादंबऱ्या कोळून प्यालों होतों. त्या काळांतल्या सर्वच तरुण विद्यार्थ्यांप्रमाणे त्यांच्या लेखनाचा चाहता होतों, भक्त होतों. मीं एक ऐतिहासिक कादंबरी लिहिल्याची गोष्ट त्यांच्या कानापर्यंत गेलेली नसण्याचा संभव फार कमी होता. कदाचित् त्यांच्या हातीं ती गेली असेल, त्यांनी ती वरवर का होईना चाळून बघितली असेल असाहि संभव होता. परंतु त्यांनी कधीहि माझ्या कादंबरीचा उल्लेख केला नाही, किंवा, मीहि कधी भीत भीत का होईना, परंतु असं कधी म्हटलं नाही की 'माझी एक कादंबरी प्रसिद्ध झाली आहे.'

त्यांच्या महत्पदाचा दरारा वाटे. मनांत येई, चोचींतून आणलेल्या थेंबभर पाण्याची टिटवीनं सागराला काय वर्दी द्यायची ?

काय असेल तें असो, पण एवढं खरं की हरिभाऊ आपट्यांच्या अखेरच्या तीन वर्षांत त्यांचा व माझा पुष्कळ सहवास घडण्याचं भाग्य मला जरी लाभलं, तरी त्यांना मी जवळून पाहूं शकलों तें अनन्यसाधारण प्रतिभेचे सारस्वत म्हणून नव्हे तर इतर स्वरूपांतच.

याचं एक कारण बहुधा हें असावं की त्यांच्या सहवासाचा लाभ मला झाला त्या सुमारास त्यांनी आपल्या 'करमणूक' साप्ताहिकाचं प्रकाशन बंद केलं होतं, आणि लेखनाचा संन्यास घेतला होता. आणि दुसरं कारण संभवतं तें हें की कादंबऱ्या लिहिणारे आपटे, आणि सार्वजनिक जीवनाचा 'जगन्नाथाचा रथ' ओढण्याची हौस करणारे आपटे, अशा दोन भिन्न प्रवृत्ति – वाटल्यास दोन वेगवेगळ्या व्यक्ति म्हणा, – हरिभाऊंच्या शरीरांत होत्या आणि मी त्यांच्या सान्निध्यांत गेलों तेव्हा त्यांच्या ठिकाणचा कादंबरीकार अस्तंगत होऊन सामाजिक जीवनाच्या धकाधकींत आणि भानगडींत रस घेणाऱ्या आपट्यांचं तेवढं दर्शन मला झालं.

साहित्यिकांच्या दोन तऱ्हा असतात, आपण बरं आणि आपलं लेखन बरं असं समजून एकमार्गीपणानं आपल्या अभ्यासिकेंत रमून राहणारे कांही साहित्यिक असतात. याउलट कांहींचा स्वभावधर्म असा असतो की प्रत्यक्ष

लेखनांत ते जितका वेळ घालवितात त्याच्याहिपेक्षा अधिक वेळ कोणत्यातरी सार्वजनिक स्वरूपाच्या कामांत घालविण्याची त्यांना हौस वाटते. हरिभाऊ आपल्यांची गणना या दुसऱ्या वर्गांत होती.

'आनंदाश्रम' नांवाच्या वास्तूच्या ज्या दर्शनी भागांत हरिभाऊ राहात असत तिथल्या 'दिवाणखान्यांतले' हरिभाऊ आणि शेजारच्या छोट्या 'खोलींतले' हरिभाऊ अशी हरिभाऊंच्या चरित्राची विभागणी झाली होती म्हणाना.

हरिभाऊ लेखन करीत असत बहुधा रात्री किंवा पहाटे, आणि त्यांचा सारा दिवस जात असे दिवाणखान्यांतल्या बैठकींत. त्यांना निरनिराळ्या कामासाठी भेटायला येणाऱ्या माणसांची आणि मित्रमंडळींची बैठक अष्टौप्रहर पडलेली असायची. हरिभाऊंचा मित्रपरिवार फार मोठा होता. या परिवारांत नाना तऱ्हांचे आणि नाना मतांचे लोक असत. हरिभाऊंचे विद्यार्थिदशेंतील स्नेही, मवाळ पक्षांतले छोटेमोठे पुढारी, शिक्षण क्षेत्रांतली माणसं, म्युनिसिपालिटीचे सभासद, गावांतले प्रतिष्ठित व्यापारी-विविध व्यवसायांतल्या शेकडो माणसांची हरिभाऊंकडे ये-जा चालू असे.

त्यांच्याकडे येणाऱ्या मंडळींचे भिन्न भिन्न गट होते. परंतु प्रत्येक गटाच्या केंद्रस्थानीं हरिभाऊ होते. सर्वांना ते आपल्या जिवलग मित्राप्रमाणे वाटत. त्यांच्या त्या दिवाणखान्याच्या बैठकींत ज्याची चर्चा झाली नाही असा एकहि सार्वजनिक विषय नव्हता. या चर्चेंत हरिभाऊ सबंध दिवस गुंतलेले असत. या बैठकींत हरिभाऊंना पाहिलं तर ते लेखक असतील अशी शंकादेखील येण्यासारखी नव्हती. हजार लोक हजार प्रकारचीं कामं घेऊन त्यांच्याकडे येत असत. त्यांचा स्वभाव इतका प्रेमळ आणि भिडस्त होता, की कुणालाहि त्यांना 'नाही' म्हणवत नसे. नको त्या भानगडी ते स्वतःमागे लावून घेत. त्यामुळे त्यांचं स्वतःचं काम जें लिहिणं तें करायला त्यांना फुरसत मिळत नसे! आणि पुष्कळदा त्यांची तारांबळ उडे. मग मात्र दिवाणखान्याला लागून असलेल्या खोलींत बसून ते लिहावयास प्रारंभ करीत असत. अशा वेळीं सरस्वती व तिचा हा प्रतिभासंपन्न उपासक या दोघांखेरीज कुणाचंहि अस्तित्व त्या ठिकाणीं उरत नसे. आपल्या

कादंबरींतल्या विविध पात्रांच्या वर्णनांत हरिभाऊ रंगून जात असत. जणूं त्यांच्या स्वतःच्या आयुष्याचा प्रवाह तेवढ्यापुरता थांबत असे, व कल्पना-सृष्टींतील पात्रांच्या रूपानं ज्यांची मायबोली मराठी आहे अशा लाखो लोकांशीं ते हितगुज करीत राहात.

## तोहि वेळ कारणींच लागे

भेटायला येणाऱ्या लोकांच्या बैठकींत हरिभाऊ तासन्तास जो वेळ घालवीत असत तो, किंवा सार्वजनिक कामांच्या कटकटींत त्यांचा जो वेळ खर्च होत असे तो वाया जात असे, तो त्यांनी तसा वाया घालविला नसता तर त्यांच्या हातून अधिक कादंबरीलेखन झालं असतं, असा विचार मनांत येण्यासारखा आहे. परंतु हा विचार चुकीचा म्हटला पाहिजे. कारण दिवाणखान्यांतल्या बैठकींत किंवा सार्वजनिक कामाच्या रगाड्यांत हरिभाऊंचा वेळ वाया जात असे ही कल्पनाच साफ चुकीची आहे. कारण, कथा-लेखनाचं मानसशास्त्र ज्याला कळतं तो सांगेल की बैठकींत काय किंवा कामाच्या रगाड्यांत काय माणसांच्या ज्या हजार तऱ्हा हरिभाऊंना भेटत त्यांतच त्यांच्या लेखनाची तयारी होत असे.

हरिभाऊंनी आपल्या कादंबऱ्यांतून विविध स्वभावाच्या पात्रांचे जे अविस्मरणीय नमुने चित्रित केले ते त्यांनी कुठून आणले ? तर बैठकींत किंवा सार्वजनिक कामाच्या खटाटोपांत जीं माणसं त्यांना भेटलीं त्यांतूनच !

हरिभाऊंचीं चार नाटकं, कांही कथांचे संग्रह, चरित्र, कविता, स्फुट, लेख, व्याख्यानं म्हणजे त्यांच्या प्रगल्भ प्रतिभेच्या आणि बुद्धीच्या पैलूंचा दुय्यम प्रकाश म्हणावा लागेल. त्यांच्या प्रतिभेचं मुख्य क्रीडास्थान कादंबरी हेंच होतं. अकरा ऐतिहासिक व दहा सामाजिक अशा एकंदर एकवीस कादंबऱ्या हरिभाऊंनी लिहिल्या. १८६४ सालीं हरिभाऊ जन्मले. सुमारे १८८६ सालीं त्यांची पहिली कादंबरी ‘ मधली स्थिति ’ प्रसिद्ध झाली. १९१९ सालीं हरिभाऊ वारले. परंतु त्यांच्या आधी दोन वर्षं त्यांची एकुलती मुलगी ताई वारली, तेव्हा अर्धवट लिहिलेली ‘ कर्मयोग ’ कादंबरी तशीच टाकून त्यांनी लेखनाचा जवळजवळ कायमचा संन्यास घेतला !

म्हणजे १८८६ ते १९१७ हा हरिभाऊंच्या लेखनाचा काळ ठरतो. सतत एकतीस वर्षे हरिभाऊ लिहीत राहिले. या काळांत ते मराठी कादंबरीकारांचे मूर्धाभिषिक्त राजेच होते. कादंबरीच्या क्षेत्रापुरतं बोलायचं झालं तर या एकतीस वर्षांच्या कालखंडाला ' हरिभाऊंचं युग ' असंच नांव द्यावं लागेल.

## जें लिहिलें तें चिरंजीव

ज्या मराठी समाजाचीं चित्रं हरिभाऊंनी रेखाटलीं त्या समाजाचं स्वरूप आता बदललेलं आहे. अर्धशतकाच्या पाण्याच्या लोंढ्याबरोबर समाजापुढचे त्या वेळचे प्रश्न, त्या वेळचे स्त्री-पुरुषांचे नमुने, कुटुंब-पद्धति, त्या पद्धतींतील सुखदुःख, सुष्टपणाच्या, दुष्टपणाच्या, प्रेमाच्या, द्वेषाच्या तऱ्हा या साऱ्या गोष्टी जुन्या पाचोळ्याप्रमाणे कोठल्या कोठे नाहीशा झाल्या आहेत. परंतु ज्याबद्दल हरिभाऊंनी लिहिलं ते विषय आणि तीं माणसं कालाच्या उदरांत गडप झालीं असलीं, तरी हरिभाऊंनी जें लिहिलं तें चिरंजीव आहे; आधुनिक मराठी साहित्याचा तो एक गाभा आहे. मराठी साहित्याच्या बरोबरीनं हरिभाऊंच्या कादंबऱ्यांची आयुर्मर्यादा आहे. कारण आज घटकेच्या वाचकाला त्यांच्या कादंबऱ्यांत कांही तांत्रिक दोष सहज आढळतील हें जितकं खरं, तितकंच, किंबहुना त्याहून अधिक संशयातीत आणि खरं हें की, त्यांच्या कलाकृती वाचणाऱ्याला पदोपदीं त्यांच्या लिहिण्यांतली प्रतिभा, प्रसाद, जनहिताची कळकळ या गुणांचा प्रत्यय येतो, व विशाल सहानुभूतीचा एक रसिक हितकर्ता आपल्याशीं बोलत आहे, या सुखकारक भावनेचा अनुभव येतो.

## ' करमणूक साप्ताहिकाचें रेकॉर्ड '

आपला समाज सुधारला पाहिजे, त्यांतील मूर्खपणाच्या व दुष्ट चालीरीतींचा व रूढींचा उच्छेद केला पाहिजे, ही हरिभाऊंच्या अंतःकरणांतील तळमळ त्यांच्या प्रतिभेच्या तोलाची होती. कादंबऱ्यांच्या द्वारें आपल्याला समाजजागृति घडवून आणायची आहे असा हेतु त्यांनी मनाशीं धरला होता. त्यांची पहिली कादंबरी ' पुणें वैभव ' मध्ये प्रसिद्ध झाली. परंतु

लवकरच 'करमणूक' नांवाचं स्वतःचं साप्ताहिक त्यांनी काढलं. या साप्ताहिकानं जें रेकॉर्ड केलं, तें अजून मराठी साहित्यांत मोडलं गेलेलं नाही ! या शनिवारचा अंक पुढच्या शनिवारीं निघावा असं कितीकदा तरी व्हावं. किंबहुना शनिवारच्या शनिवारीं 'करमणूक' पत्राचा अंक आला तर ग्राहकांना मोठा विस्मयच वाटत असे. परंतु हा दोष पत्करूनहि सर्वांना 'करमणूक' सदा हवीशी वाटे. करमणुकीच्या ताज्या अंकाची मी स्वतः किती वेड्यासारखी वाट पाहात असें तें मला आजून आठवतं.

कारण हरिभाऊंनी एखादी नवी कादंबरी अशा कांही ठिकाणीं आणून सोडलेली असे की, पुढे काय घडलं तें जाणण्याची ओढ लागून दुसरं कांही सुचूं नये अशी माझी अवस्था होई ! आणि माझ्याप्रमाणे जवळच्या दूरच्या हजार ठिकाणीं हजार माणसं करमणुकीच्या अंकाकडे डोळे लावून बसत होतीं ! 'केसरी'ची ज्याप्रमाणे एका विवक्षित दृष्टीने अमर्याद लोकप्रियता होती त्याप्रमाणेच हरिभाऊंच्या 'करमणूक' पत्राची होती.

**आम्ही नम्र सेवक–पण कोणाचे ?**

१८९० सालच्या ऑक्टोबर महिन्यांत हरिभाऊंनी 'करमणूक' पत्राचा नमुना अंक काढला, त्यांत पत्र काढण्याचा उद्देश सांगतांना त्यांनी लिहिलं होतं, "जी गोष्ट जनसमूहाने अवश्य करावी ती 'केसरी', 'सुधारक' एखाद्या कठोर पित्याप्रमाणे कठोर शब्दांत सांगणार व समाजाचं अप्रशस्त वर्तन झाल्यास वेळीं वाक्प्रतोदाचे तडाखे लगावणार, तीच गोष्ट हें पत्र प्रेमळ मातेप्रमाणे गोड गोड शब्दांनी व चांगल्या चांगल्या गोष्टींनी सांगणार व अप्रशस्त वर्तनाबद्दल मायेनं शासन करणार. येवढं मात्र ध्यानांत ठेवावं, की हें पत्र आचरट आईप्रमाणे फाजील लाड करणार नाही. या पत्रांत आता आपणास हवा तसा आचरट व पाचकळ मजकूर वाचावयास सापडेल अशी आशा धरून जे याचे वर्गणीदार होतील त्यांची अत्यंत निराशा होईल. नाटिका, फाटिका अशीं मोठमोठीं नावं घेऊन पाचकळ व फाजील मजकूर खरडणारं हें पत्र नव्हे. ज्यास तशा मजकुराखेरीज कांही आवडत नसेल त्यांनी

आमच्याकडे आपली वर्गणी पाठवून आमचे हात विटाळूं नयेत. परंतु ज्यास पुढच्या माडीपासून चुलीपर्यंत, दिवाणखान्यांतील टेबलापासून फणी-करंड्याच्या पेटीपर्यंत, कोणाच्या हातीं पडलं तरी हवं त्यांनी हवं त्याच्या देखत निःशंकपणे वाचण्यास हरकत नाही असं पत्र पाहिजे असेल, त्यांनी अवश्य करमणुकीचं वर्गणीदार व्हावं. सध्याच्या आपल्या बऱ्यावाईट स्थितीचं–कोणीहि वाचलं असतां बिलकुल नाक मुरडण्याचं कारण नाही असं चित्र पाहिजे असल्यास त्या त्या गृहस्थास आम्ही आदरपूर्वक निमंत्रण करतों. शनिवारीं संध्याकाळीं थकून भागून आल्यावर आपल्या कुटुंबांतील लहानमोठ्या माणसास जमवून खुशाल हसत करमणूक करीत ज्ञान मिळ-विण्याची ज्याची इच्छा असेल त्यांचे आम्ही नम्र सेवक आहोंत."

## सामाजिक प्रतिनिधित्व

समाजजागृतीचा हेतु ठेवून लिहिलेली कादंबरी केवळ त्या हेतूमुळे श्रेष्ठ ठरते हेंहि मला मान्य नाही. व हरिभाऊंच्या कादंबऱ्यामुळे समाजजागृतीचं कार्य कांही विशेष प्रमाणांत घडलं हेंहि म्हणणं मला मान्य नाही. परंतु समाजजागृतीविषयी हरिभाऊंची कळकळ मोठी होती. त्या कळकळीबद्दल त्यांना धन्यवाद दिले पाहिजेत, हेंहि निर्विवाद; आणि हरिभाऊंच्या कलाकृति एकाहून एक मोठ्या गुणांच्या होत्या हेंहि निर्विवाद ! हरिभाऊंच्या कादंबऱ्यांत ज्या समस्यांचं चित्रण आढळतं त्या सोडवून समाज खूप पुढे गेलेला आहे. त्या कादंबऱ्यांतला प्रचार आता इतका जुना आणि शिळा झाला आहे की, चालू घटकेला त्या प्रचारानं हरिभाऊंच्या लेखनाची गोडी वाढण्याऐवजी कमीच होत असावी. परंतु तरी देखील हरिभाऊ खूप मोठ्या प्रमाणावर वाचले जातील. याचं कारण हरिभाऊंच्या लेखनांतला प्रतिभाविलास हेंच. हरिभाऊंची कोणतीहि कादंबरी वाचायला घ्या, त्यांची सहृदयता, त्यांची कल्पकता, त्यांचा नर्म विनोद इत्यादि गुणांची छाप तुमच्यावर पडल्यावाचून राहणार नाही...हरिभाऊंच्या कलासृष्टींतलीं पात्रं तत्कालीन समाजाचं प्रतिनिधित्व करणारीं होतीं. त्या प्रतिनिधित्वाचे त्यांचे रंग आता विटून गेले आहेत. परंतु त्यांचं तें प्रतिनिधित्व म्हणजे त्यांचा खरा प्राणवायू नव्हताच. हरिभाऊंनी आपल्या प्रतिभेचा आणि

प्रसादाचा फुंकर घालून तीं पात्रं उभीं केलीं म्हणून तीं आजहि जिवंत वाटतील. ललितसाहित्याचा खरा आनंद कसा घ्यावा याची निकोप समजूत मराठी माणसांना जोंपर्यंत असेल तोंपर्यंत हरिभाऊंचीं पात्रं जिवंत राहतील !

## कायमची चुटपूट ती ही

पंचेचाळीस वर्षांपूर्वी ज्या दिवशीं हरिभाऊंचं निर्याण झालं त्या दिवशीं कित्येक संस्थांचा संगोपनकर्ता आणि सल्लागार गेला ! कित्येक व्यक्तींचा सन्मित्र गेला ! पुण्यनगरींतलं एक चैतन्य गेलं ! सारस्वतांच्या सभेची शोभा गेली !...हीं सारीं दुःखं मला जाणवलींच ! परंतु त्यांच्या भरीला माझं म्हणन एक विशिष्ट गुप्त दुःख होतं—

त्यांच्या सहवासांत असताना कित्येकदा तरी माझ्या मनांत आलं होतं, धीर करावा आणि हरिभाऊंना म्हणावं असंख्य वाचकांना तुम्ही जसा आनंद दिला आहे तसा तर मला दिला आहांतच, पण शिवाय तुमच्या-पासून मी स्फूर्तीहि घेतली आहे. सरस्वतीच्या ज्या दरबारांत तुम्ही रत्नखचित आसनावर बसलां आहांत त्या दरबाराच्या देवडीवर जागा मिळविण्यासाठी मी धडपडणार आहें. तुमचे आशीर्वाद माझ्या मस्तकावर असूं द्या ! आणि तुम्हांला बरी वाटेल अशी एखादी कादंबरी मला लिहितां आली तर माझ्या पाठीवर तुमची शाबासकीची थाप पडूं द्या !—

परंतु माझा भित्रेपणा आणि करंटेपणा असा की हजारदा ओठाशीं आलेले हे शब्द हरिभाऊंजवळ बोलायचे राहिले ते राहिले !...मानसन्मान पुष्कळ मिळविले मी; परंतु पाठीवर हरिभाऊंच्या शाबासकीची थाप मला हवी होती ती मिळावयाची तशीच राहिली !

* * *

## २६ : पंतप्रधान गेले !.... पंडित जवाहरलाल नेहरू अमर आहेत !

या क्षणीं माझ्या मनाची अवस्था मोठी कठीण झाली आहे.

काय लिहूं, कसं लिहूं, किती लिहूं, असं झालं आहे. मनांत उचंबळून येणारे विचार आणि भावना व्यक्त करणारे शब्द सापडतील असं वाटत नाही. मनोगत व्यक्त करण्याचं सामर्थ्य शब्दांत असतं यावरचा नेहमीचा विश्वासच उडाल्यासारखं झालं आहे. आणि तरी वाटतं आहे की खूप खूप लिहावं. जो थोर पुरुष आपल्यांतून गेला आणि जो आता आपल्याला कधीदेखील दिसणार नाही, त्याच्या थोरवीचं खूप खूप वर्णन करावं...

आपल्याला प्रिय असलेली व्यक्ति मृत्यूनं हिरावून नेली की जी शोक-विव्हल अवस्था वाट्याला येते ती मोठी चमत्कारिक असते. कुणाशीं कांही बोलूं नये, साऱ्या लोकांपासून दूर कुठे तरी जावं, आणि कुठल्या तरी अंधाऱ्या कोपऱ्यांत दुःखाच्या बेहोषींत पडून राहावं, असंहि त्या अवस्थेंत वाटतं, आणि उलट असंहि वाटतं की जो जो भेटेल त्याच्या त्याच्या गळ्यांत गळा घालावा, जी व्यक्ति कालवश झाली तिच्या परोपरीच्या आठवणी काढाव्या, तिच्या गुणांचे गोडवे गावे, इतकंच काय, तिच्या ठिकाणच्या दोषांच्या गोष्टी काढून का होईना, तिच्याविषयी बोलत राहावं....

मृत्यूपुढे कुणाचा इलाज नसतो. ‘भरतीचा प्रहर आणि काळाची लहर’ या दोन गोष्टी मानवाच्या इच्छेचा मुलाहिजा न ठेवतां चालतात,

अशा अर्थाचं इंग्रजी सुभाषित आहे. यमधर्मांपासून आपल्या पतीचे प्राण परत मिळविणाऱ्या सती सावित्रीची पुण्याई आपल्याजवळ नाही. ' जिथून कोणताहि प्रवासी परत येत नाही ' तिथे पोचलेल्या नेहरूंना आपण परत आणूं शकत नाही. मृत्यूची सत्ता आपल्याला मान्य केलीच पाहिजे. परंतु आपल्या लाडक्या नेहरूंच्या अगणित आठवणी आपल्याजवळ आहेत त्या तर मृत्यू हिरावून घेऊं शकत नाही ? आणि त्या जोपर्यंत आपल्याजवळ आहेत तोपर्यंत त्यांच्या रूपानं नेहरूच आपल्याजवळ राहतील, नव्हे काय आणि सर्वनाशी मृत्यूवर आपण एका प्रकारें विजय मिळविल्यासारखंच होईल, नव्हे काय ?

नेहरू आपल्यांत होते तेव्हा त्यांच्या आठवणी वाचून किती तरी दिवस कितीदां तरी जात. परंतु ध्यानींमनीं नसतांना ' आपले पंतप्रधान आपल्याला सोडून गेले ' अशा अर्थाचं इंग्रजी वाक्य रेडिओवर ऐकल्यापासून नेहरूंच्या अगणित आठवणी मनांत गर्दी करीत आहेत. नेहरूंच्या मोहक व्यक्तिमत्त्वाचीं जीं नानाविध दर्शनं माझ्या भाग्यानं मला घडलीं तीं चित्रपटांतल्या दृश्यां-प्रमाणे नजरेसमोरून सरकत आहेत. बैठकीवर बसलेले नेहरू, भाषण करणारे नेहरू, सहस्र कंठांतून उठलेल्या ' पंडित नेहरू की जय ! ' अशा जयघोषाचा स्वीकार करतांना हात जोडणारे नेहरू, हसणारे नेहरू, तरातर चालत येऊन व्यासपीठावर उडी मारणारे नेहरू, अशीं दर्शनं चक्क दिसताहेत ! त्यांचा-खास त्यांचाच ! असा आवाज स्पष्ट ऐकू येतो आहे !... चव्वेचाळीस कोटि भारतीय स्त्री-पुरुषांत असे फारच थोडे अभागी जीव असतील की ज्यांना या परमप्रिय नेत्याचं दर्शन घडलं नाही, ज्यांनी त्यांच्या तोंडचे ' भाईयों और बहनों ' हे प्रेमाच्या माधुर्यानं ओथंबलेले शब्द ऐकले नाहीत.

गेलीं पन्नास वर्षे भारतीय जनमनावर अधिराज्य कुणाचं होतं. जवाहर-लाल नेहरूंचं ! १९४७ पासूनच्या १ वर्षांत नेहरू देशाचे पंतप्रधान होते. परंतु त्याच्याहि आधी कितीतरी वर्षांपासून गांधीजींच्या हयातींतसुद्धा तमाम हिंदी जनतेच्या हृदयसिंहासनावर पंडित नेहरू अधिष्ठित झालेले होते. महात्माजींनी भारतीय जनतेची अपरंपार भक्ति संपादन केली होती.

परंतु जनतेच्या उत्कट प्रेमाचा वर्षाव होत होता जवाहरलाल नेहरूंवर ! गांधींची मूर्ति देव्हाऱ्यांत होती. नेहरूंची मूर्ति कोटि कोटि लोकांच्या हृदयांत होती !

गांधींच्या १९२० च्या सत्याग्रहाच्या चळवळींत पंडित मोतीलाल नेहरू यांचं कुटुंब ओढलं गेलं. लढाऊ राजकारणाच्या क्षेत्रांत जवाहरलाल नेहरू यांचं पहिलं पाऊल पडलं तें त्यावेळेसच. परंतु त्याच्याहि आधी पाच वर्षं राजकीय सभेंत भाषण करण्याचा मुहूर्त नेहरूंनी केला होता. तो १९१५ सालांत. नेहरूंच्या देशसेवेच्या व्रताला तेथून आरंभ झाला. लहानपणापासून श्रीमंतींत, सुखविलासांत वाढलेला, लाडावलेला, नंतर इंग्लंडमधील 'हॅरो'च्या शाळेंत आणि मग 'केंब्रिज' विश्वविद्यालयांत शिक्षण घेतलेला, बॅरिस्टरीची पदवी घेऊन स्वदेशी परत आलेला, ज्या वकिलीच्या पेशांत बापानं अलौकिक कीर्ति आणि संपत्ति मिळविली होती त्या पेशाच्या उंबरठ्यावर उभा राहिलेला जवाहरलाल नेहरू तोंड फिरवून स्वातंत्र्यसंग्रामाची वाट चालू लागला. गांधींचा अनुयायी बनला. देशभक्तीच्या व्रताची शपथ त्यानं घेतली... नेहरूंचं हें व्रत पन्नास वर्षं अखंडपणे चालू होतं. त्या व्रताची सांगता बुधवार दि. २७ मे १९६४ रोजीं दुपारीं दोन वाजतां झाली. नेहरूंच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि कर्तृत्वाचा प्रभाव एवढा मोठा होता की भारत आणि नेहरू यांत भिन्नता उरली नव्हती. नेहरूंच्या चरित्राची समाप्ति झाली याचा अर्थ खंडतुल्य भारताच्या जीवनाचं एक महापर्व संपलं असाच करावा लागेल !

माझ्या मनांत पुष्कळदा येतं की, काळाच्या गतींत एक प्रकारची लय असते. देशाचं भाग्य घडविणाऱ्या मोठमोठ्या प्रक्षोभक घटना घडतात त्यांच्यांत देखील ठराविक अंतराचीं आवर्तं येऊन गेलेलीं दिसतात. १९०८ सालीं टिळकांच्या जहाल राजकारणाला भरती आली होती. मग ओहोटीचा काळ आला, पण दहा वर्षांनंतर 'होमरूल लीग'ची चळवळ झाली, आणि मागोमाग १९२० सालीं गांधींच्या असहकार चळवळीचा देशव्यापी उठाव झाला. पुन्हा चळवळीला ओहोटी लागली, परंतु पुनः १९३० सालीं मिठाच्या सत्याग्रहाचं प्रचंड आंदोलन गांधींनी घडवून आणलं. पुन्हा चळवळ थंड पडली. परंतु पुनः १९४२ सालीं 'चले जाव'चा निकराचा

निर्णायक संग्राम पेटला, आणि त्यांत ब्रिटिश सत्तेची आहुतीच शेवटी पडली. दहा-दहा बारा-बारा वर्षांची लय काळानं जणू धरली होती.

जवाहरलाल नेहरू यांच्या जीवनांत अशीच लय मला आढळते. सतरा सतरा वर्षांचे तीन टप्पे मला दिसतात. १९१३ साली नेहरू शिक्षण संपवून घरी आले आणि बॅरिस्टरी करूं लागले. सतरा वर्षांनी १९३० साली लाहोर येथील कॉंग्रेसच्या अधिवेशनाचे ते अध्यक्ष झाले, आणि या अधिवेशनांत भारताने प्रथम जाहीर केलं की, ब्रिटिशांची सत्ता आम्ही झुगारून दिली आहे. आम्ही स्वतंत्र आहोंत. यानंतर सतरा वर्षांनी १९४६ साली नेहरू भारताचे पंतप्रधान झाले. आणि नंतर सतरा वर्षांनी आता त्यांची जीवितयात्रा समाप्त झाली आहे. आणि या तिन्ही घटना अकल्पितपणे घडल्या. बॅरिस्टरी करूं लागलेले नेहरू कॉंग्रेसचे अध्यक्ष होतील असं वाटलं नव्हतं. लाहोर कॉंग्रेसच्या अध्यक्षस्थानावर बसलेले नेहरू सतरा वर्षांत पंतप्रधानकीच्या सिंहासनावर विराजमान होतील असं वाटलं नव्हतं. आणि त्यांचं निर्याण घडेल असंहि चार दिवसांपूर्वी, कुणाच्या ध्यानींमनीं नव्हतं! डेहराडूनला विश्रांतीसाठी जाण्यापूर्वी नेहरूंनी साडेसात महिन्यांच्या दीर्घावधीनंतर प्रेस कॉन्फरन्स घेतली, त्या कॉन्फरन्समध्ये कुणीतरी नेहरूंना प्रश्न केला की, " तुमच्या पश्चात् कुणाला वारस करण्याचं तुम्ही ठरवलं आहे ? " नेहरूंनी हंसतमुखानं उत्तर दिलं होतं, " माझ्या आयुष्याची दोरी इतक्यांत संपणार आहे असं मला वाटत नाही ! " आत्मविश्वासानं भरलेल्या या उद्गारांना पुरते पांच देखील दिवस झाले नाहीत तोंच नेहरूंनी या जगाचा निरोप घेतला !

नेहरूंचीं असंख्य दर्शनं माझ्या नजरेपुढून सरकत आहेत खरीं, परंतु त्यांतल्या त्यांत माझ्यापुढे स्थिर होत आहेत दोन प्रसंग ! भारतभूमीच्या रंगमंचावर स्वातंत्र्यसंग्रामाचं जें प्रदीर्घ महान् नाट्य झालं त्यांत चित्त थरारून सोडणारे अनेक प्रसंग झाले. परंतु सर्वांत संस्मरणीय आणि स्फूर्तिप्रद प्रसंग माझ्या मतानं कोणता म्हणाल, तर लाहोर येथील कॉंग्रेसच्या अधिवेशनांत रावी नदीच्या तीरावर रात्रीं बरोबर बाराचा ठोका पडून गेला आणि १९३० च्या नव्या संवत्सराचा पहिला क्षण उगवला तेव्हा

अधिवेशनाचे अध्यक्ष जवाहरलाल नेहरू यांनी स्वतंत्र भारताचा झंडा फडकाविला, तेव्हाचा प्रसंग ! ...स्वातंत्र्याची गंभीर प्रतिज्ञा एखाद्या पवित्र मंत्रघोषाप्रमाणे नेहरूंनी तीस हजार लोकांकडून वदवून घेतली ! त्या घटकेला अखिल भारतीय पुढारी म्हणून आणि गांधींच्या गादीचे वारस म्हणून जवाहरलाल नेहरू यांचा जन्म झाला ! एक इंग्रज चरित्रकार म्हणतो, " पोलिटिकली जवाहरलाल हॅड ॲराइव्हड्. "

दुसरा तितकाच चित्तथरारक प्रसंग माझ्या डोळ्यांपुढे स्थिर होतो तो पंतप्रधानकीचीं वस्त्रं जवाहरलाल नेहरूंनी अंगावर चढविलीं आणि केवळ हिंदी जनतेलाच नव्हे तर साऱ्या जगाला उद्देशून जें भाषण केलं त्या भाषणाचा प्रसंग !

त्यांचं हें भाषण ऐकण्यासाठी लक्ष लक्ष घरांतलीं माणसं रेडिओपुढे बसलीं होतीं. देशाच्या कानाकोपऱ्यांतल्या दूरदूरच्या खेड्यापाड्यांत देखील रोषणाई झालीं होती. दिल्लीची राजधानी तर विलक्षण नटली होती. विद्युत्‌दीपांच्या झगझगाटांनी उजळलेल्या, रस्त्यारस्त्यांतून नटलेल्या, थटलेल्या स्त्री-पुरुषांचे थवे हिंडत होते. लोकसभेच्या वर्तुळाकृति इमारती-भोवती तर गर्दीचा समुद्र हेलावत होता.

आंतल्या सुसज्ज भव्य सभागृहांत खादीच्या शुभ्र वेषांतल्या लोकांची दाटी दिसत होती. वरच्या गॅलरींत स्त्रियांच्या रंगीबेरंगीं वस्त्रांचीं इंद्रधनुष्यं पसरलीं होतीं. घड्याळाचे दोन्ही काटे बाराच्या आकड्याकडे सरकत होते...अखेर घटका भरली ! पंधरा ऑगस्ट १९४७ च्या पहिल्या प्रहराचा पहिला क्षण आला...सभागृहांत एकदम गंभीर स्तब्धता झाली...फिकट पण चमचमणाऱ्या किंचित गुलाबी रंगाची अचकन आणि शुभ्र गांधी टोपी अशा वेषांतली एक कांहीशी सडपातळ, कांहीशी उंच मूर्ती उभी राहिली...ते नेहरू होते. ते थकलेले दिसत होते. त्यांच्या भावपूर्ण मोठाल्या डोळ्यांखालच्या जागेवर काजळी दिसत होती. त्यांच्या कातीव चेहऱ्यावर शीण दिसत होता. त्यांच्या अचकनवरचं गुलाबाचं लाल फूल देखील कांहीसं कोमेजलेलं भासत होतं...नेहरू बोलूं लागले, आणि त्यांची वाणी

देशांतल्याच नव्हे तर दूरदूरच्या परदेशांतल्याहि श्रोत्यांच्या कानांवर पडूं लागली. त्यांच्या तोंडचं पहिलंच वाक्य अत्यंत परिणामकारक ठरलं :

" कितीतरी वर्षांपूर्वी दैवाशी आमच्या भेटीचं हें स्थळ आणि ही घटका आम्ही ठरविली होती. आज ती भेट घडत आहे. आणि ज्या स्वातंत्र्याची प्रतिज्ञा आम्ही केली, तें स्वातंत्र्य साकार होत आहे. बाहेरचं सारं जग निद्रेच्या आधीन झालेलं आहे. भारत जागृत आणि स्वतंत्र होत आहे. इतिहासांत असा एखादा क्षण मधूनच येतो, की ज्या क्षणीं एक युग संपतं आणि दुसरं सुरू होतं ! ज्या क्षणीं वर्षानुवर्ष मुकेपणांत आणि गुलामगिरींत राहिलेलं राष्ट्र स्वतंत्र आणि बोलकं होतं. अशा या गंभीर पवित्र क्षणीं भारतीय जनतेच्या, इतकंच नव्हे तर मानव जातीच्या सेवेची प्रतिज्ञा आम्ही करावयास हवी ! "

नंतरच्या सतरा वर्षांच्या काळांत या प्रतिज्ञेचं आचरण नेहरूंनी अंखडपणे केलं. तें करतांना त्यांच्या ठिकाणच्या ध्येयनिष्ठेची, श्रद्धेची, आणि धैर्याची कसोटी लागली. ते स्वतः अधिकाधिक उंच होत गेले. त्यांनी आपल्या प्रिय भारताची जगांतील प्रतिष्ठा उंच केली. ब्रिटिशांचं दास्यत्व करणारा स्वाभिमानशून्य, सामर्थ्यशून्य, दुबळा असहाय देश म्हणून ज्या भारताकडे जगांतील मोठीं राष्ट्रं पूर्वी बघत होतीं, त्या भारताची नैतिक उंची नेहरूंच्या ध्येय-प्रवृत्त पराक्रमानं अवघ्या दहा-पंधरा वर्षांत इतकी वाढली, की इंग्लंड, अमेरिका आणि रशिया यांसारखीं राष्ट्रं भारताला बरोबरीच्या नात्यानं वागवूं लागलीं, येवढंच नव्हे तर, जगांतल्या सर्व दलित समाजांना भारत म्हणजे एक आशास्थान वाटूं लागलं. भारताचं नेतृत्व खच्ची केल्याखेरीज आपला विस्तारवाद यशस्वी होणार नाही अशी चौ-माओची खात्री झाली, आणि भारताच्या सरहद्दीवर धडक देण्यासाठी त्यांनी चिनी फौजा पाठविण्याचं दुष्टकर्म केलं. या घटनेचे इतर काय अर्थ असतील ते असोत, परंतु एक निर्विवाद अर्थ असा की नेहरूंनी भारताला कल्पनातीत मोठेपणा मिळवून दिला. १९६२ सालीं अचानक घडलेल्या चिनी आक्रमणाला तोंड देण्यास आम्ही सुसज्ज नव्हतों ही शरमेची गोष्ट असेलहि; परंतु तें आक्रमण कां झालं ? तर नेहरूंच्या नेतृत्वाखाली भारत फार मोठा झाला

आणि होत जाणार असं चिनी कम्युनिस्टांना वाटलं म्हणून; जग पादाक्रांत करूं पाहणाऱ्या चिनी खल पुरुषांना असह्य वाटावी इतकी भारताची शान वाढली म्हणून ! नेहरूंच्या कर्तृत्वाचं मूल्यमापन करतांना ही गोष्ट कटाक्षानं लक्षांत ठेवावी लागेल.

'महात्मा गांधी म्हणजे एक रहस्यमय कूट प्रश्न असून या गृहस्था-विषयी जगानं सम्यक् ज्ञान शक्य तितक्या लवकर करून घ्यावं हें बरं' असा अर्थगर्भ उद्गार एका मोठ्या इंग्रज लेखकानं काढला होता. 'कूट प्रश्न' असा शब्द नेहरूंचं वर्णन करतांना वापरावा लागेल असं वाटत नाही. ज्यांच्या संकल्पांची आणि कृत्यांची कुंडली कधी कुणाला मांडतां आली नाही असे गृहस्थ गांधीजी होते. नेहरूंची गोष्ट या कोटींतली नव्हती. त्यांच्या कीर्तीचीं कारणं उघड होतीं. देशाच्या प्रतिष्ठेबद्दलची जिद्द, देश-बांधवांच्या प्रेमाबद्दलची खात्री, सेवेची तळमळ, त्याग, निर्भयता, कठोरता आणि मृदुताहि. या गुणांत नेहरूंचं सामर्थ्य होतं. त्यांचा व्यासंग, मौलिक विचारांची झेप, आणि लेखणीचं आणि वाणीचं सामर्थ्य या गोष्टी जगमान्य झाल्या. आणि या सर्व गुणांना ज्यामुळे अपूर्व उजाळा मिळावा असं सुस्वरूप निसर्गानं त्यांना दिलं होतं. 'जगांतला सर्वांत सुंदर वक्ता' असं नेहरूंचं वर्णन करून एका अमेरिकन लेखकानं लिहिलं कीं, "नेहरू इतके देखणे नसते तर त्यांच्या वक्तृत्वाची अशी मोहिनी लाख लाख लोकांच्या विराट् सभांवर पडली असती कीं नाही कोण जाणे ! नेहरूंचं वक्तृत्व ज्या वेळेस कानावर पडत असतं त्या वेळेस ते त्यांच्या आंतरिक आवेशानं अधिकच नयनमनोहर भासूं लागतात !"

नेहरूंच्या थोरवीचं मूल्यमापन चालू घटकेला नीटसं करतां येणार नाही. त्यासाठी आणखी काळ लोटायला हवा. परंतु या संबंधांत नेहरूंची स्वतःची भूमिका काय होती तें सूचित करणारे उद्गार 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' या ग्रंथाच्या अखेरीस त्यांनी काढलेले आहेत. ते लिहितात, "आणखी कांही दिवस देशाचं भवितव्य घडविण्याचं काम आम्ही करूं. परंतु आमची वेळ आली कीं आम्ही जाऊं. आमची जागा दुसरे नेते घेतील. आमची कामगिरी आम्ही कशी काय पार पाडली ? या प्रश्नाचं उत्तर भावी पिढ्यांनी

द्यायचं आहे. आमचं यशापयश मोजायचं कोणत्या मापानं ? तेंहि सांगणं कठीण आहे. आम्ही माणसंच आहोंत, आणि आम्ही कांही चुका केल्या असतीलहि. परंतु एक गोष्ट खरी की आम्ही संकटाला किंवा मृत्यूला कधी भ्यालों नाही, आणि ज्याची शरम वाटावी असं कृत्य आमच्या हातून घडलं नाही. मानवतेची मुक्तता हें जगांतलं सगळ्यांत मोठं कार्य आहे. या महान् पवित्र कार्यांत जर माझं सबंध सामर्थ्य आणि आयुष्य खर्च झालं असेल तर माझं आयुष्य धन्य झालं असंच म्हणावं लागेल ! ”

होय, पंडितजी ! तुमचं आयुष्य खरोखर धन्य झालं ! आणि ज्या देशाला तुमचं नेतृत्व लाभलं तो देशहि धन्य झाला ! ज्या पिढीनं तुम्हांला डोळे भरून बघितलं, तुमचीं भाषणं ऐकलीं, तुमच्या रागालोभाच्या लहरी पाहिल्या, तुमच्यावर नितांत प्रेम करण्याची संधि ज्या पिढीला मिळाली, ती पिढीदेखील धन्य झाली ! पंडितजी, तुम्हांला निरोप देतांना अश्रु आवरत नाहीत. अंतःकरणाचा थरकाप होतो. तुम्हांला घट्ट घट्ट धरावं, आमच्यांत ठेवून घ्यावं असं वाटतं, परंतु तें सामर्थ्य आमच्या अंगीं नाही. तुम्हांला निरोप दिलाच पाहिजे ! जा ! पंडितजी जा ! अनंताच्या प्रवासाला तुम्ही निघालां आहांत ! शुभास्ते पंथानः सन्तु !

ग्रंथ संग्रहालय
क्र. 94929
शाखा
मराठी ग्रंथ स्थलांतर
REFBK-0015121